दीपावली २०२० / मेहता मराठी

# ग्रंथजगत

पृष्ठे : १६० । किंमत : ₹ १००





ऐ रोशनियों के शहर

कौन कहे किस सम्त है तेरी रोशनियों की राह

हर जानिब बेनूर खड़ी है हिज्र की शहर पनाह

थक कर हर सू बैठ रही है शौक़ की माँद सिपाह

आज मेरा दिल फ़िक्र में है

ऐ रोशनियों के शहर

शब ख़ूँ से मुँह फेर न जाए अरमानों की रौ

ख़ैर हो तेरी लैलाओं की, उन सब से कह दो

**आज की शब जब दिए जलाएँ ऊँची रखें लौ**

**-फ़ैज अहमद फ़ैज**

मृत्यूच्या कृष्णछायेनं व्यापलेलं यंदाचं वर्ष दीपावलीच्या तेजोमय प्रकाशात नव्या आशेसह उजळून निघावं म्हणून आशेच्या दीपांची ज्योत आणखी उंच उजळू... फैज यांच्या या ओळींसारखीच...

# मेहता मराठी ग्रंथजगत

दीपावली २०२०

वर्ष विसावे

किंमत ₹ १००


संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

संपादन साहाय्य
**योजना यादव**
**अंजली पटवर्धन**

मुखपृष्ठ
**चंद्रमोहन कुलकर्णी**

मांडणी
**मेहता पब्लिशिंग हाऊस**



संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२



या अंकातील लेखांतील मते त्या त्या लेखकाची असून संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.



# अंतरंग


**संपादकीय** /६

**<u>कोरोना काळातलं सृजन...</u>**

**पुस्तकवाले**
आशय वाळंबे / ११

**इनडोअर-आउटडोअर**
चंद्रमोहन कुलकर्णी / १७

**माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार ।**
**मज माध्यम बोलवितो**
रणधीर शिंदे / २३

**लॉकडाउन फिल्म**
गजेंद्र अहिरे / २९

**कोरोना...कोरोना...आणि प्लेग...**
डॉ. उमा वि. कुलकर्णी / ४१

**<u>कोरोना...तिथला...आपला...</u>**

**मांजर, मुलं, नवरा आणि...**
मोहना प्रभुदेसाई-जोगळेकर / ४७

**मंत्र Stay Safeचा**
शोभा चित्रे / ५१

**ओरिसातील कोरोना आणि मी**
राधा जोगळेकर / ५५

**कोरोना इथला, कोरोना तिथला, कोरोना बंगालचा**
सई कुलकर्णी-मुखर्जी / ५९

**कोविड-१९ आणि अमेरिका**
लीना सोहोनी / ६३

**कोरोनाच्या नंतरचा - भविष्यकाळ ?**
डॉ. अनिल गांधी / ६७

**विज्ञानविश्व**

**हिरवे रक्त**
जोसेफ तुस्कानो / ७३

**ह्यूमन राइट्स जिंदाबाद!**
डॉ. बाळ फोंडके / ७७

**प्राचीन विज्ञान**
लीना दामले / ८३

**वासांसि जीर्णानि यथा विहाय (पुनर्जन्म)**
शशिकांत काळे / ८७

**नॅनोशेल**
डॉ. संजय ढोले / १०५

**पुस्तकाच्या पानांतून...**

**भन्नाट प्रीतीचं टिप्पूर चांदणं - गाभुळलेल्या चंद्रबनात**
सोपान खुडे / ११९

**मदाम बटरफ्लाय**
रेई किमुरा / १२३

**लेडी जल्लाद**
के.आर.मीरा / १२७

**जालियनवाला बाग**
अमेय जाधव / १३१

**प्रपात (आत्मवंचना)**
अरुण शौरी / १३५

**आनंदनिधान फलाट (कॉकटेल कार्निव्हल)**
चेतन जोशी / १३९

**तंबूतला सिनेमा (हाऊज दॅट!)**
सुप्रिया वकील / १४३

**नो नॉट नेव्हर**
बाबाराव मुसळे / १४७

**रांगोळी (रुजवाई)**
प्रतिमा कुलकर्णी / १५१

**दिनविशेष** / १५५

**कविता**

वैभव देशमुख / १०
**दुविधा** पूजा भडांगे / ३९
योजना यादव / ४६
प्रिया जामकर / ७२
**कवितांमधलं विज्ञान**
अनुवाद : सुप्रिया वकील / ११५



## संपादकीय

# तमसो मा ज्योतिर्गमय।

*फिटे अंधाराचे जाळे, झाले मोकळे आकाश*
*दरीखोऱ्यांतून वाहे एक प्रकाश प्रकाश*

सुधीर मोघे यांच्या गीताच्या या ओळी मनावर नेहमीच प्रसन्नतेचा शिडकावा करतात; पण आज या ओळींचं स्मरण वेगळ्या संदर्भात होतंय; कारण आपण सगळे कोरोनाच्या सावटाखाली जगतोय आणि हे कोरोनारूपी अंधाराचं जाळं कधी फिटणार याची प्रतीक्षा करतोय. किंबहुना, या ओळींचा प्रत्यक्ष प्रत्यय लवकरच यावा, अशी प्रार्थना करतोय. व्यवहार सुरू आहेत; पण मनात कोरोनाची धास्ती आहेच. एक जीवाणू सगळ्या जगाला वेठीला धरू शकतो, याचा विदारक अनुभव आज सगळं जग घेतंय. त्यामुळे 'कोरोना'ला केंद्रस्थानी ठेवूनच दिवाळी अंक करावा, असं आम्हाला वाटणं अगदी साहजिक होतं. त्याप्रमाणे तो आम्ही केला आणि तो तुमच्यापर्यंत पोचवताना आम्हाला विशेष आनंद होतोय. विशेष अशासाठी, की लॉकडाउनमुळे प्रकाशन व्यवसायावरही जे आर्थिक संकट आलं होतं, त्याला तोंड देऊन दिवाळी अंक तुमच्यापर्यंत नेण्याचं भाग्य आम्हाला लाभलंय.

सगळं जग एकाच वेळी एका संकटाला तोंड देतंय, असं पहिल्यांदाच घडलं आहे. त्यामुळे प्रत्येक ठिकाणी परिस्थिती थोड्याफार फरकाने सारखी असली तरी अनुभवांच्या छटा, प्रत्येकाचा त्या परिस्थितीकडे बघण्याचा दृष्टिकोन यात वेगळेपण असू शकतं. तर कोरोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीतले अनुभव सांगणारे, कोरोना आणि कला यांची सांगड घालणारे काही लेख आम्ही या अंकात समाविष्ट केले आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आपल्या 'आतला' कलाकार काय करत होता, याचं कथन केलंय चंद्रमोहन कुलकर्णी आणि गजेंद्र अहिरे यांनी. चंद्रमोहन कुलकर्णी त्यांच्या 'इनडोअर-आउटडोअर' या लेखातून अर्थातच चित्रकार म्हणून प्रकटलेत. आजूबाजूला एवढं काही घडत असतानाही त्यांच्यातला 'चित्रकार' कसा थंडावला होता, व्यक्त होत नव्हता आणि मग हळूहळू त्यांचं सृजन कसं जागं व्हायला लागलं, याचं लालित्यपूर्ण, कलात्मक दर्शन त्यांनी घडवलंय. त्यांची लेखणीही कुंचल्यासारखीच चालते, आखीव-रेखीव आणि प्रमाणबद्ध. गजेंद्र अहिरे यांनी 'लॉकडाउन फिल्म' या लेखात एका चित्रपटाची कथा सुचल्यापासून ते तिच्या चित्रीकरणापर्यंतचे अनुभव रंगवलेत. कोरोनाच्या या तांडवामुळे त्यांना चित्रीकरण सुरू करण्यासाठी किती व्यावहारिक अडचणी आल्या, तसेच त्या अडचणींवर मात करून त्यांनी चित्रीकरण कसं सुरू केलं आणि त्यांचे चित्रीकरणादरम्यानचे दिवस याचं एक चलत्‌चित्रच त्यांनी सादर केलं आहे, जे चित्रपटनिर्मितीची प्रक्रियाच उलगडून दाखवतं आणि त्यातील खाचखळगेही दाखवून देतं.

उमा कुलकर्णी 'कोरोना...कोरोना...आणि प्लेग...' या लेखात त्यांच्या कंबोडिया-व्हिएतनाम प्रवासाबद्दल लिहितात. कोरोनाचं गांभीर्य भारतापर्यंत पोचलं नव्हतं; पण इतर देशांना त्या गांभीर्याची जाणीव व्हायला लागली होती, अशा काळात त्यांचा हा प्रवास झाला. तसेच लॉकडाउनच्या आठवणीही त्यांनी जागवल्या आहेत. 'संस्कार'आणि 'गृहभंग'मध्ये प्लेग कसा अग्रस्थानी आहे, याचं विवेचन त्यांनी केलं आहे.

लीना सोहोनी, मोहना प्रभुदेसाई-जोगळेकर आणि शोभा चित्रे यांनी अमेरिकेतील लॉकडाउनचे अनुभव सांगितले आहेत. लीना सोहोनी यांनी 'कोविड-१९ आणि अमेरिका' या लेखात अमेरिकेतील लॉकडाउनची आणि भारतातील लॉकडाउनची जीवनावश्यक वस्तू, वर्क फ्रॉम होम, शाळा इ.च्या संदर्भात तुलना केली आहे. मोहना प्रभुदेसाई-जोगळेकर यांनी 'मांजरं, मुलं, नवरा आणि मी' या लेखात कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर उद्भवलेलं त्यांच्या मांजरीचं आजारपण, पोलिसांच्या अत्याचारात कृष्णवर्णीय जॉर्ज फ्लॉईड याचा झालेला मृत्यू आणि अमेरिकेत त्याचे उमटलेले

पडसाद या घटना सांगितल्या आहेत. तर शोभा चित्रे यांनी 'मंत्र **Stay Safe**चा' या लेखात अमेरिकेत त्या ज्या भागात राहतात त्या भागातील परिस्थिती, अमेरिकेतील एकूण परिस्थिती इकडे लक्ष वेधलं आहे.

भारतातील ओरिसा, बंगाल येथील कोरोनामय वातावरणाचा वेध घेतला आहे अनुक्रमे राधा जोगळेकर, सई कुलकर्णी-मुखर्जी यांनी. 'ओरिसातील कोरोना आणि मी' या लेखात राधा जोगळेकरांनी ओरिसा सुरुवातीच्या काळात कसं कोरोनामुक्त होतं आणि नंतर तिथला प्रादुर्भाव कसा वाढत गेला, त्यांनी लॉकडाउनच्या काळात तयार केलेला वीसजणींचा what's app ग्रूप आणि त्यावर होणारं विविध विषयांवरचं विचारमंथन (कोरोना हा विषय वगळून), तसेच त्यांच्या डॉक्टर पतीची त्या काळातील प्रॅक्टिस, याबद्दल लिहिलं आहे. सई कुलकर्णी-मुखर्जी यांनी 'कोरोना इथला, कोरोना तिथला, कोरोना बंगालचा' या लेखातून बंगालमधील शिलीगुडी आणि एकूणच, बंगालमधील कोरोनामय परिस्थितीचा वेध घेताना त्यांचं लॉकडाउनमधील कौटुंबिक जीवन, शिलीगुडीतील जनजीवन, त्या काळात पाहिलेले चित्रपट, समाजाची आर्थिक स्थिती, त्याच काळात तिथे आलेलं चक्रीवादळ इ.बद्दल सांगितलं आहे.

कोरोनाच्या काळात डिजिटल साहित्याला उधाण आलं होतं. अशा या डिजिटल साहित्याचा विश्लेषणात्मक आढावा प्रा. रणधीर शिंदे यांनी घेतला आहे.

आशय वाळंबे यांनी लॉकडाउनच्या काळात लोकांपर्यंत पुस्तकं पोचवण्याचं उल्लेखनीय काम केलं आणि लॉकडाउनमध्ये सुरू केलेल्या या उपक्रमाला इतका भरभरून प्रतिसाद मिळाला, की त्यांनी 'पुस्तकवाले' ही संस्था स्थापन केली. ही संस्था सोसायट्यांमध्ये पुस्तकं घेऊन जाते आणि त्यांची विक्री करते. वाचनसंस्कृती रुजवण्याच्या या अनोख्या उपक्रमाविषयी आशय वाळंबे यांनी 'पुस्तकवाले' या लेखात सविस्तर लिहिलं आहे.

कोरोनाच्या या संकटामुळे ज्या मनोवेदना लोकांना भोगायला लागल्या आहेत/लागत आहेत, त्याला कवितेतून मूर्त रूप दिलं आहे, पूजा भडांगे यांनी. याखेरीज सुप्रिया वकील यांनी अनुवादित केलेल्या कविताही अंकात समाविष्ट केल्या आहेत.

कोरोनामुळे अस्वस्थ झालेल्या मनांवर विज्ञानकथारूपी रंजनाचं शिंपण करायला आम्ही विसरलो नाही. जोसेफ तुस्कानो यांची 'हिरवे रक्त', डॉ. बाळ फोंडके यांची 'ह्यूमन राइट्स झिंदाबाद!', डॉ. संजय ढोले यांची 'नॅनोशेल' आणि शशिकांत काळे यांची 'वासांसि जीर्णानि यथा विहाय (पुनर्जन्म)' या त्या कथा आहेत. एक तरुण स्वत:चा ब्लड ग्रूप जाणून घेण्यासाठी पॅथॉलॉजी लॅबमध्ये जातो. ज्या वेळेला नर्स सिरिंजमध्ये त्याचं रक्त घेते तेव्हा ती किंचाळते; कारण त्याचं रक्त हिरवं असतं. त्याचं रक्त हिरवं का असतं, याची कथा आहे 'हिरवे रक्त.' विज्ञान आणि ह्यूमन राइट्स यांच्यातील संबंधाचं व्यामिश्र चित्रण केलं आहे 'ह्यूमन राइट्स झिंदाबाद!' या कथेत. नॅनोशेलच्या प्रयोगातून कर्करोगावर रामबाण उपाय शोधणाऱ्या डॉ. समर यांची यशोगाथा सामोरी येते 'नॅनोशेल' या कथेतून. 'वासांसि जीर्णानि यथा विहाय (पुनर्जन्म)' ही कथा आहे विवेक संझगिरीची. विवेकला अचानक इंग्लंडला जावं लागतं आणि तिथे गेल्यावर शीतनिद्रा, क्लोन अशा वैज्ञानिक बाबी धक्कादायकपणे त्याच्यासमोर येतात. या दोन्ही गोष्टी त्याच्या जीवनात कशी उलथापालथ करतात त्याचं रहस्यमय चित्रण या कथेत केलं आहे. या विज्ञानकथांच्या जोडीला लीना दामले यांचा 'प्राचीन विज्ञान' हा विज्ञान लेखही या अंकात आम्ही अंतर्भूत केला आहे. ज्ञानेश्वरीतील ११व्या अध्यायातील काही ओव्यांची आणि रामदासांच्या काही समासांची सांगड विज्ञानाशी कशी घालता येऊ शकते, याचं सोदाहरण विवेचन त्यांनी या लेखात केलं आहे.


तर असा हा आमचा विचारसंपन्न आणि आशयघन दिवाळी अंक तुमच्या पसंतीस नक्कीच उतरेल.

कोरोनामुळे काही काळ जीवनावश्यक आणि अत्यावश्यक व्यवहार वगळता बाकी सगळं ठप्प झालं होतं; पण जिवंत माणसाचं मन आणि मेंदू कधी थांबत नाही. त्यामुळे याही काळात माणसं चिंतन करत होती. व्यक्त होत होती. आम्हीही त्याला अपवाद नव्हतो. लॉकडाउनच्या काळात आम्ही 'कोरोना नकोना' हे प्रासंगिक आणि '३५ दिवस' हे राजकीय, अशी दोन ई-बुक्स प्रकाशित केली.

तेव्हा जगभरातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवन कोरोनाने ढवळून काढलं. वैद्यकीय, वैज्ञानिक, आणि अन्य क्षेत्रांसमोर आव्हानं उभी केली. माणसाला त्याची जागा दाखवून दिली. तर कोरोनामुळे जी अभूतपूर्व आणि गुंतागुंतीची परिस्थिती निर्माण झाली त्यावर एक कालजयी महाकादंबरी निर्माण व्हावी, अशी अपेक्षा उमाताईंनी त्यांच्या लेखात व्यक्त केली आहे. ती अपेक्षा येत्या काळात फलद्रूप होवो, ही सदिच्छा!


सामाजिक अंतराचं भान राखून आणि नियमांचं योग्य पालन करून यंदाची दिवाळी साजरी करू या ! पोलीस, डॉक्टर्स, नर्सेस, सफाई कर्मचारी यांच्याबद्दल परत एकदा कृतज्ञता व्यक्त करूयात. कोरोनामुक्तीसाठी प्रयत्न चालू आहेत, त्या प्रयत्नांना यश लाभावं आणि तुम्हाआम्हाला मोकळा श्वास घेता येवो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

तमसो मा ज्योतिर्गमय।




ही दीपावली आणि नूतन वर्ष आपणा सर्वांना सुखसमृद्धीचे जावो, ही कामना !

# पुरस्कार



## नागकेशर

विश्वास पाटील लिखित 'नागकेशर' या कादंबरीस
कोल्हापूरचा 'शंकर पाटील सृजन साहित्य पुरस्कार २०१९'
आणि
संगमनेर इतिहास संशोधन मंडळातर्फे 'कवी अनंत फंदी साहित्य पुरस्कार २०१९'




## डिंभक

डॉ. संजय ढोले लिखित 'डिंभक'
या विज्ञान कथासंग्रहास पुणे नगर वाचन मंदिरातर्फे
'कै.श्री.ज.जोशी ग्रंथ पुरस्कार २०१९'



## फोर सीझन्स

शर्मिला फडके लिखित 'फोर सीझन्स' या कादंबरीस
सर्वोत्कृष्ट कादंबरी विभागात सोलापूरचा
'लोकमंगल साहित्य पुरस्कार २०१८'



## नववर्षाची अनपेक्षित भेट!

'कांगारू देशीच्या गोष्टी' या मालिकेतील
'नववर्षाची अनपेक्षित भेट!'
या ख्रिस्तोफर चेंग आणि दी वू लिखित पुस्तकास
बालसाहित्य संमेलनातर्फे उत्तम अनुवादासाठी
'भा.रा.भागवत पुरस्कार २०१८'

# कोरोना काळातलं सृजन...

आपण ठरलो आहोत एका ऐतिहासिक अस्वस्थतेचे साक्षीदार...

साक्षीदार अनिश्चिततेचे

साक्षीदार हतबलतेचे

साक्षीदार शून्यत्वाचे

ही साक्ष मनावर ओरखडलेली राहील.

आज, उद्या आणि भविष्याच्या प्रत्येक पानावर

शब्दातून... चित्रातून... चलचित्रातून...

सगळ्या अभिव्यक्तीतून...

जगाने ठेवले पाण्यात देवाला
कसा मागायचा आधार बुडत्याला

हसू, अश्रू, निराशा, दु:ख, आशा, सल
फळे आली किती एकाच झाडाला

अशी का माणसांनी झाकली तोंडे
गुन्हा हातून यांच्या कोणता झाला

उभा तो वेगळ्या लोकांमधे आहे
तुझा आवाज नाही यायचा त्याला

उभ्या गावास कळला आपला ठेपा
अता ना भेटता येणार ठेप्याला

जगाचे वाहतो सुखदु:ख कवितेतून
किती असणार किंमत या हमालाला

उन्हे येतील आता गारव्यासाठी
अता होईल पिवळा आपला पाला

उद्या गावातुनी या जाउया निघुनी
पहाटे पाचला तू पोच फाट्याला

**-वैभव देशमुख**



# पुस्तकवाले

आशय वाळंबे



*किताबें झाँकती हैं । बंद आलमारी के शीशों से ।*
*बड़ी हसरत से तकती हैं ।।*
*महीनों अब मुलाकातें नहीं होती ।*
*जो शामें उनकी सोहबत में कटा करती थीं ।।*
*अब अक्सर गुज़र जाती हैं । कम्प्यूटर के पर्दों पर ।*
*बड़ी बेचैन रहती हैं किताबें ।।*

**– गुलज़ार**

पुस्तकांप्रमाणेच, कधी बाहेर पडता येईल या प्रश्नाने मी, माझे कुटुंब, माझे शहर, माझा देश आणि सर्व मनुष्यगण गेले सहा महिने अस्वस्थ आहे. गेल्या १०-१२ वर्षांत जे काही वाचन केलं ते सगळं एका कपाटात बंदिस्त होतं. लॉकडाउनच्या काळात पुस्तकांचं कपाट असलेली खोली वर्क फ्रॉम होमची खोली झाली होती. वेळ मिळेल, तेव्हा कॉम्प्युटरवर वेबसिरीज, यु ट्यूब बघणं सुरूच होतं. सलग तीन-चार महिने दिवसातले सात-आठ तास समोर कॉम्प्युटर होता; पण मान वर केली आणि नजर फिरवली की, कपाटातील पुस्तकं दिसायची. कपाट उघडून आधी कधीतरी वाचलेलंच पुस्तक पुन्हा हातात घेतलं आणि 'पुस्तकवाले'च्या प्रवासाला सुरुवात झाली. बहुतांश पुस्तकं पहिल्यांदा वाचताना पटापट संपवण्याच्या घाईत वाचलेली होती. लॉकडाउनच्या निमित्ताने काही पुस्तकं चघळायला मिळाली. हे तीन महिने रोज एक-दोन तास वाचनाची सवय लागली. वैयक्तिक आनंद मिळत होता. दिवसभर किंवा वीकएंडला काय करायचं, या प्रश्नाला काही प्रमाणात उत्तर मिळालं. हळूहळू लॉकडाउन उठवण्यात आलं. जवळच्या लोकांकडे जाणं-येणं सुरू झालं. कुठल्याही घरात लहान मूल असेल तर जाताना एक पुस्तक घेऊन जायचं, ही आम्ही स्वतःहून लावून घेतलेली एक सवय. बाणेरला 'रोहन लेहेर २' या मोठ्या सोसायटीमध्ये राहणाऱ्या मित्राकडे जाणार होतो. त्याच्या पाच वर्षांच्या मुलासाठी आणि माझ्या चार वर्षांच्या मुलीसाठी कोथरूड इथल्या 'पुस्तक पेठ' दुकानात काही पुस्तकं आणायला गेलो, तेव्हा संजय जोशींबरोबर लॉकडाउनचा पुस्तकविक्रीवर झालेला इम्पॅक्ट आणि विक्री अजून कशी वाढवता येईल, यावर काही मोघम चर्चादेखील झाली. फ्रँकलिनच्या गोष्टींचा संच घेऊन आलो. 'अशी पुस्तकं कुठे मिळतात? ॲमेझॉनवर नाही दिसत आणि क्रॉसवर्डमध्ये हरवून जायला होतं' असा प्रश्न मित्राच्या बायकोने विचारला. घरी येताना 'विक्री कशी वाढवता येईल?' हा पुस्तक पेठेचा प्रश्न आणि 'ही पुस्तकं मिळतात कुठे?' हा मैत्रिणीने विचारलेला प्रश्न या दोन्हीचे उत्तर म्हणजे पुस्तकवाले.






दुसऱ्या दिवशी पुस्तक पेठेशी बोलून काही पुस्तकं विकत घेतली आणि मित्राला 'त्यांच्या सोसायटीमध्ये येऊ शकतो का,' असं विचारलं. Dmart, चितळे, भाजी यांच्या गाड्या येत असल्यामुळे काही अडचण नव्हती. त्या गाड्यांच्या ऐवजी 'पुस्तकांची गाडी' अशी कल्पना मांडली. तीन बॅग भरून साधारण ३०० पुस्तकं निवडली - एक बॅग लहान मुलांची, एक बॅग मोठ्यांसाठी मराठी आणि एक इंग्लिश पुस्तकांसाठी. तीन टेबल्स, हॅन्ड सॅनिटायझर, स्प्रे हे साहित्य आमच्या टाटा टिआगोमध्ये भरून मी आणि माझी बायको सकाळी नऊला बाणेरला पोहोचलो. फार तर एकही पुस्तक विकलं जाणार नाही, ही एकच रिस्क होती आणि त्यासाठी पुस्तक पेठेचे संजय जोशी आणि माधव वैशंपायन यांनी पाठिंबा दिला. तू घेऊन जा पुस्तकं. नाही विकली तर परत आणून दे. पुस्तकं निवडायला त्यांनी मदत केली.

कोरोनाचे सगळे नियम, पोलिसांची आणि सोसायटीची परवानगी या तीन गोष्टी आम्ही काळजीपूर्वक केल्या; पण त्याव्यतिरिक्त खूप विचार, चर्चा वगैरे न करता केलेली ही कृती होती. खूप चर्चा करून हे कसं चालणार नाही किंवा कशाला शनिवार – रविवार बाहेर पडा, या प्रतिवादाने आम्ही काही न करता बसलो असतो.

१ ऑगस्टला पहिला प्रयोग करायचं ठरवलं आणि संकल्प सोडला की, उरलेला २०२० हे पॉझिटिव्ह नोटवर संपवायचं. दर वीकेंडला कुठल्या ना कुठल्या सोसायटीमध्ये जिथे परवानगी मिळेल तिथे पुस्तकं घेऊन जायची. पहिल्या दिवशी मिळालेला प्रतिसाद खूपच उत्साहवर्धक होता. वय वर्ष सहा ते नऊ या वयोगटातील मुलांच्या चेहऱ्यावरची excitement बघून आम्हाला ऊर्जा मिळाली. पुस्तकं कशी रचावीत याच्या प्रॅक्टिकल टिप्स संजय जोशींनी दिल्या होत्या, त्याचा अरेंजमेंटमध्ये खूप उपयोग झाला.

पहिला प्रयोग उत्तम झाला! बऱ्याच वेळा हे आपलं नशीब किंवा मटका असतो. म्हणून लगेच दुसऱ्या दिवशी आम्ही वारज्याला श्रीराम सोसायटीमध्ये परवानगी घेऊन उभे राहिलो. राखी पौर्णिमेच्या निमित्ताने खूप लोकांनी बहिणीसाठी, भावासाठी पुस्तकांची खरेदी केली. तिसरा प्रयोग करण्यासाठी आम्ही तळेगावला योगीराज हॉलमध्ये गेलो. तिथेही उत्तम प्रतिसाद मिळाला.

सलग तीन प्रयोग अपेक्षेपेक्षा चांगले झाले, हे जाणवल्यावर या उपक्रमामध्ये पोटेन्शिअल आहे याची खात्री पटली. अपेक्षा काय होत्या आमच्या?

१. प्राथमिक अपेक्षा होती की, आपण निवडलेली पुस्तकं लोकांना आवडताहेत का?

२. येणारा वाचक एक वेळ रिकाम्या हाताने गेला तरी या उपक्रमाविषयी त्याला काय वाटतंय?

३. आर्थिक गणित समाधानकारक बसतंय ना?

या तीन प्रयोगांचा आढावा घेऊन आम्ही 'पुस्तकवाले' ही संस्था कागदोपत्री रजिस्टर केली. कुठलीही जाहिरात न करता केवळ वर्ड ऑफ माउथने सलग आठ आठवडे पुणे शहरातल्या विविध सोसायट्यांमध्ये आम्हाला जायची संधी मिळाली. वारजे येथील आदित्य गार्डन सिटीमधून कन्फर्मेशन आल्यावर एक सेकंद पोटात गोळा आला. १०१४ फ्लॅट्सची सोसायटी. आम्ही १०० -२०० फ्लॅट्ससाठीची पुस्तकं तीन बॅगजमध्ये भरून नेत होतो; पण १००० फ्लॅट्स म्हणजे दहापट. हीच संधी होती या मॉडेलची स्केलेबिलिटी चेक करायची. आम्ही मोठी उडी घ्यायची ठरवली.

‘Too Many Choices Creates Confusion’ हे डोक्यात ठेवून आम्ही पुस्तकं निवडली.

पुस्तकांचा स्टॉक तिप्पट केला. निवडक पुस्तकांच्या दोन-तीन प्रती ठेवल्या. एक नियम होता की, जी पुस्तकं मांडली असतील त्यातली जवळपास सगळी पुस्तकं आमच्या टीमपैकी कोणीतरी वाचलेली असावीत किंवा ते पुस्तक माहितीतील असावं, जेणेकरून आम्हाला त्याबद्दल बोलता येईल.

लहान मुलांच्या शेजारी पालकांसाठी इंग्लिश पुस्तकं, सीनिअर सिटिझन्ससाठी वेगळं टेबल, ज्यामुळे पुस्तकाचं मुखपृष्ठ दिसेल, जेणेकरून त्यांना नाव नीट वाचता येईल आणि कुठलीही घाई न करता ते बघता येईल. तीन फुटांचे अंतर मार्क करून ठेवले होते. आता लोकांना आपणहूनच सोशल डिस्टन्सिंगची सवय असल्यामुळे लोक निवांतपणे पुस्तकं बघत रेंगाळत होते.

आदित्य गार्डन सिटीमध्ये भरभरून प्रतिसाद मिळाला.

डेटाच्या युगात गट फीलिंग पण तितकंच महत्त्वाचं आहे. आम्ही आम्हाला आवडलेली पण तितकी प्रसिद्ध नसलेली पुस्तकंही नेली होती आणि ती वाचकांनी घेतल्यावर होणारा आनंद अवर्णनीय होता. उदा. लॉरी बेकरचे चरित्र, कॉन्स्टिट्यूशन ऑफ इंडिया फॉर किड्स.

आतापर्यंत १२ सोसायट्यांमध्ये आम्ही गेलो. त्यामध्ये दिसलेले काही पॅटर्न-

मराठी पुस्तकांमध्ये महारभारत, ऐतिहासिक हे नेहमीच बेस्ट सेलर होते. त्याबरोबर नरहर कुरुंदकरांच्या पुस्तकांना जबरदस्त मागणी आहे, हे बघून मनापासून आनंद झाला. लहान मुलांना मराठी वाचायची सवय व्हावी म्हणून माधुरी पुरंदरे यांची पुस्तकं, बोक्या सातबंडे, फास्टर फेणे ही पुस्तकं पालक आवर्जून खरेदी करतात. माधव खरेंचं ‘विमाने बनवा आणि उडवा’ हे पुस्तक मुलांमध्ये विशेष आवडीचं आहे. आजी स्वतःसाठी आणि वाचून दाखवण्यासाठी सुधा मूर्तींची पुस्तकं घेतात. मध्यमवयीन सेल्फ हेल्प, business संबंधित पुस्तकं घेताना दिसतात.

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे या डिजिटल फर्स्ट, किंडल, ipadच्या वादळात कागदाची पुस्तकं तग धरून आहेत. आम्हाला स्वतःला डिजिटल हे सोयीचं माध्यम वाटतं; पण पुस्तक दिसल्यावर त्याचे रंग, विविध फॉन्ट्स हे नजरेला खिळवून ठेवतात. हातात घेतल्यावर त्यांचा होणारा स्पर्श, कागदाचा पोत, नवीन पुस्तकाचा एक अनामिक सुगंध आपल्याला आकृष्ट करतो आणि हेच कारण पुस्तकं खरेदी करणाऱ्या बऱ्याच लोकांनी सांगितलं.

सुरुवातीला केवळ माझी बायको ऋतिका आणि मी हे दोघंच होतो; पण पोटेन्शिअल दिसायला लागल्यावर आमची भावंडं या उपक्रमात सामील झाली. आमची आठजणांची टीम आहे आणि हळूहळू त्याचा विस्तार होतोय. डेकॅथलॉनसारख्या दुकानात गेलात तर तिथे स्पोर्ट्स किंवा आउटडोअर enthusiasts असतात, जे ग्राहकांना नक्की काय घ्या हे सांगू शकतात.

सगळ्यांसाठी युनिफॉर्म ठरले, जबाबदाऱ्या वाटून घेतल्या. पुस्तक कोण आणणार, रेकी कोण करणार, सोशल मीडिया कोण बघणार,




कुठली पुस्तकं कुठे लावायची याचे नियम ठरले. येणाऱ्या वाचकाला पुस्तकं लवकर शोधता यावीत यासाठी लावतानाच त्याची नीट मांडणी करायची. कुठले विषय, लेखक कसे मांडायचे हे ठरलं. उदा - महाभारताशी संबंधित सगळी पुस्तकं एकत्र ठेवली तर जास्त सोयीचं होतं - युगंधर, मृत्युंजय, युगांत, व्यासपर्व, व्यासांचे शिल्प हे शेजारी ठेवल्याने निर्णय घेणं सोपं होतं. तसंच सुधा मूर्ती, अब्दुल कलाम, जयंत नारळीकर, स्टीफन हॉकिंग यांची पुस्तकं एकत्र ठेवायची.

प्रत्येक स्लॉटप्रमाणे हा सेटअप इव्हॉल्व्ह होतोय; पण एकूण पुस्तकांची संख्या ६००-७०० एवढीच ठेवू; कारण निवड करायला सोपं जातं. नवीन पुस्तकं आली तर काही पुस्तकं रिप्लेस करायची; पण एकूण पुस्तकं तेवढीच ठेवायची.

एका सेटअपसाठी जास्तीतजास्त चार लोक आणि कमीतकमी दोन लोक लागतात. प्रत्येक टेबलप्रमाणे पुस्तकांचे क्रेट्स भरून ठेवलेले असतात, जेणेकरून सेटअप करताना १५ मिनिटांत सेटअप होतो. पुन्हा क्रेट्स तसेच भरले तर पुढच्या सेटअपला सोयीचं होतं.

हे सगळं करताना एक गोष्ट पक्की होती की, आम्ही सेल्स टार्गेट ठेवणार नाही. आमचं टार्गेट आहे की, येणारे वाचक काही वेळ पुस्तकांबरोबर रेंगाळू देत, त्यावर चर्चा करू देत. त्यांनी एकही पुस्तक घेतलं नाही तरी चालेल; पण बाहेर पडताना ‘हे पुस्तकवाले करताहेत ते चांगलं आणि गरजेचं आहे. मी अजून दोन लोकांना सांगितलं पाहिजे’ अशी जाणीव झाली तरी आम्ही यशस्वी झालो म्हणू. सुदैवाने आतापर्यंत जे ६००+ वाचक आलेत, त्यांपैकी फक्त आठ-दहा असे असतील जे रिकाम्या हाताने परत गेलेत.

आता एका वेळी तीन टीम्स तीन ठिकाणी सेटअप करू शकतील,




इतकी इन्व्हेंन्टरी आणि लॉजिस्टिक्स सेट झालंय. 'पुस्तकवाले'मध्येसुद्धा आम्हाला पुस्तकप्रेमी हवे आहेत, जे लोकांना आपुलकीने पुस्तकांविषयी सांगतील. आमच्या उपक्रमात ज्या लोकांना सहभागी व्हायला आवडेल त्यांनी थेट संपर्क साधावा.

हे सगळं करत असताना पुस्तक पेठेचा पाठिंबा होताच. त्याबरोबरच पुण्यातील काही नामवंत प्रकाशकांनी आपणहून या उपक्रमात सहभागी होण्यास उत्सुक आहे, असं सांगितलं. मेहता पब्लिशिंग हाऊस, रोहन, ज्योत्स्ना, देशमुख या प्रकाशनांनी पुस्तकं उपलब्ध करून दिली. औंधमधील क्रॉसवर्ड हे भारतातील सगळ्यात मोठं बुक स्टोअर आहे. त्यांनी आम्हाला पूर्ण मोकळीक दिली. लहान मुलांची इंग्लिश पुस्तकं निवडण्यासाठी, IBDने प्रोत्साहन दिलं. डॉ. समीर कुलकर्णी आणि आनंद अवधानी यांनी मोलाचे सल्ले दिले. 'पुस्तकवाले' ही काही अनुभवांतून निर्माण झालेली संस्था नाही, तर एका संकल्पातून आणि प्रयोजनातून निर्माण झालेली संस्था आहे.

'मैं अकेला ही चला था जानिब-ए-मंजिल मगर... लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया।' असा प्रत्यय आम्हाला आला.

हे सगळं कशासाठी, हा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे.

एक १३ वर्षांचा दिव्यांग मुलगा उत्साहाने स्वतःच्या वाढदिवसाच्या निमित्ताने १०-१२ पुस्तकं घेऊन गेला. साहिल हा ११ वर्षांचा चुणचुणीत मुलगा आमच्याकडून आठ-नऊ पुस्तकं घेऊन गेला आणि तीन दिवसांत आम्हाला ई-मेल करून चार पुस्तकं वाचून झाली, पुन्हा कधी येणार असा प्रश्न विचारतो आणि अमुक अमुक पुस्तकं घेऊन या, असं हक्काने सांगतो, तेव्हा आम्हाला आमच्या कामाची दाद मिळते. 'ऋतुरंग'मध्ये एक ७५ वर्षांचे आजोबा शांतपणे सगळी पुस्तकं आणि उत्साहाचं वातावरण बघून आज ऋतुरंग सोसायटीची वास्तुशांत झाली, अशी प्रतिक्रिया देतात, तेव्हा आपण काहीतरी चांगलं करतोय याची जाणीव होते.

'वाचन संस्कृती' वाढवणे वगैरे इतके मोठे शब्द वापरण्याइतपत 'पुस्तकवाले' संस्था मोठी नाही किंवा ते आमचे ध्येय नाही. संस्कृती म्हणजे काय? तर संस्कार या शब्दाशी त्याचा संबंध आहे, असं माझं मत आहे. एखाद्या चांगल्या गोष्टीची जर सवय लावता आली तर त्याचं रूपांतर संस्कारांमध्ये होऊ शकतं. एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे ते संस्कार सजगतेने पोहोचवले पाहिजेत. दर महिन्याला जसं इतर गोष्टींचं बजेट असतं तसं पुस्तकांसाठी बजेट असायला काय हरकत आहे? संपूर्ण कुटुंब जर सिनेमाला, हॉटेलमध्ये एकत्र जातं, तर मग पुस्तक खरेदी करण्यासाठी का जाऊ नये? आमचं अगदी साधं प्रयोजन आहे की, ज्या वाचनाने आणि पुस्तकांनी आम्हाला वैयक्तिकरीत्या खूप आनंद, स्थैर्य, विश्वास, आशावाद दिला, त्या वाचनाच्या निमित्ताने आपण लोकांना एका सकारात्मकतेने जोडू या. 'पुस्तकवाले'च्या निमित्ताने सोसायटीमध्ये प्रसन्नता, ऊर्जा बघायला मिळते, जी आम्हाला प्रोत्साहित करते. तीन पिढ्या एकत्र येऊन पुस्तकं खरेदी करतात, हे दृश्यच फार समाधानकारक आहे आणि हीच खरी आमच्या यशाची पावती.

जोडोनिया जन उत्तम वाचावे । चैतन्य पसरवावे प्रत्येक घरी ।।

pustakwale@gmail.com





नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**'मेहता मराठी ग्रंथजगत' दिवाळी अंकास मिळालेले पुरस्कार**

महाराष्ट्र साहित्य परिषद अ.स. गोखले स्मृत्यर्थ **'रत्नाकर पुरस्कार' २००९**

मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या वतीने **'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २००९**

**'उत्कृष्ट अंक पारितोषिक' २०११**

रोटरी क्लब ऑफ पुणे, पर्वती आणि लोकमान्यनगर तर्फे

**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०१०**

**'रोटरी लोकमान्य पुरस्कार' दिवाळी अंक स्पर्धा २०११**

नंदा फाउंडेशनचा राज्यस्तरीय **'नविवा दर्जेदार दिवाळी अंक पुरस्कार २०१०'**

दिनमार्क पब्लिकेशन तर्फे **'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१७'**

दिनमार्क पब्लिकेशन तर्फे **'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार २०१८'**

**३ वर्षांची वर्गणी ₹४५०** | **५ वर्षांची वर्गणी ₹६००**

**'मेहता मराठी ग्रंथजगत' डिजिटल अंक**

**३ वर्षांची वर्गणी ₹३००** | **५ वर्षांची वर्गणी ₹४००**

**वर्गणीदारांना आमची सर्व पुस्तके सवलतीत मिळतील.**
**पोस्टखर्चासह रक्कम मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टद्वारा पाठवावी.**

**चेक किंवा डिमांड ड्राफ्ट 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या नावाने पाठवावा.**

**लवकरच वर्गणीदार व्हा व सवलतीचा लाभ घ्या**

**तीन वर्षांना २५%** | **आमच्या पुस्तकांवर वर्गणीदारांसाठी सवलत** | **पाच वर्षांना ३०%**




Available on
**play.google.com / store / books**
**www.amazon.in**

G Pay +91 94223 23039

# इनडोअर-आउटडोअर

चंद्रमोहन कुलकर्णी



एका अर्थानं मी बाहेरख्याली माणूस आहे असं म्हणायला हरकत नाही. बाहेर म्हणजे स्टुडिओच्या बाहेर, घराच्या बाहेर, भर गर्दीत रस्त्यावर, चौकात, तिठ्यावर, कट्ट्यावर, नदीकाठी, समुद्रावर, तुळशीबागेत, बोहरी आळीत, रेल्वे स्टेशनवर, बस स्टॅन्डवर. घर आणि स्टुडिओ सोडून इतर कुठेही !

माणसं न्याहाळायची मला सवय आहे. आवडतं. त्यांचे देह, बोली, देहबोली, कपडे, राहणीमान, हावभाव, लकबी. जाम घाम काढणाऱ्या गर्दीत जीव घुसमटला. वाहनांचे आवाज, विक्रेत्यांच्या आरोळ्या, तारस्वरातली बोलणी, लहान हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, सामान्य दर्जाचे बार, तिथे जमणाऱ्या माणसांची बोलणी हे सगळळं सगळळं कानावर पडलं, त्या किचाट गर्दीचा आपण स्वतःच एक 'विभाज्य' घटक झालो की, आपल्यातला जो कोणी सर्जनशील चित्रकार वगैरे असेल, तो जागा राहतो (म्हणजे, झोपत नाही.) असं सतत वाटत राहतं. 'विभाज्य' घटक अशासाठी म्हणालो की, त्या सगळ्याचा अविभाज्य घटक व्हायला मात्र माझं मन तयार नसतं.

मला अचानक कंटाळा येतो.

वाटतं, 'चला यार इथून, बास झालं.'

चला घरी, नाहीतर, स्टुडिओत.

स्टुडिओ किंवा घर सोडून कुठे बाहेरगावी, परदेशात फिरायला, मुलीकडे किंवा मित्रांच्या घरी, हॉटेलात, लॉजमध्ये जिथे कुठे मुक्काम असेल, ते ठिकाण त्या वेळेपुरतं आपलं घरच असतं. तर तशा अर्थानं तातडीनं 'घरी' परतण्याची अचानकच घाई होते.

अचानकच गर्दीत मन रमेनासं होतं.

घरी गेलो, स्टुडिओत गेलो की, नकळतच चित्रकला ताबा घेते.

मग, ते सगळं सुरू !

कॅनव्हास, रंग, कागद, पेन्सिली, ब्रश, पाणी, खडू, जलरंग, ॲक्रॅलिक, लिन्सिड ऑइल नि टरपेन्टाइन !

आयपॅड, आय पेन्सिल, माती, दगड, शिल्प. पसारा.

पसारा कोऱ्या कागदांचा, अर्धवट रंगवलेल्या कागदांचा आणि

पसारा : पूर्ण छापलेल्या कागदांचा !

लेखकांच्या, कवींच्या, समीक्षकांच्या हस्तलिखितांचा (हल्ली पीडीएफ फाइलींचा !)

आता ती गर्दी ! एका गर्दीतनं दुसऱ्या गर्दीत !

मग या गर्दीत राहून काम काम काम.

मजा येते. आनंद वाटतो.

आपण, आपण नसतोच कधी, असं वाटतं !

एकटं वाटत नाही, अडकलोय, बाहेर पडावं असं वाटत नाही. बाहेर पडलो की, गर्दीत मिसळावं, गर्दीचा कंटाळा आला की, आत जावं !

सांगण्याचा मुद्दा असा की, एके ठिकाणी विशिष्ट काळाच्या पुढे थांबणं कठीण होतं.

'लॉकडाउन' सहन होत नाही !

अगदी शांत, निसर्गरम्य वगैरे, थंड हवेच्या ठिकाणी जीव किती रमणार ? रोमॅन्टिक वगैरे ठिकाणी दोन-तीन दिवस ठीक वाटतं, नंतर कंटाळा येऊ लागतो. काही काळानं उबग आणि नंतर नंतर तर जीव घुसमटायलाच लागतो.

अशा ठिकाणी जाऊन चित्रं काढणं, रेखाटनं करणं वगैरे गोष्टी मी अगदी थोडासाच वेळ करू शकतो; बॅटरी जास्त पुरत नाही, एका जागी स्वस्थ बसून डिस्चार्ज होत असावी बहुतेक !

आत्ताचा लॉकडाउन तर फारच मोठा ठरला त्या मानानं. आपल्या सगळ्यांच्याच आयुष्यातला मोठा आणि कठीणही !

मार्चमध्ये जर्मनीत होतो. जिकडेतिकडे रोगराईचं भय. मायदेशी परतावं म्हणून मुक्काम, तिकिटं, व्हिसा, पासपोर्ट इत्यादी शंभर गोष्टी पुढे-मागे करून, उलटासुलटा प्रवास करून मिळेल त्या फ्लाइटनं भारतात म्हणजे मुंबईत परतलो. परदेशवारीचं किटाळ होतं म्हणून आरोग्य चाचणीचा रिपोर्ट हाती येण्यापुरता एका रात्रीचा मुक्काम मुंबईतच करून पुण्यात घरी परतलो, तेव्हा लॉकडाउनचं फर्मान निघालेलं होतंच.

लंडन-जर्मनीचा प्रवास मोठा नसला, तरी प्रचंड बोअर झालं होतं. म्हटलं, कुठे जाता आता, बसू काही दिवस घरातच !

विचार केला, एरवी आपण स्टुडिओत नाहीतर घरात कित्येक तास 'आत'च असतो; त्यामुळे आत्ता विशेष काही वेगळं वाटायचं कारण नाही.

पंधरा दिवस झाले !

कागदावर एक रेघ ओढली नाही की पुस्तकाची एक ओळ वाचली नाही. व्हॉट्स ॲप आणि फेसबुकात मी काही फारसा रमत नाही.

बातम्या किती बघणार?

'खास'गी वाहिन्यांवरून प्रसारित केले जात असलेले रुग्णांचे आकडे आणि लाल रंगाचे कोरोनाचे ते काटेरी चेंडू बातमीदारांच्या कर्कश आवाजात 'ब्रेकिंग न्यूज'मधनं अंगावर येऊ लागले !

कुठली क्रिएटिव्हिटी ?

केव्हा चित्रं काढणार? कसली काढणार? कशाला ?

आणखी पंधराएक दिवस उलटून गेले. घरात बसायचा कंटाळा बिलकूलच आला नव्हता. आपल्याच घरात बसायचा कंटाळा नाही येऊ शकत माणसाला. मी तर म्हणेन, कितीही दिवस आपण घरात राहिलो तरी कंटाळा येणार नाही; पण ते घरात राहणं आपल्या मर्जीनं असायला हवं.

दुसऱ्या कुणाच्या सांगण्यावरनं नव्हे ! अगदी मुख्यमंत्र्यांच्यासुद्धा नव्हे !

समजा, एखाद्या कवीला सांगितलं की, बाबा रे, किंवा बाई गं, घे हा प्रचंड वेळ, कागद, पेन घे, हवे तेवढे किंवा काय कॉम्प्युटर, की बोर्ड वगैरे जे काही आवडत असेल लिहिण्यासाठी साहित्य म्हणून, आणि लिही कविता, तर लिहील काय तो ?

सर्जन असं होत असतं तर आणखी काय हवं होतं माणसाला !

नाही होत अहो !

नाही तेव्हा ठार गर्दीमध्ये, मुंबईच्या भयाण गर्दीत, फास्ट लोकलमधनं प्रवास करताना, समुद्रकिनारी, हर्णेच्या बाजारात मत्स्यव्यवहार करताना, बँडवाल्यांच्या मिरवणुकीत, रंगारी मंडळींच्या आणि बांधकाम मजुरांची देहबोली न्याहाळताना अचानकच धमन्यांमधनं कसलीतरी द्रव्यं वाहू लागतात आणि वाटू लागतं, आत्ता चित्र काढलं

पाहिजे, चला चला, लवकर चला, चित्रकलेच्या गावी !

ऑनलाइन किंवा ऑफलाइन, अत्यंत महत्त्वाची, गंभीर मीटिंग सुरू असते, तेव्हा वाटतं, चला, गुरुजी, इथे तुमचं काम नाही, आत्ता चित्र नाही काढलंत तर एक्झिक्युटिव्ह व्हाल, जन्मभर एक्झिक्युटिव्ह राहाल, चला चला, पळा पळा !!

तर, लवकरच कळून चुकलं की, या लॉकडाउनच्या काळात आपल्या हातून चित्रकलेचं काही भलं होऊ शकत नाही.

काहीही हळवं, संवेदनशील, प्रयोगशील वाचावंसंसुद्धा वाटेनासं होत होतं.

खरंतर, वाचलं की सुचतं सुद्धा ना !

पण

अहो, मूड नको का वाचायबिचायचा ?

सर्वांत महत्त्वाचा घटक म्हणजे, अनिश्चितता ! किती काळ हे सगळं असंच सुरू राहणार, या विचारानं वैताग येऊ लागला.

नेटफ्लिक्स झालं, ॲमॅझॉन प्राइम, सोनी, डिस्नी सगळं होतं एका क्लिकवर. काही कोटी पुस्तकं होती.

समोर बायको.



शांत मनाची.

स्वच्छ अंघोळ करून, प्राणायाम, योगा, कपालभाती वगैरे करून; स्कर्ट-टॉप, साडी नेसून

या जागेवरनं त्या जागेवर.

हातात मोबाइल, वैश्विक बातम्या, गावाकडच्या बातम्या. पेट्रोलवाहतूक करणाऱ्या टँकरमधनं, वारुळातून मुंग्या बाहेर पडाव्यात तशी माणसं बाहेर पडताना तिनंच मला दाखवलं.

उलघाल, करुणा. इकॉनॉमिक्स, जर्मन भाषेचा सुफळ संपूर्ण अभ्यास सुरू. हार्मोनियम वादन. वाचन-लेखन.

आत हे.
बैठं सगळं.



बाहेर :

टीव्हीवर आम्ही पाहतोय, माणसं निघून चालली आहेत आपापल्या गावी. सैरावैरा धावतायत, सामान, बोचकी, मुलंबाळं, रेल्वे रूळ, माणसं चिरडली जातायत.

समोरच्या आयपॅडवर माझ्या नकळतच हे सगळं उमटू लागलं.

हवालदिल, अस्वस्थ इनडोअर पत्नीची रेखाटनं.

हवालदिल, आउटडोअर स्थलांतरितांची चित्रं.

-माणसं माणसं माणसं.

एकमेकांवर आदळतायत, रेषा एकमेकांवर आदळतायत, गुंताडा चाललाय.

पाय पाय पाय.


पाय घासले जातायत, टाचांना भेगा पडतायत, रेल्वे रुळांवर तुकडे तुकडे होतायत पावलांचे.

तुकडे होतायत माझे, तुकडे होतायत तुमचे, ब्रेक होतायत न्यूज, ब्रेकिंग न्यूज,


न्यूज : इनडोअर, न्यूज : आउटडोअर.

chandramohan.kulkarni@gmail.com

# बेस्ट सेलर्स





स्वामी




श्रीमान योगी




राधेय




पावनखिंड





ययाति





अमृतवेल




झोंबी





वपुर्झा





संभाजी





रुचिरा भाग-१




रुचिरा भाग-२




अदम्य जिद्द




नागकेशर





टर्निंग पॉइंट्स




द मॅजिक ऑफ
थिंकींग बिग




प्लेइंग इट माय वे





मी मलाला



आवरण



संवादु अनुवादु





द लास्ट गर्ल





लज्जा




फोर सीझन्स




बाजिंद




रेड टेप

# माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज माध्यम बोलविती

रणधीर शिंदे



जेव्हा तू झूम मीटिंगा अन् लाइव्ह करत होतास
तेव्हा किराणा दुकानवाला पैसे कमवत होता,
येड्या, जग किती बदललंय ना (कुणाल गायकवाड)

गेल्या सहा महिन्यांत कोरोना या संसर्गजन्य महामारीने साऱ्या पृथ्वीवर थैमान घातले आहे. असुरक्षितता, भीती, मृत्यूभय, मानसिक आजार, संभ्रम आणि संशयाचा हा कोविड काळ आहे. या काळाने मानवी स्वातंत्र्यावर व आविष्कारावर अनेक बंधने आणली. माणसाच्या सार्वजनिक वावरावर, तसेच त्याच्या मानसिक स्थितीवर त्याचा परिणाम झाला. या काळातील मानव समूहाचे आविष्कारस्वरूप बदलले. या स्थितिशील काळात सांस्कृतिक आविष्कारांनी नवी वळणे धारण केली. सर्जनशील तसेच विचारशील लेखनाविष्काराचे स्वरूपदेखील बदलले.

या काळात सामाजिक अवकाश हद्दपार झाला. लिहिणं, बोलणं, चर्चा यांवर या काळाने जवळपास बंदीच आणली. माणूस चार भिंतींच्या घरांमध्ये राहून इंटरनेट माध्यमांतून जगाशी जोडून घेऊ लागला. त्यासाठी तंत्रमाध्यमांचा विपुल वापर होऊ लागला. आविष्काराला नवेपणा प्राप्त होऊ लागला. सर्व स्तरांतील लहान-थोर मंडळी यात सहभागी झाली आहेत. फेसबुक, झूम, इन्स्टाग्राम, गूगलमीट, ट्विटर, व्हॉट्स ॲप समूहगट आणि इतरही माध्यमांचा वापर, प्रसरणशीलता वाढली. ब्लॉगलेखन, ई नियतकालिके, डिजिटल अंक प्रकाशित होऊ लागले. गावांमधून, वस्त्यांवरून, शहरांमधून तंत्रज्ञान आभासी माध्यमावकाश आकाराला आला. मनोरंजन उद्योग नव्या स्वरूपात शिफ्ट झाला. या नव्या आविष्काररूपात तंत्रज्ञानाचा मोठा सहभाग आहे. तंत्रज्ञानाविषयी नापसंती व्यक्त करणारी अनेक मंडळीही यामधून व्यक्त झाली. या तंत्रमाध्यमांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचा सर्वकालीन, सार्वत्रिक अशा प्रकारचा विनियोगव्यवहार. एक प्रकारचा खुलेपणा आणि व्यापक प्रसरणशीलता या माध्यमाने आणली. या तंत्रमाध्यमाने एक प्रकारचे लोकशाहीकरणच केले; त्यामुळे कोणालाही, कुठेही, कधीही, कशाही प्रकारे व्यक्त होण्याचा स्वातंत्र्यावकाश उपलब्ध झाला. ही सकारात्मक आणि धन स्वरूपाची बाब म्हणता येईल.

नवभांडवली तंत्रज्ञानाचे नवे समाजशास्त्र निर्माण झाले. त्याचा जगभर वेगाने प्रसार झाला. पृथ्वीतलावर आयटी कंपन्यांचा संचार सुरू झाला. हरएक माणसाकडे, व्यक्तीकडे ग्राहक म्हणून पाहिले जाऊ लागले. मानवी वर्तणुकीचे आणि विचार करण्याच्या पद्धतीचे सांख्यिकी स्वरूपाचे विश्लेषण करून त्याचे बाजारपेठेमध्ये रूपांतर केले जात आहे. पृथ्वीतलावरील साऱ्या माणसांवर त्याची अदृश्य नजर आहे. मानवी वर्तणुकीचे आणि विचारांचे निरीक्षण, विश्लेषण हे माध्यमनियंत्रक करत आहे. जाहिरातीच्या निरंतर प्रसारणातून नवे मार्केट विकसित झाले. स्मार्टफोनची अपरिहार्यता आणि त्याची निकड अपरिहार्य झाली. माणसाला तो अत्यंत जिवलग, जिवाभावाचा सहचर वाटू लागला. मोबाइल जवळ नसला की, माणसांत कमालीची अस्वस्थता आणि काहीतरी हरवल्याची भावना निर्माण झाली. स्मार्ट फोनशिवाय माणसाचे अस्तित्वच नाही, अशा प्रकारचे रचित या काळाने निर्माण केले. नवे मन घडवले जात आहे. माणसाच्या सवयी, आवडीचे व्यसनात रूपांतर केले जात आहे. या माध्यमाने संवादाच्या मिती सहस्रमुखी झाल्या. त्याची परिणामकारकता आणि प्रभावक्षमता वाढली. भाषा बदलली. इमोजी चिन्हांचा चमचमता अवकाश सार्वत्रिक झाला. सायबर समाज अस्तित्वात आला. मानवी आविष्काराला, अभिव्यक्तीला शिफ्ट करण्यात तंत्रज्ञानाला यश लाभले. कोणाकडे किती ॲप आहेत, यावरून त्याच्या प्रतिष्ठेच्या कल्पना ठरत आहेत. असंख्य ॲप्सच्या जाळ्यात गुरफटलेला समाज आजूबाजूला दिसत आहे. 'स्व'प्रेमाच्या अतिरेकी कल्पना या माध्यमाने निर्माण केल्या. सेल्फी समाज निर्माण होतो आहे. मला किती viewers आहेत किंवा किती लाइक्स आहेत त्यावर लक्ष ठेवले जात आहे. 'छबीदार छबी मी तोऱ्यात उभी, हजारात लाइक माझ्या डीपीला, सोशल मीडियाची राणी मी, हॅश टॅगवाली कहाणी मी' या गाण्यातदेखील समकालाचे प्रतिबिंब आहे. तंत्रज्ञान अवकाशाचा महास्फोट भविष्यामध्ये कोणत्या दिशेला जाईल याचा अंदाज वर्तमानाच्या भूमीवरून आपण बांधू शकतो.

०२

या तंत्रज्ञान माध्यमावर जुन्या तसेच नव्या पिढीतीलही मंडळी अधिक गंभीरपणे व्यक्त होत आहेत. विशेषतः या काळात मुक्त पत्रकारितेला नवे स्वरूप प्राप्त झाले आहे. पारंपरिक मुद्रित माध्यमांची चौकट ओलांडून अनेक विषयांवर नावीन्यपूर्ण रीतीने लेखन केले जात आहे. हेमंत देसाई, निखिल वागळे, सुनील तांबे, दत्ता देसाई, अरुण खोरे, विजय चोरमारे, संजीव चांदोरकर आनंद शितोळे या लेखकांनी समाज पत्रकारितेला या माध्यमातून नवे आयाम मिळवून दिले. रूढ, परंपरानिष्ठ कक्षेत न सामावणाऱ्या विषयांना नवा अवकाश मिळवून दिला. तो सामाजिक, राजकीय हस्तक्षेप आणि व्यवस्था टीकेच्या स्वरूपाचा आहे; त्यामुळे अनेक नव्या घटना, घडामोडींचा अन्वयार्थ आणि त्यावरचे भाष्य या लेखकांनी मांडले. पत्रकारिता लेखनाला नवे स्वरूप प्राप्त झाले आहे. काही राजकीय नेत्यांनी, अभिनेते, तसेच कलावंतांनी या माध्यमाचा चांगला उपयोग केला. एका अर्थाने समाज पत्रकारिता नवे रूप धारण करीत आहे. वेगवेगळ्या प्रदेशांच्या कथा-कहाण्या आणि लपलेले वास्तव मांडले जात आहे. मुक्त स्वरूपाच्या लेखनामुळे सामाजिक आविष्काराच्या कथा अधिक विस्तारल्या. हरवत चाललेल्या सकारात्मक मूल्यनिष्ठ पत्रकारितेची अंगे निर्भीडपणे व्यक्त झाली. प्रस्थापित चौकटीत न मावणारे अनेक विषय त्यामधून आले. ही या लेखनमाध्यमाची मोठी उपलब्धता आहे. समस्याकेंद्री घडामोडींचे तसेच व्यक्तिगत अभिप्रायाचेदेखील स्वरूप त्यास प्राप्त झाले. अगदी सीएचबी शिक्षकांचे आंदोलन केवळ आणि केवळ या माध्यमाने आरंभिले आणि त्याची व्याप्ती वाढवली. विस्थापन व परिघावरील अनेक विषय त्यामधून अभिव्यक्त झाले.

या माध्यमांचा सर्वदूर वापर होऊ लागला. विविध राजकीय पक्ष, संस्था, विचारसरणीचे, तसेच जातसमूह गटांतील गट देवाणघेवाण व प्रसारासाठी या माध्यमांचा वापर करताना दिसतात. राजकीय पक्षांनी पक्षाची ध्येय-धोरणे प्रसारित करण्यासाठी पक्षाचा फेसबुकसारख्या माध्यमाचा वापर केला. व्यक्ती आणि समूहाचे फॅन क्लब निर्माण झाले.

ज्ञातिसंस्थेच्या नेत्यांचे, पुढाऱ्यांचे, एवढेच नव्हे तर प्रदेश किंवा दैवतांच्या नावांनीदेखील समूहगट तयार झाले. एक प्रकारे महाराष्ट्रीय समाजमानस व त्याच्या वर्तनव्यवहाराचेच चित्र या माध्यमाविष्कारांतून पाहायला मिळते. या माध्यमाची ताकद आणि प्रसरणशीलता खूप मोठी आहे. ज्यामुळे पारंपरिक माध्यमाच्या मर्यादा उघड पडल्या. इतकी गतिशीलता, चौकटी ओलांडणारे स्वातंत्र्य या माध्यमांनी निर्माण केले. हितसंबंधीय अवलंबित्व या माध्यमांनी काढून टाकले. आविष्काराचे सार्वत्रिक खुलेपण आणले. मात्र, त्याचे सामर्थ्य हे मानवी हाताळणीत मर्यादादेखील बनत आहे. एकलकेंद्री विचारप्रसारण, सत्य-असत्याचा अपलाप, ओरडून बोलत राहणे, अस्मितेबद्दल तीव्र एकांगी जागृतता निर्माण झाली आहे. जनमत घडवण्यासाठी वा मोडण्यासाठीचा वापर त्यामधून होत आहे.

या काळात कविता, कथा, चर्चा, मुलाखती, ग्रंथचर्चा, वाचन, वेबिनार यांची प्रचंड उलाढाल झाली. विविध प्रकारच्या लेखनाचा महास्फोटच घडतो आहे. महेश एलकुंचवार, नंदा खरे, पन्नालाल सुराणा यांच्या वेगळ्या मुलाखती आवर्जून पाहाव्यात. या तंत्रमाध्यमाच्या साहाय्याने लेखनाचे गंभीर आविष्कार या आधीच्या लगतच्या काळात घडले, तसे या काळातही त्याचे प्रमाण वाढले. मात्र, हे प्रमाण तसे फार अत्यल्प स्वरूपाचे आहे. समीर गायकवाड, कुणाल गायकवाड, शाहू पाटोळे, शर्मिष्ठा भोसले, संपत मोरे, बालाजी सुतार, सौमित्र, राहुल बनसोडे, विकास गोडबोले, शरद आजगेकर, ऐश्वर्या रेवडकर यांनी या माध्यमाचा गंभीर वापर केला. आत्मपरता, समाजवृत्तान्त, सांस्कृतिक जाणिवांचे लेखन होत आहे. त्यामध्ये विषयवैविध्याची खोलवर जाण आहे. समीर गायकवाड यांचे ब्लॉगलेखन तर अतिशय वाचनीय स्वरूपाचे आहे. इतिहास, संस्कृती, भाषा, राजकारण आणि स्थानिक जीवन व भावनांचे चित्र त्यांच्या लेखनात आहे. थेट बोलीभाषेचा आणि व्यक्तीबोलीचा अवकाश या लेखकांनी समाजमाध्यमात आणला. वर्तमानातल्या घटना-घडामोडींना लेखनविषय बनवले. रस्त्यावरची दृश्ये, दुकानातल्या घटना-घडामोडी, बाजार, डोंगरदऱ्यांतील अनुभव असे विमुक्त स्वरूपाचे लेखन घडले. राहुल बनसोडे सारखे तरुण सामाजिक विषयावरील लेखन व कलांची सरमिसळी स्वरूपाचे लेखन करत आहे. बालाजी सुतारच्या लेखनातील तिरकस उपरोधात्मक शैलीतून समाज संस्कृतिचित्रे उल्लेखनीय आहेत. स्थानिक घडामोडींपासून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडींवरील चिंतने त्यात आहेत. प्रवासकथने, संस्कृती चिंतन आणि परिघावरील आहार संस्कृतीविषयी शाहू पाटोळे यांनी केलेले लेखन महत्त्वाचे आहे. 'आठवणींचा खाकाना' ही त्यांची लेखमाला विशेष वाचनप्रिय ठरली. मराठवाड्याची संस्कृती व सामाजिक विषयावर त्यांनी लेखन केले आहे. कवी, अभिनेता सौमित्रने आत्मपरता व वाङ्मयीन पर्यावरणाविषयी केलेले काही लेखन वैशिष्ट्यपूर्ण आहे.

०३

या काळात कोरोना या विषयावर प्रत्यक्ष ललित निर्मितीदेखील झाली; त्यामुळे भविष्यातल्या अभ्यासाला मोठी सामग्री उपलब्ध होईल, अशा प्रकारची ललित निर्मिती होते आहे. मात्र, त्यामध्ये काळ-समाजाचे बहुमुखी वाचन नाही. येते ते केवळ पृष्ठस्तरावरील. राजकीय, सामाजिक, प्रशासन स्तरावरील घडामोडींचे पडसाद ललित लेखनात नाहीत. उस्मानाबाद जिल्ह्यातील बोरगाव नावाच्या एका छोट्या खेडेगावातील ज्ञानेश्वर जाधवर नावाच्या तरुणाने लॉकडाउन विषयावर कादंबरी लिहिली. रोहन प्रकाशनाने 'लव्ह इन द टाइम ऑफ कोरोना' हा कोरोना काळातील निवडक कथांचा संग्रह प्रसिद्ध केला. मानवी नात्यातल्या आजच्या काळातील विविध परी त्यातून चित्रित झाल्या आहेत.

या काळात सर्व तऱ्हेचा सामाजिक अवकाश आक्रसल्यामुळे विचारांच्या देवघेवीसाठी लाइव्ह व्याख्यानमाला सुरू झाल्या. त्यास चांगला प्रतिसादही मिळाला. अण्णा भाऊ साठे शताब्दीच्या निमित्ताने महाराष्ट्रभर अनेक व्याख्यानमाला झाल्या. महाविद्यालयांनी वेबिनार नावाची गोष्ट सुरू केली. यापूर्वी सेमिनार नावाच्या गोष्टींमध्ये काही अस्ताव्यस्तपणा व दिशाहीनता होती. त्याचेच चित्र वेबिनारमध्ये पाहायला मिळते. एकतर कोविड या अवस्थेबद्दल आजही वैज्ञानिक, सामाजिकशास्त्राचे अभ्यासक, प्रशासन, राज्यसंस्था संभ्रमित आहेत. या साथीबद्दल आजही लोकव्यवहारात संभ्रम आहेत. मात्र, मराठीचे प्राध्यापक 'कोरोना काळातील साहित्य' अशा विषयावर आज ई-चर्चासत्रे घेत आहेत. केवळ नावनोंदणीसाठी असंख्य स्वरूपाच्या वेबिनारची निर्मिती या काळात झाली.

०४

या माध्यमावर काही लोकविलक्षण भावविश्व मांडणारी तरुण मुलं आहेत. ती बहुविध क्षेत्रांतील आहेत. उद्योग, कंपनी, कार्पोरेट क्षेत्र, शिक्षक, शेतकरी, गृहिणी, विद्यार्थी अशा तरुणांच्या उपस्थितीने गजबजलेली पिढी या माध्यमांत आहे. विकास गोडगे, कुणाल गायकवाड, अविनाश उषा, सागर वाघमारे, श्रीकांत आव्हाड, भास्कर लवांदे, सतीश वाघमारे अशी व इतरही अनेक मंडळी या माध्यमाचा कल्पक वापर करताना दिसतात. या माध्यमाच्या उपस्थितीचा एक भाग म्हणजे अनेक माणसांच्या सहस्रमुखी कथनांना अवकाश लाभला. त्याची व्याप्ती आणि पसारा वाढला. अनेक 'छोऱ्यांनी' ही कथने सजली. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अनुभवविश्वाबरोबर व्यक्तिगत कथने पुढे आली. विकास गोडगे याच्यासारखा लेखक एकाच वेळी ग्रामीण आणि नागर जीवनातील विविध तऱ्हेचे अनुभवविश्व सांगत आहे. या लिहिणाऱ्यांमध्ये उदंड कथनवैशिष्ट्ये आहेत. तसेच या अभिव्यक्ती स्वरूपात कमालीचा बदल झाला. या माध्यमांची गरज, तसेच त्याचा आभासी वाचक, श्रोता, प्रेक्षकवर्ग, काळवेळ ही परिमाणे ध्यानात घेऊन आविष्काररूपे बदलली. फेसबुक व व्हॉट्स ॲप ग्रूपवर विषय, प्रदेश वा व्यक्तिकेंद्री गट निर्माण झाले; त्यामुळे प्रादेशिक संस्कृतीतील अनेक गोष्टी, मानवी समाज, घटना-घडामोडी व भाषारूपे या माध्यमातून मोठ्या प्रमाणातून आली. अगदी काही शब्द समूहगटदेखील निर्माण झाले. वैयक्तिक भूतकाळाचा आविष्कार लिहिण्यातून झाला. लहानपणीच्या पत्र्यावरून टपटप वाजणाऱ्या पाऊस आठवणी ते शाळकरी आठवणी त्यात आहेत. मध्यमवर्गीय रोमँटिक दृष्टी या तरुण मंडळींनी काढून टाकली. तसेच गावाकडील भानगडी, घडामोडींसह गतस्मरणरंजनतेची

विविध रूपे साकार केली. सर्वदूर परिसर महाकथनांचा गजबजलेला हा अवकाश आहे. 'म्हसराला दगडं घालावी तशी धोनीची बॅटिंग वाटली' (विकास गोडगे) अशी रोखठोक भाषारूपे आली. संपत मोरे, शर्मिष्ठा भोसले, मीनाज लाटकर, सुचिता घोरपडे, योजना यादव यांसारखे लेखक-कवी-कवयित्री या माध्यमाचा अतिशय कल्पक असा उपयोग करीत आहेत. सांगली जिल्ह्यातील संपत मोरेसारख्या तरुणाचे माध्यमावरील समाजवृत्तान्तपर लेखन उल्लेखनीय आहे. व्यक्तिचित्रणात्मक लेखनातून अदृश्य समाजेतिहास आणि अनाम भावकथांना तो आपल्या लेखनातून साक्षात करीत आहे. शर्मिष्ठा भोसले यांच्या लेखनात सामाजिक जीवनाची अस्वस्थ रूपे आहेत. तर सुचिता घोरपडे या वैशिष्ट्यपूर्ण कथा लिहीत आहेत. योजना यादव यांच्या लेखनात कोरोना काळातील अस्वस्थ अवस्थांतरणाची आविष्काररूपे आहेत. लहानलहान गद्य तुकड्यांतून व कवितांमधून त्यांचे भावविश्व प्रकटले आहे. न छापलेल्या कविता आणि गद्यलेखनातून काळ घडामोडींचे विविध मूड्स त्यांच्या लेखनात आहेत. ''अंगणात बालपण संपलेल्या स्मृती, विरळ करून टाकल्या या लॉकडॉउननं आणि अंगणानं हिरवागार हात फिरवला मायेनं'' हा भावपाठलाग त्यांच्या आविष्कारात जसा आहे. तसाच 'कोणत्याही कविता आनंद देत नाहीत आता, दवाखान्यातल्या उग्र सॅनिटायझरचा दर्प येतो' अशी या वर्तमानाची अस्वस्थ गुंफणही त्यांच्या आविष्कारात आहे.

०५

या माध्यमाने 'स्व'टीकेसह भोवतालाची बहुपरिणात्मक शैली सर्जनशील अंगाने व्यक्त झाली. नवा भाषाबंध विकसित झाला. आकृतिबंधात मोठ्या प्रमाणात बदल झाले. लघु भाषावकाश त्याच्या दृश्य, चित्र, रंग, मिती वाढल्या. दोन शब्द, एका ओळीच्या वापराच्या



अर्थमिती वाढल्या. तरुणांच्या सडाफटिंग गमजा, हटके बोलण्याच्या पद्धती माध्यमावर रूढ केल्या. त्यात पारंपरिक मध्यमवर्गीय जागरूकतेचे उल्लंघन जसे आहे तसेच मध्यमवर्गीय संवेदनशीलतेची डुलकी पकडण्याची, सामाजिक कंगोरे उघडे करण्याची दृष्टी आहे. भाषेत थेटपणा आला. तरुणांच्या भाषेत टोपी उडविणाऱ्या तिरकस शैलीचा अवलंब आहे. बालाजी सुतार, कुणाल गायकवाड यांच्या लेखनाचा बाज या प्रकारचा आहे. बऱ्याच वेळा नको इतका थेट वाटावा असा भाषाव्यवहार घडत आहे. तसेच समाजभाषेने निषिद्ध मानलेल्या क्षेत्रांना ओलांडून त्याला प्रत्यक्षातली भाषाव्यवहारची उघड बाजू दाखवली जात आहे. या माध्यमाची एक बाजू म्हणजे त्याची प्रसारणाची गती, वेग आणि त्यास मिळालेला प्रतिसादही थक्क वाटावा असा आहे. इतकी संदेशप्रतिसादाची चहलपहल वेगवान झाली आहे. त्यावरून लेखन प्रतिसादाचे आडाखे बांधणे शक्य झाले आहे. लेखनाचा प्रतिसाद विक्रीमूल्यात आणि बाजारपेठेत रूपांतरित होत आहे. लेखक स्वामित्व हक्काचेदेखील सार्वत्रिकीकरण होत आहे.

'मी मुक्त, स्वच्छंद अनंताच्या शोधात, मंग इथं फेसबुकावर काय उपटायलास?'

किंवा 'मला माणसं जोडायला आवडतात, हं मंग पुढं काय?',

'नो इनबॉक्स, सरळ नारळ दिला जाईल, मंग तू येतीस कशाला फेसबुकवर, येडे.'

(कुणाल गायकवाड)

या प्रकारच्या उधळमोकळ्या भाषेचा विविधरंगी नकाशा या लेखकांच्या लेखनात आहे.

०६

या नव्या माध्यमातून ग्रंथसंस्कृतीसंबंधी काही वेगळे प्रयत्न झाले. नवी पुस्तकं, दुर्मिळ पुस्तकं, ग्रंथचर्चा असा भाग त्यामध्ये होता. नितीन वैद्य, श्रीधर तिळवे, महेंद्र कदम, प्रवीण बांदेकर, आशुतोष जावडेकर, प्रमोद मुनघाटे, मेघना भुस्कुटे, योगिनी पांडे-सातारकर, प्रणव सखदेव, ऋषिकेश देशमुख, अभिषेक धनगर, तुषार पाटील-निंभोरकर ही मंडळी ग्रंथसंस्कृतीसंबंधी लिहीत आहेत. नामदेव कोळीसारखा तरुण वाङ्मय दुवा म्हणून या माध्यमावर सतत भेटतो. सरदेशमुख यांच्या शताब्दी निमित्ताने गेल्या वर्षभरात त्यांच्या लेखनाविषयी जवळपास शंभर संस्मरणे, नोंदी, नितीन वैद्य यांनी समाजमाध्यमावर लिहिली, ती वैशिष्ट्यपूर्ण आहेत. यात जुन्या पिढीतील रामदास भटकळ, प्रा. भगवंत क्षीरसागर, हरी नरके जसे आहेत, तसेच समकालीन घडामोडींच्या तिरकस शैलीने परामर्ष घेणारे रवींद्र तांबोळीदेखील आहेत. काही वाङ्मय नियतकालिकांनी ऑनलाइन अंक सुरू केले आहेत. वाङ्मयविषयक वेबसाइट सुरू झाल्या. अनेक ऑडिओबुक ॲप सुरू झाले. यासंबंधीचे लेखन विविध ॲप्सवरून प्रसिद्ध होऊ लागले. 'अक्षरनामा', 'कोलाज', 'हाकारा', 'प्रतिलिपी' आणि पुणे-मुंबईतून अनेक प्रकारची ऑनलाइन वाङ्मयीन स्वरूपाची नियतकालिके सुरू झाली. दृक-श्राव्य स्वरूपाची मांडणी या अंकांमधून झाली. डायरी, आत्मकथा, गद्य तुकडे, अवतरणे, यांसारख्या फॉर्ममधून ते अभिव्यक्त होऊ लागले. चिमुकल्या चिंचोळ्या 'सांगण्यांच्या' रूपाला महत्त्व येत आहे. त्यात एक चमचमीत आकर्षकपणादेखील आहे.

भाषेची पूर्वरचित नियंत्रणकक्षा या माध्यमातील मंडळींनी उधळली. प्रदेश बोली, व्यक्तिबोली, व्यावसायिक बोलींना अत्यंत सहजपणानं आणि शब्दरूपांची उधळण केली. महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतील समाज, व्यवसाय व व्यक्तिबोलीतील कितीतरी शब्द या मंडळींनी माध्यमावर रूढ केले. 'बाबो', 'एडझव्या', 'येड्या', 'निसते रिकामे', 'ग्यानगेल्या,' 'हळवे येडझवे,' 'नेटकरी', 'गण्या म्हणतंय तेबी बरोबर हाय', 'आपुनीच' असं विमुक्त शब्दभांडार उघड केलं. व्यक्तिनामांची खास टपोरी उच्चार रूपांची रुजवण केली. बबन्या, बाळ्या, पिंट्या, संगी, मंगी, चंगी, भाड्या, 'असं असतंय गावाकडं' असा शब्दावकाश भरून टाकला. चिं. वि. जोशी यांच्या कथनसृष्टीतला नायक भेटावा अशी 'स्व'लोप करणारी आणि स्वतःवर विनोद करणारी पात्रसृष्टी कथनात आणली. या गद्य आविष्कारातून काही व्यक्तिरेखा पुनःपुन्हा भेटत राहतात. हलचल झाली. त्या कल्पित पात्रांची निर्मिती करून सामाजिक, राजकीय उपहासचित्रे मांडली. 'खंडेराव', 'पिंट्या', 'पेट्रोलबाळ्या' या कल्पित पात्रांच्या उभारणीतून विचार, अनुभवांचे वहन केले; त्यामुळे कल्पित कॅरेक्टरचे नवे जग या लिखाणातून अवतीर्ण झाले.

या वाङ्मयीन संस्कृतीत वरवरचे आणि उथळ आविष्काराचे एक विपुल जग पाहायला मिळते. या माध्यमातून कवींना मात्र अतिशय सुगीचे दिवस आलेले आहेत. अनेक शहरांमधून काव्य महोत्सवांचे, व्याख्यानांचे आयोजन केले गेले. मार्केटिंग कंपन्यांसारखे एका कवीने आणखी दोन कवींची नावे सुचवायची असे फंडेदेखील या काव्यउत्सवामध्ये वापरले गेले. अनेकदा अत्यंत गद्य, सर्वसाधारण बोलण्याच्या कविता तिथे सादर झाल्या. एक उदंड उत्साह या कवितांमध्ये पाहायला मिळाला. तुलनेने हिंदी भाषिक प्रदेशात कविता आणि काव्यचर्चेचे चांगले उपक्रम राबविले. या कोरोना काव्यसंस्कृतीबद्दल बालाजी सुतार यांनी एक उपहासनोंद केली आहे, ती रास्तच आहे.

'कोरोनातून जगल्या-वाचलेल्या कोणी आगामी काळात अर्वाचीन 'भाऊसाहेबांची बखर' लिहिली तर तिच्यातल्या 'कोरोना काव्य पानिपताची रणधुमाळी' या प्रकरणात कविता लाइव्ह सोडण्याच्या नादात लाख बांगडी फुटली. कित्येक मोती आणि मोहरा धारातीर्थी पडल्या. चिल्लर खुर्दा तर गणतीच नाही, अशी नोंद नक्कीच असणार.' (बालाजी सुतार)

०७

या माध्यमातील लेखनाकडे नजर टाकल्यास काही वैशिष्ट्ये आपल्याला जाणवतात. एक म्हणजे व्यक्त होण्याच्या स्वातंत्र्यावकाशाचा विस्तार झाला. वाङ्मयीन आविष्कार चौकटींची मोडतोड झाली. अभिव्यक्तीचे उदंड विषयवैविध्य आले. माहितीच्या संग्रहाची अफाट देवाणघेवाण होत आहे. स्थानिक प्रदेश, तिथल्या जीवनरीती, भाषा, लोकव्यवहार विपुल प्रमाणात या माध्यमावर आला. अनेकविध प्रकारचा खासगी अवकाशदेखील माध्यमावर आला. शब्दांपेक्षा दृश्यमितीत रूपांतर झाले. 'दाखवण्याला', 'दिसण्याला' अधिक महत्त्व आले;

त्यामुळे आकर्षकपणे सजवणे आणि बहुरंगी ढंगात दाखवण्याला महत्त्व आले. दृश्यचित्रे आणि त्यांची परिणामकारकता या माध्यमाच्या गरजेमधून निर्माण झाली. नवा काळ हा दृश्यांचा काळ आहे; त्यामुळे दृश्य आविष्काराची बाजू उजळपणाने माध्यमांमधून व्यक्त झाली. रस्त्यांवरील चित्रे, जनावरे, निसर्गचित्रे, बाजारचित्रे, अगदी लहान लहान आकारांचे, दृश्यांचे रेखांकन करणारी चित्रे अगदी दररोज काही नसले तरी नाश्त्याला काय खाल्ले, जेवणात कोणते पदार्थ होते, ग्रामीण जीवनातले पदार्थ दाखवण्याला अतोनात महत्त्व आले; त्यामुळे रुचिर दृश्यप्रतिमांनी ही माध्यमे गजबजली. अधिक नेटक्या सादरीकरणाला, 'मी कसा दिसतो' याचे दक्ष भान आले. काही वेळा केवळ फोटोंचा विपुल कचरा पाहायला मिळतो. उत्सवी डेकोरेमच संमोहन काळ अवतरला.

या माध्यमांतून उत्स्फूर्तपणे, तात्कालिक, प्रतिक्रियात्मक हे लेखन प्रतिक्रियावादी बनले. उथळ, वरवरच्या अभिप्रायास महत्त्व दिले जाते. विचार, भावनांचे बहुमुखी स्रोत व्यक्त होताना दिसत नाहीत. राग, संताप, शिव्या व्यक्त करण्याचे ते माध्यम बनले. अस्मितांच्या टकरावांची रणभूमी म्हणून माध्यमभूमीकडे पाहिले जात आहे.

गंभीरपणाच्या अभावामुळे व आविष्काराच्या प्रदर्शन वृत्तीमुळे सांगण्याला महत्त्व मिळते. बरीच मंडळी स्वतःचा फोटो टाकतात आणि त्याखाली 'अगदी सहज', 'काहीतरी उगी लिहावे', 'सहज आपलं फोटो सेशन घरातल्या घरात', 'कवितेच्या अघळपघळ गोष्टी' असे लिहितात. 'स्व'ला उत्सवी रूपात प्रोजेक्शन केले जाते. गावकथांना उधाण आले आहे. या माध्यमाने स्त्रियांच्या आविष्काराला, दाखवण्याला वेगळे परिमाण मिळवून दिले. त्यामागे पुरुषी आणि बाजारू मानसशास्त्र आहे. हे माध्यम 'आवाजी' आणि 'आक्रस्ताळी' बनत आहे. त्यास किंचाळलेपण, नकारात्मक आविष्काराची बाजू प्राप्त झाली आहे.

या माध्यमाचा विवेकाने वापर होत नाही, अशा वेळी तुकारामांच्या ओळी आठवणे शक्य आहे. काही लोक निरंतर या माध्यमावर दिसतात. 'शुक नळिकेशी गोवियले पाय, विसरोनि जाय पि दोन्ही' अशी या गोंधळ नेटकऱ्यांची अवस्था आहे. 'गाजराची पुंगी तैसे नवे झाले जोगी' अशी या संगणक, मोबाइलरूपी जोगींत दिवसेंदिवस वाढ होत आहे; त्यामुळे 'आधी होता वाघ्या, देवयोगे (माध्यमामुळे) झाला पाग्या' असे त्याचे रूपांतर व्हायला वेळ लागणार नाही. अर्थात या माध्यमांचा लेखनाविष्कार हा फारसा समाधानकारक नाही. विचारभाव संवेदनांच्या गंभीरतेचा अभाव या लेखनात आहे. सर्जनशील, तसेच विचारशील लेखनासमोर एक मोठे आव्हान या माध्यमांनी उभे केले आहे. एका बाजूला अभिव्यक्ती-स्वातंत्र्याचा खुलेपणा, तंत्रज्ञानाधारित नवी बाजारपेठ आणि विवेकस्वातंत्र्याचा संकोच या काळात होत आहे, तेव्हा या माध्यमाचा वापर अधिक सर्जनशील आणि धन स्वरूपात होईल, असा विश्वास बाळगू या.


(या माध्यमातील अनेक आविष्कार प्रवाहांचा, व्यक्तींचा निर्देश माहितीअभावी देता आला नाही. लेख शीर्षकाची ओळ तुकारामांची.)

**randhirshinde76@gmail.com**



# लॉकडाउन फिल्म

गजेंद्र अहिरे



एकवीस मार्चला... आत 'गोदावरी'चं डबिंग करत होतो.

अचानक तानाजी वर आला आणि सांगितलं की, सगळं थांबवायला सांगितलंय.

आणि सगळंच थांबलं.

मी मुंबईला निघालो. तीन वाजले असतील. दुसऱ्या दिवशी जनता कर्फ्यू होता आणि सगळीकडेच दहशत होती.

बावीस तारखेला सगळं बंद असणार होतं. मी, ठाण्याचे कलेक्टर आणि मित्र राजेश नार्वेकर यांना फोन केला. उद्याच्या रिकाम्या रस्त्यांचे शूट करून ठेवतो. पुन्हा ठाणे असे असणार नाही. मुंबईतही बान्द्रा आरडीसींना फोन केला.

ते शूट झालं नाही; पण मुंबई, ठाणे रोजच तसं दिसू लागलं. बाहेर भयंकर भीती पसरली होती. तेवीसपासून लॉकडाउन सुरू झाला. काय करावं सुधरेना. एक दिवस घरात बसणं असह्य होत होतं. तिथे दिवसच्या दिवस जाऊ लागले.

'वक्त नही एक उम्र जाया हो रही है।' अशी अवस्था होऊ लागली. दाराबाहेर पडता येईना. मग घरातच रूटीन सुरू झालं. परिस्थिती स्वीकारून वेळ हाताळायचा ठरू लागलं. एके रात्री अचानक हे पुस्तक लिहायचं मनात आलं.

दिवस जात राहिले. लॉकडाउनच्या तारखा वाढत राहिल्या.

आजारी पडू लागलो. दोनदा घरातल्या घरात तोल गेला.

मग मनाशी ठरवलं. दोन हजार एकवीसच्या जूनपर्यंत काहीही करायचं नाही. जेव्हा थोडं मोकळं होईल, तेव्हा हातात असलेली, अर्धवट राहिलेली कामं तेवढी पूर्ण करू.

रोज संध्याकाळी सोसायटीच्या गार्डनमध्ये व्यायामाला जात होतो. तिथे कुणी नसायचं. कधीकधी दोन-चारजण असत. वेळा ठरलेल्या होत्या. जगात सगळे व्यवसाय, व्यवहार ठप्प असताना ओ.टी.टी. प्लॅटफॉर्म जोरात सुरू होते.

एक फोन आला. दिल्लीवरून एक जुना ओळखीचा माणूस बोलत होता. दिल्ली इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हलमध्ये ओळख झाली होती. एका अमेरिकन कंपनीला 'निळकंठ मास्टर' हवा होता.

मी म्हणालो, 'त्याचे व्यवहार केव्हाच झालेत. ते आता आमच्याकडे नाहीत.'



फोन ठेवला. विसरूनही गेलो. दोन दिवसांनी पुन्हा फोन आला की, त्या कंपनीला तो सिनेमा हवाच आहे. कुणाकडे राइट्स आहेत. आपण बाय बॅक करू शकतो का!

मला जरा बरं वाटलं; कारण रिलीज झाला, तेव्हा तो विशेष चालला नव्हता. लोकांपुढे पोहोचण्याआधीच त्याने थिएटरवर दम सोडला होता; पण मग 'अधीर मन झाले' आणि त्यातली इतर गाणी गाजू लागली. तो ॲमेझॉनवर आला. सॅटलाइटवर आला आणि बऱ्यापैकी पाहिला जाऊ लागला आणि आता त्याची डिमांड आली होती.

मी बलभीम पठारेंना (आबाजी) फोन केला. कुणाकडे आहे काय विचारलं. त्या निमित्ताने आमचं बोलणं झालं. काय करता येईल यावर चर्चा झाली. आपलं त्या वेळी नक्की काय चुकलं याची जाणीव आणि पार्श्वभूमी दोघांनाही चांगली उमगली होती.

दिल्लीवरून पुढचे चार दिवस फोन येत राहिले. नंतर प्रवीण निश्चल यांचा फोन आला आणि 'मी बघतो, काही होतंय का,' असं म्हणून त्यांनी पुढची जबाबदारी घेतली.

दरम्यान, आबाजींशी बोलणं चालूच होतं. एका फोनमध्ये ते म्हणाले, 'अहो सर, जाऊ दे. मरू दे ते. तुम्ही या. आपण दुसरा करू.'

जगात कडक लॉकडाउन. सोसायटीच्या गेटबाहेर जाता येत नव्हतं आणि हे म्हणताहेत 'तुम्ही या. आपण दुसरा करू...'

फोन ठेवला आणि डोकं सुरू झालं... कसं आणि काय करता येईल?

एक जूनच्या अनलॉक वनमध्ये शासनाकडून काही गाइडलाइन जाहीर झाल्या. मी ट्रॅव्हल पाससाठी अर्ज केला. तो काही मिळेना. एकीकडे डोक्यात गोष्टी सुरू होत्या. या दिवसांत कोण ॲक्टर्स येतील. टेक्निशिअन्स, इक्विपमेन्ट्स सगळं मिळेल का?

सोरेनने, 'कॅमेरा मिळेल, मी बोललोय,' असं कळवलं.

आबाजींनी नगरमध्ये प्रयत्न केले आणि कलेक्टर ऑफिसकडून शूटिंगची परवानगी मिळाली. अनलॉक प्रक्रियेत शूटिंगसाठीचा जी.आर. निघाला होता; पण अजून कुणाला परवानगी मिळाली नव्हती.

हे लिहिताना जितकं सहज वाटतंय तितकं सोपं नव्हतं. एक-एक दिवस जात होता आणि दिवसभर फक्त तो एकच विषय होता की, कसं निघता येईल. सहा वेळा मी पाससाठी अर्ज केला आणि तो सतत रिजेक्ट होत होता. भयंकर चिडचिड होऊ लागली. डब्यात डांबलेल्या उंदराने एखादी फट मिळतेय का म्हणून तो डबाच हादरवून सोडावा तसं झालं होतं. मला सगळ्याच प्रकारच्या परवानग्या हव्या होत्या आणि मी काही 'जाऊ दे' म्हणायला तयार नव्हतो. अशी परवानगी अहमदनगर प्रशासनाने पहिल्यांदा दिली.

कॅमेरा मिळणार होता. परवानगी होती आणि आबाजींचा प्रचंड उत्साह होता. दिवसागणिक त्यांचा फोन यायचा, मिळाला का पास आणि ट्रॅव्हल पास काही मिळेना. काहीतरी चुकलं होतं.

सायलीने माझे मेडिकल रिपोर्ट, त्यासाठीच्या टेस्ट सारं करून दिलं होतं.

सगळे पेपर्स हातात होते. मग उठून सरळ डी.सी.पी. ऑफिस गाठलं. तिथे इन्स्पेक्टर होते. त्यांना सगळं दाखवलं. त्यांनी अत्यंत

तत्परतेने सहकार्य केलं आणि अकरा जूनला संध्याकाळी पास माझ्या हातात होता.

दरम्यान, ज्या दोन-चार स्टोरीज डोक्यात आल्या, त्यातली कुठली पुढे न्यावी हे कळत नव्हतं.

गोदाशी, वृंदाशी मी प्रत्येक गोष्टीची चर्चा करतो. त्यातल्या त्यात एक गोष्ट जरा आकार घेऊ लागली होती; पण ती मला माझ्या एकाच साच्यातली वाटेना. गोदा म्हणाला, 'तो तुझा साचाच मोडून टाक.'

जवळच्या सर्कलमधल्या लोकांपैकी प्रत्येकाचं वेगळं मत पडू लागलं. एका मैत्रिणीने मला त्या प्रोसेसमध्ये थ्रुआउट मदत केली.

एका वाक्यात प्रश्न सुटला. 'गोष्टीचं ठीक आहे. तू फिल्म करायला घे. ती आपोआप गजेंद्र अहिरे फिल्म होईल.'

बारा जूनला सकाळीच सोरेन आला. मी गाडी चालवत होतो आणि तो नेहमीप्रमाणे शेजारच्या सीटवर झोपला.

मी म्हणालो, 'गोष्ट सांगतो. कशी वाटतेय बघ.' मी सांगू लागलो आणि थोड्या वेळात तो 'हं हं' करत करत अचानक घोरू लागला. मग मी तोंड बंद करून गाडी चालवत राहिलो.

असे रस्ते पाहिले नव्हते. भयंकर दडपण आलं. टोल नाक्यावर पास विचारला. दाखवा म्हणाले. दाखवला. तिथून पुढे सोडलं त्यांनी.

फूड मॉलवर आलो तर टॉयलेटपासून सगळंच बंद!

तिथे वर फडतरेंच्या एका मित्राचं ऑफिस आहे. त्यांनी 'बिडी बाकडा'मध्ये छोटा रोल केला आहे. ते भेटले. मस्त चहा प्यायलो. अख्ख्या फूड मॉलमध्ये कुणीही नव्हतं. डेड सिटीमध्ये फिरतोय असं वाटलं.

तिथून निघालो. तळेगावला आलो. दीप्तीच्या छोट्या कॅफेमध्ये बसलो. दीप्ती कित्येक दिवस घरात बसून होती. आम्हाला पाहिलं आणि 'काम काम' ओरडू लागली. दुपारी निघून पुढच्या रस्त्याला लागलो.

शिरूरच्या आधी 'नवनाथ भेळ' म्हणून प्रसिद्ध जागा आहे. तिथे गाडी थांबवली आणि घरात बांधून घेतलेला डबा खाल्ला. गाडीच्या बॉनेटवर ठेवून.

'झोंबी' सिनेमात डेड सिटीज दिसतात तसा फील होता.

दुपार टळताना आम्ही नगर-शिर्डी बायपासला लागलो. दहा-पंधरा मिनिटांत देहरे टोल नाक्याच्या पुढे एका कच्च्या रस्त्याने उजवीकडे जाऊन मोठमोठे पॉली हाउस होते. तिथे पोहोचलो.

हा आबाजींनी प्रेमाने वाढवलेला गोतावळा. पंचवीस एकरांत पॉली हाउस आणि त्यात निर्माण होणारी शोभेची रोपं.

दोन एकराचं साठ फूट खोल शेततळं आणि सुरुवातीलाच एक सुंदर स्ट्रक्चर. त्यात चिंचेची दोन मोठी झाडं. एका चिंचेखाली शेणाने सारवलेली जमीन आणि मोठा झोपाळा. एकीकडे हौसेला चूल आणि पुढे मॉडर्न किचन.

रांगेत गेस्टरूम ऑफिस आणि अतिशय सुंदर छोटा बंगला. ज्यात एकच बंदिस्त खोली आणि बाकी मोकळा हॉल.

विटकरी आणि शुभ्र रंगाची उत्तम रंगसंगती. मध्ये विहीर. तिला कुंपण. त्यावर वारली चित्रे. एकीकडे लॉन, त्यात शुभ्र भिंत आणि यावर आपण केलेले पिक्चर बघायचे, अशी मॅडमची स्वप्नं.

ते सगळं मोबाइलवर शूट करून वृंदाला, निवासला पाठवलं की, मी इथे राहणार आहे.

सगळेच निश्चिंत झाले. मी आबाजींना म्हणालो, ''मी तीन गोष्टी घेऊन आलोय.''

ते म्हणाले, ''ती जी कार्यकर्त्यांची गोष्ट आहे, ती ऐकव.''

त्यांनी चॉइस ठेवलाच नाही. निळकंठच्या वेळीही त्यांनी मी जी पहिली गोष्ट सांगितली, ती त्यांनी ओके केली होती. तेव्हा मी त्यांना विचारलं होतं, 'तुमचं बजेट काय आहे?' तर ते म्हणाले, 'ते तर गोष्ट ठरवेल.'

बजेट गोष्टीवर ठरतं याची जाणीव असलेले जे एखाद-दुसरे निर्माते भेटले, त्यांपैकी हे आबाजी. संध्याकाळी पहिल्या चिंचेखाली बसून त्यांना पहिली गोष्ट ऐकवली आणि ते म्हणाले, ''ही फायनल!'' पुढच्या गोष्टी त्यांनी ऐकल्याच नाहीत.

बारा तारीख संपली.

तेरा तारखेला रिशी (आबाजींचा मोठा मुलगा) मी आणि सोरेन, काही लोकेशन्सवर भटकलो. दुपारी आम्ही गोरखनाथ गडावर गेलो. तिथे घरून जेवण नेलं होतं. ते खाल्लं.

मग मेहरबाबाला गेलो आणि दिवसभर भटकत राहिलो.

चौदा तारीख...

आबाजींनी नगरमधली नाट चळवळीसाठी नव्या दमाची मुलं बोलावली. मी ऑडिशन घेत नाही. डोळ्यांत समजतं की, काय करू शकेल हा किंवा ही; काही फोटो पाहत होतो.

आबाजींनी दोन फोटो दाखवले. एक ऋषिकेश वांबुरकर आणि दुसरी कश्मिरा. मला पुढे काही बघावं लागलंच नाही. पाहिलेली लोकेशन्स आणि पाहत असलेली मुलं, माझी गोष्ट घडवू लागले होते.

एका मुलाला आबाजींनी फोन केला. तो लगेच आला. अर्ध्या तासात. देहरेचा हा मळा नगर शहरापासून वीस किलोमीटरवर आहे. नगरमध्ये कोरोनाने थैमान घातलेलं आणि ही मुलं कसल्या ओढीने धावत आली होती, काय देणार होतो मी त्यांना.

कदाचित, मी ज्या ओढीने धावत गेलो होतो, तीच ओढ यांच्या ठायी होती आणि तेच मॅच झालं.

अख्खी टीम उभी राहिली. मला माझे असिस्टंट हवे होते. आबाजींचं म्हणणं होतं सगळे इथलेच घेऊ. यांना कधी संधी मिळणार? आबाजी कुणालाही घुसवत नव्हते. त्यांचं निस्सीम प्रेम आहे, नगरमधल्या धडपडणाऱ्या नव्या पिढीवर आणि त्या मुलांचीही प्रचंड श्रद्धा आहे त्यांच्यावर आणि याचा अफाट अनुभव मी पुढे घेतला. तर तो अमित आला त्याच्या एन्ट्रीलाच मी मनात दुसरा हिरो फायनल केला. सगळी मुलं मास्क लावून, अंतर पाळून रेंगाळली होती. कुणाच्या पदरात काय पडणार, हे त्या चिंचेलाच ठाऊक होतं.

रात्री जेवलो. झोपलो.

पंधरा तारीख. पुन्हा भटकलो. मला माझा एक तरी अनुभवी असिस्टंट हवाच होता. मग आबाजींनी अमितला फोन केला. अमित 'निळकंठ मास्टर'च्या वेळी सोबत होता. त्यांना तो चांगला ठाऊक होता. अमित साताऱ्याहून सायकलवर निघाला. प्रशांत यादव मला यात हवा

होता; पण तो सांगलीत अडकला. मला फार वाईट वाटलं. प्रशांतला मला यात रोल देणं शक्य होतं आणि त्याची मदत होणार होती. सेटवर तो धाकट्या भावासारखा पाठीशी असतो.

पंधरा तारीख भटकण्यात गेली.

तोवर ताण होता. कॅमेरा मुंबईहून निघून नगरला पोहोचेल का? कारण त्यांचा ई-पासचा प्रश्न सुटत नव्हता. प्रशांत जठार आणि सोरेन त्या प्रयत्नांत होते.

सोळा तारीख.

प्रचंड ताण आलेला. आपण काय करतोय वगैरे... नेहमीचं. पहाटे उठून झोपाळ्यावर बसून चिंचेच्या झाडाशी बोलायचो तासभर... प्रचंड हिंमत दिली चिंचेने या दिवसांत.

विहिरीत सुगरणीच्या घरट्याचं बांधकाम चालू होतं. किती बारीक काम ते. किती मेहनत त्यामागे... नर पक्षी मन लावून घरटी बनवतात. मग मैत्रिणींना आमंत्रण देतात. त्यांना घर नाही आवडलं की, त्या नाकारतात. सगळी मेहनत वाया जाते. पुन्हा नव्याने प्रयत्न. सिनेमाचं काय वेगळं असतं? चिंचेवर दोन खारी होत्या. त्यांना भुईमूग भरवत होतो. त्या अगदी जवळ येत होत्या.

होले होते. त्यांचा प्रचंड कर्कश आवाज.

सुरुवातीला रात्री खूप किडे चावायचे. उगाच पांढऱ्या टाइल्सवर हिंडत राहायचे. कुठेतरी जायचं असायचं त्यांना? दिशा वळवली की, तिकडे चालत राहायचे. बस 'तुझको चलना होगा...'वाल्या कॅटेगरीतले. आमचंही काय वेगळं आहे?

रोजच संध्याकाळी तळ्यावर पोहायला जायचो. मला येत नव्हतं. दोरी बांधून, टायर लावून डुंबत राहायचो.

सोळा तारीख अशीच गेली काहीच न करता. मागे एक दुसरी चिंच आहे, त्याखाली बाज टाकली आणि लोळत राहिलो.

त्या चिंचेशी बोलत राहिलो. दुपारी तिने आणखी काही मार्ग सुचवले. शेजारी थोडी खाली बकऱ्यांची शेड होती. ज्या भांड्यात त्यांना खायला ठेवलं होतं, त्यातच त्या जाऊन बसत होत्या (अशीही काही प्रॉडक्शन्स मी या इंडस्ट्रीत पाहिलीत.)

समोर जाळी आणि पलीकडे भुईमुगाचं शेत होतं.

दुपारी एक मांजर भामट्यासारखं भराभर पळत चाललं होतं. वर टिटव्यांनी कहर माजवला होता आणि मांजराच्या तोंडात टिटवीचं पिलू होतं. सगळंच आपापल्या जागी बरोबर होतं. हाही प्रसंग मी प्रॉडक्शनमध्ये पाहिलाय. खारूताई मटामटा पंख असलेले किडे खाते, हे मी इथे पहिल्यांदा पाहिलं.

सोळा तारखेला मी सगळ्यांना सांगितलं, 'उद्या संध्याकाळी आपण स्क्रिप्टचं रीडिंग करू या आणि अठरापासून शूट सुरू करू. जी काही तयारी करायची ती उद्या त्या त्या डिपार्टमेन्टने करावी.' सगळे तसे तयार होते.

सतराला मी सकाळी दुसऱ्या चिंचेखाली माझी केबिन बनवली. वॉल गार्डनची दोन पॅनल लावून आडोसा केला. भुईमुगाच्या शेतासमोर टेबल-खुर्ची लावली. शेजारी बाज ठेवली.

आणि लिहायला बसलो...

एक सरडा आला जाळीवर. तो माझ्याकडे टक लावून बघत होता. तासभर हलला नाही. मग जवळ टेबलाकडे आला. खूप वेळ होता. मला कौतुक वाटत राहिलं. लिहिणाऱ्या माणसाला पाहणारा सरडा.



दुपारी निरोप आला. अमितला पोलिसांनी अडवलं औंधमध्ये आणि साताऱ्याला परत पाठवलं. तो येणार नाही. प्रशांत नाही, अमित नाही. एकही अनुभवी सहायक नाही. मी दीप्तीला फोन केला, 'कशीही नीघ आणि पोहोच.'

दुपारी झोपलो बाजेवर. मग उठून चिंचेशी बोललो बरंच. भुईमुगाची रोपं माझ्या आत बहरली होती.

संध्याकाळी सगळे जमले. ऋषिकेशही मुंबईवरून पोहोचला होता. कॅमेरा गाडी आली होती.

मग संध्याकाळी स्क्रिप्ट वाचलं. अख्खं डिटेल, सगळ्यांसमोर. त्यानंतर तिथे फक्त आणि फक्त उत्साह होता.

दुसरा दिवस अठरा जून.

याच दिवशी एक वर्ष आधी 'बिडी बाकडा'चं शूटिंग सुरू झालं होतं.

अठराला सकाळी मी चिंचेशी बोललो. होले, खारी, बुलबुल, सुगरणी... सगळेच दिसले. तो सरडा मात्र पुन्हा दिसला नाही.

तयार झालो आणि जिथे बसलो होतो तेच लोकेशन. तिथून शूट सुरू केलं.

प्रोफेसर नाव असलेल्या गुंडाचा रोल अभिजित दळवी करत होता. मला तोच हवा होता म्हणून मी हट्ट केला. त्याच्या घरी वयस्कर माणसं. गावात कोरोनाचा हाहाकार. त्याचं येणं कठीण होतं; पण तो आला.

नंतर जे कुणी आले ते इथेच राहिले. कुणी घरी गेलं नाही. जशी जिथे जागा मिळेल तिथे मुलं राहिली. विलक्षण अनुभव होता. एकांकिका करायचो, तेव्हा जसं वातावरण होतं तेच मी पुन्हा अनुभवू लागलो.

रश्मिता पुण्याहून गाडी, ड्रायव्हर घेऊन निघाली. तळेगावला गेली. तिने दीप्तीला पिकअप केलं. दीप्तीला इथे सोडायची जबाबदारी घेतली होती. दीप्तीला सोडायला आली. तिला शूटला सोडलं आणि स्वतःही परत गेलीच नाही.

त्या सेटवर सहकार्य, समर्पण आणि उत्साह आणि तरीही सगळे भानावर होते.

नेहमीसारखं धडाधड शूट सुरू झालं. मेघमाला मॅडम रोज स्वतः काढा बनवत होत्या. प्रत्येकाला देत होत्या.

मी असाही अनुभव घेतला की, विचारायचो एकमेकांना की कसलीच अडचण कशी येत नाही?

आबाजींचा दांडगा जनसंपर्क, प्रेमाने, आपुलकीने वागणं आणि आजवर निःस्वार्थीपणे लोकांच्या उपयोगी पडणं माझ्या पथ्यावर पडलं. मी म्हणेन ते लोकेशन, मी म्हणेन ते लोक मला मिळत होते. एखाद्या दिग्दर्शकाला काय हवं असतं, याची पूर्ण जाणीव असलेला निर्माता.

त्यांचा प्रोफेशनॅलिझम मी निळकंठच्या वेळीच अनुभवला होता आणि आता तर ते त्याही पुढे गेले होते.

सगळी मुलं खूश असली पाहिजेत आणि उत्तम प्रॉडक्ट व्हायला हवं याकडे त्यांचं लक्ष होतं.

सिनेमातून काय मिळायचं ते मिळेल, सर. तो व्यवसायाचा भाग आहे; पण तुमच्यासारखी माणसं आमच्या भागात येतात. या मुलांना शिकता येतं, हेच मला खूप आहे, असं त्यांचं म्हणणं होतं.

आबाजी, रिशी, रोहन, मेधा मॅडम, पायल, सुरेश भाऊ, अभी आणि कुटुंबाशी संबंधित सगळेच राबत होते. घरी जेवण बनत होतं. युनिट फार मोठं नव्हतं; पण तरीही माणसं होतीच आणि शूटिंग चालू होतं.

रोज दुपारी एक डॉक्टर सेटवर यायचे. ॲम्ब्युलन्स तयार होती. रोज चेकअप होत होतं आणि आम्ही ऑक्सिजन, ब्लड प्रेशर आणि टेम्परेचरचे गुण मोजत होतो.

याला आणखी एक बाजू, रश्मिताच्या फोनवर कुठल्यातरी ग्रूपवर जोरदार चर्चा चालू होती. अशा दिवसांत पण शूटिंग. याला परवानगी कुणी दिली? याला बघा रे कुठून मिळतात... पैसे कमवायचं दुकान उघडलंय... सुमार काहीतरी करणार. असा लोकल ॲक्टर आणि नातेवाईक घेऊन सिनेमा होतो का, अशा आशयाची वाक्यं होती.

मला ते नवीन नाही; पण तरीही वाईट वाटलं. शूटिंग सुरूही झालं नाही धड, तर सुमार आहे हे कसं ठरवणार आणि निर्मात्याला बकरा म्हणायची काय मेन्टॅलिटी असते? मी चिंचेखाली जाऊन उभा राहिलो आणि मला माझीच दुसरी बाजू ऐकू येऊ लागली.

धूर तर निघणारच. आगच तशी लावलीय आपण... लोक घराबाहेर पडायला आसुसलेत आणि आपण सेटवर आहोत.

अख्खं जग जिथे बंद आहे, तिथे आपण शूटिंग करतोय. लॉकडाउननंतर जगातलं पहिलं आउटडोअर शूट होतं हे. आणि मला ही ऐतिहासिक घटना वाटते. पुन्हा मला एनर्जी आली. पॉझिटिव्ह फीलिंग आलं.

आणि या शूटिंगच्या चर्चा ऐकून इतरही पॉझिटिव्ह विचार करणाऱ्यांना हुरूप आला. आणखी ठिकाणी कामं सुरू झाली.

एकवीस तारखेला आम्ही गॅप घेतला. आबाजी म्हणाले, ''एक सुट्टी घेऊ.''

मी मान्य केलं. त्या दिवशी पुढची तयारी केली. आणखी काही लोकेशन्स शोधली.

मुळा धरणाच्या बॅक वॉटरवर गेलो. अप्रतिम दृश्य होतं समोर. आपल्याकडे हवी ती उत्तमोत्तम लोकेशन्स आहेत. जगातलं सर्व प्रकारचं सौंदर्य आपल्याकडे उपलब्ध आहे.

मला अनेकदा लोक विचारतात, 'हे कुठे शूट केलं? हे कुठलं लोकेशन आहे?'

आहे, आपल्याकडे सगळं आहे. फक्त ते तसं दिसलं पाहिजे नजरेला आणि फिल्मही लोकेशनमध्ये नाहीतर लोकेशनवर लावलेल्या लेन्समध्ये असते. कुठली लेन्स लावून, कॅमेरा कुठे प्लेस करायचाय हे जाणवल्याशिवाय त्या लोकेशन्सना अर्थ नसतो.

डॅमच्या मागच्या बाजूला जे पाहिलं तिथे शूट करण्यासारखं स्क्रिप्टमध्ये काही नव्हतं; पण मला इथे शूट करायचंच होतं. आपोआप स्क्रिप्टमध्ये सिच्युएशन तयार झाली. त्या दिवशी जे भटकलो ते सारं आपसूक स्क्रिप्टमध्ये झिरपलं आणि पुढेही झिरपत राहील.

आरामात वेळ घेऊन काम चालू होतं. सगळी नवीन मुलं आणि सगळे तयारीचे अभिनेते. टेक्निशिअन्सही मोठमोठ्या ठिकाणी काम करणारे, तरुण; पण अनुभवी. जे लॉकडाउनमध्ये गावाकडे येऊन राहिलेले ते युनिटमध्ये होते.

सगळेजण एका ठिकाणी राहत होतो; त्यामुळे तारखा उपलब्ध असणं, याला सोडायचंय, तिचं काहीतरी आहे, कॉल टाइमचा गोंधळ असली काही झंझटं नव्हती. शूटिंग अगदी सहज आणि शेड्युल्डप्रमाणे चालू होतं. रोज संध्याकाळी पॅकअपनंतर आबाजींचं एक वाक्य ठरलेलं असायचं, 'सूर-गाण्यांशिवाय पिक्चरला मजा नाही आणि पिक्चरला जिवंत ठेवतात गाणी. लिहा.'

मी हो हो म्हणत राहिलो. सिनेमात गाण्यांच्या जागा होत्या. अजय-अतुलच्या नावाचा हट्ट धरला. आधीचा आमचा सिनेमा त्यांनी केला होता. आबाजीही खूश होते. अतुलशी बोलणं झालं. त्याने सिनेमा करायचं मान्यही केलं; पण प्रश्न वेळेचा होता.

एका विशिष्ट वेळेत सिनेमा पूर्ण व्हायला हवा होता. अजय-अतुल सिनेमाचं सोनं करणार हे वेगळं सांगायला नको... वेळेचं गणित जमत नव्हतं, एवढाच काय तो प्रश्न. आबाजींनी माझी काही गाणी ऐकली होती. ते म्हणाले, ''तुम्हीच करा.''

हे धाडस तेच करू जाणे. तुम्हाला हवा तो ॲरेंजर घ्या. जगातला कुणीही चालेल. माझी तयारी आहे. फक्त वेळेत करा.

लॉकडाउन संपताना सुरू झालेला सिनेमा थिएटर उघडेपर्यंत कुठलंही कॉम्प्रमाइज न करता पूर्ण करू, असं त्यांचं रास्त म्हणणं होतं.

कशासाठीही थांबून राहायची त्यांची तयारी नव्हती आणि सिनेमा दिवसेंदिवस उत्तम वळणदार होत चालला होता.

'पप्याच्या पिंकीची लव्हस्टोरी'... अनेक नावं आली-गेली आणि हे नाव फायनल झालं. (आता ते बदलून) 'अडकित्ता' झालंय!

बंदुकीच्या गोळीला जर फुलपाखराचे पंख फुटले तर काय हो? ती ही गोष्ट होती.

तारुण्य कायम नादात झिंगलेले असते. तो नाद आयुष्य घडवतो आणि उद्ध्वस्तही करू शकतो.

पप्या, नागेश आणि पिंकी या तीन निरागस मुलांची कथा आहे ही. पप्याला गुन्हेगारीची पार्श्वभूमी आणि नागेश, पिंकी एकदम सरळ, कष्टाने धडपडून उभे राहणारे, नव्या पिढीचे प्रतिनिधी. एका छोट्या गैरसमजातून तिघांच्या आयुष्याचा डाव लागतो. आताची तरुण मुलं आणि गुन्हेगारी वातावरण. राजकारण्यांच्या गुन्हेगारी साट्यालोट्यात रॉ-मटेरिअल झालेली तरुण मुलं आणि त्यांच्यात उमलत असणाऱ्या नव्या आशा-आकांक्षा, प्रेम-राग-लोभ-सूड, उद्ध्वस्त होणं, तुटून पडणं.

अशा आताच्या खऱ्याखुऱ्या भोवतालची गोष्ट पडद्यावर उमटत होती. जी मुलं यात काम करत होती, त्यांना लांबून का होईना पण हे जग दिसत होतं.

आणि काम करणाऱ्यांची जिद्द, समर्पण, धाडस, इन्वॉल्व्हमेन्ट मला दिसत होती.

एक मुलगा फक्त शूटिंग बघायला आला होता. मी त्याला सीनमध्ये उभं केलं. तो इतका फिट बसला. आधी लाजत होता; पण मग त्याला इंटरेस्ट येऊ लागला आणि बघता बघता तो सिनेमाचा एक महत्त्वाचा भाग बनला.

सिनेमा कसा बनत जातो, याची अनेक उदाहरणं मी पाहिलीत आणि त्यातलं लक्षात राहावं असं उदाहरण नव्याने घडताना मी रोज अनुभवत होतो. भल्या पहाटे उठून गरम पाणी पीत आजचं काम डोक्यात घोळवत बसण्याची माझी सवय आहे. पहाटे फटफटत जाणारा निळा रंग ही माझी ऊर्जा आहे.

असे क्षण शक्यतो मी वाया जाऊ देत नाही. जे काही पुढे व्हायचंय ते या वेळेत आकार घेत असतं.

मी चिंचेला नाव दिलं 'फलक आरा' आणि रोज पहाटे तिथे बसून तिच्याशी बोलू लागलो... तासभर. माझी ही सवय सागरला, सौरभला समजली होती. मी कधी त्यातून मोकळा होणार हेही त्यांना समजलं होतं. सागर माझ्यासाठी चहा बनवू लागला. त्याच्या हातच्या चहाची चव अगदी वृंदा बनवते तशी होती. आताही मी हे लिहीत बसलोय तर पहाट होतेय. खिडकीबाहेर निळा रंग पसरू लागलाय. त्यात आभाळ मोकळं आहे आज आणि तेच - तसेच पक्ष्यांचे आवाज!



शासनाच्या गाइडलाइनप्रमाणे मला वीसपेक्षा जास्त लोक सेटवर ठेवता येत नव्हते. उलट, त्यामुळे शूटिंग जास्त सुटसुटीत झालं.

फक्त कॅमेरा, एवढीच रिक्वायरमेन्ट होती. तो मात्र आम्ही भारतात नुकताच आलेला हेलियम मोन्स्ट्रो वापरला. सोरेनने तेवढंच मागितलं. बाकी लाइट्स, जनरेटर, ट्रॉली, जिमी जीप कुठलीच इक्विपमेन्ट नव्हती. जो प्रकाश उपलब्ध होता त्यात सोरेनने कमाल केली. एक-एक शॉट देखणा होत चालला होता. लोकांनी सोडून दिलंय आणि ओसाड झालंय अशा गावात नागेश आणि नंदा येऊन लपतात. तिथे रात्री शूट करायचं होतं. दोन गाड्यांचे क्रॉस केलेले

हेडलाइट्स आणि शेकोटी एवढ्यावर सोरेनने रात्रीचा औरा निर्माण केला.

माझं नेहमी असं म्हणणं आहे की, तांत्रिक बाजू नंतर येतात. तो फक्त सपोर्ट आहे. आधी येतं ते म्हणावं. काय म्हणायचंय! कसं म्हणायचंय तेही तितकंच महत्त्वाचं आणि तांत्रिक अडचणींवर मात करते ती कल्पनाशक्ती. कुठलीही अडचण तिच्या सोल्यूशनशिवाय येत नाही. आम्हाला कुठलीही अडचण, अडचण वाटलीच नाही.

सिनेमा एकमताने तयार होतो; परंतु ते एक मत दिग्दर्शकाचं असतं, असं मी नेहमी गमतीने म्हणतो; पण सगळ्यांनी ते फार सिरिअसली घेतलं होतं.

रोज बातम्या येत होत्या. कोविड पेशंट्सची संख्या वाढत होती आणि अजूनही वातावरणात भीती होतीच; पण ते बाहेर... माझं युनिट सुखरूप होतं. इतकं कुठे कुठे शूटिंग करूनही आम्ही सगळ्यांनी सगळ्यांची काळजी घेतली होती. मुळात एका परिघाबाहेर आम्ही जात नव्हतो आणि परिघाबाहेरच्यांना आता आत घेत नव्हतो. एअर बबल तयार केला होता.

रात्रीचा आणखी एक मोठा सिक्वेन्स होता. एक अख्खा मर्डर सिक्वेन्स आणि त्यानंतरचा चेस. आम्ही तो देहरे गावात केला. पाऊस पडून गेला होता आणि स्ट्रीट लॅम्प्सचं प्रतिबिंब पडून रस्ते चमकत होते. रात्री उशिरा आम्ही तो सीन केला. गावात काळोख्या गल्ल्या आणि गावातल्या रस्त्यांवर स्ट्रीट लॅम्प्स.

अत्यंत रिॲलॅस्टिक परिणाम जाणण्यासाठी हे एवढंच पुरेसं होतं आणि तो इफेक्ट मिळवण्यात आम्ही यशस्वी झालो.

एका रेल्वे पुलाखालून नंदा, नागेशला स्कूटीवर घेऊन पळते आणि रेल्वे पुलावरून जायला हवी होती. रेल्वे बंद आहेत. फक्त मालगाड्या चालू. त्यांचं वेळापत्रक माहीत नाही. पुलाखाली दोन्ही ॲक्टर तयार होते. आम्ही दूर, मोठ्या रस्त्यावर कॅमेरा ठेवून तयार... असा तास दीड तास गेला... लोक येता-जाता बघत होते. हे लोक काही न करता फक्त उभे का आहेत उन्हात. केव्हातरी गाडीचा हॉर्न ऐकू आला आणि तो टायमिंगचा शॉट मिळाला. एकीकडे मारुती, दुसरीकडे सौरभ ट्रकवर उभे राहून गाडीची वाट पाहत होते.

बघता बघता एकोणतीस तारीख आली. त्या दिवशी शूटिंग पूर्ण झालं. दुसऱ्या दिवशी कुणाचाही पाय निघेना तिथून. तिथेच रेंगाळलो. रात्री आबाजींनी सगळ्यांना पार्टी दिली.

तीस तारखेला मी, सोरेन पुण्याला आलो. खूप दिवसांनी पुण्याच्या घरी येत होतो. सोसायटी घेईल की नाही इथपासून शंका होती.

घरी आलो. घर स्वच्छ केलं आणि आता इथे राहायचं म्हणून आम्ही दोघांनी आवश्यक ते महिनाभराचं सामान भरलं.

त्याच दिवशी डॉ. शशिकला कांबळे मॅडमचा फोन आला. शशिकला मॅडम मला दोन वर्षांपूर्वी येऊन भेटल्या होत्या. त्यांनी भयंकर संघर्षातून शिक्षण घेतलं. डॉक्टरेट झाल्या आणि एच.ओ.डी. म्हणून एस.पी. कॉलेजमधून रिटायर झाल्या.

त्यांच्या त्या एकूण अनुभवांवर सिनेमा व्हावा, असं त्यांना वाटत होतं. आमच्या बऱ्याच बैठका झाल्या. विलक्षण अनुभव होते त्यांचे. आम्ही सगळे त्या वेळी रेकॉर्ड केले होते आणि मग त्यावर स्क्रिप्ट तयार केलं होतं.

ते स्क्रिप्ट मी टी सीरीजमध्ये ऐकवलं होतं. त्यांना ते पसंत पडलं; पण प्रोजेक्ट सुरू होईना. हा एक हार्डकोअर अनुभवांवर आधारित रिॲलिस्टिक सिनेमा होता आणि तो रीजनल भाषेत जास्त भावेल, असं प्रत्येकाचं मत पडलं. टी सिरीजला रीजनल भाषेत सिनेमा करणे त्यांच्या तेव्हाच्या स्ट्रॅटेजीमध्ये बसत नाही, असं त्यांनी कळवलं.

एक दिवस मॅडम म्हणाल्या, ''आपणच तो सिनेमा करू. काय खर्च येईल?'' आम्ही बजेट बनवलं. मॅडम धाडसी आहेत. त्या धाडसावरच त्यांनी परिस्थिती वाकवली आणि आयुष्यात उभ्या राहिल्या. त्या कष्टाची, धाडसाची, चिकाटीची प्रेरणा देणारीच ही फिल्म होती. आम्ही बरंच काम केलं त्यावर. लोकेशन्स पाहून आलो होतो आणि सिनेमा म्हणून त्यावर बराच विचार झाला होता; पण मग गोष्टी लांबत गेल्या आणि पुढे लॉकडाउनमुळे थांबलंच.

मॅडमचा फोन आला. तर मी म्हणालो, ''मी पुण्यात आहे. उद्या भेटू या.''

तो दिवस आरामात गेला. आता पुढे काय करायचं त्याचे बेत सुरू होते; कारण जो करून आलो त्या सिनेमाच्या एडिटिंगसाठी ट्रान्सकोडिंगला वीस-बावीस दिवस लागणार होते. मग काही दिवस इथेच राहू असं ठरलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी मॅडम आल्या. सिनेमावर बोलणं झालं. आपण आता तो सिनेमा करू या, असं म्हणाल्या. मी विचारलं, ''कधी करू या?'' त्यांनी एका क्षणात म्हटलं, ''उद्यापासून सुरू करा. माझी तयारी आहे.'' मी ते सिरिअसली घेतलं. आबाजींना फोन केला. म्हटलं, ''उद्या येतो.'' ते त्यांच्या स्टाइलमध्ये म्हणाले, ''या!''

दुसरा फोन अंजली पाटीलला केला. तिला फोनवर साधारण त्या संघर्षाची गोष्ट सांगितली. साधारण स्क्रीन प्ले कसा जातो ते सांगितलं. अंजली 'हो' म्हणाली.

अंजलीसोबत या आधी मी 'द सायलेन्स' केली होती. आम्हाला तशी एकमेकांची काम करण्याची पद्धत माहीत झाली होती.

कैलास वाघमारेचं काम मी प्रत्यक्ष पाहिलं नव्हतं; पण मला एका कार्यक्रमात तो भेटला. तिथे दोन दिवस आम्ही सोबत होतो. मला तो भलताच उमदा माणूस वाटला.

मी कैलासला फोन करून सगळी परिस्थिती सांगितली. ''गुरुजी, कधी यायचं ते सांगा. मी पोहोचतो.'' इतकंच म्हणाला.

मी मॅडमना म्हणालो, ''उद्या सकाळी निघू.''

सकाळी 'विद्यापीठ'चं स्क्रिप्ट घेऊन आम्ही निघालो. तो दोन जुलैचा दिवस होता. जाण्या-येण्याचे ई-पास आबाजींनी सगळी प्रोसेस करून काढले. आम्ही नगरला पोहोचलो. पुन्हा एकदा 'फलक आरा'शी बोललो.

देहऱ्यात युनिट होतंच. अजूनही तिथून कुणीच हललं नव्हतं. कॅमेरा मात्र रातोरात मुंबईला गेला होता.

लॉकडाउन होण्याआधी एका मोठ्या हिंदी सिनेमावर माझी निरीक्षक म्हणून नेमणूक झाली होती. त्या संदर्भात मला भोपाळला जायचं होतं.

भोपाळवरून आल्यावर 'विद्यापीठ' सुरू करावा की करून मग जावं, मला कळत नव्हतं. मनात ओढाताण होती. अंजलीशी बोललो. १५



जूननंतर अंजलीने दुसऱ्या एका कामाला तारखा दिल्या होत्या. आता मला शूट करणं भाग होतं आणि माझा निर्णय झाला. आम्ही सगळेच तयारीला लागलो. आबाजी आणि त्यांची कंपनी कार्यकारी आणि सहनिर्माते म्हणून सगळं काम पाहणार होते आणि त्यांनी ती जबाबदारी उचलली.

माझ्या आधीच्या सिनेमातले दोन्ही हिरो दीप्तीसोबत असिस्टंट म्हणून काम पाहू लागले. बाकी टीम तशीच राहिली.

'विद्यापीठ'वर आधीच खूप काम झालं होतं. त्याची थॉट प्रोसेस ठरलेली होती.

आणि आता प्रत्यक्ष काम करायला घेतल्यावर त्याचा फॉर्म मनात आकार घेऊ लागला होता.

मी कधीच कुठल्या कलावंतांना हातात स्क्रिप्ट देत नाही; कारण कागदावरचं स्क्रिप्ट आणि मनात, डोक्यात आकार घेणारं स्क्रिप्ट वेगळं होत गेलेलं असतं. रंगरूप, आकार, ध्वनी-प्रकाश, प्रोसीनं ब्लॉक्स फ्रेम्स हे सगळं कागदावर उतरत नाही किंवा असं म्हणू या की, मला उतरवता येत नाही. मला पडदा दिसतो आणि अख्खा सिनेमा दिसतो, ऐकू येतो. त्याचा फॉर्म दिसतो आणि तो तसा उतरवण्याचा माझा प्रयत्न असतो. अजूनही मला दिसलेला सिनेमा मला जसाच्या तसा उतरवता आलेला नाही.

'विद्यापीठ' सारखा त्याचा फॉर्म बदलत होता. अंजलीला थोडं टेन्शन येणं साहजिक होतं; कारण एका बाईच्या आयुष्यातला एक मोठा काळ सादर करणार होतो. ती त्यात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सगळी परिस्थिती टप्प्याटप्प्याने बदलत जाणार होती. ते सगळं झिरपणं महत्त्वाचं होतं. तिने स्क्रिप्ट मागितलं. मी माझ्याकडे जे होतं ते पाठवलं; कारण चर्चेला वेळ कमी होता आणि आमची एकही भेट झालेली नव्हती. ती काय तयारी करून येणार? पण मी तिला सांगितलं, ''हे फक्त रेफरन्स स्क्रिप्ट आहे.''

एका मुलीचं लहानपण आणि मोठेपण या दोन वेगळ्या व्यक्तिरेखा एकमेकींना आपापली गोष्ट सांगताहेत.

मोठी शशी छोट्या शशीला सांगते, 'बरं झालं. मोठी झाली नाहीस. हे भोग तुझ्या वाट्याला आले नाहीत.' आणि छोटी शशी तिला तिची गोष्ट सांगते. असा वेगळा पट नव्याने सुरू झाला.

शूटिंगला दोन दिवस बाकी असताना अंजलीचा व्हॉइस मेसेज आला. तिला एकूणच हे शूट करणं जमणार नाही, असं तिने कळवलं.

मीही ठरवलं की, ती कम्फर्टेबल नसेल तर शूट कॅन्सल करू. शेवटी फिल्म महत्त्वाची आणि एका वेगळ्या कॉजसाठी ती करत होतो. ताण घेऊन मला करायचं म्हणून काही करायचं नव्हतं.

युनिट थांबलेलं. पैसे गुंतलेले. मी सगळं कॉम्पेन्सेट करायची तयारी ठेवली होती.

संध्याकाळपर्यंत वेळ घेतला. गोदा म्हणाला, ''सगळं व्यवस्थित होईल. तू अंजलीशी मोकळेपणाने बोलण्याची गरज आहे.'' आणि तसंच झालं.

संध्याकाळी सगळे पोहत असताना मी तळ्याकाठी बसून स्क्रिप्टवर काम करत होतो. तिथून अंजलीला फोन लावला. दोघांनी शांतपणे चर्चा केली. थोडा मोकळेपणा आला. मलाही काही प्रश्नांची उत्तरं सापडली. काही मार्ग निघाले. सगळे लोक पोहून बाहेर येईपर्यंत माझा प्रश्न सुटलेला होता. मी कशातून गेलो हे मी कुणालाही सांगितलं नाही; पण ते लपूनही राहिलं नाही.

त्या रात्री कैलास आला. मस्त माणूस. दिलखुलास. त्याने एकही प्रश्न विचारला नाही. पूर्ण निश्चयाने आला होता.

दुसऱ्या दिवशी मी बाजेवर पडून 'फलक आरा'शी बोलत होतो आणि दुपारी अंजली आली. सोबत तिची आई होती. फारच प्रसन्न व्यक्तिमत्त्व. मला अजून त्या डोळ्यांसमोर आहेत. अंजलीला सोडायला आल्या होत्या. डबा खाल्ला आणि आल्या पावली नाशिकला परत गेल्या. मला खरोखर सेटवर आई येऊन गेल्याचा भास झाला.

संध्याकाळी पुन्हा जेव्हा सगळे पोहायला गेले, तेव्हा अंजलीने थोंग आणला होता. हे एक स्विस वाद्य. ती ते वाजवत बसली. तासभर वाजवत होती. एक वेगळाच नाद सर्वत्र भरलेला होता. ती ट्रान्समध्ये जाऊन वाजवत होती. तो आवाज आणि पोहणाऱ्यांचा आवाज आणि ती कातरवेळ. पुन्हा एक गडद छाया-प्रकाश मला 'विद्यापीठ'साठी सापडला.

या दोन्ही सिनेमांमध्ये फार इक्विपमेन्ट वापरायची नव्हती. सहज, सरळ, साधेपणा अपेक्षित होता. साधा ट्रॉली ट्रॅक पण वापरला नाही. सगळा भार योग्य लेन्स आणि कॅमेरा प्लेसमेन्टवर होता; त्यामुळे त्याची ट्रीटमेन्ट वेगळ्या पद्धतीने ठरवली होती.

नुकताच केलेला सिनेमा आणि 'विद्यापीठ' यांच्या जॉनरमध्ये जमीन-अस्मानचा फरक.

एक जगून झालेला हार्डकोअर अनुभव जशाच्या तसा मांडायचा होता.

ऐंशीच्या दशकातला काळ उभा करायचा होता. आबाजींनी अशी काही लोकेशन्स दाखवली जणू इथेच ते ते प्रसंग घडले असावेत. जुन्या इमारती आणि तो काळ उभा राहिल्याने काम सोपं झालं होतं.

कथा शशिकला मॅडमची होती आणि त्या स्वतः सेटवर हजर होत्या. कुठलाही रेफरन्स लागला तर त्या सांगत होत्या. अर्थात प्रत्यक्ष घडलेल्या घटना आणि त्याचे ॲडॉप्शन यात परिणाम पातळ होणार नाही, याची मात्र आम्ही काळजी घेत होतो. संदर्भ जरी बदलले तरी मूळ आशय हलू देत नव्हतो.

अनेक संस्था आणि कॉलेजेसमध्ये जाऊन शूटिंग सुरू होतं; कारण मुळात कथा शिक्षणाची होती; त्यामुळे जागा, लोक बदलू लागले आणि बाहेर दहशत वाढली होती. कोविड रुग्णांची संख्या वाढू लागली होती. मृत्यूचे आकडेही येत होते. आमचा परिघही वाढू लागला होता.

आणि अचानक अहिरे सर पॉझिटिव्ह झाले, अशी बातमी मलाच आली. आरोग्य अधिकारी आले. चौकशी झाली. मग कळलं अहिरे सर नव्हे, लाहेरे सर पॉझिटिव्ह झाले आणि ते शासकीय अधिकारी आहेत.

आमचं शूटिंग निर्विघ्न चालू राहिलं.

नगरच्या न्यू आर्ट कॉलेजच्या प्राचार्यांनी अख्खं कॉलेज उघडून दिलं होतं. प्राचार्यांच्या केबिनमध्येही काही दृश्यं होती. तीन दिवस प्राचार्य, उपप्राचार्य आणि बाकी स्टाफ आम्हाला सहकार्य करत होता. लॉ कॉलेजच्या प्राचार्यांनी तेही कॉलेज उघडून दिलं.

क्लेरा ब्रूस या संस्थेने मुलींचं वसतिगृह उघडून दिलं होतं.

कोविडच्या दहशतीतही लोक मदतीला उभे राहिले होते. सतीश मिसळ नावाचे एक अधिकारी आम्हाला खूप मदत करत होते. ते अचानक यायचे थांबले. नंतर कळलं, त्यांना कोरोना झाला आणि ते स्वतः होऊन क्वारंटाइन झाले. आम्ही त्यांना खूप मिस केलं.

आता हळूहळू गावं बंद होऊ लागली. सगळीकडे ताण वाढू लागला होता. एका गावात मिळालेलं फायनल झालेलं लोकेशन तिथल्या लोकांनी दबावाला बळी पडून आम्हाला द्यायला नकार दिला. त्याच गावात, त्याच वेळी दुसरं लोकेशन मिळालं. ते जास्त वास्तववादी होतं. आम्ही तिकडे शिफ्ट झालो आणि आधी नकार दिलेले लोक शूटिंग बघायला दिवसभर येऊन थांबले. कुठेच मनं कलुषित झाली नाहीत. ठरलेलं सगळं पार पडलं. अंजली आणि कैलास त्या पात्रांमध्ये झिरपून गेले होते.

अत्यंत संवेदनशील आणि अगदी जमिनीवर असलेले हे दोन्ही कलावंत ते अगदी तेच दिसत, वागत होते, ज्या भूमिकेत ते होते.

जाणीव आणि समज या अत्यंत टोकदार गोष्टी दोघांकडे होत्या. व्हॅनिटी व्हॅन्स, स्पेशल ट्रीटमेन्ट असलं काहीही तिथे नव्हतं. तिथे लोक फक्त काम करायला आले होते आणि फक्त काम करत होते.

त्या सेटवरची शिस्त, साधेपणा आणि कामावरचा फोकस या तीन गोष्टी जन्मभर सोबत करतील.

ठरल्याप्रमाणे सात दिवसांचं एक शेड्यूल पूर्ण झालं. त्या रात्री कुणी झोपलं नाही. रात्रभर अंजली तिचा थोंग वाजवत होती.

मुलं गप्पा मारत होती.

पहाटे मी आणि ऋषिकेश मुंबईला निघालो. पाच वाजून पाच मिनिटांनी आम्ही नगर-कल्याण हायवेला लागलो होतो. रस्ता सुनसान होता.

चहा चहा झालं होतं; पण वाटेत एका गावात घरगुती चहा मिळाला. ऋष्याने माझे फोटो काढले. माळशेज घाट लागला. धबधबे वाहत होते. तिथे थांबलो. आपण काय करून आलो याचा लेखाजोखा चालू होता मनात. शांत वाटत होतं.

बनगे-पाटील हे एक नवे मित्र मिळाले. देहऱ्यात माझी एक कविता ऐकून हा शेतकरी रडला होता. रोज माझ्यासाठी काहीतरी खायला आणायचा. विशेषतः शेंगदाण्याची चटणी. मग त्याचं नावच चटणी पाटील पडलं. त्यानं पहाटे उठून डबा बनवून दिला होता. जाताना रस्त्यात खायला मिळणार नाही म्हणून.

वाटेत डबा खाल्ला. पाणी प्यायलो. पुन्हा प्रवास सुरू झाला.

दीप्ती, ईशा, सोरेन तिकडेच राहणार होते. पुढचा काही प्लॅन ठरत नव्हता. अजूनही बाकी सगळं बंदच होतं.

मला आता भोपाळला जाणं आवश्यक होतं.

घरी आलो, ती सोळा जुलै तारीख होती. बारा जूनला निघालो होतो. दुसऱ्या दिवशी भोपाळ दोन दिवस पुढे गेलं आणि मग आणखी एक महिना पुढे गेलं. मी गाडी काढली. पुण्याला आलो. दुपारपर्यंत पुण्यात थांबलो. रिकामे रस्ते अंगावर आलेले. घरही रिकामं. आता पुढे काय, हा प्रश्न होता.

मी गाडी काढली. थेट नगर गाठलं. देहरे. मी गेलो, तेव्हा सगळे पोहायला गेले होते. मी 'फलक आरा'खाली जाऊन थांबलो तासभर. मी पुन्हा आलेलो बघून सगळ्यांनाच आनंद झाला.

आता पुन्हा पप्या-पिंकीच्या सिनेमाच्या एडिटिंगला बसलो. एडिट सेटअप एम.आय.डी.सी.च्या आबाजींच्या ऑफिसवर लावला होता. दीप्ती अठरा जूनला जी आली ती इथेच होती. तिने रात्रंदिवस बसून अख्खा सिनेमा एडिट करून घेतला होता. लाइनअप झालेलं होतं.

आता गाणी करायची होती. संगीत मी करावं असं ठरलं होतं. नगरला जाताना एकटा होतो गाडीत. फोन रेकॉर्डर ऑन केला. ज्या चाली डोक्यात घोळत होत्या, त्या उतरवल्या आणि त्यावर काम चालू होतं. काही चाली गंमत म्हणून ऐकवून पाहिल्या. इंटरेस्टिंग वाटत होतं; पण काही फायनल केलं नाही. चैतन्यला फोन करून विचारलं 'अरेंजमेंट

करशील का?' तर तो हो म्हणाला.

मी, सोरेन, ईशा आम्ही पुण्यात आलो आणि गाण्यांवर काम सुरू केलं. दीप्ती एडिटिंगला बसली होती. चैतन्य आला. मी प्राची रेगेला म्हटलं, ''आपल्याला गाणी करायचीत.'' तीही आली. तिने मोलाचं साहाय्य केलं. चाली तपासून पाहिल्या. एका ठिकाणी एका चालीला नेटकं वळण दिलं. प्राची खूप टॅलेन्टेड मुलगी आहे. उत्तम लिहिते, उत्तम गाते. समज आणि जाणीव दोन्ही गोष्टी बाळगून आहे. तीन दिवस बसून आम्ही चाली फायनल केल्या. त्यावर शब्द लिहिले आणि ट्रॅक्स करायला घेतले.

पुढच्या तीन-चार दिवसांत रफ स्केचचं रेकॉर्ड झालं. गाणी हातात मिळाली आणि पुन्हा नगरला धूम ठोकली. सगळं युनिट पुन्हा गोळा झालं.

दोन गाणी कुठे, कशी करायची पक्कं ठरलं होतं; पण एक रोमॅन्टिक गाणं आहे, त्यासाठी विशिष्ट वातावरण हवं होतं.

आम्ही भंडारदऱ्याला गेलो; पण तिथेही पाऊस नव्हता आणि शूटिंगला परवानगीही मिळेना. कुठलेही गावकरी मदतीला तयार नव्हते. मग ते गाणं आता नको करू या असं ठरलं. बाकीची दोन करू.

बोलता बोलता एक लोकेशन डोळ्यांपुढे आलं. मुळा धरणाचं बॅक वॉटर. मग तिकडे गेलो. इथे गाणं होऊ शकेल असं ठरलं.

दरम्यान, निवास आणि स्वाती दोघंही मुंबईहून आले. निवास सोबत असला की, मी आनंदात असतो. त्यालाही चेंज मिळाला.

आम्ही तळ्यावर फिरायला गेलो. दुसरं एक शेततळं तयार करण्याचं काम बरेच दिवस चालू होतं.

आम्ही पुण्याला निघण्याआधीची गोष्ट आहे – रात्री विचित्र आवाज येत होता. मी बंगल्याच्या मागच्या टॉयलेटमध्ये होतो. बाहेर आलो आणि पाटलांना सांगितलं. कसले आवाज येताहेत बघू या.

एक कुत्री त्या पस्तीस फूट खोल खड्ड्यात पडली होती. हेच ते दुसरं शेततळं. त्यात पाणी नव्हतं आणि नुकताच नवीन पेपर टाकला होता. तिला वर येता येत नव्हतं. घाबरली होती. ती प्रेग्नन्ट होती. तिला सोडवण्याचा एक कॉमेडी सीन सुरू झाला. जो तो आपापल्या परीने लीड करत होता. शेवटी मारुतीने तिला जाळीत उचलून वर काढलं.

गाण्याचं शूटिंग धमाल झालं. खऱ्या अर्थाने शूट पॅकअप झालं. मी, निवास, सोरेन, ईशा, स्वाती मुंबईला आलो. येताना पुन्हा माळशेज घाट. वाटेत डबा खाणं. पोलिसांनी अडवणं. सोडवणं. सगळं झालं.

घरी आलो. दुसऱ्या दिवशी भोपाळची मीटिंग नागपूरला शिफ्ट झाली. तिकडे सात दिवस गेले. गाण्यांचं रेकॉर्डिंग ठरलं होतं.



आजीवसन स्टुडिओ ठरला.

आता मुंबई बऱ्यापैकी हिंडूफिरू लागली होती. हवे ते वादक मिळाले आणि तिन्ही गाणी रेकॉर्ड झाली. गाणी घेऊन मी पुण्याला आलो. २८ ऑगस्टला गाणी पूर्ण झाली. त्याचं मिक्सिंग सुरू झालंय.

आज एकतीस ऑगस्ट. मी हे लिहीत असताना एडिटिंग सेटअप घेऊन आबाजी नगरहून पुण्याला निघालेत. आता एडिट फायनल होईल. काल तीस तारखेला 'विद्यापीठ'च्या पुढच्या शेड्यूलची तयारी सुरू झाली आणि दोन्ही सिनेमांचं पोस्ट प्रॉडक्शन सुरू होईल.

हे सगळं लिहिताना जाणवलं किंवा ते करतानाही जाणवत होतं की, घाबरून जाऊन काही होत नाही. काळजी घ्यायला हवीच; पण प्रवाही राहायला हवं.

जगाच्या पुढे धावायचं, म्हणून हे केलं नाही तर आतली ऊर्मी गप्प बसू देत नव्हती. जगण्यासाठी जिवंत राहणं आवश्यक आहे आणि ते रसरशीत जिवंत जगणं सतत अनुभवत राहायला हवं. युनिटमधला कुणीही माणूस आजारी पडला नाही. ही इच्छाशक्तीच होती प्रत्येकाची. लॉकडाउननंतर झालेला हा पहिला सिनेमा असेल त्याचं कौतुक नाही; पण हातावर हात धरून हतबल न होता माझ्या टीमने शिस्तीत आणि हिमतीने काम केलं. त्यात सगळ्यांचाच संयम आणि शिस्त होती.

हे सिनेमे येतील. त्याचा ठसा उमटेल न उमटेल तो पुढचा भाग!


पण, या अशा काळात आपण काम करत होतो त्याचं समाधान प्रत्येकाला देऊन जाईल.

या युनिटमधल्या प्रत्येकासाठी ही एक ऐतिहासिक घटना बनून राहील. युनिटसाठीच का, सिनेजगतात. या काळात घडलेली ही एक ऐतिहासिक घटना आहे, अशी येणारा काळ नोंद ठेवेल याची मला खात्री वाटते.

**gajendraahire@hotmail.com**

# दुविधा

**पूजा भडांगे**



१

सरकारी नियम निघालाय म्हणून
चार भिंतींत चेंदून ठेवलाय मी जीव
पण मन मात्र नुस्तं धावतंय
रस्त्यावरून चालणाऱ्या असंख्य पावलांमागं.

२.

फ्रिजमध्ये भरून ठेवल्यात पाण्याच्या बाटल्या बऱ्याच
अगदी उकळलेलं पाणी थंड करून पण;
तेवढ्यात बातम्यांतून सांगताहेत,
चालता चालता अर्ध्यात मृत्युमुखी पडलेल्या
लहानग्याची तहान.

३.

माझ्याही दारावरून जात असतील अनेक माणसं
आपापल्या घराच्या दिशेने म्हणून;
मी खिडकीतून बाहेर सोडून दिलेत माझे डोळे लांब रस्त्यावर
तेही पोहोचतीलच की चालत चालत गावाकडे कधीतरी

४.

रिपोर्टर विचारतोय तोच प्रश्न
चालणाऱ्या प्रत्येकाला
चालणाराही देतोय आपलं उत्तर न थांबता
मग मला का ऐकू येताहेत त्यांचे शाप टीव्हीतून
थेट कानावर...?

५.

वेळ जात नाही म्हणून
कागदाची फुलं केलीत अगदी मनापासून.
मात्र, त्यांना वास येतोय
या अस्थिर काळाचा...

६.

आताशा नुसताच उजाडतोय दिवस नेमाने
अंधारतंयही क्रमाने
आताशा मला वाटतंच नाही कुठलं आकर्षण
कुठल्याच प्रहराचं

७.

कवितेच्या निमित्ताने वळवलं स्वतःला स्वतःकडे तर
तिथेही दिसला एकटेपणा...
सोशल डिस्टन्सिंग पाळत
सुचण्याच्या अभिनयात मग्न बसलेला...

८.

उद्या होईलच सगळं काही सुरळीत
तोवर आपण आपले बहर टिकवून ठेवण्याचा
निदान प्रयत्न तरी करू या !

९.

आईच्या कडेवर बसून
घराकडे जाणाऱ्या लेकरांच्या डोळ्यांतला शून्यपणा
मागतोय पुरावे बाळवयातल्या निरागसतेचे...
मला त्या लहानग्यांच्या डोळ्यांची खूप भीती वाटतेय

१०.

काहीच करता येत नाही याची चीड
आणि घरात सुरक्षित असल्याचा स्वार्थ
अगदी छान तोलून धरलाय मी
या काही दिवसांच्या पारड्यात...

११.

पंख्याखाली बसून टीव्ही बघताना
चुकचुकतेय नजर काही वेळ
आणि हजारो मैल लांब चालत जाणारी माणसं
गायब होत आहेत टीव्हीतून अचानकच...!

१२.

एक कादंबरी वाचून संपलीय कालच
मीही मशगुल आहे अजून त्याच पात्रात
तितक्यात गावाहून फोन आलाय
‘काळजी घे’चा

१३.

खरंतर मला कळतंय की,
आपण आता भेटणार नाही
तरीही तू म्हणालास म्हणून लिहितेय कविता
स्वतःची समजूत काढत...

१४.

परिस्थितीच्या कचाट्यातून
निसटून जाण्याचा कुठलाच पर्याय
नसतो शिल्लक आपल्याकडे
हे तुझं वाक्य, हल्ली सारखं आठवतं

१५.

हे सगळं एकदा संपेल किंवा सगळंच एकदाचं संपेल
या विचारात कुरवाळलेत काही क्षण जुन्या दिवसांतले
म्हणून तर तरता आलंय इतके दिवस...

**poojabhadange91@gmail.com**

# कोरोना...कोरोना... आणि प्लेग...

डॉ. उमा वि. कुलकर्णी

या सत्तावन साली । फ्लूची साथ आली ।
फ्लूनं देशामधली । शेकडो माणसं मेली ।।
या या या । लोक हो या ।
एबीसीच्या गोळ्या घ्या ।।
निरुपयोगी तेही ठरले, काय उपाय बोला ।
इन्फ्ल्युएंझा झाला ।
इन्फ्ल्युएंझा झाला ।।

आमचा कंबोडिया-व्हिएतनाम प्रवास जवळ जवळ येऊ लागला, तेव्हा कोरोनाचा जन्म होऊन त्यानं अमेरिका-चीनमध्ये हात-पाय पसरायला सुरुवात केली होती. तिथल्या बातम्या यायला लागल्या होत्या. काहीतरी 'भयंकर' चाललंय हे जाणवत असलं तरी त्याचा आपल्याशी संबंध येईल असं वाटत नव्हतं. तरीही एकीकडे प्रवास कॅन्सल होईल की काय याविषयी आशंका होती. प्रवासाच्या तारखा ३ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी अशा होत्या; पण या दोन्ही देशांमधली परिस्थिती ठीक असल्याच्या बातम्याही येत असल्यामुळे कॅन्सल करायचा प्रश्नच नव्हता. एका सहप्रवासी मैत्रिणींचे जावई अमेरिकेत होते. तिथल्या वातावरणामुळे त्यांना आपल्या सासूबाईंची काळजी वाटू लागली, म्हणून आमच्या सहप्रवासी भगिनीनं 'पैसे वाया गेले तरी हरकत नाही...' म्हणत यायचं कॅन्सल केलं. बाकी सगळ्यांनी प्रवासात मास्क वापरायचा निर्णय घेतला आणि ठरल्याप्रमाणे प्रवास सुरू केला.

कंबोडियात यंदा प्रवासी कमी संख्येनं असल्याचं बोललं जात होतं. आधीच मंदीमुळे प्रवासी उद्यमाचं नुकसान होत होतं, त्यात या आजारानं पुरतं कंबरडं मोडलं जाणार आहे, असंच सगळे बोलत होते. तिथं आणि व्हिएतनाममध्ये आम्ही सगळे बऱ्यापैकी मास्क वापरत होतो. हॉटेल्समध्ये जेवायला जाताना हातावर तीर्थ घालावं तस सॅनिटायझरचा थेंब टाकला जायचा.

कंबोडिया आणि व्हिएतनाममधलं सायगाव उरकून आम्ही 'दा नांग'पासून हनोईला जायला निघालो, तेव्हा आमच्यासोबत असणाऱ्या डॉक्टरांनी सांगितलं, 'यानंतर आपण कोरोनाच्या प्रदेशात जात आहोत... सगळ्यांनी काटेकोरपणे मास्क वापरावेत.' कारण तेव्हा त्या परिसरात एक कोरोनाचा पेशंट सापडल्याची बातमी होती.

त्या आधीच व्हॉट्स ॲपवर जगभरातील कोरोनाच्या बातम्या यायला सुरुवात झाली होती. चीनमधले रस्ते आणि इमारती जंतुनाशकं फवारून शुद्ध करत असल्याचा व्हिडिओ कुणीतरी व्हॉट्स ॲपवर पाठवला होता; त्यामुळे परिस्थिती वाटली त्यापेक्षा बिघडते आहे हे जाणवत होतं.

विमानातून हनोईला उतरल्यावर आमची बस गावातून संध्याकाळच्या वेळी हॉटेलकडे जायला निघाली. रस्ते सुनसान होते. क्वचित कुठेतरी दिवे लावलेले दिसले तरी माणसांचा मागमूस दिसत नव्हता. हे थोडं भयावह होतं. कुणीतरी भाबडेपणानं विचारलं, 'ही कम्युनिस्ट कंट्री असल्यामुळे हे दृश्य आहे का?' परस्पर उत्तर मिळालं, 'नाही! जवळपासच्या खेड्यात कोरोनाची एक केस मिळाली आहे ना! म्हणून काळजी घेतली जात आहे!'

जवळपासच्या एका खेड्यात एक पेशंट सापडला म्हणून ही काळजी! नंतर व्हिएतनामनं घेतलेल्या या काळजीचं खूप कौतुकही झालं!

आम्ही 'आर्मी' नावाच्या हॉटेलवर उतरलो होतो. ते अतिप्रचंड हॉटेल होतं; पण त्यात आम्ही वीसजण वगळता सर्वत्र सामसूम होती. अक्षरशः इतर कुणीच नव्हतं! खोल्या ताब्यात मिळेपर्यंतही आम्ही लांबलांबच्या कोचांवर बसलो. इथल्या साइटसीइंगमध्येही कमीच प्रवासी होते.

अखेरच्या टप्प्यामध्ये एक दिवस 'हालॉन्ग बे'ला एका बोटीत राहायचं होतं. ड्रॅगनहिल्स मानल्या जाणाऱ्या, छोट्या-मोठ्या खडकांनी घेरलेल्या समुद्रातल्या एका छोट्या स्वतंत्र बोटीवर व्यवस्था केलेली होती. केवळ वीसजणांचीच व्यवस्था असल्यामुळे आमच्याव्यतिरिक्त आणखी कुणी नसणार होतं.

आम्ही पोहोचलो, तेव्हा काठावर असंख्य बसेस उभ्या होत्या आणि त्यातून अनेक प्रवासी उतरत होते. पाण्यात भरपूर लहान-मोठ्या नावा होत्या. बस सोडून आम्ही बोटीत चढलो. आत शिरताच सगळ्यांना एका रांगेत उभं करून डोक्यावर यंत्र रोखून प्रत्येकाचं टेम्परेचर तपासण्यात आलं. हात सॅनिटायझरने स्वच्छ केल्यानंतरच बोट सोडण्यात आली.

अनेक टेकड्यांनी घेरलेल्या त्या परिसरातच विखुरलेल्या एका टेकाडामध्ये असलेल्या एका अतिप्रचंड गुहेत आम्हाला नेण्यात आलं. तिथलं निसर्गाचं अद्‌भुत रूप पाहताना एका क्षणी अचानक लक्षात आलं की, बऱ्याचजणांनी मास्क वापरले नव्हते. आम्ही मात्र ते काढले नव्हते. आश्चर्य वाटलं. थोडी भीतीही वाटली; पण बोटीवर पाय ठेवतानाच काळजी घेतल्याचं आठवलं आणि काहीसे निर्धास्त झालो.

हॉटेलवर वायफाय मिळाल्यावर फोटोंची देवाणघेवाण करताना चीन-अमेरिकेच्या भयावह बातम्याही येऊन आदळत होत्या. आमचा भारतात परतायचा दिवसही जवळ येऊन ठेपला होता. मनात एकच आशंका होती, एअरपोर्टवरून घरी परतू देतील की काही दिवस क्वॉरन्टाइन व्हावं लागेल?

बँकॉकला विमान बदलून आम्ही भारताच्या विमानतळावर उतरलो. एअरपोर्टवर सगळ्यांचं तापमान तपासण्यात आलं. शिवाय एक फॉर्महीदेण्यात आला. त्यावर आमचे फोन नंबर आणि पत्ते घेण्यात आले. एवढे सोपस्कार झाल्यावर आम्ही बाहेर आलो. नेहमीचा टॅक्सीवाला उभाच होता. हुश्श म्हणत त्यात बॅगा टाकून आम्ही पुण्याला परत आलो.

'बाल बाल बच गये...' अशा मूडमध्ये खुशीत प्रवासातले फोटो फेसबुक-व्हॉट्स ॲपवर टाकत, मित्रमंडळींना प्रवासाविषयी सांगत असतानाच संपूर्ण जगाबरोबरच भारतातही कोरोनाचं प्राबल्य वाढू लागल्याच्या बातम्या कानांवर येऊ लागल्या. ९ मार्च रोजी आमच्या लग्नाचा पन्नासावा वाढदिवस. 'वैशाली'मध्ये जाऊन ब्रेकफास्ट करून घरी परत आलो.

त्याच दिवशी पुण्यात पहिला पेशंट सापडला. पाहता पाहता सगळ्या जगाबरोबर भारताला, महाराष्ट्राला आणि पुण्यालाही कोरोनानं ग्रासलं आणि 'लॉकडाउन'च्या अभूतपूर्व पर्वाला प्रारंभ झाला.

महिना झाला, दोन महिने झाले. टीव्ही, व्हॉट्स ॲप, फेसबुकवर उलटसुलट बातम्यांचा वर्षाव होत होता. सुरुवातीला भोवंडून जायला झालं. मग सगळे सरसावले. दररोज कुणी ना कुणी - काही ना काही नवा खाद्यपदार्थ, नवे विनोद पाठवून स्वतःची करमणूक करून घेऊ लागलं. कोरोना टाळण्यासाठी काय करावं यावरचे हजार उपाय सुचवले जाऊ लागले. काही ज्योतिषीही महामारी केव्हापर्यंत आटोक्यात येईल याबाबत ठोकताळे बांधू लागले. विज्ञानाकडून काही उत्तर मिळेना, तेव्हा 'बुडत्याला काडीचा आधार' या उक्तीप्रमाणे या विधानाचा आधार घेतला जाऊ लागला.

हळूहळू तोही उत्साह ओसरला. बातम्या आणि आकडेवारीत डोकं घातलं तर नैराश्य येतं, असा अनुभव येऊ लागल्यामुळे दिवसभर ऐकू

येणारे टीव्हीचे आवाज कमी-कमी होऊ लागले. कपाटभर कपडे निरुपयोगी होऊन गेले. बँकेच्या पासबुकवरील आकड्यांवरच्या शून्यांना काही अर्थ नाही, असा ज्ञानोदयही होऊ लागला. जगायला किती कमी पुरतं, याचंही नव्यानं भान येऊ लागलं. एक प्रकारचा अनोखा 'अंतर्प्रवास' सुरू झाला.

-----

एक दिवस मी यांना म्हणजे विरूपाक्षांना विचारलं, 'हे सगळं एखाद्या महायुद्धसदृश परिस्थितीसारखं झालं ना! सगळं जगच यात ओढलं गेलंय!'

यांनी लगेच दुरुस्ती केली, 'मला महायुद्धाचं काही फारसं आठवत नाही; कारण मी तेव्हा न कळत्या वयाचा होतो; पण युद्ध संपल्यानंतरचं थोडंफार आठवतं. काही गोष्टी घरातली मोठी माणसं बोलायची. त्या वेळी अनेकदा जीवनावश्यक गोष्टींची टंचाई असायची. रेशन हा प्रकार तेव्हाच केव्हातरी सुरू झाला. लहान असताना कपड्यांचंही रेशन असल्याचं आठवतं. रेशनकार्डावर मर्यादित आणि ठरावीक प्रकारचंच कापड मिळायचं. आता तसं तर नाही ना! आपल्याला कधीही किराणा मालाची कमतरता जाणवली काय? भाज्या व्यवस्थित मिळतात. कधीच कोथिंबीर नाही असं झालेलं नाही! फळंही मिळताहेत!'

कशाचीही कमतरता भासत नव्हती हे खरंच होतं.

तरीही गावाला पायी निघालेल्या माणसांचे फोटो आणि बातम्या, त्यांचे हाल, विविध पातळ्यांवर चाललेले या महामारीला रोखायचे प्रयत्न...

गेल्या काही वर्षांत डेंग्यू-स्वाइन फ्लूसारख्या नव्या-नव्या आजारांची नावं कळली तरी असा प्रकोप अनुभवाला आला नव्हता. १९५६ मध्ये आलेली फ्लूची साथ आठवते. घरातली सगळी भावंडं आजारी असायचो. दवाखान्यात जाऊन औषध आणायलाही कुणी नसायचं. अखेर आमचे फॅमिली डॉक्टर - डॉ. हुक्केरी हे घरी येऊन सगळ्यांना तपासून औषधं पाठवून द्यायचे. माझा थोरला भाऊ तेव्हा एक गाणं मोठ्यानं म्हणायचा,

या सत्तावन साली। फ्लूची साथ आली।<br>
फ्लूनं देशामधली। शेकडो माणसं मेली।।<br>
या या या। लोक हो या।<br>
एबीसीच्या गोळ्या घ्या।।<br>
निरुपयोगी तेही ठरले, काय उपाय बोला।<br>
इन्फ्ल्युएंझा झाला। इन्फ्ल्युएंझा झाला।।

तरीही गेल्या कितीतरी वर्षांमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात कुठलीही महामारी सामोरी आली नव्हती. प्रत्यक्ष कधीच तिचा असा प्रकोप पाहिला नव्हता.

-----

पण इतकाच अस्वस्थ करणारा प्लेगच्या साथीचा अनुभव काही वेळा साहित्यानं मात्र दिला होता, ते मला आठवत राहिलं.

मला यू.आर.अनंतमूर्तींची 'संस्कार' कादंबरी आठवत होती. या कादंबरीत प्लेग हे एक महत्त्वाचं पात्र आहे. कर्नाटकातल्या एका अतिशय कर्मठ गावात अचानक मेलेले उंदीर सापडू लागतात. कादंबरीतलं एक प्रमुख पात्र नारायणप्पा हा मरण पावतो. त्याच्या अंत्यसंस्काराचा प्रश्न गहन होऊन सगळ्या गावाला ग्रासू लागतो. एकीकडे प्रेत सडल्याची दुर्गंधी गावभर पसरू लागते, आकाशात गिधाडं दिसू लागतात. हे भयाण वास्तव एकीकडे आणि दुसरीकडे अंत्यसंस्काराचा प्रश्न अधिकाधिक क्लिष्ट होऊ लागतो.

संपूर्ण कादंबरीच अंगावर येऊ लागते! कादंबरीचा नायक कर्मठ; पण अतिशय संवेदनशील ब्राह्मण प्राणेशाचार्य. एकीकडे प्लेगनं माणसं मरत असताना त्याच्यासमोर 'धर्मसंकट' उभं आहे. त्यातून मार्ग काढताना त्याला जीवनाचं वेगळंच सत्य सामोरं येत आहे; पण हे होत असताना कसोटी बघणारे अनेक क्षण येतात. त्यात त्याचा जीव घुसमटून जातो. त्याच्याबरोबर वाचकाचाही जीव घुसमटत असल्याचा अनुभव लेखक या प्लेगच्या साथीच्या रूपकाद्वारे देत राहतो.

यात एक प्रसंग तर विशेष बोलका आहे. गरिबीत जगत असलेल्या एका जोडप्याच्या झोपडीत उंदीर पडलेला आढळतो. ते झोपडीबाहेर येतात आणि आपल्या झोपडीला आग लावून वेगळ्या ठिकाणी निघून जातात. जळून जाण्याची काळजी करावं असं तिथं काहीच नसतं! जीव वाचला तरच सगळं आहे, याचं पुरेपूर भान या अडाणी व असंस्कृत मानल्या गेलेल्या जोडप्याला आहे!

-----

हाच प्लेग भैरप्पांच्या आत्मकथनामध्येही भेटतो.

१९८६ च्या सुमारास भैरप्पांचा पुण्याच्या साहित्य परिषदेत कार्यक्रम झाला. त्यांचा तो महाराष्ट्रातला पहिलाच कार्यक्रम होता, तेव्हा त्यांनी भाषणात आपल्या साहित्य-प्रेरणांविषयी बोलताना प्लेगचा उल्लेख केला होता. प्लेगनं त्यांना खूप लहानपणीच मृत्यूचं तांडव दाखवलं होतं. पराकोटीच्या गरिबीबरोबर येणारा हा अनुभव या मुलाला 'मृत्यू म्हणजे काय? आणि तो आमच्याच घरी का येतो?' अशा प्रकारचे गंभीर प्रश्न विचारू लागला. या उत्तराच्या अपेक्षेनं ते तत्त्वज्ञानाकडे वळले आणि तो त्यांचा ध्यास बनला; पण केवळ तत्त्वज्ञानाचे ग्रंथ जेव्हा उत्तरं देईनात, तेव्हा ते जीवनात त्याचा अर्थ शोधू लागले आणि त्यातून त्यांच्या साहित्यनिर्मितीला सुरुवात झाली.

भैरप्पांचं आत्मचरित्र 'भित्ती' (मराठी अनुवाद - 'माझं नाव भैरप्पा') यात ते या संपूर्ण प्रकरणाविषयी अक्षरशः एक-दोन परिच्छेद लिहितात आणि पुस्ती जोडतात, 'माझ्या 'गृहभंग' या कादंबरीत मी आधीच्या चार वर्षांच्या दुष्काळाविषयी आणि या प्लेगविषयी विस्तारानं लिहिलं आहे; त्यामुळे ते इथे नको...'

'गृहभंग' या कादंबरीत मात्र त्यांनी या महामारीविषयी विस्तारानं लिहिलं आहे. महामारीच्या आगे-मागे येणाऱ्या सुक्या-ओल्या दुष्काळाविषयीही तपशील असला तरी प्लेगचं वर्णन जास्त विदारक आहे.

विश्व हे त्यातलं (आणि 'परिशोध'मधलं) भैरप्पासदृश पात्र म्हणता येईल. यातील आई नंजम्मा म्हणजे भैरप्पांच्या आई गौरम्मा. वडिलांचं पात्रही जसंच्या तसं रेखाटलं आहे. भाऊ-बहीण आणि बाकी कुटुंबही जवळपास त्यांचंच आहे.

अतिशय कष्टानं पैसे उभे करून आणि बेजबाबदार नवऱ्याला मनवून कादंबरीची नायिका नंजम्मा मुलीचं, पार्वतीचं लग्न लावून देते. जावईही

मनासारखा असतो. अक्षता पडल्यानंतर माघारी जाताना तो पार्वतीला, म्हणजे आपल्या बायकोला हळूच सांगून जातो, 'लवकरच तुला माझ्याकडे घेऊन जाईन.' तीही मोहरून जाते; पण त्या आधीच प्लेगची साथ येते. घरात ती आणि थोरला भाऊ रामण्णा आजारी पडतात. नंजम्मा आधी दृष्ट काढ - देवीला नवस बोल यांसारखे उपाय करते. नंतर गावात उपलब्ध असलेलं औषधपाणीही करते; पण काही उपयोग होत नाही. आधी पार्वती मरण पावते. तिला अग्नी देऊन सगळे घरी येतात. तोवर रामण्णाचं, थोरल्या भावाचंही जास्त होतं आणि तोही मरण पावतो. त्यालाही स्मशानात घेऊन जातात. इकडे घरात विश्वही फणफणलेला असतो. आता मात्र नंजम्मा दगड होऊन बसते. आपण विश्वला जवळ घेतलं तर आपल्यावर कोपलेली प्लेगदेवी यालाही घेऊन जाईल या भयानं त्याला हातही न लावता बसून राहते. अखेर नरसी येते. छोट्या विश्ववर पुत्रवत माया करणारी नरसी गावात चरित्रहीन म्हणून बदनाम असते. नंजम्मा विश्वला तिच्या ओटीत देते. 'हा माझा मुलगा नाही! तुझा म्हणून याला जगू दे!' असं साकडं घालते. अखेर या महामारीतून विश्व वाचतो.

या प्रकरणाची सुरुवात करताना भैरप्पा लिहितात, 'यंदा टोपलीवाल्या देवीची महामारी नाही आली; प्लेगदेवीचा प्रकोप झाला...' कॉलरा आणि प्लेग किती वरचेवर समाजजीवनावर प्रभाव टाकायचे हे या शब्दप्रयोगावरूनच दिसतं.

'गृहभंग'सारखी आत्मचरित्रात्मक कादंबरी लिहिताना इतर जीवनानुभवांबरोबरच प्लेगचं वातावरणही ते रसपरिपोषासाठी समर्थपणे वापरू शकले. ही त्यांच्या अनंतमूर्तींसारख्या शत्रूंनंही गौरवलेली, अतिशय महत्त्वाची कलाकृती बनली. तीच घटना कादंबरीत कलात्मक रीतीनं वापरताना त्यांच्या नेहमीच्या, संगीतातल्या 'बडा ख्याल' पद्धतीनं सुदीर्घ करतात. कादंबरीत प्लेगमुळे झालेल्या पार्वतीच्या आणि रामण्णाच्या मृत्यूविषयी लिहिताना त्यांनी पंचवीस पानं खर्ची घातली आहेत.

-----

कोरोनाच्या काळात माझा भैरप्पांशी फोनवर संपर्क होताच. एकमेकांच्या दिनक्रमाची चर्चा करणं, एकमेकांच्या तब्येतीची चौकशी करणं, बाकी वातावरणाविषयी गप्पा मारणं सुरू होतं.

या गप्पांमधून साहजिकच एकदा त्यांच्या प्लेगच्या आठवणीही निघाल्या.

माझ्या एका प्रश्नावर या साथीची प्लेगशी तुलना करताना ते म्हणाले, 'प्लेग आणि कोरोना यात फरक आहे. प्लेग दर दोन वर्षांनी यायचा, उंदीर मरून पडायला लागले की, हे लक्षात यायचं. सगळे आपापली घरं सोडून बाहेर राहायला जायचे. शेतकरी लोक आपापल्या शेतावरच्या झोपडीत राहायला जायचे. ज्यांची स्वतःच्या मालकीची वितभरही जागा नसायची, ते गावातल्या देवळाचा किंवा धर्मशाळेचा आधार घ्यायचे.'

मला आठवलं, आमची बेळगावची टिळकवाडीही अशाच प्रकारे वसायला सुरुवात झाली आणि पुढच्या काळात ते सुनियोजित गाव बनलं असल्याचं जवळपासची वयस्कर माणसं सांगायची.

भैरप्पा सांगत होते, 'या आजारामुळे लहान-मोठे, तरुण-म्हातारे, स्त्री-पुरुष मृत्युमुखी पडायचे हे तर खरं; पण याला काळाची मर्यादा असायची. एकदा पाऊस सुरू झाला की, उंदीर मरून पडणं बंद व्हायचं. नंतर सगळे पुन्हा आपापल्या घरी जाऊन राहायला सुरुवात करत. दुसरं म्हणजे गावाचा विशिष्ट भाग या आजाराच्या प्रभावाखाली येई. इतर भागांत राहायला जाऊन माणसं सुरक्षित राहत, तेव्हा प्रवास कमी केले जात; त्यामुळेही सगळी झळ विशिष्ट भूप्रदेशापुरतीच असायची. प्लेग पसरायची पद्धतही वेगळी होती. उंदरांवरच्या पिसवांपासून तो व्हायचा. कोरोनाची प्लेगशी तुलना होऊ शकत नाही, कारण हा आजार पसरायला त्याला व्यक्तींचं केवळ जवळपास येणं पुरेसं आहे. शिवाय तोंडासमोर हात न धरता खोकणं - कुठेही थुंकणं यांसारख्या आपल्याकडच्या सर्वसामान्यांमध्ये असलेल्या सहज-सवयीही याच्या प्रसाराचं काम करतात. प्रवासासाठी विमानासारखी साधनं आहेत; त्यामुळे हा आजार सहजच जगभर पसरत गेला. शिवाय आपण कितीतरी गोष्टींसाठी परदेशांवर अवलंबून असतो. अगदी सफरचंदासारखं फळसुद्धा ऑस्ट्रेलियातून मागवतो. यामुळेही या आजाराचा पुन:पुन्हा प्रादुर्भाव होत राहतो. त्यातच आणखी एक महत्त्वाचा मुद्दा राहतोच. किती केलं तरी प्लेग निसर्ग-निर्मित होता. कोरोना मानव-निर्मित आहे, असंही म्हटलं जातं. तसं असेल तर विषय आणखी कठीण आहे!'

'सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे याचा अर्थव्यवस्थेवर होणारा दूरगामी परिणाम! तेव्हा प्लेगमुळे कुटुंबच्या कुटुंबं उद्ध्वस्त झाल्याची उदाहरणं होती. माझ्या घरीही माझा थोरला भाऊ आणि नुकतंच लग्न झालेली बहीण एकाच दिवशी प्लेगनं गेले. मीही आजारी होतो; पण बचावलो! तरीही, काही काळापुरताच हा येत असल्यामुळे अर्थव्यवस्थेवर काही फार गंभीर परिणाम झालाय असं जाणवायचं नाही. दुष्काळामुळे परिणाम व्हायचा. कोरोनाचा फार मोठा परिणाम आर्थिक पातळीवर होतो आहे. हजारो मजूर-कुटुंबांचं स्थलांतर हा मोठा विदारक प्रकार आहे! शिवाय यानंतरही परिस्थिती पूर्ववत होण्यासाठी किती काळ लागणार आहे ते सांगता येत नाही. त्यातून निर्माण होणारे सामाजिक प्रश्न तर अजून आपल्या आवाक्यातही आलेले नाहीत.'


-----

शेवटी साहित्यिक दृष्टीनं विचार करायचा म्हटलं तर यातून एखादी जबरदस्त कलाकृती जन्माला आली पाहिजे! जर एखादी संपन्न दीर्घायुष्यी ललित कलाकृती जन्माला येणार असेल, तर ती केवळ तात्कालिक अनुभवांवर आधारित असता कामा नये. तिचं सार्वत्रिक, सार्वकालिक व्यापक स्वरूप लक्षात घेऊन ललित कृतीत रूपांतर करणारा एखादा भैरप्पांसारखा 'दैत्य प्रतिभेचा लेखक' पुढे सरसावेल, तेव्हा कोरोना ओसरून गेला तरी सर्वकालीन अनुभव देणारी एखादी अजरामर कलाकृती जन्माला येईल. तो मात्र भविष्यकाळातील वाचकाचा भाग्योदय ठरेल.

**virupaxuma@gmail.com**

# कोरोना...तिथला...आपला...

संकटात आठवतो
आपला गाव, आपला देश, आपली माणसं
झुरत राहतो जीव आठवणीनं
तरीही सावरावं लागतं नव्या भोवतालासोबत
दूर देशात दूर राज्यात एकरूप व्हावं लागतं
आपलं आपलं जग घेऊन
आणि जगत राहावं लागतं
परक्या-आपल्याची गणितं विसरून.



आम्ही
इतिहासाचे साक्षीदार आहोत
म्हणून उर बडवून सांगू
जगलो वाचलो तर.

भविष्य असेलच भाळी
तर भयावर पुन्हा चढेल
आत्मप्रौढीचा थर.


किडनी स्टोनसारखी हलकेच सलत राहील
या काळाची आठवण.

सोबतीची नवी परिभाषा घेऊन उद्यात प्रवेश करू
तेव्हाही राखू
एकमेकात सुरक्षित अंतर.

**-योजना यादव**

# मांजर, मुलं, नवरा आणि...

मोहना प्रभुदेसाई-जोगळेकर



गेल्या महिन्यातली गोष्ट. त्सुनामी, आमचं मांजर. अचानक एक दिवस तिने खाणं बंद केलं. पोट फुगलेलं. तिला नक्की काय झालंय, तिने काय खाल्लं असेल हे समजेना आणि काय करावं तेही लक्षात येईना. वाट पाहायची की, लगेच डॉक्टरांकडे धाव घ्यायची? आम्ही थोडी वाट पाहायचं ठरवलं, कारण कोविड १९चं वातावरण! त्सुनामीला कसं तपासतील, दवाखान्यात जाऊ शकतो का, गर्दी असेल तर संसर्गाची भीती असे प्रश्न मनात होते. त्सुनामी आम्हाला कुणालाच जवळ येऊ देत नव्हती. त्सुनामीलाच कोरोनाचा संसर्ग झाला असेल तर? शंकेची पाल चुकचुकली आणि क्षणभर हातापायांतलं त्राण गेल्यासारखंच झालं. कसंबसं तिला पिंजऱ्यात ठेवलं आणि तातडीने दवाखाना गाठला. नियमाप्रमाणे आम्ही गाडीतच बसून राहिलो. दवाखान्यातलंच कोणीतरी त्सुनामीला आत घेऊन गेलं.

त्सुनामीला तपासल्यावर तिच्या पोटात काहीतरी अडकलंय एवढं समजत होतं. आम्ही एक दिवस वाट बघायचं ठरवलं. रात्रभर त्सुनामी वेदनांनी कळवळत होती. आम्ही सगळेच तिच्या काळजीने बेचैन झालो. अमेरिकेत प्राण्यांच्या जोपासनेचे नियम कडक आहेत आणि तरीही प्राण्यांवर अत्याचार करून त्यांना सोडून देण्याचं प्रमाणही खूप आहे. बेवारशी प्राण्यांना सांभाळणाऱ्या संस्थेतून त्सुनामी आमच्याकडे आली. कधी तिचा लळा लागला तेही समजलं नाही. तिला आणून वर्षही झालं नाही, तो हा प्रकार घडला. त्सुनामीइतकीच आमचीही ती रात्र अस्वस्थता आणि बेचैनीत गेली. मुक्या प्राण्यांच्या वेदना काळीज हलवून टाकतात. सर्व काळजी घेऊनही तिने असं काय खाल्लं असेल या विचारात रात्र गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी पुन्हा दवाखाना गाठला. डॉक्टरांनी शस्त्रक्रियेशिवाय पर्याय नाही याची कल्पना दिली आणि तिला रुग्णालयात हलवायला सांगितलं. कोविडमुळे आत जायला परवानगी नव्हतीच. नर्सने त्सुनामीचा ताबा घेतला आणि आमचा जीव रात्रभर वर-खाली होत राहिला. झोप उडालीच होती. मध्यरात्री रुग्णालयातून फोन आला. डॉक्टरांनी त्सुनामीच्या पोटातून छोटासा फोमचा तुकडा काढला होता. शस्त्रक्रियेचा खर्च ऐकून लुबाडणं, पैशासाठी काहीही करणं असे विचार मनात आले होतेच; त्यामुळे खरंच तिच्या पोटात काही अडकलंय का हे कसं कळणार, डॉक्टर म्हणतील त्याला मान डोलवायची, असंही मनात येऊन गेलं होतं. प्रत्यक्षात त्सुनामीबरोबर फोमचा तुकडा आला, तेव्हा वस्तुस्थिती तशी नाही हेही समजलं आणि अडगळीच्या खोलीत जाऊन त्सुनामी रोज फोमचा थोडा थोडा समाचार घेत होती हेही लक्षात आलं.

याआधी म्हणजे जानेवारीत कोरोना हा शब्द नुकताच कानावर पडू लागला, तेव्हा नेमकं आमच्या मुलाने, ऋत्विकने एप्रिलमध्ये व्हिएतनामला जायचं ठरवलं होतं. विमान कंपन्या पैसे परत देतील, तू तुझा बेत रद्द कर म्हणून आम्ही मागे लागलो होतो; पण २५ वर्षांचं तरुण रक्त एकदम पेटलेलं. 'मी ठरवलं आहे तर जाणारच. गेल्या वर्षीच मी तिकीट काढून ठेवलंय. तिकडे इतका नाही पसरलेला कोरोना.' यावर पुत्ररत्न ठाम! नंतर अर्थातच त्याचं जाणं रद्द झालं; पण त्याआधी घरी असे फुटाणे फुटले. आमचेही एप्रिलमध्ये पुतण्याच्या लग्नाला जायचे बेत सुरू होते; पण लग्नच पुढे ढकलावं लागणार अशी चिन्हं दिसू लागली तशी आमचा जाण्याचा बेत रद्द करण्याचीही. जागतिक संकटाची ती सुरुवात होती याची मात्र जानेवारीत पुसटशीही शंका आली नव्हती. त्यात राष्ट्राध्यक्षांनी, हे संकट आपल्यापर्यंत पोहोचणार नाही अशी ग्वाही दिलेली; त्यामुळे याबाबतीत अमेरिकेत फेब्रुवारीपर्यंत फार गांभीर्य नव्हतंच. कोरोनाचा संसर्ग आणि मृत्यूचा आकडा वाढू लागला आणि उशिरा का होईना संसर्ग रोखण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. या अशा वातावरणात २५ मे रोजी पोलिसांच्या अत्याचारात कृष्णवर्णीय जॉर्ज फ्लॉईड मृत्युमुखी पडला आणि देश अक्षरशः पेटून उठला. या देशातल्या वर्णद्वेषाचा निषेध करण्यासाठी तरुण पिढी रस्त्यावर उतरली.

ऋत्विक व्हाइट हाउसच्या अगदी जवळ राहतो. त्याने 'मी फक्त मोर्चा बघायला जातोय' असं सांगितलं, तेव्हाच तो त्यात सहभागी होणार याची आम्हाला कल्पना आली. त्याला कसं थांबवायचं हा प्रश्न होता; त्यात 'मी मोर्चा लांबून बघणार आहे' हे टुमणं त्याने लावलेलं. निमूट बसण्याशिवाय हातात काहीच नव्हतं. काही दिवसांनी त्यानेच मोर्च्यात सहभागी होणं हा एकाच वेळी किती चित्तथरारक आणि भयावह अनुभव होता हे सांगितलं. हे फक्त आमच्याच मुलाने केलं असं नाही. कितीतरी घरांतली ही एक प्रातिनिधिक गोष्ट आहे. स्थलांतरितांच्या मुलांनी त्यांच्या पालकांच्या 'तटस्थ' भूमिकेला निषेध दर्शवीत अशा मोर्च्यांमध्ये भाग घेतला आणि स्थलांतरितांच्या घरांमध्ये वादळच उठलं. कोरोनाचा संसर्ग होऊ नये म्हणून मुलांनी अशा मोर्च्यांमध्ये भाग घेऊ नये, अशी पालकांची भूमिका होती; पण त्याचबरोबर बहुतांश आशियाई पालक अल्पसंख्याकांमध्येही स्वतःला श्रेष्ठ समजतात; त्यामुळे त्यांना वर्णद्वेष ही आपली समस्याच वाटत नाही हे दुसरं कारणही. स्थलांतरितांची दुसरी पिढी मात्र या समाजात मिसळून गेलेली, स्वतःला अमेरिकन नागरिक समजणारी आणि कृष्णवर्णीय मित्रमंडळी, सहकारी असणारी. या दुसऱ्या पिढीने पालकांच्या तटस्थ भूमिकेला विरोध करत, कोरोनाची भीती बाजूला ठेवून कृष्णवर्णीयांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध आवाज उठवणं आपलं कर्तव्य मानलं. त्यामागे वर्णद्वेष हा रोग कोरोनाच्या संसर्गापेक्षाही भयानक आहे आणि त्याने प्रत्येकजण बाधित आहे, ही तरुण मुलांची भूमिका आहे. कोरोना आणि ब्लॅक लाइव्ह्ज मॅटर्स चळवळीच्या दरम्यान मुलं खरंच खूप काही शिकवून गेली. वर्णद्वेषाविरुद्ध लढा द्यायला जशी ती तयार आहेत, तसंच कोरोनाच्या संसर्गाबाबत जागरूक. संसर्गाची भीती असूनही लोकांचे वाढदिवस साजरे करण्याची, भेटण्याची भूक काही संपत नाही. अशा वेळी कितीतरी घरांमधून मुलांनीच त्यांना या विचारापासून परावृत्त केलं, अजूनही करत आहेत.

सगळा काळच 'घडामोडींचा' आहे, असं हे सर्व घडत असताना वाटत होतं. विरेनने, माझ्या नवऱ्याने नोकरी बदलली. बहुतांशी सर्वच घरांतून काम करणं सुरू झालं असलं तरी या कंपनीची कर्मचाऱ्यांनी कंपनीत यावं अशी अपेक्षा होती. नॉर्थ कॅरोलायाना राज्यात कोरोनाचा संसर्ग वाढला होता, नियम कडक झाले होते. विरेन कंपनीत जायला लागला आणि तीन आठवड्यांनी त्याला कणकण वाटू लागली, घसा खराब झाला. घरातला प्राणी डॉक्टरवारी करून आला होता. आता

माणसाची वेळ. कोरोना चाचणी. नर्सने फोनवर बरेच प्रश्न विचारले होते आणि मगच चाचणीसाठी यायला सांगितलं. पोहोचल्यावर सूचनेनुसार Text केल्यावर नर्स गाडीपाशी आली. विरेनच्या तब्येतीची लक्षणं चाचणीसाठी पुरेशी वाटली नाहीत म्हणून ४८ तासांनी यायला सांगितलं. त्या ४८ तासांत तो बरा झाला; पण तरीही चाचणी करायला हवी, असं डॉक्टरांनी सांगितलं. चाचणी झाल्यावर कोरोनाचा संसर्ग झाला आहे का हे कळायला ७२ तास. झाला असेल तर तुम्हाला ते लगेच कळवणार, नसेल तर online नोंद तपासायची. सुदैवाने, विरेनला लागण झालेली नव्हती; पण असं वाटून गेलं की, खरंच ज्याला कोरोनाचा संसर्ग झाला असेल तो इतक्या वेळात 'राम' म्हणेल एवढा कालावधी लक्षणं आणि उपचार यामध्ये जातो.

अमेरिकेत निवडणुका जवळ आल्या आहेत. नोव्हेंबरमध्ये या निवडणुका असल्याने कोविड १९ आणि फ्लॉईडच्या मृत्यूने सुरू झालेली ब्लॅक लाइव्ह्ज मॅटर्स चळवळ या दोन्हीला राजकीय स्वरूप आलं. निवडणूक पुन्हा जिंकायची, हे ध्येय असलेल्या डोनाल्ड ट्रम्पनी कोरोना हा बागुलबुवा आहे, असंच जनतेच्या मनावर बिंबवलं; त्यामुळे राज्याराज्यांत महापौरांनी कितीही आर्जवं केली तरी सर्वसामान्य जनता तिकडे दुर्लक्ष करायला लागली. जिथे सक्ती केलेली आहे तिथे नियम पाळले जात आहेतच; पण ट्रम्प यांच्या भूमिकेला पाठिंबा देणारे मुद्दाम नियम मोडण्यातही धन्यता मानत आहेत. 'आमच्यावर चेहरा झाकण्याची सक्ती तुम्ही करू शकत नाही, आम्ही मास्क घालणार नाही.' ही धुंदी इतकी आहे की, तोंड झाकलेलं नाही म्हणून कुणी हटकलंच तर बंदूक रोखण्याच्या घटनाही घडलेल्या आहेत.

त्यातच निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ट्रम्पनी बाहेरील देशांतून शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या व्हिसावरही बंधनं आणली. विद्यार्थी online शिक्षण घेणार असतील तर आपल्या देशात राहून ते शिक्षण घेऊ शकतात, असा युक्तिवाद त्यामागे आहे; पण हे विद्यार्थी सगळं बंद असताना परत जाणार कसे? वेळेतला फरक आणि सर्वच देशांत खात्रीशीरपणे इंटरनेट उपलब्ध असेलच असं नाही, या गोष्टी विचारात घेतलेल्या नाहीत. चीनमधून इथे शिकायला येणाऱ्यांचं प्रमाण लक्षणीय आहे. त्या देशातली बंधनं विचारात घेता या मुलांना आपल्या देशात परत जाऊन online शिकणं अशक्यच आहे. यात विद्यार्थ्यांचं होणारं आर्थिक नुकसान वेगळंच; पण येनकेन प्रकारे अमेरिकन जनतेला, बाहेरच्यांना या देशात आपण कसं राहू देणार नाही, हे दाखविण्याचा ट्रम्प सरकारचा हा आटापिटा आहे, असं मानलं जातं. त्याबद्दल जितकी नाराजी आहे तितकाच पाठिंबाही आहे. एकदा का नोव्हेंबरमध्ये निवडणुका झाल्या की, ते निवडणूक जिंकले तरी या प्रकरणातला ट्रम्प यांचा रस संपेल आणि हरले तर येणाऱ्या सरकारची भूमिका बदलेल अशी चर्चा आहे. तोपर्यंत काय? या अनिश्चिततेमुळे परदेशातून इथे शिकायला आलेल्या विद्यार्थ्यांच्या मनावरचा ताण वाढतो आहे. काही विद्यापीठांनी याचिका दाखल केल्या आहेत, तर काही विद्यापीठे मुलांना देश सोडावा लागू नये म्हणून प्रत्यक्ष शिकवणार आहेत. असंख्य संस्था मदतीसाठी सरसावल्या आहेत. भारतीय दूतावासानेही पावले उचललेली आहेत. व्हिसा संदर्भात मार्गदर्शन, राहण्याची व्यवस्था, आर्थिक मदत,



एक ना अनेक! जिथे समस्या तिथे उपाय हाच विचार यामागे आहे. कॉलेज, संस्था, सरकारी यंत्रणाही आपापल्या परीने मदतीचे हात पुढे करत आहेत.

आमच्या मंडळानेही काही विद्यार्थ्यांना नुकतीच अशी मदत केली. शार्लटहून साधारण तीन-चार तासांच्या अंतरावर शव्हिल नावाचं गाव आहे. तिथे पुण्याची १४-१५ मुलं 'हॉटेल व्यवस्थापन' या विषयावरच्या उच्च शिक्षणासाठी आलेली होती. कोविड १९चं संकट आल्यावर या मुलांच्या नोकऱ्या गेल्या. ही मुलं ज्या हॉटेलसाठी काम करत होती, तिथे त्यांची महिनाभर राहण्याची व्यवस्था झाली; पण पुढे काय, हा प्रश्न होता. फेसबुकवर त्यांनी मदतीसाठी विनंती केली. मंडळाने पुढाकार घेऊन शार्लटहून त्यांच्यापर्यंत जीवनावश्यक वस्तू पोहोचवल्या. यातली काही

मुलं काही महिन्यांनी इतर ठिकाणी गेली, तर काही नुकतीच भारतात परतू लागली आहेत. त्यांपैकी काहींना मंडळ आणि इतर संस्थांच्या स्वयंसेवकांनी शार्लटमध्ये आणण्याची व्यवस्था केली.

आलेल्या संकटातून मार्ग काढणं आणि त्यातूनच काहीतरी सकारात्मक शोधणं हेच अखेर आपल्या हातात असतं. विद्यार्थ्यांना मदत करण्यात आमचा प्रत्यक्ष सहभाग नसला तरी मदतीचा हात आपण पुढे केला हे समाधान मिळालं. जिथे जिथे शक्य होईल तशी आर्थिक मदत करता आली, तेव्हा निदान एवढं तरी आपण करू शकतो, हे आंतरिक समाधान अनुभवलं. ब्लॅक लाइव्ह्ज मॅटर्स चळवळीत भाग घेऊन निषेध मोर्च्यात सहभागी झालेल्या आमच्या मुलाने आम्हाला आमच्या भूमिकेचा पंचनामा करत विचार करायला, दृष्टिकोन बदलायला भाग पाडलं. अगदी सहज बोलतानाही आपण किती सर्रासपणे कुणावरही कसे शिक्के मारत असतो, हा धडा डोळ्यांत अंजन घालणारा आहे. आताची पिढी आमच्या पिढीपेक्षा जागरूक आहे. या दरम्यान ही मुलं पूर्वग्रहाचा चश्मा लावत नाहीत आणि आपणही तो काढायला हवा, हे आम्ही मुलांकडून शिकलो हे प्रकर्षाने जाणवलं. बारावीनंतर शिक्षणासाठी म्हणून घराबाहेर पडलेल्या मुलाचा सहवास तसा दुर्मिळच झाला होता. कधीतरी चार महिन्यांनी किंवा मोठ्या सुटीत सलग आठ दिवसांपेक्षा जास्त त्याला घरी राहाता येत नव्हतं. त्याचं घर आणि कंपनी, वॉशिंग्टन डी. सी.त; व्हाइट हाउसच्या अगदी जवळ अजूनही जे निषेध मोर्चे चालू आहेत ते कंपनीच्या समोरच्या रस्त्यावरच; त्यामुळे डिसेंबरपर्यंत घरून काम हाच पर्याय आमच्याकरता त्याच्या सहवासाचा आनंद मिळवून देणारा ठरला आहे.

कोविड १९ने जगालाच प्रत्येक गोष्टीचा पुनर्विचार करायला भाग पाडलं आहे. मानवजात यातून काय शिकणार, हा खरा प्रश्न आहे. जागतिक मंदीची कळा पसरण्याची लक्षणं दिसू लागली आहेत, मृत्यूच्या थैमानाने कितीतरी घरांत शोकात्म वातावरण आहे, गेलेल्यांचा धड निरोपही घेता न आल्याचं जिवलगांना दुःख आहे. या सगळ्याला आपण तोंड देत असतानाच आशेचा, सुखाचा, समाधानाचा वाटणारा एखादा किरणही आपण घट्ट पकडून ठेवायला हवा. हा एखादाच किरण सर्वांसाठीच काळोख्या रात्री पसरलेला सूर्यप्रकाशच की! नाही का?

**mohanajoglekar@gmail.com**



# मंत्र Stay Safeचा

शोभा चित्रे



नवीन वर्ष २०२० उजाडलं, तेव्हा या वर्षातले प्रवासाचे बेत आधीच ठरले होते. भारतातून कोण कोण येणार हे नक्की होतं. या सर्व गडबडीत हे वर्ष पटकन निघून जाणार याची खात्रीच होती.

याच वेळी दूरवर एक अशुभ सावली घोटाळत होती. ती गडद होत होती; पण ते घडलं होतं ते फार दूर. सामान्यांना त्याची चिंता करायचं कारण नव्हतं. शास्त्रज्ञ, डॉक्टर्स याबद्दल सावधगिरीचा इशारा देऊ लागले. मात्र, स्वतःच्या कर्तृत्वावर फाजील विश्वास असणाऱ्या ट्रम्प बुवांनी त्याकडे दुर्लक्ष केलं. कोविडची साधा फ्लू म्हणून संभावना केली. प्रथम चीनमधून येणाऱ्यांवर बंधनं आली; पण ख्रिसमस, न्यू इअर साजरा करायला गेलेले लोक आपापल्या देशातून भरभरून परत येत होते. कुणी क्रूझवरून आले. या वेळी कोविडची ठिणगी युरोपात पडली होती; पण या परतणाऱ्या लोकांची कुठे, कसलीच तपासणी झाली नाही. या विषाणूंनी आधी पश्चिम किनाऱ्यावर वॉशिंग्टन राज्यात प्रवेश केला. मग न्यू यॉर्कमध्ये पहिली केस पुढे येईपर्यंत त्यांनी आपलं जाळं विणायला सुरुवात केली.

आमच्याकडे फ्लोरिडा राज्यात इटलीतून आलेल्या तरुण व्यक्तींना यानं घेरलं; पण त्या त्यातून बऱ्याही झाल्या. त्यातून आमच्या गव्हर्नरनी आपल्या राज्यात कोविड येण्याची शक्यता कमीच असल्याचं वर्तवलं; पण तेवढ्यात सत्तरीतले दोघं या रोगाला बळी पडले आणि इथंही या रोगाने पाय पसरायला सुरुवात केली.

याच वेळी माझी सख्खी शेजारीण, माझ्याच गल्लीत राहणारी, फेब्रुवारीच्या मध्यावर भारतातून परत आली. चार दिवसांतच तिला तापानं गाठलं. फ्लूचं निदान झालं. औषधं घेऊनही त्रास वाढतच गेला. एक दिवस सकाळी सहा वाजताच तिचा फोन आला की, त्रास वाढल्याने ती हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होणार होती. तिने आमच्या कम्युनिटीच्या emergency squadला फोन केला; पण त्या लोकांनी ही नुकतीच परदेशातून आल्यामुळे हेल्थ डिपार्टमेन्टचं पत्र असल्याशिवाय तिला घेऊन जायला नाकारलं. हे असं पत्र कुठून मिळणार? तेही अशा सकाळच्या वेळी. या लोकांच्या दृष्टीने त्यांचं म्हणणं बरोबर होतं. ही मंडळी आमच्यासारखीच इथं राहणारी स्वयंसेवी वृत्तीनं ॲम्ब्युलन्स चालवण्यापासून सर्व कामं करणारी. सत्तरीच्या पुढचीच. कोविड पेशंट असेल तर काय काळजी घ्यायची याबद्दल कुणाला, कसली माहिती नव्हती. मैत्रिणीने विचारलं, ''तू नेशील?'' मी तयार झाले. मनातून मात्र घाबरले होते. जवळच्या हॉस्पिटलला पोहोचलो. तिला ॲडमिट केलं. मी घरी परतले. तिथे तिच्या अनेक टेस्ट झाल्या; पण या वेळेपर्यंत या सुसज्ज हॉस्पिटलमध्ये कोविडची टेस्ट उपलब्ध नव्हती. थोड्या वेळाने चौकशी करायला फोन केला. तिला न्यूमोनिया झाल्याचं कळलं. माझं तर धाबंच दणाणलं. तिच्या काळजीनं आणि माझ्याही! आम्ही दोघी एकेकट्या राहणाऱ्या. मुलं लांब, आधी जाऊन गाडीची सीट, दारं सगळं सॅनिटायझरनी पुसून काढलं. लक्षात आलं, गाडीत ती मास्क लावूनच बसली होती. गेल्या आठवडाभरात मी तिला दुरून भेटत होते. हवं, नको बघत होते. त्या प्रत्येक वेळी ती मास्क घालूनच असायची. या वेळेपर्यंत मास्क हा शब्दही कानावर पडला नव्हता; पण ही स्वतःची आणि इतरांचीही काळजी घेणारी. लवकरच ती बरी होऊन घरी आली. हुश्श झालं.

तर आज १३ मार्च, शुक्रवार. सकाळी लवकर चालून आले आणि नऊच्या आत क्लासला पोहोचले. आम्ही राहतो ती फ्लोरिडामधील टॅम्पाच्या दक्षिणेला असलेली 'सन सिटी सेंटर' ही वसाहत पंचावन्नहून अधिक वयोमर्यादा असलेल्या लोकांची. तरी इथलं सरासरी वय ७४-७५, काही लोक तर नव्वदीच्या पुढचे. प्रत्येकाची स्वतंत्र घरं. भोवती बागबगीचा. वयानं येणारी दुखणी सांभाळत आनंदाने वावरणारी ही मंडळी. या कम्युनिटीमध्ये टेनिस, बास्केटबॉल, गोल्फपासून अनेक स्पोर्ट्स, तसेच तुमचे छंद जोपासायला अनेक क्लब्ज. त्यात कार्यरत असणारे हे ज्येष्ठ.

आज आमच्या क्लासमध्ये नेहमीचं उत्साही वातावरण. कुणी घरी केलेल्या कुकीज ट्रेभरून ठेवल्या होत्या. त्यांचा खमंग वास दरवळत होता. हा आमचा वूडकार्व्हिंगचा क्लास. प्रत्येकाचे हात कामात. तासा दोन तासांतच फतवा आला की, कोविडमुळे यापुढे सर्वच क्लासेस बंद ठेवण्यात येतील. जिम, स्विमिंग पूल सर्वच. काहीतरी वेगळंच घडत होतं. कधीच न अनुभवलेलं. एकदम क्लासचं वातावरण बदललं. प्रत्येकाची सामान आवरण्याची घाई. एकजण म्हणाला, ''कशाला घाबरायचं? मी सत्त्याऐंशी वर्षांचा आहे. कधीतरी मरण येणारच. याने आलं काय नि त्याने आलं काय?''

मी म्हटलं, ''प्रत्येकाला जायचं आहेच. मात्र, हा विषाणू डसला तर आपल्या नकळत, आणखी पाच-पंचवीस लोकांना घेऊन जाऊ त्याचं काय?''

सगळ्यांवर आलेलं दडपण. आमच्या क्लासमध्ये काहीजण माझ्यासारखेच इथं राहणारे, तर काही ज्यांना स्नो बर्ड्स म्हणतात ते, त्यांच्याकडील हिवाळ्यातून सुटका करण्यासाठी इथल्या उबदार हवेत येतात आणि इथला उन्हाळा सुरू होण्यापूर्वी आपापल्या गावी परत जातात. इथलं सगळंच बंद असेल तर इथं राहण्यात काही अर्थ नाही, असा त्यांचा सूर दिसला.

घरी आले. आता पुढे काय हे प्रश्नचिन्ह! हातापायातलं त्राण गेलं. गेले काही दिवस मनाची घालमेल होत होती. आता चित्र अधिक स्पष्ट झालं. लवकरच एप्रिलच्या सुरुवातीला मी, मुलं, नातवंडं, माझा भाऊ, त्याची फॅमिली अशी सगळी वेगवेगळ्या राज्यांतून लॉस एंजेलिसला जमणार होतो. एकेक दिवसाचे बेत ठरले होते. गेल्या वर्षीपासून ठरलेला हा बेत. शेवटी नाइलाजानं तो रद्द केला. त्यानंतर भारतातून येणारी भाची, तिची छोटी मुलं, माझी जर्मनीची ट्रिप भारतातून येणाऱ्या भावंडांबरोबर करायची. मनात आखलेले असे अनेक बेत आणि ते रद्द करता करता झालेली दमछाक!

मनाचा विरस झाला. तरीही स्वतःला समजावलं, कुठे जाऊन अडकून पडण्यापेक्षा घरच्या घरी सुरक्षित असणं महत्त्वाचं. सगळीकडे शाळा बंद करण्यात आल्या. ही लॉकडाउनची सुरुवात होती. लोक घरून काम करू लागले. अत्यावश्यक सेवा सोडून इतर उद्योग बंद करण्यात आले. मात्र, घरात कोंडून बसण्याची आवश्यकता नव्हती. कुणाच्या कुठे जाण्यावर बंधनं नव्हती; पण परदेशात जाणारी आणि तिकडून येणारी विमानं आठवड्यानंतर बंद करणार असल्याचं जाहीर झालं; त्यामुळे लोकांना तातडीनं जाणं-येणं अशक्य झालं.

दोन-चार आठवड्यांत सगळं आटोक्यात येईल, असं वाटत असतानाही वणवा पसरला. न्यू यॉर्कमध्ये मृत्यूचं तांडव सुरू झालं. आरोग्य यंत्रणा, वैद्यकीय क्षेत्र यांना हे सगळंच अपरिचित होतं. सगळी व्यवस्था कोलमडली. हॉस्पिटल्स अपुरी पडू लागली. डॉक्टर्स, नर्सेस, इतर कर्मचारी जिवावर उदार होऊन काम करत होते. आजही करत आहेत. त्यात काहींनी आपला जीव गमावला. काही राज्यांतल्या गव्हर्नर्सनी अतिशय हिमतीनं परिस्थिती हाताळली. तरीही मृत्यूदर कमी करण्यात यश येत नव्हतं. या जिवाणूकडे दुर्लक्ष करून वेळीच पावलं न उचलण्याची किंमत हजारो कुटुंबांना द्यावी लागली. विज्ञानापेक्षा जेव्हा राजकारण, आत्मप्रौढी महत्त्वाची ठरते, तेव्हा काय घडतं, हे एका बलाढ्य राष्ट्राने जगाला दाखवलं.

याच वेळी D2 Anthony Fauciसारखे Infections diseaseमधील तज्ज्ञ कोविडसाठी जनजागृती करण्यासाठी झटत आहेत. शांतपणे या जिवाणूची उग्रता लोकांच्या गळी उतरवण्याचं काम करीत आहेत. मास्क लावण्याची आवश्यकता, एकमेकांपासून दूर राहणं, बंदिस्त जागेत दहापेक्षा जास्त लोकांनी न जमणं, सतत हात धूत राहणं या गोष्टींचा ते पुनरुच्चार करत असतात.

मास्क या शब्दाभोवती इथे भरपूर राजकारण चालू आहे. मास्क लावणं हा अनेकांना आपल्या स्वातंत्र्यावर घाला वाटतो. त्यात मास्क न लावणाऱ्या राजकारण्यांचे आदर्श.

कधीकधी या लोकांच्या स्वातंत्र्याच्या कल्पनाच मला उमगत नाहीत. आपण जगलो तरच स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल ना? स्वातंत्र्याच्या नावानं काय काय पणाला लावायचं?

अगदी सुरुवातीच्या काळात लॉकडाउन जाहीर होताच लोक भराभर ग्रोसरीच्या दुकानांवर तुटून पडले. गाड्या भरभरून माल घेऊ लागले. त्याच वेळी राज्याराज्यांतून बंदुकांची विक्री वाढल्याची बातमी आली. हे मनाला घाबरवणारं. आकलन शक्तीपलीकडचं. एक रोग उग्र रूप धारण करून आपला घास घेऊ पाहतो आहे. त्यासाठी शस्त्रास्त्रांची काय गरज? ही अमेरिकन मानसिकता का? ठिकठिकाणी आवश्यक सेवा सोडून इतर गोष्टी बंद ठेवण्यात आल्या. न जाणो, सरकार आणखी बंधने आणेल. गन कन्ट्रोलचे कायदे बदलतील. लोकांमध्ये असुरक्षितता वाढीस लागली आणि त्यातून त्यांना हा मार्ग दिसला असावा.

न्यू यॉर्क, न्यू जर्सीत मृत्यूचं तांडव सुरू होतं. फ्लोरिडात लॉकडाउन होतं खरं; पण सगळीकडे समुद्रकिनारे उघडे होते. एप्रिलमध्ये शाळा, कॉलेजला असलेल्या स्प्रिंग ब्रेकमध्ये फ्लोरिडात येणं या मुलांसाठी ritualच; त्यामुळे या समुद्रकिनाऱ्यांवर झुंडीने तरुणाई जमली. त्यांनी बिनधास्तपणे या सुट्टीचा उपभोग घेतला. कोविडबद्दल कुणालाच कसलं देणं-घेणं नव्हतं. शिवाय ते म्हाताऱ्यांचं दुखणं हा विश्वास! त्यांचा हा हंगामा सोशल मीडियाद्वारे समोर दिसत होता, त्याच वेळी इतरत्र माजलेला हाहाकारही! शेवटी याचा परिणाम झालाच. मग मात्र मायामीकडील समुद्रकिनारे काही दिवस बंद ठेवण्यात आले.

आमच्या वसाहतीत सुरुवातीला बंद असलेले क्लब्ज आता उघडण्यात आलेत. मास्क घालणं आवश्यक आहे. शिवाय क्लासमध्ये कितीजण असावेत, स्वच्छता कशी ठेवावी, अंतर किती राखायचं हे आमच्या कम्युनिटीने ठरवलंय आणि ते प्रत्येक क्लासला बंधनकारक आहे. प्रत्येकजण स्वतंत्रपणे राहत असल्यामुळे कुणाची बागेत कामं चालू असतात. कुणी घरातली, घराबाहेरची कामं करत असतात. अंतर ठेवून गप्पा होतात. काहीजण घरासमोर खुर्च्या टाकून बसतात. येणाऱ्या-जाणाऱ्यांशी बोलणं होतं. मी सकाळ, संध्याकाळ चालायला जाते, तेव्हा चालणारे काही दिसतात, तर काही सायकलीवरून फिरणारे दिसतात. मात्र, गर्दी कुठेच नसते. ग्रोसरी स्टोअर्स तर उघडी असतातच; पण आता ब्युटी पार्लरसारखी दुकानं उघडल्याने बायका खूश आहेत. पूर्वी सतत सारखं पार्ट्या, बाहेर खाणं, प्रवास या गोष्टींवर बंधनं आलीत; पण या लोकांनी समजूतदारपणे सगळं स्वीकारलं. कुणाच्याही बोलण्यात निराशेचा सूर नसतो.

हे सगळं चालू असताना वाटलं, साऱ्या जगावर एवढं भयानक संकट आलंय. यानिमित्ताने सगळे जवळ येतील, एकमेकांच्या साथी-सोबतीने या रोगाला दूर लोटण्यात यश मिळवतील. यातून आपल्या मनावर चढलेली जात, वर्ण, धर्म, पंथ ही सारी चिलखतं गळून पडतील.

प्रत्यक्षात तसं काही घडलंच नाही. कृष्णवर्णीय लोकांवरचे अत्याचार वाढले. महात्मा गांधींचा आदर्श ठेवून डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांनी गोऱ्या सत्तेविरुद्ध अहिंसेच्या मार्गाने लढा दिला. त्याच मार्गाने निघालेला हा समाज आणि त्यांना सामील झालेले इतर वंशीयही शांततेच्या मार्गाने चाललेल्या या मोर्चांना हिंसात्मक रूप देणारे समाजकंटक आणि त्यातून उडालेला भडका; मात्र हे सर्व घडत असताना, सुरुवातीपासूनच ठिकठिकाणी स्वयंसेवक, सेवाभावी संस्था उभ्या राहिल्या. नोकरी गेल्याने अनेक कुटुंबांवर कोसळलेला अडचणींचा डोंगर. त्यातही महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मुलाबाळांसह उदरनिर्वाह करण्याचा. या कुटुंबांना आठवड्याचा शिधा देण्याचं काम ही मंडळी करतात. वेगवेगळ्या स्तरांतून मंडळी पुढे आली. त्यांनी मदतीचा हात पुढे केला.

हे असं किती दिवस चालणार, या प्रश्नाला उत्तर नाही. योग्य व्हॅक्सिन शोधण्यासाठी जगभरातील शास्त्रज्ञ कौशल्य पणाला लावून प्रयत्न करताहेत. लवकरच पुढील वर्षाच्या सुरुवातीला ते उपलब्ध होईलही; पण ते सामान्यांपर्यंत कसं, केव्हा पोहोचणार?

डॉ. फाउची (Fauci) हे सतत पहिली लाट ओसरल्यावर फॉलमध्ये दुसरी येईल असं सांगत होते. इथं तर पहिली लाट थोडी मागे सरकतेय असं वाटेपर्यंत ती परत उफाळून आली. हे सगळं घडत असताना मनात सकारात्मक विचार ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करावा लागतो. असं मळभ कधीच दाटून आलं नव्हतं. त्याला दूर सारून, भोवतालच्या चांगल्या गोष्टी टिपत आपलं मन रमवायचं. फेस टाइम, झूम या माध्यमांतून मुलं, नातवंडं भेटतात, नातेवाईक, मित्र-मैत्रिणी भेटतात ते आनंदाचे क्षण. भरपूर व्यायाम, माफक आहार यांच्या मदतीने मनाबरोबर शरीराचीही ताकद वाढवायची. लवकरच हेही दिवस सरतील, हे स्वतःलाच बजावायचं आणि Stay Safe हा मंत्र इतरांना देताना स्वतःही त्याचं पालन करायचं. बस्स! एवढंच आपल्या हातात.

**shobha_chitre@hotmail.com**


चिवड्याचं चुकतं गणित

चकली टाकते मान

करंजीचा उकळत्या तेलात
तुटतो नेमका कान

लाडू रुसून होतो टणक

शेव मऊसूत



दिवाळसणाच्या फराळाशी
जमत नाही का सूत?


रुचिरा

श्रीमती कमलाबाई ओगले

भाग १ व २


सुगरण 'रुचिरा'चा घ्या एकदा सल्ला
रोजचा स्वयंपाकही होईल दिवाळसणासारखा..

५३वी आवृत्ती




पृष्ठसंख्या : ३८८ । किंमत : ₹२७५

२३वी आवृत्ती




पृष्ठसंख्या : ३५६ । किंमत : ₹२७५

# औरिसातील कोरोना आणि मी

राधा जोगळेकर



**‘भवती न भवती झाली आणि महामारी आली’**

माझी बहीण नेहा सोहोनीच्या कवितेची ही पहिली ओळ. तर ही महामारी जी आली, ती कशी आली? काळ, वेळ, स्थळ, व्यवसाय, श्रीमंत/गरीब अशी काही मर्यादा आहे का या महामारीला? तर नाही. सर्व जगभर पसरली. प्रगत देश, प्रगतीच्या मार्गावर असलेले देश, अप्रगत देश, श्रीमंत/गरीब, जातपात काही म्हणजे काही फरक ही महामारी मानत नाही. कोणालाही, कुठेही, कुठल्याही वयात, कुठल्याही व्यावसायिकाकडे ही अगदी समान नजरेने बघते.

२५ मार्च रोजी पहिला लॉकडाउन जाहीर झाला. तो १४ एप्रिलपर्यंत, म्हणजे २१ दिवसांसाठी जाहीर झाला. मी ओरिसा राज्यातील कटक शहरात राहते. हे राज्य अशिक्षित व मागासलेलं राज्य म्हणून ओळखलं जातं; पण लॉकडाउनसाठी जे जे नियम सांगितले गेले होते, त्यांचे तंतोतंत पालन झालेले इथे पाहायला मिळत होते.

पंतप्रधान मोदीजींनी घंटा, थाळी वाजवायला सांगितली होती. इथे लोकांनी घराच्या व्हरांड्यात उभे राहूनच त्या वाजवल्या. मिरवणुका काढल्या नाहीत.

आमच्या इथे कटकला या २१ दिवसांत एकही रोगी नव्हे, तर कोरोनाची एकही +ve केसदेखील नव्हती.

ओरिसा हे पहिलं राज्य होतं, जिथे मुख्यमंत्री नवीन पटनायक यांनी हा लॉकडाउन ओरिसासाठी ३० एप्रिलपर्यंत वाढवला.

कटकमध्ये तोपर्यंत तरी या महामारीची कोणतीही लक्षणं नव्हती. तरीदेखील अगदी छोट्यातल्या छोट्या स्तरापासून ते उच्चवर्गीय लोकांपर्यंत सर्वजण नियमांचे काटेकोर पालन करताना दिसत होते. याच काळात घरकाम करणाऱ्या बायका बंद झाल्या होत्या. भाजीखरेदी असो, वाणसामान असो किंवा मासे, अंडी, मटण असो. सर्व ठिकाणी सामाजिक दूरतेचे पालन करून, चेहऱ्यावर मास्क लावूनच लोक फिरताना म्हणजे आपापली कामे करताना दिसत होते. या सामाजिक दूरतेवरून एक गोष्ट ध्यानात आली, ती म्हणजे इतके दिवस स्पृश्य/अस्पृश्य प्रकार जातिव्यवस्थेवर मानला जात होता. आता तर माणूसच माणसाला अस्पृश्य झाला होता आणि आहे. प्रत्येक रूढी, जी जातपातीवर अवलंबून होती, तिचा या कोरोनाने अगदी धज्जा उडवलेला दिसतो आहे.

शनिवार, दि. ३० मे रोजी संध्याकाळी ५.३० वाजता, ओरिसातील तसेच ओरिसाबाहेर राहणाऱ्या ओडिया लोकांनादेखील मुख्यमंत्री पटनायक यांनी उत्कल गीत म्हणायचं आवाहन केलं. हे आवाहन कोरोना योद्ध्यांना प्रोत्साहित करण्यासाठी होतं. सर्वांनी हे उत्कल गीत ५.३० वाजता गायलं. त्या दिवशी सकाळी वर्तमानपत्रात हे उत्कल गीत छापून आलं होतं; त्यामुळे ज्यांना हे पाठ नव्हतं तेदेखील म्हणू शकले. टीव्हीवर हे उत्कल गीत त्याच वेळी सादर करण्यात आलं होतं. गाताना आणि ऐकताना अंगावर रोमांच उभे राहिले.

पण आम्हा कटकवासीयांचं हे सुख फार काळ टिकलं नाही. इतर राज्यांमधून कामगार परतीच्या योजना कार्यान्वित व्हायला लागल्या. ओरिसातील बरेच कामगार आपापली घरं सोडून महाराष्ट्र, तामिळनाडू, बंगाल, कर्नाटक, गुजरात, मुख्यत्वे सुरत वगैरे ठिकाणी काम करत होते.

तोपर्यंत भारताच्या नकाशात कोरोनाग्रस्त लोकांची संख्या ओरिसासाठी एक टक्का होती. ओरिसा हे एकमेव राज्य Model State मानलं गेलं होतं. राज्याबरोबरच नवीन पटनायक यांचंही सर्वत्र कौतुक होत होतं.

सुरतहून पहिली बस ओरिसातील ‘ब्रह्मपूर’ या गावी येऊन पोहोचली आणि त्यांच्याबरोबरच कोरोनाने आपला पाय इथल्या भूमीत टाकला. त्यापाठोपाठ आणखी कामगार बसने, ट्रेनने, विमानाने आपापल्या मायभूमीत परतले. त्यातील बरेचजण कोरोनाच्या हातात हात घालूनच आले आणि मग मात्र खरोखरच दृष्ट लागल्यासारखं होत्याचं नव्हतं झालं. सरकारी पातळीवरील यंत्रणांना वेग आला. नुसत्या शिंका/खोकला असला तरी माणसं एकमेकांना टाळायला लागली. जून महिन्यात +ve केसेस आणि प्रत्यक्ष रोगी ही संख्या वाढायला लागली. नियम पुन्हा कडक झाले. बाजार बंद झाले. भुवनेश्वर, कटक, ब्रह्मपूर, जगन्नाथपुरी, झाजपूर, केंद्रापाडा वगैरे शहरं एकमेकांसाठी बंद झाली. जूनमध्ये दर शनिवार आणि रविवार या दोन दिवशी shut down जाहीर झाला, तो जुलैअखेरपर्यंत चालू होता.

पण सामान्य लोकांच्या वागण्यात मात्र काही फरक नव्हता. इतका की, दारूविक्री खुली झाली, तेव्हा निदान कटकमध्ये तरी वेड्यासारख्या रांगा लागल्याचे फोटो कुठल्याही वर्तमानपत्रात अथवा टीव्ही चॅनलवर बघायला मिळाले नव्हते.

दरवर्षी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर रथयात्रेच्या रथाच्या कामाला सुरुवात होते. या वर्षीदेखील त्या दिवशी रथासाठी लागणारी लाकडे आणून रथाच्या कामाला सुरुवात झाली होती; पण रथयात्रा होणार की नाही, याबाबत सर्वजण साशंक होते. रथ तयार करण्याचं काम मात्र दरवर्षीप्रमाणे सुरूच होतं आणि सुप्रीम कोर्टाचा निकाल जाहीर झाला की, रथयात्रा होणार नाही. जनमानसाच्या प्रतिक्रिया वेगवेगळ्या होत्या. कोरोनामुळे आरोग्याच्या दृष्टीने रथयात्रा न होणे चांगले, असे काहीजणांचे मत होते तर दरवर्षीचा पायंडा का आणि कसा मोडायचा? त्यामुळे रथयात्रा व्हावी, असे म्हणणारेदेखील काहीजण होते.

रथयात्रा अगदी तोंडावर आलेली, २३ जूनला. त्याआधी तीन दिवस पुरीचे राजे गजपती महाराज आणि पुरीचे शंकराचार्य निश्चलानंद सरस्वती या दोघांनी सुप्रीम कोर्टाला आपला निकाल बदलण्याची विनंती केली.

२१ जूनला संध्याकाळी रथयात्रा होऊ दे, असा फेरनिकाल सुप्रीम कोर्टाने दिला. या रथयात्रेमध्ये बाहेरच्याच नव्हे तर खुद्द जगन्नाथपुरीमधील नागरिकांनादेखील सामील होण्याची परवानगी नव्हती. पोलीस दल, सैन्य दल आणि मंदिराचे सेवेकरी यांनी मिळून रथयात्रा पार पाडली. एक रथ निघाल्यानंतर एकेक तासाच्या अंतराने अनुक्रमे दुसरा आणि तिसरा रथ निघाला. आषाढ शुद्ध द्वितीयेला सुरू झालेली ही रथयात्रा, आषाढी एकादशीला पुनर्यात्रा होऊन, देवांना सोन्याचा वेश घालून पूर्ण झाली. सोन्याचा वेश उतरवून द्वादशीला देव मंदिरात आपल्या स्थानी विराजमान झाले. या रथयात्रेला बाहेरचे कोणीही नाही म्हणजे ओरिसाचे मुख्यमंत्री, जे दरवर्षी रथयात्रेला जातात तेदेखील उपस्थित नव्हते, ही आवर्जून उल्लेख करण्यासारखी बाब आहे.

देव पुन्हा जागेवर गेल्यावर मगच जगन्नाथपुरीमधील लोकांना रथ जातो त्या रस्त्यावर (या रस्त्याला इथे 'बडदांड' म्हणतात.) जाण्याची परवानगी मिळाली. तोपर्यंत हा रस्ता सर्वांसाठी बंद होता.

रथयात्रेसाठी तिन्ही देवांना रथावर आणणे, त्यांना उचलून दहा दिवस ते ज्या मंदिरात असतात, तिथे उतरवून ठेवणे आणि पुनर्यात्रेसाठी पुन्हा रथावर चढवणे व शेवटी मंदिरात नेणे, ही सर्व कामे माणसांकरवीच केली जातात. तिन्ही देवांना जवळजवळ उचलूनच नेले व आणले जाते. देवांचे वजनही खूप आहे. साहजिकच, अशा वेळी सामाजिक दूरतेचे पालन करणे अशक्य होते; पण चेहेऱ्यावर मास्क लावून सगळ्यांनी ही कामे केली. अशा प्रकारे या वर्षीची रथयात्रा भक्तांशिवाय 'न भूतो न भविष्यती' अशी पार पडली.

रथयात्रेनंतर कोरोना राज्यातून निघून जाईल, असा एक भाबडा समज लोकांमध्ये होता; पण प्रत्यक्षात जगन्नाथपुरीमध्येच रथयात्रेनंतर कोरोनाचे रुग्ण वाढत गेले. जुलैअखेरपर्यंत बाहेरच्या कोणालाही तिथे प्रवेश बंदच होता.

ओरिसा सरकारच्या शासकीय सेवेत बरीच मराठी माणसं मोठमोठ्या पदांवर आहेत. इथे गंजाम जिल्ह्यात बरेच कोरोना रुग्ण आढळले; कारण बाहेरून जे कामगार आले ते आधी इथेच उतरले. ओरिसातील मृत्यूसंख्या ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात जवळजवळ २४० इतकी आहे. त्यातील १५०च्या आसपास एकट्या गंजाममधील आहे. इथे जे कलेक्टर आहेत, ते मराठी आहेत. श्री. विजय अमृता कुलांगे. त्यांनी या काळात खूप महत्त्वाची कामे केली. सामाजिक दूरता पाळली जावी म्हणून त्यांनी सगळ्यांना छत्री घेऊनच बाहेर पडण्याची सक्ती केली; त्यामुळे ऊन व पाऊस यापासून रक्षण तर होतेच; पण छत्री उघडलेली असली की, आपोआपच सामाजिक दूरता पाळली जाते. याआधीही वादळाच्या काळात त्यांनी खूप कामे केली होती. इथल्या वर्तमानपत्रात त्यांचे खूप कौतुक होताना दिसते. उत्कृष्ट नियोजन व त्याचा पाठपुरावा. आपला मराठी माणूस जे चांगले काम करतो ते सगळ्यांना समजावे म्हणून मुद्दाम हा उल्लेख केला आहे.

आता आमच्यासाठी कोरोनाचा अनुभव हा सर्वसाधारण लोकांपेक्षा जरा वेगळा होता. वेगळा अशासाठी की, माझे यजमान व्यवसायाने डॉक्टर आहेत. अगदी सुरुवातीच्या काळात म्हणजे १७ मार्च ते मार्चअखेरपर्यंत. सर्वच लोकांना या रोगाची विशेष अशी भीती मनात बसली होती. सगळ्यांचाच पेशन्स कमी झालेला होता; त्यामुळे तब्येतीला थोडेसे काही झाले की, लोक दवाखान्यात यायला लागले; त्यामुळे सकाळचा दवाखाना १० ते जवळजवळ दुपारी ३ पर्यंत आणि संध्याकाळी ६ ते रात्री ११ पर्यंत चालू असायचा. त्याचा परिणाम यांच्या प्रकृतीवर व्हायला लागला. मी यांना दवाखाना एक वेळ - संध्याकाळचा बंद ठेवा, सांगायला लागले. सत्तरी उलटलेली असल्याने मला काळजी वाटत होती.

दवाखान्याबाहेर पोलीस उभा असायचा. तो सामाजिक दूरता पाळली जावी या दृष्टीने पेशंट आत सोडायचा. काही पेशंट रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला सावलीत उभे राहायचे. एकदा पेशंट संपले असे वाटून डॉ. जोगळेकर दवाखान्याबाहेर आले, तेव्हा तो पोलीस ओरडला आणि म्हणाला, ''तुम्ही आत कधी गेलात? मी तर तुम्हाला आत सोडलं नव्हतं.'' त्यावर बाहेर असलेल्या एका पेशंटनी हेच डॉक्टर आहेत, असं त्याला सांगितलं. एकवार यांच्याकडे बघून तो म्हणाला, ''अहो साहेब, तुमचं इतकं वय झालेलं आहे. वेळ वाईट आहे. कशाला येता दवाखान्यात? या वयात काही झालं तर?'' आणि या पोलिसाने माझा प्रश्न चुटकीसारखा सोडवला. दुसऱ्या दिवसापासून संध्याकाळचा दवाखाना बंद झाला आणि मग महिन्यासाठी पूर्णच बंद झाला. अगदीच नाइलाज झाला तर पेशंट घरी यायला लागले. बाहेरच्यांना अपार्टमेन्टमध्ये यायला बंदी होती. हे त्यांना गेटवर तपासायचे; पण या पूर्ण महिन्यात डॉ. जोगळेकरांनी कोणत्याही पेशंटकडून एक पैसाही घेतला नाही. अशा या संकटकाळात धंदा करायचा नाही, हेच त्यांचं तत्त्व होतं. त्यानंतर लॉकडाउन उठल्यावर ऑगस्टपर्यंत दवाखाना फक्त सकाळी एक वेळ चालू राहणार होता.

आमच्या घराच्या बाबतीत विचार केला तर सुरुवातीच्या दीड महिन्याच्या काळात जेव्हा घरकामाला बायका येत नव्हत्या, त्या वेळी आम्ही तिघांनी कामाचे वाटप करून घेतले होते. घर झाडणे/पुसणे आणि भांडी घासणे ही कामे आनंद करत होता. धुतलेली भांडी पुसून जागेवर लावण्याचे काम डॉ. जोगळेकर करत होते. मी स्वयंपाकाचे बघत होते. कपड्यासाठी मशीन होते...

हे सर्व करत असताना पुढील गोष्टी लक्षात आल्या...

१. आपले घर आपण जास्त स्वच्छ झाडतो व पुसतो.

२. महिन्यात भांडी चकचकीत झाली. म्हणजे आपण घासलेली भांडी जास्त स्वच्छ असतात.

३. स्वतःमधील सुगरणीचा नवा आविष्कार झाला. म्हणजे असे की, पास्ता, पिझ्झा, बर्गर यांसारखे नवे पदार्थ जे तरुण वयात मला माहीतही नव्हते, ते मी अगदी लीलया करू लागले.

एकूणच वाणसामान आणि भाजीपाल्याचा पुरवठा व्यवस्थित असल्याने रोज वेगवेगळे पदार्थ केले जात होते.

याबरोबरच आपल्या कामातला केवढा मोठा वाटा या बायका रोजच्या रोज उचलतात याची जाणीव झाली. आमच्यापुरते बोलायचे तर त्या येत नसलेल्या काळाचा, पूर्ण दीड महिन्याचा पगार आम्ही त्यांना दिला.

सगळ्यात अवघड होते माझ्यासाठी, ते म्हणजे घरातून अजिबात बाहेर न पडणे. हे एक सोडले तर हा कोरोना खूप काही शिकवतो आहे. घरच्यांचीच एकमेकांशी नव्याने ओळख होते आहे; कारण एकमेकांना पुरेसा वेळ दिला जातो. पत्ते, कॅरम यांसारखे खेळ मुलांच्या लहानपणाबरोबरच जे कुठेतरी दडून बसले होते, ते बाहेर आले. इतके दिवस, इतका वेळ सतत एकमेकांसमोर असूनही आम्हाला एकमेकांचा कंटाळा आलेला नाही.

मी 'चला व्यक्त होऊ या...' नावाचा एक what's app ग्रुप तयार केला. त्यात महाराष्ट्र मंडळ, भुवनेश्वरच्या वीसजणी सामील झाल्या होत्या. त्यांना मी दर तीन ते चार दिवसांनी एक-एक विषय द्यायची. त्यावर विचार करून त्या लिहायच्या आणि मग मी त्यावर अभिप्राय म्हणून एक ऑडिओ तयार करून पोस्ट करायची. या ग्रूपवर कोणत्याही फॉरवर्डची परवानगी नव्हती. कोणत्याही राजकीय आणि कोरोनासंबंधित

बातम्यांच्या पोस्टलादेखील मनाई होती.

पहिला विषय या लॉकडाउनच्या काळात तुम्ही कशा आहात? इथपासून सुरुवात करून श्रद्धा, नाव नसलेली नाती, संकल्प, स्वतःची पाककृती, अध्यात्म आणि सगळ्यात शेवटी स्वतःचा व्हिडिओ तयार करणे असे वेगवेगळे विषय होते. त्यात सगळ्यांनी, 'आमची स्वतःशी ओळख झाली आणि कोरोनामुळे जे एक भीतीचे सावट होते ते निघून गेले,' असे एकमुखाने सांगितले.

पुढचा विषय काय देणार याकडे माझे आणि घरच्यांचे, तर तिकडे त्या सगळ्यांचे लक्ष असायचे. माझ्या ऑडिओची सगळ्याजणी अगदी आतुरतेने वाट बघायच्या. जवळजवळ प्रत्येकीचीच लिहायची सवय गेली होती. वय वर्षं तीस ते पन्नास अशा सगळ्यांनी लिहायला सुरुवात केली आणि शेवटच्या विषयापर्यंत त्या खूप छान प्रकारे व्यक्त व्हायला लागल्या. बघता बघता दीड महिना कसा गेला समजले नाही. माझ्या लेखनप्रवासासाठी हा एक अद्वितीय असा अनुभव होता.

कोरोना हे पृथ्वीने स्वतःसाठी तयार केलेले एक अस्त्र आहे की काय, असाच विचार मनात येतो. बघा ना! विमानसेवा बंद; त्यामुळे आकाश मोकळे... घराबाहेर पडणे बंद; त्यामुळे रस्त्यावर ना माणसे ना वाहने. अर्थात त्यामुळे जमीन मोकळी... पाण्यात जहाजे नाहीत; त्यामुळे जलमार्ग मोकळे... या सर्वांमुळे प्रदूषण नाही. दूरवरून हिमालय दिसू लागला. जंगलातील जनावरे रस्त्यावर बघायला मिळाली. इतकेच काय तर मोर रस्त्यावर नाचताना दिसले. आकाशात वेगवेगळे पक्षी नजरेस पडले. नदीच्या पाण्याचे प्रवाहही सगळीकडेच स्वच्छ दिसायला लागले.

म्हणूनच वसुंधरामातेने स्वतःसाठी हे एक अस्त्र माणसांवर सोडले आहे की काय, असा विचार मनात येतो; कारण हा कोरोना फक्त जगभरातील माणसांनाच होताना दिसतो. प्राणी, पाण्यातले मासे यांच्यावर त्याचा काही परिणाम होताना दिसत नाही. झाडांवरदेखील काही परिणाम नाही. म्हणजेच माणसाने निसर्गावर अत्याचार करत जो काही विध्वंस चालवला आहे, तो वाचावा आणि निसर्गाचे, त्याचबरोबर माणूस सोडून इतर जीवमात्रांचे रक्षण व्हावे यासाठी तर हा सगळा घाट वसुंधरामातेने घातला नसेल ना, असा विचार मनात येतो. यापासून जितक्या लवकरात लवकर आपण माणसे काही शिकू ते आपल्यासाठीच, आपल्या हिताचे असणार आहे. मनुष्यहानीचा आकडादेखील एकूण लोकसंख्येचा विचार करता, काही फार आहे असे म्हणता येणार नाही.

तेव्हा मानवा, वेळीच सावध हो आणि आता जाताजाता, सगळीकडची देवळे म्हणजे अगदी गल्ली-बोळांतील छोट्या देवळापासून ते अगदी पंढरपूरचा विठोबा किंवा इथला पुरीचा जगन्नाथ बंद दाराआड आहेत. खरंच, हे सगळे देव बंद दाराआड असतील का? मला तर वाटतं, ते सगळे देव माणसाच्या पहाऱ्यातून मुक्त झाल्यामुळे मस्त मजेत फिरत असतील. 'युगे अठ्ठावीस' विटेवर उभे राहायला त्याला तरी आवडत असेल का? कदाचित पुरीतील जगन्नाथाच्या भाग्याचा इतर देव हेवाही करीत असतील; कारण तोच एक देव मंदिरातून बाहेर पडून, दहा दिवस छान हिंडून आला.

तोदेखील आता या सर्व देवांत सामील झाला असणार. ते सगळे एकत्र बसून गणपतीबद्दल विचार करत असतील. या वर्षीचा गणपती उत्सव झाला नाही तर ते ओंगळ नाच आणि DJवर वाजणारी घाणेरडी गाणी याच्या नशिबात नसतील.

सर्व काही त्यांच्याच हातात आहे. 'आले देवाजीच्या मना...' हो की नाही?


तेव्हा हे जगन्नाथा, तुझा रथ दरवर्षीप्रमाणे माणसांकरवी तू सुखरूपपणे नेलास, तसाच आमचा हा रथ त्या पल्याड सुखरूपपणे नेऊन पोहोचव, अशी विनम्र प्रार्थना त्याच्या पायापाशी करून मी इथेच थांबते.

जय जगन्नाथ...।

(हा लेख प्रकाशित होईपर्यंत सारे काही सुरळीत सुरू झाले असेल अशी आशा आहे.)

**joglekarradha@rediffmail.com**

नवं कोरं



धगधगत्या ॲसिडनं जळलेल्या एका चेहऱ्यामागची अदम्य जिद्द...
जिनं आंतरराष्ट्रीय रॅम्पवर सौंदर्याची नवी व्याख्या प्रस्थापित केली...
अशी रेश्मा कुरेशीची आत्मकथा...

चेहऱ्यामागची रेश्मा

मूळ लेखक - रेश्मा कुरेशी | सहलेखक - तानिया सिंग | अनुवाद - निर्मिती कोलते

पृष्ठसंख्या : १७६ । किंमत : ₹२६०

Book Available

# कोरोना इथला, कोरोना तिथला, कोरोना बंगालचा

सई कुलकर्णी-मुखर्जी



अनेक अपेक्षांसहित २०२० हे वर्ष सुरू झालं. टोकिओ शहर या वर्षी 'ऑलिम्पिक'च यजमानपद स्वीकारण्यासाठी सज्ज झालं होतं. पाच वर्षांतून एकदा होणारे 'वर्ल्ड एक्स्पो' या वर्षी ऑक्टोबरमध्ये दुबईला होणार होते, त्यासाठी तिथे जय्यत तयारी चालू होती; पण नियतीने पुढे काय मांडून ठेवलं आहे याची वर्षाच्या सुरुवातीला कोणाला अंधुकशीही कल्पना नव्हती.

तसं जानेवारीपासूनच 'कोरोना' हे नाव अधूनमधून ऐकू येत होतं; पण चीनमधून आलेला हा व्हायरस आपल्या सर्वांच्या आयुष्याला असा विळखा घालेल असं मला अजिबात वाटलं नव्हतं; परंतु बघता बघता एक-दोन महिन्यांच्या अवधीतच कोरोनाची 'अनिष्टसूचक सावली' (किंवा किमान त्याची भीती) जगभरात अशी पसरली की, सगळ्यांच्या बोलण्यात 'कोरोना'व्यतिरिक्त दुसरा काही विषयच उरला नाही! सुरुवातीला सगळ्यांना असं वाटलं होतं की, हा आजार फ्लूसारखाच आहे, पसरतोही तसाच; पण हळूहळू असं लक्षात आलं की, या आजारामुळे रुग्ण दगावण्याचं प्रमाण साध्या फ्लूपेक्षा खूपच जास्त आहे; त्यामुळे लोकांच्या मनात या आजाराबद्दल मोठ्या प्रमाणात भीतीही पसरली.

मी, माझे पती ऑनिर्बान आणि आमची दोन मुलं (वय वर्ष ८ आणि २) असे आम्ही पश्चिम बंगालमधील शिलीगुडी इथे राहतो. इथे कोरोनाचा काय प्रभाव दिसला, हे या लेखाच्या स्वरूपात लिहायची संधी मिळाल्यावर मी विचार करू लागले. खरोखर, शिलीगुडी किंवा पश्चिम बंगालपुरतं मर्यादित असं काय घडलं होतं? या प्रक्रियेतून माझ्या असं लक्षात आलं की, या पाच-सहा महिन्यांच्या प्रवासातील बऱ्याच गोष्टी आपल्या आता तितक्याशा लक्षातही नाहीत! वैयक्तिक आयुष्यात म्हणाल तर कुटुंबातील सगळे सध्या पूर्ण वेळ घरी असल्यामुळे या काळातील प्रत्येक दिवस वेगळा असतो आणि तरी एकसारखा असतो! मला आठवतात ते सगळे प्रसंग विस्कळीत आहेत. त्यातून एक एकसंध चित्र तयार करणं मला खूप अवघड जात आहे. तेव्हा महत्त्वाचे वाटणारे प्रसंगही जणू काही आता कुठेतरी हरवून गेले आहेत.

भारतात कोरोना व्हायरसचा पहिला रुग्ण ३० जानेवारी, २०२० रोजी आढळला. फेब्रुवारी महिन्यात छोट्याशा विश्रामानंतर मार्चच्या पहिल्या आठवड्यापासून भारतातील रुग्णांचा आकडा उत्तरोत्तर वाढतच गेला. पश्चिम बंगालमध्ये पहिली केस १७ मार्चला सापडली; इंग्लंडहून परतलेल्या एका युवकाची चाचणी पॉझिटिव्ह आली. मधल्या दोन आठवड्यांच्या काळात आमच्या आजूबाजूच्या सगळ्यांच्या मनात भीती वाढत असलेली मला जाणवत होती; पण तरीही त्याचा आवाका आम्हाला तेव्हा तितका कळला नव्हता. अगदी होळीच्या वेळीसुद्धा आम्ही तीन दिवस दार्जिलिंगला छोटीशी ट्रिप करून आलो. मास्क घालणे, कशालाही हात लावला की, लगेच हात धुणे वगैरे गोष्टी तेव्हा आमच्या गावीही नव्हत्या. तिथून परत आल्यावर १३ मार्च रोजी माझ्या मुलाची परीक्षा संपली आणि सुट्टी लागली. त्यानंतर चार-पाच दिवसांनी आम्ही दरवर्षीप्रमाणे माझ्या सासू-सासऱ्यांकडे कोलकात्याला जाणार होतो. जायच्या आदल्या दिवशी आम्ही 'कंटेजिअन' नावाचा एक इंग्रजी चित्रपट बघितला. हा चित्रपट कोरोनासारख्याच पसरणाऱ्या; पण खूप घातक असणाऱ्या एका काल्पनिक व्हायरसच्या प्रसाराबद्दल आहे. हा सिनेमा बघितल्यावर आमच्या मनात अशी काही भीती बसली की, आम्ही दुसऱ्या दिवशीचे कोलकात्याचे तिकीट रद्द केले. या सगळ्या पार्श्वभूमीवर आम्ही ठरवलं की, जे जिथे आहेत तिथे त्यांनी सुरक्षित राहावं. आता प्रवास न केलेलाच बरा!

या महामारीची व्याप्ती किती मोठी आहे हे त्यानंतर थोड्या दिवसांत सगळ्यांच्या लक्षात आलंच. २२ मार्चला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक दिवसाचा लॉकडाउन जाहीर केला, तेव्हा असं वाटलं होतं की, एक अख्खा दिवस सगळ्यांना घरी बसायला लावणं कसं शक्य होईल? मग २४ मार्चला भारत सरकारने २१ दिवसांसाठी संपूर्ण लॉकडाउन जाहीर केला आणि तो पुढे टप्प्याटप्प्याने मे महिन्यापर्यंत वाढवला गेला. मग विविध निर्बंधांसहित 'अनलॉक' व्हायला सुरुवात होऊनही आता तीन महिन्यांपेक्षा जास्त झाले. एवढे दिवस आपण घरी बसू शकू, आपली मुलेही बऱ्यापैकी आनंदात २४ तास घरी राहू शकतील हे आधी मला कोणी सांगितलं असतं तर त्यावर माझा विश्वास बसला नसता!

शिलीगुडीला आम्ही नॉर्थ बेंगॉल विद्यापीठाच्या कॅम्पसवर राहतो. इथे मुलांची शाळा आणि नवऱ्याचे विद्यापीठातील वर्ग बंद होण्याव्यतिरिक्त या सगळ्या प्रकरणाने तसा फारसा काही फरक जाणवला, असं मी म्हणणार नाही. कॅम्पसवर आम्ही राहतो त्या भागात एरवीही अजिबात रहदारी नसते, लोकांची वर्दळ नसते; त्यामुळे लॉकडाउनच्या काळात प्रत्यक्षात फार काही वेगळं घडत आहे असं आम्हाला वाटलं नाही. फरक पडला होता तो लोकांच्या मानसिकतेत! २४ मार्चला लॉकडाउन जाहीर झाल्यावर सगळ्यांनी भरपूर डाळ-तांदूळ आणि कांदे-बटाटे आणून ठेवले, जेणेकरून सगळं बंद झालं तरी निदान रोजच्या जेवणाचे हाल होणार नाहीत; पण तसं काही झालं नाही. उलट लॉकडाउन सुरू झाल्यावर इथे अचानक दिवसातून चार-पाच भाजीवाले येऊ लागले. ज्यांची इतर कामं बंद झाली होती, असे बरेच लोक आता भाजी विकू लागले. सुरुवातीच्या काळात भाजीवाले आले की, सगळे धावतपळत खाली जायचे आणि जे मिळेल ते घेऊन यायचे; परंतु हळूहळू हा उत्साहही कमी झाला. आम्ही कॅम्पसच्या एका कोपऱ्यात राहत असल्यामुळे इथे पूर्वी कुठल्याही सामानाची घरपोहोच डिलिव्हरी होत नव्हती; पण गेल्या तीन-चार महिन्यांत अशा प्रकारच्या अनेक सेवा सुरू झाल्या आणि पूर्वी फक्त जेवणाची डिलिव्हरी करणाऱ्या कंपन्यांनी आता किराणा माल आणि इतर सामान पोहोचवायलाही सुरुवात केली.

कोलकात्याला राहणाऱ्या माझ्या सासू-सासऱ्यांची प्रकृती फारशी बरी नसल्यामुळे त्यांच्याकडे दिवसा एक आणि रात्री एक अशा दोन बायका कामाला आहेत. त्यांच्यापैकी एकजण लांब राहत असल्यामुळे त्या लोकलने ये-जा करत होत्या. लॉकडाउन जाहीर झाल्यावर अचानक लोकल बंद झाल्यामुळे त्यांना कामावर येण्याचा काहीच मार्ग नव्हता. सुदैवाने दुसऱ्या बाईंनी २४ तास थांबायची तयारी दाखवली. त्या पुढे दोन महिने आमच्या घरीच राहिल्या; त्यामुळे सामान आणून देणे, घरातील इतर किरकोळ कामे करणे इत्यादी कामांमध्येही त्यांची माझ्या सासूबाईंना खूप मदत झाली.

आमच्या घरी एप्रिल महिन्यातच माझ्या मुलाच्या शाळेचे ऑनलाइन वर्ग सुरू झाले. त्याला त्याची मजा वाटत होती; पण मित्रांना भेटता येत नाही याचं दुःखही होतं; परंतु त्याच्या शाळेने मुलांसाठी ही प्रक्रिया मनोरंजक करायचा वेगवेगळ्या प्रकारे प्रयत्न केला, त्याबद्दल त्यांचं विशेष कौतुक करावंसं वाटतं. माझी मुलं या पाच महिन्यांत जिना उतरून खालीही गेली नाहीत. अधूनमधून आम्ही गच्चीवर जातो. तिथे ते दोघं पळापळी करतात, सायकल चालवतात; पण सगळं काही आमच्या चौघांमध्ये. इतर सगळा वेळ घरीच खेळ, पुस्तकं, चित्रकला, थोडा अभ्यास, थोडा टीव्ही अशा गोष्टींमध्ये ते काढतात. माझा मोठा मुलगा त्याच्या कल्पनाशक्तीच्या जोरावर रोज कुठेतरी जायची 'ॲक्टिंग' करतो; एक बॅग भरून 'ट्रेन'ने कुठेतरी जातो, मग आमच्या 'हॉटेल'मध्ये राहायला येतो, वगैरे वगैरे. धाकटा मुलगाही दादा सतत घरी असल्यामुळे आनंदातच आहे. बाहेर खेळणं आणि मित्रांना भेटण्याचा आनंद जरी त्यांना या काळात घेता आला नसला तरी हे पाच महिने आमच्या सगळ्यांसाठीच खूप महत्त्वाचे ठरले आहेत असं मी म्हणेन. या काळात माझ्या मोठ्या मुलाने पुस्तकं वाचण्याचा सपाटा लावला होता. दिवसाला एक पुस्तक तो वाचत होता. त्याने व माझ्या नवऱ्याने अनेक नावाजलेले चित्रपट एकत्र बघितले. सत्यजित राय यांच्यापासून आकिरा कुरोसावापर्यंत, ज्युरासिक पार्कच्या पाच भागांपासून ते हॅरी पॉटरच्या आठ भागांपर्यंत, असे सर्व प्रकारचे चित्रपट त्यांनी एकत्र बसून पाहिले; त्यामुळे एका अर्थाने या परिस्थितीने सगळ्यांचा कस लागला असला, तरी एकमेकांबरोबर इतका वेळ काढायची आणि असे 'विविध प्रकारचे शिक्षण' घेण्याची व देण्याची संधी आम्हाला आयुष्यात क्वचितच मिळेल, असं मला वाटतं.

हे सगळं चालू असतानाच पूर्व भारताला एका भयानक चक्रीवादळाला तोंड द्यावं लागलं. ताशी १२० किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या या 'आम्फान' नावाच्या वादळाचा २० मे, २०२० रोजी पश्चिम बंगाल आणि ओडिशाला फटका बसला. केंद्र सरकार आणि दोन्ही राज्य सरकारांनी त्याचा तडाखा कमी करण्याच्या हेतूने आधीच वेगवेगळे उपाय केले; पण सार्वजनिक विलगीकरणाची गरज असल्यामुळे स्थलांतरितांसाठी दुप्पट सोय करावी लागली. आवश्यक असलेली सावधगिरी बाळगून वीस लाखांहून अधिक लोकांना सुरक्षित जागी हलवले गेले. या सगळ्या उपायांमुळे मृतांची संख्या अपेक्षेपेक्षा कमी होती; परंतु इतर नुकसान मात्र खूप झालं. या वादळाने दहा हजारांहून जास्त झाडे पडली. फक्त कोलकात्यामध्ये चार हजार विजेचे खांब पडले, ज्यामुळे पुढचे १५-२० तास शहरात कुठेही दिवे नव्हते. सर्व खांब पुन्हा उभे करून सगळीकडचा वीजपुरवठा नियमित व्हायला काही ठिकाणी जवळजवळ एक आठवडा लागला. वीजपुरवठा नसल्यामुळे आणि फोन चालू नसल्यामुळे कोलकात्याला राहणाऱ्या माझ्या सासू-सासऱ्यांशी आम्हाला तीन-चार दिवस संपर्कही करता आला नाही. पश्चिम बंगालमधील गावांमध्ये सुमारे एक लाख घरांचं आणि कितीतरी लाख एकर शेतीचं नुकसान झालं. कोरोना आणि त्यासाठीच्या लॉकडाउनमुळे मनुष्यबळही कमी होतं; त्यामुळे पुनर्वसनाच्या कामामध्ये असंख्य अडथळे उभे राहिले. या सगळ्यातून गेलेल्या लोकांसाठी हा काळ नक्कीच 'दुष्काळात तेरावा महिना' म्हणतात तसा होता.

तसं बघितलं तर पुणे असो की पॅरिस, शिलीगुडी असो की सॅन फ्रान्सिस्को, जगभरात सगळीकडे मध्यमवर्गीय आणि उच्च-मध्यमवर्गीय कुटुंबांमधील लोकांचे या काळातील अनुभव कमी-अधिक प्रमाणात सारखेच होते. सगळे घरून काम करत होते, शाळा-कॉलेजात जाणारी मुलं घरी होती, त्यांचेही घरूनच ऑनलाइन तास चालू होते. या काळात जगभरात सगळीकडेच अनेक लोकांच्या नोकऱ्या गेल्या किंवा पगार कमी केले गेले; त्यामुळे ते तणावाचं एक मोठं कारण होतं. वेगवेगळ्या ठिकाणी जाणवणारे फरक हे किरकोळ होते. म्हणजे लॉकडाउन कधी जाहीर झाला, त्याचे नियम आणि त्या नियमांची अंमलबजावणी किती कडक होती, लॉकडाउनमध्ये कशाकशाला परवानगी होती आणि कशावर प्रतिबंध होता, एवढाच तपशिलाचा काय तो फरक! पण सगळीकडे आर्थिकदृष्ट्या निम्नस्तरातील लोकांसाठी हा काळ खूप कठीण असल्याचं जाणवतं. भारतातील रोजंदारीवरील कामगारांना अचानक काही काम मिळणं शक्य नव्हतं; त्यामुळे त्यांचं दोन वेळचं जेवणही अनिश्चित झालं. शहरात राहणाऱ्या आणि ज्यांच्याकडे घराचं भाडं देण्यासाठीही पैसे उरले नाहीत, त्यांनी मग जो मार्ग सापडेल तो अवलंबून आपापल्या गावाचा रस्ता धरला. काही दिवसांनी सरकारने त्यांच्यासाठी विशेष रेल्वेसेवा सुरू केली; पण मुक्कामाला पोहोचल्यावर सगळ्यांचं विलगीकरण करणे यासारखी अनेक व्यावहारिक आव्हानं समोर आली. अनेक ठिकाणी श्रमिकांसाठी तयार केलेल्या विलगीकरण केंद्रांना तिथल्या आजूबाजूच्या लोकांनी खूप विरोध केला. कोरोना व्हायरसबद्दल लोकांच्या मनात इतकी भीती बसली आहे की, त्याच्या पलीकडे जाऊन माणुसकीच्या दृष्टिकोनातून याकडे बघणं लोकांना खूप अवघड जात असल्याचं दिसतं. इथे आसपासही अशी काही विलगीकरण केंद्रे तयार केली गेली होती. आजूबाजूच्या लोकांनी विरोध केल्यावर संबंधित अधिकाऱ्यांनी त्यात लक्ष घातलं आणि पोलीस बंदोबस्तासह या केंद्रांनी त्यांचं काम बऱ्यापैकी सुरळीतपणे केलं.


जगभरात सगळीकडे लॉकडाउनमध्ये कशाकशाला परवानगी दिली गेली त्याची यादी वेगवेगळी होती. काही ठिकाणी गोल्फ कोर्स बंद केले गेले नाहीत, काही ठिकाणी घरातील लोकांबरोबर बागेत किंवा मोकळ्या ठिकाणी व्यायामाला जायची परवानगी होती, तर काही ठिकाणी यापैकी कशालाच परवानगी नव्हती. भारतात या लॉकडाउनच्या काळात सुरुवातीला किराणा मालाची व औषधाची दुकाने आणि अत्यावश्यक सेवांव्यतिरिक्त सगळ्याला बंदी होती; परंतु सर्व राज्यांना परिस्थितीचा आढावा घेऊन लागतील त्या सेवा सुरू करण्याची मुभा होती. पश्चिम बंगालमध्ये सुरुवातीला सगळ्यालाच प्रतिबंध होता; पण हळूहळू काही विशिष्ट गोष्टींना परवानगी दिली गेली. एप्रिल महिन्यातच असं लक्षात आलं की, दूध, फुले यांसारख्या काही नाशिवंत गोष्टी खूप मोठ्या प्रमाणात वाया जात आहेत. बंगाली मिठाई ही बरीचशी दुधाची असते आणि इथे अगदी कोपऱ्याकोपऱ्यावर मिठाईची दुकानं आहेत. ही दुकानं बंद झाल्यावर दुधाची विक्रीही बंद झाली; त्यामुळे अनेक लिटर दूध वाया जाऊ लागलं. ही सगळी परिस्थिती लक्षात घेऊन एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यापासून इथल्या प्रशासनाने मिठाई आणि फुलांच्या दुकानांनाही

दिवसातून काही तास उघडण्याची परवानगी दिली.

गेले पाच महिने अनेक प्रकारे अनिश्चिततेत गेले. सगळं कधी सुरळीत होईल? शाळा आणि कॉलेज परत कधी सुरू होतील? आपल्याला पुन्हा कधी मास्कशिवाय बाहेर जाता येईल? लहान मुलांना घेऊन आपल्याला प्रवास करायचं धाडस कधी होईल? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं कोणाकडेच नाहीत; पण वाइटातून चांगलं निघतं म्हणतात तसे काही आशेचे किरणही या काळात दिसले आहेत. वैयक्तिक माझ्या बाबतीत सांगायचं तर सगळं शिक्षण सध्या ऑनलाइन चाललेलं असल्यामुळे मला अचानक पुण्यातील एका मराठी माध्यमातील शाळेत communication skills शिकवण्याची संधी मिळाली. माझ्यासारख्याच अनेकांना इंटरनेटच्या माध्यमातून घरबसल्या वेगवेगळ्या ठिकाणी कार्यशाळा, व्याख्याने आणि इतर कार्यक्रमांचं आयोजन करण्याची व इतर काही कार्यक्रमांमध्ये भाग घेण्याची संधी मिळाली. पूर्वी दिवसभर घराबाहेर असणाऱ्या अनेक लोकांना आता कुटुंबाबरोबर घालवायला वेळ मिळाला. यामुळे काही वेळा काही घरांमध्ये जास्त भांडणंही झाली असतील; पण यातूनच एकमेकांना नव्याने ओळखण्याची संधीही मिळाली. इतके दिवस 'मला कामाव्यतिरिक्त कशासाठी वेळच मिळत नाही, जरा पुस्तक हातात घ्यायचं म्हटलं की, लगेच ऑफिसला जायची वेळ होते!' असं म्हणणाऱ्या कित्येक लोकांना अचानक थोडाफार का होईना वेळ मिळू लागला. बऱ्याच लोकांनी या मिळालेल्या संधीचा पुरेपूर वापर केला. अनेकांनी ऑनलाइन नवीन भाषा शिकायला सुरुवात केली, स्वयंपाकात विविध प्रयोग केले, घराची साफसफाई केली किंवा बरेच दिवस हातातून निसटलेली अशी एखादी आवड पुन्हा जोपासायला सुरुवात केली. असे बरेच 'लॉकडाउन प्रोजेक्ट्स' आपल्याला बघायला मिळाले; त्यामुळे या कठीण काळात आपण स्वतःची मनःस्थिती ढासळू न देता ज्या प्रकारे यामध्ये नवीन काहीतरी बघण्याचा प्रयत्न केला; त्यामुळे आपल्याला स्वतःबद्दलही बरंच काही शिकायला मिळालं, असं मला वाटतं!

हे सगळं वाचताना वाचकांना कदाचित असं वाटेल की, यात विशेष असं काहीच नाही! हे अनुभव तर कमी-अधिक प्रमाणात जगभरात सगळ्यांनाच आले आहेत. हे अगदी खरं आहे! कारण हा कोरोना व्हायरस एखाद्याच्या शरीरात घर करतो, तेव्हा ही व्यक्ती भारतीय आहे की जर्मन, मराठी आहे की बंगाली, हिंदू आहे की मुसलमान, गरीब आहे की श्रीमंत, उच्चशिक्षित आहे की निरक्षर यापैकी काहीच बघत नाही! आपल्याला जो फरक दिसतो तो देशातील आरोग्य व्यवस्था, आपले माणसामाणसांतील संबंध आणि आपली वैयक्तिक मनःस्थिती या बाबतीत. या काळात लांब राहणाऱ्या नातेवाइकांपेक्षा शेजारीपाजारी राहणाऱ्या लोकांचा आधार जास्त होता, याचा अनेक लोकांनी अनुभव घेतला. याव्यतिरिक्त आपल्या आसपास काम करणाऱ्या डॉक्टर, नर्स, पोलीस, सफाई कर्मचारी आणि अशा इतर व्यावसायिकांबद्दल लोकांना नव्याने आदर वाटू लागला. एकूणच असं जाणवतं की, या काळात आपली स्वतःशी आणि आजूबाजूच्या इतर लोकांशी जी नव्याने ओळख होत आहे, ती आपल्यासाठी आयुष्यभर अर्थपूर्ण ठरणार आहे, एवढं मात्र नक्की!

**sai.kulkarni20@gmail.com**



# कोविड-१९ आणि अमेरिका

लीना सोहोनी



आपल्या पंतप्रधानांनी २१ मार्च, २०२० रोजी पहिला देशव्यापी लॉकडाउन घोषित केला. हा लॉकडाउन अत्यंत कडक स्वरूपाचा होता. केवळ अत्यावश्यक सेवा वगळता सर्वच व्यापार, उद्योगधंदे, दुकाने, शाळा, महाविद्यालये, ऑफिसेस, खासगी तसेच सार्वजनिक वाहतूक या सर्व गोष्टींवर कडक निर्बंध घालण्यात आले. या काळात सामान्य जनतेला बरीच गैरसोय सहन करावी लागली. तसेच या नियमांची काटेकोर अंमलबजावणी होते की नाही हे पाहण्यासाठी पोलिसांवर, तसेच वाढत्या संख्येने रुग्णालयांमध्ये भरती होणाऱ्या रुग्णांची देखभाल करणाऱ्या डॉक्टर्स, तसेच परिचारकांवरसुद्धा याचा अतिरिक्त ताण पडू लागला. अर्थात, ही गोष्ट खरी असली तरी लॉकडाउनच्या कालावधीत एकीकडे आपल्या भारत सरकारने या पुढे उभ्या राहिलेल्या संकटाचा समर्थपणे सामना करण्याची तयारी जोरात सुरू केली होती. सरकारी तसेच खासगी रुग्णालयांमधून दिवसेंदिवस वाढत असलेल्या कोरोनाबाधित रुग्णांची व्यवस्था करता यावी, मास्क, पीपीटी किट्स, व्हेंटिलेटर्स, टेस्टिंगच्या सुविधा, आयसीयूच्या सुविधा व इतर सर्व बाबतींत रुग्णालये सज्ज करता यावीत यासाठी केंद्र तसेच सर्व राज्य सरकारांनी तातडीचे प्रयत्न सुरू केले.

अमेरिकेत मात्र इतका कठोर स्वरूपाचा लॉकडाउन सुरुवातीच्या काळात घोषित केला गेला नव्हता. लोकांनी सोशल डिस्टन्सिंगचे पालन करावे, बाहेर समाजात वावरताना फेस मास्कचा वापर करावा, असे नियम जनतेला घालून देण्यात आले होते, तसेच ज्यांना शक्य असेल त्यांनी घरून काम करावे, अशाही सूचना जनतेला देण्यात आल्या होत्या; परंतु लोकल ट्रेन्स मात्र बंद करण्यात आल्या नव्हत्या. भारतात केंद्र सरकारने देशव्यापी लॉकडाउन जाहीर केला होता आणि सर्वच राज्यांमध्ये त्या नियमांचे काटेकोर पालन केले जात होते. अमेरिकेच्या अध्यक्षीय लोकशाही पद्धतीमध्ये राज्याराज्यांच्या सरकारांना जास्त अधिकार असतात; त्यामुळे त्या त्या राज्याच्या राज्यपालांनी आपल्या राज्यातील स्थानिक परिस्थितीनुसार त्यांना जे योग्य वाटले ते निर्णय घेतले. उदाहरणार्थ, लॉकडाउननंतर काही काळानंतर काही राज्यांच्या सरकारांनी आपल्या राज्यातील पब्ज आणि रेस्टॉरंट्स काही नियमांचे, निर्बंधांचे पालन करून उघडण्यास काही काळासाठी परवानगी दिली होती; परंतु तेथील कोरोनबाधितांची संख्या वाढीस लागल्यावर परत तसे करण्यावर बंदी घालण्यात आली. भारतात मास्क न घालता बाहेर पडण्यास बंदी असून, त्याबद्दल दंडही ठोठावण्यात येतो. सोशल डिस्टन्सिंगचे नियम झुगारून देणाऱ्या नागरिकांना पकडून पोलिसांनी त्यांना भर रस्त्यात उठाबशा काढायला लावल्याचे, तर काहींना चोप दिल्याचे व्हिडिओज्सुद्धा आपण पाहिले आहेत. अमेरिकेतील जनतेमध्ये मात्र मास्क व सोशल डिस्टन्सिंगचे इतके कठोर पालन करावे की नाही याविषयी मतभेद आढळून येतात. खुद्द अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना कित्येक वेळा मास्कशिवाय वावरताना आपण टीव्हीवर पाहिले आहे.

त्यामुळेच मी जेव्हा या संदर्भात माझ्या नातेवाइकांशी बोलले, तेव्हा त्यांनी मला असं सांगितलं की, त्यांच्याकडे लॉकडाउनचे नियम आपल्याएवढे कठोर नसले, तरी एक सुजाण नागरिक म्हणून सर्वसामान्य लोकांची सोशल डिस्टन्सिंग पाळण्याकडे, मास्क घालून वावरण्याकडे प्रवृत्ती दिसून येत आहे. भारतात अशा प्रकारचे सोशल डिस्टन्सिंगचे नियम धाब्यावर बसवून मॉर्निंग वॉक करण्यासाठी बाहेर पडणाऱ्या नागरिकांना किंवा दुचाकीवरून मास्क न घालता हिंडणाऱ्या तरुण पोरांना पोलीस रस्त्यात अडवून चोप देत असल्याचे फोटो सोशल मीडियावर झळकलेले जेव्हा अमेरिकन लोकांनी पाहिले, तेव्हा त्यांना जबरदस्त धक्का बसला; कारण मुळात अशा प्रकारची सक्ती जनतेवर करणं हेच लोकांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आणण्यासारखं आहे, असंसुद्धा तिथल्या काही लोकांचं मत आहे.

दैनंदिन जीवनात लागणाऱ्या दूध, भाजीपाला, फळे, औषधे यांसारख्या गोष्टींसाठी तिथले लोक काय करतात, याचेही मला कुतूहल होते. त्यावर मला तिकडच्या लोकांनी असे सांगितले की, तिकडे देशभर खूप मोठमोठ्या सुपर स्टोअर्सची साखळी असून, एका ठिकाणी सर्वच आवश्यक गोष्टी मिळतात. ही स्टोअर्स सकाळी सहालाच उघडतात. त्याच्यासमोर लोकांच्या मैलभर रांगा असतात. लोक सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळून, रांगेत उभे राहून, अत्यंत शिस्तबद्ध रीतीने अशी खरेदी करून सामान गाडीत घालून घरी जातात. आपल्याकडे आपण बाहेरून आणलेले सगळे पदार्थ, भाजीपाला असं सगळं धुऊन, पुसून मगच ते ठेवून देतो. हे लोकसुद्धा तसंच करतात का, अशीही मला एक शंका होती. त्यावर त्यांनी मला असं सांगितलं की, सुपर स्टोअरमधून आणलेली भाजी आणि फळे स्वच्छतेचे नियम पाळून अगदी काळजीपूर्वक साफ करूनच विक्रीला ठेवलेली असतात; त्यामुळे आम्ही ती फ्रिजमध्ये ठेवतो; पण शक्यतो आणल्यापासून तीन-चार दिवसांनंतरच त्यांचा खाण्यासाठी वापर करतो. कच्चे पदार्थ खाणे सध्या तरी टाळतो. मायक्रोवेव्ह, ओव्हन, गॅसचा वापर करून, ते पदार्थ व्यवस्थित शिजवून मगच ते आम्ही खाण्यासाठी वापरतो. घरीसुद्धा हात वारंवार साबणाने धुणे, बाहेर पडताना सॅनिटायझर जवळ ठेवणे आणि गरज पडल्यास ते वापरणे, असं सगळीकडे काटेकोरपणे पाळण्यात येतं.

जिम आणि हेल्थ क्लब्ज जरी बंद असले तरी लोकांना मॉर्निंग वॉकला जाण्याची मुभा आहे. अर्थातच, मास्क घालून आणि सुरक्षित अंतर राखून. लोक अधूनमधून बागेत किंवा समुद्राकाठी जातात आणि याचं खरं कारण असं की, मुळातच तिकडे रस्त्यावर गर्दी कमीच असते. काही राज्यांमध्ये रेस्टॉरंट्स, पब्ज चालू करण्यात आल्यानंतर त्यामध्ये लोकांची तुरळक प्रमाणात ये-जा सुरू झाली. रेस्टॉरंटमध्ये जरी गेले नाही, तरी फूडची होम डिलिव्हरी सतत सुरूच ठेवण्यात आली असून, लोक त्याचा वापर करत असतात. 'पूर्वीसारखी वीक एन्डला मित्रमंडळींची वर्दळ अर्थातच सुरू नाही. आम्ही मोठ्या संख्येने एकत्र जमून पार्ट्यासुद्धा करत नाही; तरी पण अगदी जवळचे फॅमिली फ्रेंड्स असतील तर कधीतरी आम्ही एकमेकांच्या घरी जा-ये करतो; कारण आमच्या लहान मुलांना माणसांमध्ये मिसळण्याची मानसिक गरज आहे,' असं तिकडच्या लोकांनी सांगितलं; 'पण त्याचबरोबर आमच्याकडे संचारबंदीसारखे कायदेकानून लागू करण्यात आलेले नसल्यामुळे आपल्या किंवा आपल्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेसाठी आपण नीट काळजी घेणे ही आपली

जबाबदारी आहे, याची जाणीव आम्हाला ठेवावीच लागते!'

कामाच्या बाबतीत तर आता बऱ्याच कंपन्यांनी आपापल्या कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची सवलत (काही कंपन्यांनी बेमुदत, तर काहींनी डिसेंबरपर्यंत) जाहीर केलेलीच आहे. सर्व मीटिंग्ज घरून झूम, गूगल मीट किंवा तशाच कोणत्यातरी ॲपवरून घेण्यात येतात. लोक घरून काम करत असताना कधीतरी घरातील लहान मुले, पाळीव प्राणी हेसुद्धा त्या मीटिंगमध्ये आपली उपस्थिती लावून जातात; पण घरोघरी हीच परिस्थिती असल्यामुळे कुणालाच त्याचे काही वाटत नाही. हे आता सगळ्यांच्या अंगवळणी पडले असून, ऑफिसमधल्या सहकाऱ्यांमधली औपचारिकता जवळजवळ संपुष्टात आली आहे, असं आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या माझ्या मित्रमंडळींनी सांगितलं.

तीच गोष्ट लहान मुलांना शाळेत पाठवण्याबद्दलसुद्धा झाली. काही दिवसांपूर्वी ट्रम्प सरकारने आता शाळा सुरू करण्यास हरकत नाही, असा आदेश दिला. आमच्या नातेवाइकांच्या किंडर गार्टनमध्ये जाणाऱ्या लहान मुलांची शाळा गेले चार-पाच महिने ऑनलाइन अगदी सुरळीत सुरू होती. आई-वडील दोघेही वर्किंग असल्यामुळे घरी मुलांना सांभाळण्यासाठी आधीपासूनच आया नेमलेली होती. मुलांच्या शाळेचे ॲप शाळेच्या सूचनेनुसार पालकांनी डाउनलोड केले होते, त्यावर मुले अभ्यास करून शिक्षकांकडे तपासायला पाठवत होती. झूम मीटिंगवर मुलांची शाळा नियमित चालू होती. अशी सगळी घडी व्यवस्थित बसली होती. उच्च मध्यमवर्गीय घरांत, जिथे दोन्ही पालक वर्किंग आहेत अशांसाठी हे मॉडेल खूपच सोईचं झालं होतं. त्यानंतर अचानक सरकारने शाळांना परत नेहमीसारखे वर्ग भरवून शाळा घेण्यास हरकत नाही, अशी सूचना दिली. खरं पाहता शाळेत मुलं पूर्ववत शिकण्यासाठी येऊ लागली की, त्यांच्या सुरक्षिततेची काळजी घेण्याची जबाबदारी शाळेच्या व्यवस्थापनावर येऊन पडणार. वेगवेगळ्या घरांतून शाळेत येणारी मुले, त्यांना पोहोचवायला येणारे पालक, शिक्षक, इतर सेवकवर्ग यांची वर्दळ सुरू झाल्यानंतर रोगाचा प्रादुर्भाव टाळणार तरी कसा? अशी चिंता शाळेच्या व्यवस्थापनासमोर उभी राहिली. त्यातून मार्ग काढण्यासाठी त्यांनी पालकांची झूम मीटिंग घेऊन त्यांना लवकरच शाळा पूर्ववत सुरू होणार असल्याची बातमी दिली; पण त्याचबरोबर तोच वर्ग त्याच वेळी ऑनलाइनसुद्धा भरवण्यात येईल; त्यामुळे पालकांनी यातील कोणताही एक पर्याय निवडून तो शाळेला एका विशिष्ट तारखेच्या आत कळवावा, असे सांगण्यात आले. त्यावर काही लोकांनी त्यांची मुलांना शाळेत पाठवण्याची इच्छा असल्याचे सांगितले. त्यांना काही कारणाने मुलांना घरी सांभाळणे शक्य नव्हते. मग व्यवस्थापनाने असे सांगितले की, शाळेतील वर्गात फक्त दहा-बारा मुले असतील, त्यांना सर्व वेळ मास्क घालून बसावे लागेल, तसेच एकमेकांमध्ये मिसळण्याची परवानगी दिली जाणार नाही. शिक्षकही अशाच प्रकारे सर्व वेळ मास्क घालून असतील. अशा प्रकारे शाळा सुरू झाल्यानंतर जर एखादी कोरोनाची केस निघालीच तर पुन्हा सर्व वर्गाला घरून शाळा अटेन्ड करणं भाग पडेल. जे पालक मुलांना शाळेत पाठवू इच्छित नव्हते त्यांच्यावर आपल्या पाल्याचा घरी अभ्यास करून घेण्याची जबाबदारी पडणार होती. शिवाय, इतक्या लहान मुलांना अभ्यासाच्या कारणाने लॅपटॉपच्या स्क्रीनसमोर इतके तास बसवून ठेवावं लागलं तर त्याचे मुलांच्या प्रकृतीवर, डोळ्यांवर किती दुष्परिणाम होऊ शकतात हा मुद्दा तर आणखी वेगळा! थोडक्यात असं की, कोणताही पर्याय निवडला, तरी त्याचे काही ना काही दुष्परिणाम पालकांना आणि पाल्याला भोगावे लागणारच. सध्या तरी ही परिस्थिती आहे.


This COVID-19 is a Great Leveller!

तुम्ही भारतात राहात असा, अमेरिकेत किंवा युरोपात राहात असा, नाहीतर जगाच्या पाठीवर कुठेही राहात असा; या पॅन्डेमिकच्या बाबतीत बोलायचं तर 'Facing a Different Crisis, Every Day is the New Normal' असंच म्हणावं लागेल. उद्या नेमकं काय घडेल हे आज कुणालाच सांगता येणार नाही. येणाऱ्या काळाच्या पोटात काय दडलंय त्याचा सामना करण्यासाठी आपण सर्वांनी एकजुटीने सज्ज राहाणं, एवढंच आपल्या सर्वांच्या हातात आहे.

**leena.n.sohoni@gmail.com**

यारदोस्तांच्या करामती आणि
आयुष्यातल्या खुमासदार वळणांची
प्रत्येकाला उजळणी करायला लावणारा
खुसखुशीत ललितसंग्रह...

हेलमेटस




लेखक -
डॉ. नंदकुमार उकडगावकर

पृष्ठसंख्या : १३६
किंमत : ₹१८०

Book Available

# टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व **५० रु.** भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किंमतीत मिळतात.

पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.**

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील.

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून उपलब्ध असलेल्या पुस्तकांपैकी कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त.

## टी बुक क्लब २९ मधून प्रकाशित झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| **एच.एम.एस. युलिसिस** | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अनिल काळे | ४५० |
| **चेसिंग टुमॉरो** | सिडनी शेल्डन, टिली बॅगशॉ | अनु. मेघना जोशी | ४५० |
| **रिव्हर गॉड** | विल्बर स्मिथ | अनु. सुभाष जोशी | ७५० |

## टी बुक क्लब २९ मधून प्रकाशित होणारी पुस्तके


| | | |
|---|---|---|
| **द इनोसन्ट मॅन** | जॉन ग्रिशॅम | अनु. संजय गडकरी |
| **नेव्हर गो बॅक** | ली चाइल्ड | अनु. बाळ भागवत |
| **चार्लटन्स** | रॉबिन कुक | अनु. उज्ज्वला गोखले |

## टी बुक क्लब ३० मधून प्रकाशित होणारी पुस्तके

| | | |
|---|---|---|
| **द स्टोनहेंज लेगसी** | सॅम ख्रिस्टर | अनु. अशोक पाथरकर |
| **सेल** | रॉबिन कुक | अनु. डॉ. अजेय हर्डीकर |
| **व्हेअर ईगल्स डेअर** | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. माधव कर्वे |
| **द मिसिंग** | ख्रिस मुनी | अनु. नारायण पै |
| **माइटर दॅन द स्वोर्ड** | जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी |
| **द वॉन्टेड** | रॉबर्ट क्रेझ | अनु. सुरेश देशपांडे |

**सभासद फी ₹ ५०.** सभासद व्हा व **५०%** सवलत मिळवा!

अधिक माहितीसाठी संपर्क : (०२०) २४४७६९२४/२४४६०३१३/२९५२४०४८ 9420594665 G Pay +91 94223 23039



# कोरोनाच्या नंतरचा - भविष्यकाळ ?

डॉ. अनिल गांधी

आजपर्यंत पृथ्वीवर जीवांची उत्पत्ती, विकास आणि विनाश यांचे चक्र अव्याहत चालू आहे. आतापर्यंत पाच वेळा विविध कारणांनी पृथ्वीवरचे जीवन जवळजवळ नष्ट झाले असा संशोधकांचा दावा आहे. पृथ्वीवर प्रचंड आकाराची उल्का अतिवेगाने येऊन आदळली; त्यामुळे असो वा हिमयुगांमुळे, प्रलयामुळे अनेकविध कारणांनी पृथ्वीवरच्या जीवसृष्टीचा विनाश झाला आहे. माणसाच्या बेताल वागण्यामुळे हवेचे, पाण्याचे, ध्वनीचे प्रदूषण असो. विविध कारणांनी धूर ओकणाऱ्या उद्योगधंद्यांचे स्तर कित्येक टन कार्बनडाय ऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड ओकणारी स्वयंचलित, पेट्रोल, डिझेलवर चालणारी वाहने असोत. गरज नसताना किंवा माणसांच्या वाढलेल्या गरजांसाठी किंवा विनाकारण होणारी जंगलतोड कित्येक दिवस अथवा महिने पेटलेले किंवा माणसाने पेटवलेले वणवे, अण्वस्त्रांच्या स्फोटांच्या चाचण्या असोत किंवा अंतराळ संशोधनांच्या मोहिमा असोत. या सर्वांमुळे पृथ्वीचे तापमान वेगाने वाढते आहे. या वाढलेल्या तापमानाने वसुंधरेच्या अंगाची लाही लाही होत आहे. परिणामी, पर्वतराजी किंवा पोलर प्रदेशातील बर्फ वितळणे सुरू झाले आहे. अशा सर्व प्रकारच्या तापमानवाढीमुळे वितळलेल्या हिमसाठ्याचे पाणी मोठ्या प्रमाणावर समुद्रात भर टाकत आहे. परिणामी, समुद्राच्या पाण्याची पातळी वाढते आहे. सागर, महासागरांनी आपली लक्ष्मणरेषा ओलांडण्यास केव्हाच सुरुवात केली आहे; त्यामुळे समुद्राकाठचा आणि दूरचा भूभाग पाण्याखाली जाऊ लागला आहे.

निसर्गातील जीवशृंखला अनेक कारणांनी विस्कळीत झाली आहे. वन्यप्राण्यांची शिकार, तस्करी, वृक्षतोड, विविध प्रकारचे प्रदूषण अशा अनेक प्रकारांनी गेल्या काही दशकांत पर्यावरणाची फार मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. विविध विकास प्रकल्पांमुळे स्थानिक जैवविविधता धोक्यात आली आहे. भूभागावरील, पृथ्वीवरील जीवन तसेच समुद्री जीवन अशा विविध कारणांनी संपूर्ण विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहे. खरं तर पर्यावरणवादी बेंबीच्या देठापासून ओरडून या विषयावर बोलत आहेत. हा विनाश टाळण्यासाठी खबरदारी घेण्याविषयी सतत छाती पिटत आहेत; पण लक्षात कोण घेतो? अशा अंधकारमय किंवा विनाशकारी भविष्याचे ज्ञान आणि भान सामान्य माणसाला नसते आणि ते करून घेण्याची मानसिकता, जागरूकता त्यामानाने अत्यंत धीम्या गतीने वाढते आहे. पर्यावरणावर आणि तापमानवाढीवर काम करणाऱ्या संशोधकांच्या मते हा संभाव्य विनाश टाळण्यासाठी फार वेगाने जागृती करण्याची आणि पावले उचलण्याची वेळ बहुधा निघून गेलेली आहे. निदान खूप उशीर नक्कीच झालेला आहे; पण देर आये; दुरुस्त आये । असा विचार करून भविष्यात जरी माणूस सुधारला तरी हे संकट पुढे ढकलले जाऊ शकेल किंवा कदाचित टाळता येईल अशी अंधूक आशा आहे. पृथ्वीवरचे अन्य जीव, वृक्षवेली, इतर पशू-पक्षी पृथ्वीच्या विनाशाला कारणीभूत नसतील. हे महत्पाप फक्त तथाकथित बुद्धिमान मनुष्यप्राणीच करतो आहे. निसर्गातला पर्यावरणाचा असमतोल असो किंवा परस्परावलंबी जीवशृंखला खंडित करणे असो त्याला प्रामुख्याने माणसाचा लोभ, अविचार, अज्ञान किंवा जाणूनबुजून केलेला अत्याचार हेच निश्चितपणे कारणीभूत आहे, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही.

विज्ञानामुळे माणसाच्या जीवनात पुष्कळ चांगल्या गोष्टी घडल्या; पण त्याच विज्ञानाच्या अविचारी वापराने अनेक तऱ्हेचे मोठे नुकसान झाले आहे. माणसाने या वैज्ञानिक शोधांचा सकारात्मक उपयोग अवश्य करावा. त्यातून मिळणाऱ्या सुख-सोयींचाही लाभ घ्यावा; पण लोभ, अति लोभ यांच्या मागे लागून निसर्गाचा समतोल बिघडणार नाही, पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची संपूर्ण दक्षता घेतलीच पाहिजे. आपल्या भावी पिढ्यांची बेगमी करण्याची विचारधारा, सद्बुद्धी म्हणा किंवा दुर्बद्धी ही फक्त बुद्धिमान (?) मानवप्राण्यालाच लाभली आहे. मला आज सर्व सुखसोयी भरपूर प्रमाणावर मिळाल्या पाहिजेत. मग त्याच्या दुष्परिणामांमुळे भावी पिढ्यांच्या अस्तित्वालाच धोका पोहोचत नाही ना एवढा तरी किमान संयम व तारतम्य राखले पाहिजे. निसर्गातील इतर जीव, वनस्पती अथवा प्राणिविश्व वर्षाच्या अडचणीच्या मोसमात उपयोगी पडण्याइतपत बेगमी करतात; पण अनेक वर्षे किंवा अनेक पिढ्यांची सोय करण्याचा खटाटोप करीत नाहीत. माणसाला दूर भविष्यात डोकावण्याची बुद्धी किंवा क्षमता लाभली आहे हे वाईट नाही; पण अनेक वर्षांची किंवा अनेक पिढ्यांची बेगमी करून ठेवण्याच्या हव्यासापोटी इतर माणसे, वन्यप्राणी, जलचर प्राणी किंवा वनस्पतींचे जग यांचे सुख, चैन आपल्या सुखासाठी हिरावून घेण्याचा अधिकार मनुष्यास कोणीही दिलेला नाही. स्वार्थीपणामुळे तो इतर जीवमात्रांचा विचार करीत नाही; पण त्यामुळेच तो स्वतःच्या आणि भावी पिढ्यांच्या मुळावरच घाव घालतो आहे. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ अशी आपल्याकडे म्हण आहे. जुन्या, वठलेल्या वृक्षातून निर्माण झालेला कुऱ्हाडीचा दांडा त्याच्या भावी पिढीतील वृक्षांच्या मुळावर घाव घालतो तसाच आजचा स्वार्थी माणूसही आपल्या भावी पिढीच्या मुळावर कळत-नकळत, उद्देश समजून किंवा या विषयाच्या अज्ञानापोटी घाव घालत आहे किंवा ती भावी पिढी अस्तित्वात येण्यापूर्वीच संपूर्ण सृष्टीचा विनाश करून त्यांना या जगात अस्तित्वात येऊच दिले जाणार नाही, अशी आजची कडेलोटाची



परिस्थिती आहे. ज्या मनुष्याचा देवावर विश्वास आहे, त्याने देवाची शपथ घेऊन किंवा देव नाही; पण निसर्ग ही एक महाशक्ती आहे असे मानणारे वैज्ञानिक विचारधारेचे लोक असोत. सर्वांनीच निसर्ग संवर्धनाची शपथ घेतली पाहिजे आणि ती कसोशीने पाळली पाहिजे तरच काही तरणोपाय सापडू शकेल.

आज २०२० मध्ये स्वतःच्या वैज्ञानिक ज्ञानाच्या आधारे तथाकथित सुख, समाधानात लोळणाऱ्या माणसाचे गर्वहरण करण्यास निसर्गातील सर्वांत सूक्ष्म असा एक विषाणूसुद्धा कसा कारणीभूत होऊ शकतो याची चुणूक दिसून आली आहे. टिंग्या मारणारा माणूस जीवाच्या भीतीने आपल्या घराच्या कोषात दडून बसला आहे. या विषाणूविरुद्ध लस किंवा परिणामकारक औषधांच्या शोधाकडे डोळे लावून आपला जीव मुठीत धरून, भेदरून बसला आहे. हे सर्व पाहिल्यावर वाटते की, निसर्गापुढे माणूस किती खुजा आहे. आपण निसर्गावरही मात करू शकतो हा त्याचा भ्रम किती क्षणभंगुर आहे, किती निरर्थक आहे. तर मंडळी विचार करा. निसर्गाशी स्पर्धा किंवा वैर करू नका. निसर्ग माणसाला त्याच्या गरजांसाठी भरभरून देतो. त्याचा समाधानाने स्वीकार करा; पण आभाळाएवढ्या लोभाच्या मागे धावून संपूर्ण जगाचा आणि स्वतःचा विनाश टाळण्यासाठी वेळीच पावले उचला.

'जगा आणि जगू द्या' हा मंत्र विसरू नका !

**सन २०२०-२१ (AC)**

डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी प्रस्तावनेत चर्चा करताना BC आणि AC यांना आजच्या जागतिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर एक नवा अन्वयार्थ समजावून दिला आहे. त्यांनी BC म्हणजे Before Corona आणि AC ला After Corona असे म्हटले आहे; ते खूपच समर्पक आहे. BC च्या काळाची आताच्या पिढीला पूर्णपणे माहिती आहेच. औद्योगिकीकरण, विज्ञानाची प्रचंड प्रगती, सुख साधनांची रेलचेल, चैनी जीवनशैली. ऐहिक सुख साधनांची रेलचेल आणि जीवघेण्या स्पर्धेमुळे गमावलेले शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य आपण सर्वांनीच अनुभवले आहे. आता 'कोरोना'च्या महामारीने तर आपण सर्वजण भयभीत झालेले आहोत. संकटसमयी देव धावून येतो ही



संकल्पनाही मोडीत निघाली आहे. सर्व देव-धर्मांनी आपली दारे, खिडक्या बंद करून माणसाला वाऱ्यावर सोडून दिले आहे. भयभीत मनुष्य आपल्या कोषात (घरामध्ये) बंदिस्त झाला आहे. त्याचे काही तोटे असले तरी काही फायदेही झाले. घरात असलेल्या माणसांनी शरीरातले अंतर ६-८ फूट राखले तरी सहवासाने परत मना-मनांतील अंतर कमी होण्यास मदत झाली. थोड्याशा शिळोप्याच्या गप्पा, थोडेसे हितगुज, थोडे रुसवे-फुगवे तर क्वचित वादविवाद यांना वेळ मिळाला. पुन्हा एकदा कौटुंबिक एकात्मतेची भावना जागी झाली. सुख-दुःखात वाटेकरी किंवा थोडक्यात सांगायचे तर यंत्र बनलेला मानव पुन्हा मनुष्यपातळीवर एकत्र आला. हे सुख काही औरच असते. त्याचे पैशात मोल करता येणार नाही.

घरकाम म्हणजे फक्त गृहिणीची जबाबदारी असा आपला पूर्वापार पुरुषप्रधान संस्कृतीचा दंडक होता. दिवसभर ढोरमेहनत करूनसुद्धा स्त्रियांच्या कष्टांचे मूल्यमापन तर होत नव्हतेच; पण तिच्या कष्टाला प्रतिष्ठाही नव्हती. याउलट दिवसभर काय काम असते? अशी विचारणा केली जाई आणि वर तुम्हाला काय; दिवसभर घरात बसून तर असता अशी वर्मी झोंबणारी वक्तव्ये ऐकावी लागत होती. आता या लॉकडाउनच्या काळात अगदीच वेळ जात नाही म्हणून नाइलाजाने पुरुषांनी, मुलांनी जेव्हा स्त्रियांचे हाल व कष्ट 'याची देही याची डोळा' पाहिले, तेव्हा लाजे-काजेस्तव का होईना त्यांना घरातील झाडू-पोछा, धुणीभांडी, भाजी, किराणा आणणे, खरेदी आणि अशा थोड्या जबाबदाऱ्या घ्याव्या लागल्या. काहींना थोडी मजा वाटली, काहींना आईचे दूध आठवले; तिने आयुष्यभर किती कष्ट केले असतील याचा अंदाज आला. आता कोरोनानंतरच्या काळातही गृहिणींच्या कष्टांची कदर केली किंवा निदान निंदा केली नाही तरी ती कोरोनाने दिलेली एक देणगी ठरावी. या काळात स्वयंपाक करता येत नसला तरी तो करताना किती व्यवधाने पाळावी लागतात याचेही जवळून दर्शन झाल्यामुळे जेवताना मीठ कमी पडले, तिखट थोडे जास्त झाले असे शेरे मारताना आता पुरुष आणि मुले यांनी संयम बाळगला तर तीसुद्धा जमेची बाजू ठरावी. आपल्या कष्टांची कोणीतरी कदर करते आहे ही बाबही कष्टकऱ्यांना थोडा दिलासा देणारी असते. याउलट येता-जाता प्रतिकूल शेरेबाजी केल्याने आपण त्यांच्या भावनांना ठेच पोहोचवीत आहोत याची तरी जाणीव असावी.

घरात बंदिस्त राहावे लागल्याने शाळा, कॉलेज, परीक्षा यांत बरीच गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. प्रतिकूलता ही नेहमीच नवीन शोधाची किंवा कार्याची जननी असते. या न्यायाने शिक्षक व विद्यार्थी दूर राहून अभ्यासक्रम किंवा परीक्षा चालू राहू शकतात. त्या परीक्षांचा निकालही परीक्षा संपताक्षणीच लागू शकतो. शाळेत येण्या-जाण्याचा वेळ वाचला. मात्र, शारीरिक व्यायामासाठी सांघिक खेळ जे शाळेत होतात त्याला मुकावे लागते. प्रत्येक बालकाच्या निकोप शारीरिक आणि मानसिक विकासासाठी सांघिक खेळांना खूप महत्त्व आहे. खेळांमुळे व्यायामाखेरीज हिरिरीची विजीगिषू वृत्ती वाढते. जिंकण्याचा आनंद मोठा असतोच; पण हरल्यानंतर जिंकणाऱ्याचे अभिनंदन करण्यातही मनाचा मोठेपणा असतो; खिलाडूवृत्ती दिसते. शिवाय पुढच्या वेळी आपण जिंकले पाहिजे म्हणून अधिक प्रयत्न करण्याची ईर्षाही प्रगती साधण्यात पूरक ठरते.

घरातील जी मोठी माणसे नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने बाहेर जात होती. त्यांनाही घरून काम करण्याची संधी मिळाली. त्यांना रोजचा येण्या-जाण्याचा, प्रवासातला वाया जाणारा वेळ सत्कारणी लावणे शक्य झाले. त्या अनुषंगाने होणारा खर्च कमी झाला. रस्त्यावर वाहनांची वर्दळ कमी झाली. पर्यायाने ट्रॅफिक जामच्या समस्या कमी झाल्या. प्रवासामुळे येणारा थकवा कमी झाला. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून त्या प्रत्येक व्यक्तीची कार्यक्षमता वाढली. कामाचा उरक व उत्साह वाढल्याने उद्योजकांनाही दरडोई जास्त चांगले काम, जलद करून मिळाले. अशा तऱ्हेने उद्योगसमूह आणि कामगार दोघांचाही फायदाच झाला. यालाच आपण Win-Win Situation म्हणतो. परिणामी, T.C.S. या भारतातल्या सर्वांत मोठ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीच्या व्यवस्थापनाने कोविडनंतरच्या काळातही ७५ टक्के कर्मचाऱ्यांना घरूनच काम करण्याची सूचना केली; त्यामुळे वेळ वाचणे, प्रवासखर्च वाचणे, कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढणे, वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी होणे हे तर फायदे झालेच! पण भविष्यात बऱ्याच उद्योगांची जागेतील गुंतवणूक, विजेचा खर्च, वाहनांना खर्च कमी झाल्याने त्यांच्या उद्योगाचा नफाही वाढणार आहे. रोज २-३ तास कर्मचाऱ्यांचा प्रवासाचा वाचलेला वेळ ते व्यायाम, करमणूक, वाचन किंवा इतर विधायक कामांसाठी उपयोगी आणू शकतात. त्याचा कर्मचाऱ्यांच्या शारीरिक आरोग्यावर खूप सकारात्मक परिणाम होईल तसेच ते कुटुंबालाही वेळ देऊ शकतील असे या घरून काम (Work from Home) करण्याच्या पद्धतीचे अनेक फायदे आहेत.

मात्र, ज्या उद्योगांमध्ये वस्तूंची निर्मिती होत असेल उदा. वाहन उद्योग तेथे Automation केले तरीही मनुष्यबळही लागणारच. त्याची उणीव काही प्रमाणात A.I. यंत्रमानव भरून काढू शकतील; पण रोजगार निर्मितीवर त्याचा विपरीत परिणाम होणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागेल. सध्या या कोरोनाच्या महामारीविरुद्ध खबरदारी म्हणून जगातील बहुसंख्य देशांना टाळेबंदी लागू करावी लागल्याने उद्योगजगताचे अतोनात आर्थिक नुकसान झाले आहे. या सर्व देशांची आर्थिक घडी पूर्णपणे उद्ध्वस्त झाली आहे. ते नुकसान भरून येऊन आर्थिक घडी पूर्व अवस्थेला येण्यास बराच कालावधी लागेल. शिवाय सध्याची महामारी किती काळ टिकते किंवा परत उलटून येत नाही ना या गोष्टींवरही संपूर्ण जगाच्या आरोग्याचे आणि रोजगाराचे तसेच आर्थिक घडी परत मूळ पदावर येण्याचे गणित अवलंबून राहील.

**ganilgulab@gmail.com**

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित आणि**
**डॉ. अनिल गांधी लिखित 'युद्ध कोरोनाशी' या पुस्तकातून)**

# विज्ञानविश्व

आपल्या साऱ्या जीवनप्रवासाची भिस्त विज्ञानावरच.
या विज्ञानाचा आरसा असणारं विज्ञानविषयक साहित्य
कधी भविष्यातल्या शक्यता सूचित करतं
तर कधी अतर्क्य संदर्भांनी अचंबित करतं
अशाच काही कथा, कविता आणि ललित...


दावणीला बांधलेलं वासरू
हिसडा मारून उधळलंय मनभर
जमीन काळजाची उखडत चाललीय अस्ताव्यस्त
दगडधोंडेखड्डेखडकमाती
धूळच धूळ इथूनतिथं
किनारे डोळ्यांचे  दुखून दुखून सोडून गेलेत दूरवर
नखानं टोकरत चाललेय रिक्कामपण
मेंदू शिणावलाय बेसुमार
काळ चाललाय सुजत
मी सुखरूप पोचलेय कोमात
तू सांग, यंदाच्या वर्षी
तू कशी कोसळणार बये

**-प्रिया जामकर**



# हिरवे रक्त

जोसेफ तुस्कानो



सकाळचे सात वाजले होते. बोरीवलीच्या एस. व्ही. रोडवरील डॉ. जरीवाला पॅथॉलॉजी लॅबसमोर एक-एकजण जमा होत होता. गेटपाशी उभा असलेला पोऱ्या लॅबच्या कपांउंडच्या आत शिरणाऱ्या प्रत्येकाला नंबराचे कूपन वाटत होता. थोड्याच वेळात कामावर येणाऱ्या लॅबच्या सिस्टर्स एकेक करत आल्या. लॅबच्या आत जाऊन त्यांनी आपले युनिफॉर्म परिधान केले. पंधरा मिनिटांत बऱ्यापैकी पेशंट्स गोळा झाले होते.

मग त्या पोऱ्याने नंबर पुकारायला सुरुवात केली. प्रथम क्रमांकाचे कूपन हातात असलेला तो दाढीधारी, गंभीर चेहऱ्याचा तरुण आत गेला. काउंटरवरील स्टाफला आपले नाव सांगून, त्याने आपला पेपर काढून घेतला. त्याला केवळ आपला रक्तगट तपासायचा होता.

नाव : मकरंद

वय : २५ वर्षे

त्याने पेमेंट केले आणि केसपेपर हाती घेऊन, तो तिथल्या मोकळ्या जागेतील खुर्चीवर जाऊन बसला. त्याचं नाव पुकारलं जाताच तो उठून केबिनमध्ये गेला. तिथल्या लांब हाताच्या खुर्चीवर स्थानापन्न झाला. शर्टाची बाही वर करत, त्याने आपला उजवा हात त्या खुर्चीच्या लांब फळीवर टेकवला. थोड्याच वेळात एक तरुण नर्स एका हातात जंतुनाशक स्पिरिटमध्ये भिजवलेला कापसाचा बोळा आणि दुसऱ्या हातात निर्जंतुक केलेल्या सुईचे इंजेक्शन घेऊन केबिनमध्ये शिरली. तिने क्षणभर आपल्या त्या दिवसाच्या पहिल्या पेशंटला न्याहाळले. त्या मनस्वी नजरेच्या, विस्कळीत केस असलेल्या आणि दाढी वाढविलेल्या धडधाकट तरुणाला केवळ रक्तगट तपासून हवा होता, याचं तिला अंमळ आश्चर्य वाटलं. तिने त्याच्या खुर्चीवर टेकवून ठेवलेल्या हाताची मूठ आवळायला सांगितले. तिने त्याच्या मनगटावरची ताठरलेली रक्तवाहिनी हाताने चाचपून बघितली. त्या रक्तवाहिनीवरील कातडीतून हळूच सुई खुपसली. सुळकन उडी मारून त्याचे रक्त त्या इंजेक्शनच्या नळकांडीत आले... तोच त्या रक्ताचा रंग पाहून ती सिस्टर किंचाळली. सुई बाहेर काढण्याचे भान ती विसरून गेली. तिची किंकाळी ऐकताच, तिथला स्टाफ केबिनकडे त्या दोघांच्या दिशेने धावला. काही कळायच्या आत, त्या तरुणाने आपल्या मनगटावरील नसेत घुसलेली सुई बाहेर काढली. तिथल्या टेबलावर ठेवली आणि या गडबडीत तिथून सटकला.

तो समोरच्या एस. व्ही. रोडवर आला तोच त्याला समोरून बेस्ट बस येताना दिसली. तिच्यावर पाटी होती : 'हात दाखवा, बस थांबवा.' डाव्या हाताच्या बोटाने मनगटावर दाबलेला उजवा हात त्याने वर केला. थांबलेल्या बसमध्ये घुसत, खिडकीजवळच्या सीटवर तो स्थानापन्न झाला. अस्वस्थतेची एक लाट त्याच्या शरीरभर सळसळत गेली.

* * *

'ग्रीन-ग्रूप' ही अलीकडेच प्रकाशात आलेली एक संघटना होती. आशिया खंडातील काही नामवंत शास्त्रज्ञांनी ही संघटना स्थापन केली होती. तिचे कार्य काहीसे गुप्त स्वरूपाचे होते. त्या संघटनेचा सभासद होण्यासाठी गुप्त शपथ घ्यावी लागे. संघटनेचा हेतू आणि कार्य सभासदांना समजावून देण्यासाठी गुप्त बैठकांचे आयोजन केले जात होते... आजच्या सभेचे मुख्य आकर्षण डॉ. निसर्गे होते. थोड्याच वेळात ते सभागृहात आले आणि आपल्या जागेवर स्थानापन्न झाले. अपेक्षित सभासद उपस्थित होते. त्यात समाजातील विविध गटांतील सुजाण नागरिक होते. त्या बैठकीत आज महत्त्वाचा निर्णय घेतला जाणार होता आणि त्याची पार्श्वभूमी सभासदांना सांगण्यात येणार होती. डॉ. निसर्गे बोलू लागले,

''मित्र हो,

निसर्गाचा नाश अटळ आहे. हवेतील ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे. वातावरणातील हवा शुद्ध राखण्यासाठी झाडे- झुडपे उरलेली नाहीत. वृक्षवेली या आपल्या हवामानाला शुद्ध ठेवणाऱ्या गाळण्या होत. तुम्ही जाणत असालच की, एका नैसर्गिक चक्राद्वारे आपली हवा सतत शुद्ध होत असते. आपल्या शरीरातील पेशीत मंद ज्वलन होऊन ऊर्जा निर्माण होते. ती आपण शरीरकार्यासाठी वापरतो. त्यासाठी आपण हवेतला ऑक्सिजन श्वासाद्वारे शरीरात घेतो आणि तो रक्ताद्वारे शरीरात पसरतो. पेशीतल्या ज्वलनाने निर्माण होणारा कार्बन डायऑक्साइड वायू रक्ताभिसरणातून फुप्फुसात गोळा होतो. ते कार्य रक्तातील हिमोग्लोबिन हे द्रव्य करत असते. आपण उच्छ्वासातून तो हवेत उत्सर्जित करतो. हे महत्त्वपूर्ण कार्य आपली फुप्फुसे लीलया करत असतात. वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढत नाही; कारण वनस्पतींना आपले अन्न तयार करण्यासाठी हा कार्बनवायू गरजेचा असतो. वनस्पतीसृष्टीत हिरव्या पानांत आणि खोडांत हरितलवके असतात. ती प्रकाश संश्लेषण या जादुई प्रक्रियेद्वारे या कार्बनवायू आणि पाण्यापासून दिवसा सूर्यप्रकाशात अन्ननिर्मिती करतात; पण माणसांनी घरे बांधण्यासाठी भरमसाट वृक्षतोड केली. जंगलेच्या जंगले नष्ट झाली आहेत. साहजिकच, हवेचे शुद्धीकरण थांबले आहे. त्यातच कारखाने आणि वाहतुकीच्या प्रदूषणाने हवा बिघडत आहे. कार्बन डायऑक्साइड हा हरितगृह वायू आहे. तो पृथ्वीचे वातावरण तापवीत आहे; त्यामुळे आम्हा मानवजातीचे अस्तित्व धोक्यात आले आहे...''

डॉ. निसर्गे क्षणभर थांबले. त्यांनी श्रोतृवर्गाकडे नजर टाकली. त्यात तरुण होते, तरुणी होत्या; काही वयस्कर मंडळीदेखील होती. सगळ्यांच्या नजरेत चिंतेचे भाव उमटले होते. या भावी संकटाला तोंड तरी कसे द्यायचे, हा पेच तिथे उपस्थित असलेल्या तरुणाईला पडला होता...

''तेव्हा,'' डॉक्टर पुढे बोलू लागले, ''जगातील कानाकोपऱ्यांतले, विशेषतः विकसनशील देशांतले आम्ही काही संशोधक मित्र एकत्र येऊन ही संघटना स्थापन केली आहे. आमच्यामध्ये जैवतंत्रज्ञान, वैद्यक, रसायन अशा विविध क्षेत्रांतले तज्ज्ञ लोक आहेत. आमच्यातले हे संशोधन मुख्यतः आशियाई देशांतले आहे. त्यात भारतीय व चिनी वैज्ञानिकांचा भरणा आहे. आम्ही सारे एकत्र येऊन खूप खल केला, संशोधन केले. वनस्पतीतील हरितद्रव्य व मानवी शरीरातील रक्तात असलेले हिमोग्लोबिन याचा संकर करून बघितला. त्याद्वारे आम्ही प्रयोगशाळेत 'क्लोरोग्लोबिन' नावाच्या अद्भुत घटकाची निर्मिती केली...''

डॉक्टरांनी पुनश्च एकदा आपल्या श्रोत्यांकडे बघितले. सगळ्यांच्या चेहऱ्यावरून उत्सुकता उतू जात होती. डॉ. निसर्गेंना हायसे वाटले. बिचाऱ्यांची उत्सुकता जास्त ताणली जाऊ नये, म्हणून ते लगेच बोलू लागले,

''आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे क्लोरोग्लोबिन संयुग मानवी रक्ताशी चपखल जमवून घेत असल्याचे शास्त्रोक्त चाचण्यांत आढळून आले आहे. रक्तपेशीतील हिमोग्लोबिनप्रमाणे त्याची वाढदेखील होते, हे विशेष! ते हिमोग्लोबिनप्रमाणे रक्तपेशींना ऑक्सिजन पुरविण्याचे कार्य करते.

श्रोतृवर्गाने टाळ्या वाजवून आपला आनंद व्यक्त केला नि डॉक्टरांचे पुढचे व्याख्यान ते कान टवकारून ऐकू लागले.

''अन् हो! ऑक्सिजन कुठला? केवळ वातावरणातला नव्हे, जो आपण श्वासातून घेत असतो, तर क्लोरोग्लोबिन आपल्या शरीरातदेखील प्रकाश-संश्लेषण क्रिया घडवून आणते. त्यासाठी ते शरीर पेशीतून जमा झालेला कार्बनवायू वापरते आणि ऑक्सिजन मुक्त करते. हाच ऑक्सिजन शरीरपेशींना पुन्हा पुरवला जातो; त्यामुळे आपल्या उच्छ्वासातून क्वचितच कार्बनवायू वातावरणात सोडला जातो; कारण त्यातला बराच अंश क्लोरोग्लोबिनने अन्ननिर्मितीसाठी वापरलेला असतो. त्यातून तयार होणारे कार्बोहायड्रेट अन्न शरीरपेशींना ज्वलनासाठी, तद्वतच ऊर्जानिर्मितीसाठी वापरता येते. या अन्ननिर्मिती प्रक्रियेत जो ऑक्सिजन मुक्त होतो, तो पुन्हा शरीरपेशींना ज्वलनप्रक्रियेसाठी वापरता येतो. अशा प्रकारे, त्रिसूत्री फायद्याचे हे नवे संशोधन आहे आणि त्याआधारे माणसाचे निसर्गावरील परावलंबित्व हळूहळू कमी करता येईल...''

डॉ. निसर्गे बोलायचे थांबले. श्रोते जणू हरखून गेले होते. त्यांच्या चेहऱ्यावर कौतुकमिश्रित आनंद होता.

''पण सर, मानवी शरीरावर हा प्रयोग यशस्वी झाला आहे का?'' प्रेक्षकांतील एका दाढीवाल्या तरुणाने पृच्छा केली.

''होय!'' डॉक्टरांनी त्याच्याकडे पाहत स्मित केलं.

''सरकारी कायदेशीर बंधनानुसार, आमचे हे संशोधन गुप्तपणे चालू आहे. या प्रयोगांची अधिक खात्री करून घेण्यासाठी आम्हाला तूर्तास दहा तरुण-तरुणींची नितांत गरज आहे.''

* * *

त्याच्यावरचा तो गुप्त प्रयोग पूर्ण झाला होता. त्याच्या शरीरातील रक्तातले हिमोग्लोबिन आणि वनस्पतीच्या हिरव्या पानांतले क्लोरोफिल यांचा प्रयोगशाळेत संकर केलेला तो नावीन्यपूर्ण लवकीय घटक त्याच्या रक्तात यशस्वीरीत्या घुसविण्यात आला होता. हळूहळू त्या क्लोरोबिन लवकाची त्याच्या शरीरात वाढ होणार होती. त्याचे लाल रक्त हळूहळू हिरवट रंगाचे बनणार होते.

''कसे वाटते, मि. मकरंद?'' त्याच्यावर तो अभिनव नि अपूर्व प्रयोग करणारे ते चिनी शास्त्रज्ञ म्हणाले.

''ओ.के., सर; पण जरा अस्वस्थ वाटतंय.''

''साहजिकच आहे. काही दिवस असंच वाटणार. तुमच्या शरीरात बदल घडून येतोय ना? अन् कुठलाही बदल शरीर सहजासहजी स्वीकारत नाही, हो ना?''

मकरंदने मान डोलवली. त्या चिनी डॉक्टरांचे म्हणणे त्याला पटले होते. आपण 'ग्रीन-ग्रूप' या गुप्त चळवळीत भाग घेऊन एक खूप मोठी जबाबदारी स्वीकारली आहे याची त्याला जाणीव झाली होती. अखिल मानवजातीच्या भल्यासाठीच त्याने तो निर्णय घेतला होता; परंतु मागच्या बैठकीत एका मुद्द्यावर झालेला खल त्याला निराश करून गेला होता. हिरव्या रक्ताचा रक्तगट शोधून काढण्यात त्यांच्या संशोधकांना यश येत नव्हते. तो काहीसा अस्वस्थ होता.

...

''डॉ. चांग, काही प्रगती?'' प्रयोगशाळेत घुसता घुसता डॉ. निसर्गे यांनी पृच्छा केली.

डॉक्टर चांगनी नकारात्मक मान डोलवली. त्यांच्या चेहऱ्यावरची चिंता स्पष्ट दिसत होती. 'ग्रीन-ग्रूप'चे सर्वेसर्वा म्हणून आपली जबाबदारी ते टाळू शकत नव्हते. क्लोरोग्लोबिनच्या संश्लेषणाचे आणि प्रत्यारोपणाचे संशोधन यशस्वी झाले होते. भारत व चीन या देशांतील लोकसंख्येचा स्फोट, वाढती बेरोजगारी, पर्यावरणाचा ऱ्हास आदी प्रश्नांनी त्रस्त झालेल्या समस्यांना तोंड देता यावे म्हणून ते या वेगळ्या संशोधनाकडे वळले होते. मानवतेच्या कल्याणासाठी, डॉ. निसर्गेसारख्या कडव्या पर्यावरणवादी भारतीय शास्त्रज्ञाची त्यांना साथ मिळाली होती. त्यांच्या गुप्त गटाने खूप मोठा धोका पत्करला होता. तथाकथित नैतिकतेच्या नावाखाली शासकीय अधिकृत परवानगी मिळणार नाही, म्हणून सारी चळवळ गुप्त ठेवण्यात आली होती. काही तरुण त्यांच्या उपक्रमात उत्सुकतेने सहभागी झाले होते. प्रयोग यशस्वी होत होते... पण त्या उत्साहाच्या भरात एका बाबीकडे दुर्लक्ष झाले होते. ती एक महत्त्वाची, संवेदनशील गोष्ट होती. क्लोरोग्लोबिनयुक्त रक्ताचा गट तपासण्याचे तंत्र विकसित करण्याचे राहूनच गेले होते... उद्या आणीबाणी निर्माण झाली, तर आपल्या समूहातील सभासदांसाठी रक्तपुरवठा कसा करायचा... हा गहन प्रश्न डॉ. चांगना सतावत होता. ते आटोकाट प्रयत्न करत होते. रात्र-न्-दिवस प्रयत्नांची पराकाष्ठा करत होते. विविध प्रकारचे प्रयोग करत होते; पण हिरव्या रक्ताचा रक्तगट शोधण्याचे तंत्र त्यांच्या हाती लागत नव्हते. त्यांच्या विमनस्क चेहऱ्याकडे पाहत असलेल्या डॉ. निसर्गेंच्या कपाळावर आठ्या उमटल्या होत्या...

**haiku_joe_123@yahoo.co.in**

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट–नेट, इंजिनीअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ, कोल्हापूर - ४१६०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८.०० (शनिवार बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४
Email : mehtabooksellers@gmail.com

**1000+ Marathi Titles available as e-Book**

on

GET IT ON Google Play

amazon iTunes Connect

eBook

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर -
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि अँड्रॉइड टॅब्लेटवर!

eBooks साठी खालील लिंक्सचा वापर करा

**play.google.com/store/books**
**www.amazon.in**
**books.apple.com/us/book**

Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com

# ह्यूमन राइट्स जिंदाबाद!

डॉ. बाळ फोंडके



‘‘आई, येतो गं?’’ पायात मोजे घालता घालता रवीन्द्र म्हणाला. गळ्यात अडकवायची बॅग त्यानं खुर्चीच्या पाठीला लटकवली होती.

‘‘अरे थांब, तुझाच डबा भरतेय. तो घेऊन जा. काल नेला नाहीस आणि मग दिवसभर उपाशीच राहिलास ना?’’ स्वयंपाकघरातून हातात पोळ्या घेऊन बाहेर डोकावत तिनं रवीन्द्रला सांगितलं.

‘‘घाई कर जरा. कंपनीची बस चुकली तर सगळीच बोंब होईल.’’

‘‘हा बघ, झालाच!’’ डब्याचं झाकण लावतलावतच तिनं लगबगीनं तो रवीन्द्रच्या बॅगेत ठेवला. रवीन्द्रही उठून उभा राहिला. खुर्चीवरची बॅग उचलत तो दाढी करत असलेल्या बाबांना म्हणाला, ‘‘येतो. संध्याकाळी लवकर यायला मिळेल असं वाटतंय.’’

बाबांनी नुसताच हुंकार भरला. आई मात्र ‘जपून जा’ असं म्हणाली. दारापर्यंत त्याला सोडायला आली. दोघांचंही लक्ष त्या वेळी अजून दातही न घासता दिवाणावर पसरलेल्या सुधीन्द्रकडे लागलं होतं. ‘‘आज काय कुठं मोर्चा?’’ असं त्याला विचारावं असं रवीन्द्रच्या मनात आलं; पण त्यापायी उगीचच तोंडातोंडी होईल, आपलाच वेळ बरबाद होईल, सुधीन्द्रवर त्याचा ढिम्म परिणाम होणार नाही, याची त्याला खात्री होती.

घरची परिस्थिती बेताचीच आहे याची रवीन्द्रला लवकरच जाणीव झाली. अशा वेळी मुलं फार लवकर मोठी होतात. रवीन्द्रच्या बाबतीतही तेच झालं. दहावीनंतरच त्यानं पॉलिटेक्निकमध्ये प्रवेश घेतला. मेकॅनिक होण्याचं शिक्षण घेतलं. वास्तविक, दहावीमध्ये त्याला चांगले मार्क्स होते. एखाद्या ख्यातनाम कॉलेजमध्ये सहज प्रवेश मिळाला असता. ते नाही तर इंजिनिअरिंग डिप्लोमाला तर कोणतीच अडचण नव्हती; पण त्या शिक्षणाची फी भरणं बाबांना जमणार नाही, हे त्यांनी न सांगताच रवीन्द्रनं ओळखलं होतं. त्याऐवजी पॉलिटेक्निकचा कोर्स करून लवकर नोकरीला लागता येईल, असा विचार करत त्यानं तो मार्ग पत्करला होता.

रवीन्द्र तसा जात्याच हुशार! त्यामुळे त्या कोर्समध्येही तो चमकला. पहिला आला. नोकरीही चटकन मिळाली. तीही एका चांगल्या कंपनीत.

दाढी आटोपून बाबाही बाहेर आले. सुधीन्द्र अजूनही दिवाणावर लोळत पडला होता. मोबाइलवर कोणाशी तरी चॅटिंग करत होता. न राहवून बाबांनी विचारलंच,

‘‘काय रे, आज कामावर जायचं नाही का?’’

‘‘जाणार ना; पण उशिरा. आज कोर्टावरच मोर्चा न्यायचा आहे. दुपारी बारा वाजता आम्ही सगळे जमणार आहोत आणि मग मिळूनच कोर्टावर चालून जाणार आहोत.’’

‘‘कोर्टावर मोर्चा? अरे तुम्ही कोर्टात केस चालवायला जाता ना?’’

‘‘तसे जातोही; पण बाबा, आजकाल कोर्टंही विचित्र वागायला लागली आहेत. हे बघा ना, त्या चौघांना चक्क फाशीची शिक्षा सुनावली आहे त्यांनी. हे तर जंगली वागणं झालं. कॅपिटल पनिशमेन्टला आमचा मूलभूत विरोध आहे. माणुसकीला काळिमा फासणारं वर्तन आहे ते.’’

‘‘अरे, काय बोलतोस तू? कसली जंगली वृत्ती? कसली माणुसकीला काळिमा फासणारी वृत्ती?’’

‘‘नाही तर काय? ज्यांना तुम्ही फाशी द्यायला निघाला आहात ती काय माणसं नाहीत? त्यांना काही मानवाधिकार आहेत की नाही?’’

‘‘कोणाबद्दल बोलतो आहेस तू?’’

‘‘तुम्ही पेपर वाचता ना रोज, बाबा. मग त्या चौघांना फाशीची शिक्षा सुनावलीय कोर्टानं आणि ती फाशी येत्या नऊ दिवसांत द्यायची आहे. दररोज तर बातम्या येत आहेत.’’

‘‘हं! म्हणजे त्या बिचाऱ्या निरपराध मुलीवर बलात्कार करून ज्यांनी तिचा खून केला त्यांच्यासंबंधीच बोलतो आहेस ना तू?’’

‘तेच ते. ती मुलगी बिचारी आणि ही मुलं, ती बिचारी नाहीत? त्यातला एक तर अल्पवयीन आहे.’’

‘‘अल्पवयीन? बलात्कार करण्याइतकी समज होती ना त्याला. अल्पवयीन कसला? ती मुलगी निरपराध होती. आपल्या वाटेनं जात होती. त्या चौघांनी तिच्यावर जबरदस्ती केली. त्यांनीच तो गुन्हा केलाय याचा सबळ पुरावा मिळाला आहे. त्याच्याच आधारे न्यायालयानं त्यांना फाशीची शिक्षा सुनावली आहे. सुप्रीम कोर्टानंही ती कन्फर्म केलीय. त्यांना सगळे न्यायालयीन मार्ग उपलब्ध करून दिले होते. मनमानी करून काही त्यांना फासावर दिलं जात नाही.’’

‘‘हीच हीच, जंगली मनोवृत्ती आम्ही म्हणतो ती हीच. माणूसपण दाखवा जरा. न्यायालयही याच मानसिकतेला बळी पडतंय. म्हणून तर आम्ही ह्युमन राइट्स असोसिएशनचे लोक त्याविरुद्ध दाद मागतोय. आमच्या मॅडमच त्याच्या सेक्रेटरी आहेत. त्याच आज या मोर्चाचं नेतृत्व करणार आहेत. मला त्यांनी त्यांच्या असोसिएशनच्या कामासाठी निवडलंय, याचा तुम्हाला अभिमान वाटायला हवा, बाबा. पण छ्या...?’’

ताडकन उडी मारत, उठून सुधीन्द्र बाथरूममध्ये पळाला.

स्वयंपाकघरातून आई त्या दोघांचा संवाद ऐकत होती. आता तीही बाहेर आली. बाबांकडे पाहत राहिली.

‘‘मला या पोराचं काही कळतच नाही. एकटा रवी बिचारा सगळा गाडा ओढतोय.’’

‘‘हो ना! त्याला इंजिनिअर नसतं होता आलं? पण स्वतःचं मन मारून त्यानं तो कोर्स केला. का? तर लगेच नोकरी मिळेल. हाती पैसे येतील. स्वतःच्या इच्छा मारून त्यानं घर चालवलंय. या सुधीन्द्रचं सारं शिक्षणही त्यानंच केलं. चांगला वकील झाला.’’

‘‘वाटलं होतं, आता तरी रवीच्या खांद्यावरचं ओझं कमी होईल. सगळा भार एकटाच पेलतोय. आता याचा हातभार लागेल.’’

‘‘पण कसलं काय? खरं तर त्या मॅडम भरुचांच्या हाताखाली काम करायची संधी मिळाली याचा मला आनंदच झाला होता. एक उत्तम वकील म्हणून त्यांचं नाव झालंय सगळीकडे. अगदी सुप्रीम कोर्टातले जजेससुद्धा त्यांचा आदर करतात, असं ऐकलं होतं. सुरुवातीलाच असा चान्स याला मिळाला हे पाहून मला अभिमानच वाटला होता.’’

‘‘पण हा भलत्याच नादाला लागला. त्यांच्या वकिलीत सहभागी होण्याऐवजी त्यांच्या त्या असोसिएशनच्या कामातच रंगून गेला. घरच्या परिस्थितीची जाणीवच नाही. जगाचं भलं करायला निघालेत, घराचं काय?’’

‘‘मानवाधिकार, अखिल मानवजातीचा उद्धार करायला निघालेत.’’

‘‘पण आपलं काय?’’

''आपलं काय? आपण त्यांच्या मानव कॅटेगरीमध्ये बसत नाही ना? सरळ मार्गानं जाणारे मानव नाहीत, वाकड्या वाटेनं चाला, मग येतील हे तुमच्या मदतीला.''

''पण या लष्करच्या भाकऱ्या भाजणं आपल्याला परवडेल का याचा विचार नको का करायला यानं? कमाई काय? ती मॅडम काय तुकडे फेकते तेवढेच. याच्या पॉकेटमनीलाही ते पुरत नाहीत. रवीच बिचारा यालाही पोसतोय. त्याच्या कामावर त्याचे साहेब सगळे खूश आहेत म्हणून बरं. दर वर्षाला त्याला बढती मिळतेय, बऱ्यापैकी बोनस मिळतोय म्हणून चाललंय; पण याला त्याची काही पर्वा आहे का?''

''त्या मॅडमचं ठीक आहे गं! तिची फी तशीच जबरी आहे म्हणतात. गडगंज कमावतेय. शिवाय नवऱ्याचा कसलातरी चांगला बिझनेस आहे म्हणे. फॉरेनला जातो त्याचा माल. तिला ही असली कामं करून परत समाजकार्य केल्याचं पुण्यही पदरी पाडून घेता येतं.''

''आणि ते समाजकार्यही या आपल्या दिवट्यासारख्यांच्या जिवावर.''

''काय होणार आहे कळत नाही. कसं व्हायचं याचं? आणि आपलंही?''

''रवी बिचारा काहीही न बोलता ढोरमेहनत करतोय. लग्नाचाही विचार करायला तयार नाही. परवा विषय काढला होता मी. तर म्हणाला, कोणत्या तोंडानं आणखी एकीला या खाईत आणून घालू. त्याचंही बरोबर होतं. मलाच मेलीला तोंडात मारल्यासारखं झालं.''

''त्याचं बरोबरच आहे. त्याच्या एकट्यावर सगळा बोजा आहे. त्यात आणखी वाढ कशाला करायची! आणि त्या मुलीलाही काही सुख देता येणार नसेल तर तिच्या आयुष्याचीही कशाला वाट लावायची? शहाणपणाचंच बोलतोय तो.''

''पण त्यात त्याचं तारुण्यही वाया चाललंय, त्याचं काय? तिशी उलटली त्याची. वेळेवर सगळ्या गोष्टी व्हायला नकोत का?''

''हे आपल्याला समजतंय, रवीलाही उमजतंय; पण या सुधीन्द्रला ते कोण समजावणार? आणि समजून घ्यायला तो तयार असेल तरची गोष्ट. तो तर त्या वकिलीणबाईच्या पूर्ण कह्यात गेलाय.''

जेवणाचीही शुद्ध राहिली नव्हती त्या दोघांना. कपाळाला हात लावून सुन्नपणे ते तसेच कितीतरी वेळ बसून राहिले होते. पोस्टमननं पत्र देण्यासाठी बेल वाजवली, तेव्हा कुठं ते भानावर आले. पत्रही कसलं. विजेचं बिलच आलं होतं. तेही रवीलाच भरावं लागणार होतं.

संध्याकाळी रवी आल्यावर त्याच्याकडे देता येईल म्हणून बाबांनी ते नीट सापडेल अशा ठिकाणी ठेवलं. रवीला कामावरून घरी यायला तसा वेळच झाला. फ्रेश होऊन जेवायला बसणार तो त्यानं विचारलं,

''बाबा, आपण तिघंच? सुध्या कुठं आहे?''

''सकाळी तुझ्यापाठोपाठ बाहेर पडला, तेव्हापासून त्याचा पत्ताच नाही. कसला तरी मोर्चा आहे असं सांगत होता.''

''अगं, असं काय करतेस? कसला तरी नाही, कोर्टावर मोर्चा नेणार असल्याचं सांगत होता तो.''

''कोर्टावर? तो कशाला?''

''अरे, त्या कोणा गुन्हेगारांना कोर्टानं फाशीची शिक्षा सुनावलीय ना, तिला विरोध करण्यासाठी मोर्चा काढणार होता त्यांचा तो ह्युमन राइट्सवाल्यांचा ग्रुप.''

''पण कोर्ट तर केव्हाच बंद झालं. आता काय करताहेत हे तिथं?''

''गेला असेल त्या टोळक्याबरोबर कुठंतरी उनाडगिरी करायला.''

''कळवलं नाही त्यानं कुठं गेलाय, कधी येणार ते?''

''तो काही सांगतो का काय करतोय ते! आजही काही कारणावरून विषय निघाला म्हणून त्या मोर्च्याचं तरी सांगितलं त्यानं.''

''त्याचा फोन नाही आला?''

''नाही ना. बराच वेळ वाट पाहिली आम्ही.''

''पण तुम्ही त्याला केला होतात का?''

''हो तर. गेले दीड-दोन तास सतत फोन करतोय; पण लागतच नाही. रिंग वाजतेय; पण उचलतच नाही तो. त्याच्या काही मित्रांनाही केला होता; पण तिथंही तेच. काही मित्र भेटले फोनवर; पण त्यांना काहीच माहीत नव्हतं.''

तेवढ्यात टीव्हीवर त्या मोर्च्याचीच बातमी सांगितली जात असल्याचं रवीला दिसलं.

''आई - बाबा, ते पाहा त्या मोर्च्याचीच बातमी सांगताहेत.''

'आज दुपारी साडेबाराच्या सुमारास ह्युमन राइट्स ऑर्गनायझेशनचा मोर्चा हायकोर्टावर गेला होता. त्या चार नराधमांना दिलेल्या फाशीला विरोध करण्यासाठी मोर्च्याचं आयोजन केलं होतं, असं सूत्रांनी सांगितलं. आमचे खास वार्ताहर नीरज दिवेकर तिथं होते. त्यांच्याकडूनच आपण त्याची हकिकत ऐकू या. नीरज, काय झालं आज?'

'तेजश्री, आज आलेल्या मोर्च्याची माहिती पोलिसांना आधीच मिळाली होती. म्हणून त्यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. मोर्च्याला आझाद मैदानातच अडवण्यात आलं. मोर्च्याचं नेतृत्व करणाऱ्या ॲडव्होकेट शिरीन भरुचा यांनी पोलिसांशी आर्ग्युमेन्ट करायला सुरुवात केली. पोलीस शांतपणे त्यांना उत्तरं देत होते; पण त्या मॅडम भलत्याच उत्तेजित झाल्या होत्या. चिडल्या होत्या. ही दडपशाही आहे, आम्ही शांतपणे, सनदशीर मार्गानं विरोध करतो आहोत, असं त्यांचं म्हणणं होतं; पण त्यांनी पोलिसांशी वाद घालायला सुरुवात केल्यावर त्यांच्याबरोबर आलेला तरुण मुला-मुलींचा जमावही बिथरला. त्यांनी पोलिसांना धक्काबुक्की करायला सुरुवात केली. एक-दोन दगडही फेकले गेले. मग पोलिसांचाही नाइलाज होऊन त्यांना सौम्य लाठीहल्ला करावा लागला. त्याबरोबर पळापळ झाली; पण पोलिसांनी मॅडम भरुचांसह काहीजणांना अटक करून ताब्यात घेतलं. भरुचा मॅडमना काही वेळानंतर सोडण्यात आलं; पण इतर मंडळी मात्र अजूनही लॉकअपमध्ये असल्याचं समजतं.'

'त्यांची कधी सुटका होणार यासंबंधी पोलिसांनी काही सांगितलं का?'

'नाही. तिथं आलेल्या डेप्युटी कमिशनर संगीता मालवणकर यांना आम्ही विचारलं; पण त्यांनी काहीही सांगायला नकार दिला. अटक केलेल्या मोर्चेकऱ्यांना घेऊन पोलिसांच्या व्हॅन्सही तातडीनं निघून गेल्या.'

'या अटक केलेल्यांना कुठं ठेवलंय?'

'तेही नक्की माहीत नाही; पण सर्वजण एके ठिकाणी नसावेत. त्यांना

निरनिराळ्या पोलीस स्टेशनमध्ये ठेवलं असावं, असं दिसतंय.'

'दिलेल्या माहितीबद्दल धन्यवाद! नीरज. पश्चिम बंगालच्या किनाऱ्याजवळ...'

रवीनं रिमोटनं टीव्ही बंद केला.

क्षणभर कोणीच काही बोललं नाही. आईनं मात्र पदराचा बोळा तोंडात कोंबून येणारा हुंदका आवरण्याचा प्रयत्न केला.

''आई, आवर स्वतःला. त्याला अटक झालीच असेल असं नाही.''

''पण झाली असली तर? तुरुंगात हालहाल करतात ना?''

''आई, अटकेअटकेमध्येही फरक असतो. यानं कायदेभंग केला असेल; पण त्यानं गुन्हा केलेला नाही. चोरीमारी, खून केलेला नाही. सिव्हिल आणि क्रिमिनल असे खटल्यांचेही दोन वेगवेगळे भाग असतात. याचा अपराध सिव्हिल कॅटेगरीमध्ये मोडणारा धरला जाईल. त्याच्याबरोबर अनेकांना एकाच वेळी अटक झाली असणार.''

''पण त्या बाईंना त्यांनी सोडून दिलं. मग याला का नाही?''

''अगं, ती पुढारी आहे ना. शिवाय स्वतःच वकील आहे; त्यामुळे तिला सोडलं असणार.''

''पण आता रे, रवी. याला कधी आणि कसं सोडवायचं?''

''तू उगीचच काळजी नको करूस. उद्या बहुतेक सोडतील.''

''नाही सोडलं तर?''

''तर मग आपल्याला जामीन मिळवण्याची व्यवस्था करावी लागेल.''

''जामीन?'' बाबांनी एकदम विचारलं. ''पण त्यासाठी वकील लागेल, झालंच तर जामीन म्हणून काही रक्कमही भरावी लागेल. चांगल्या वागणुकीचं काही प्रमाणपत्रही द्यावं लागेल.''

''खरं आहे! ते तर करावंच लागेल. बघू या उद्या. आधी त्याला खरोखरच अटक झालीय का आणि झाली असेल तर तो कुठं आहे हे समजायला हवं. माझा एक मित्र आहे. पत्रकार आहे. त्या टीव्ही वाहिनीत काम करतो. त्याला विचारतो. तो माहिती मिळवू शकेल.''

रवीनं लगेच त्याला फोन लावला. अर्ध्या तासात त्याचा फोन आला परत. त्यानं सुधीन्द्रला अटक झाल्याचं कन्फर्म केलं आणि त्याला किंग्ज सर्कल पोलीस ठाण्यात ठेवलंय, हेही सांगितलं.

''चला, आता उशीर झालाय. जेवून घेऊ या आणि झोपू या. उद्या सकाळी जाऊ या आपण किंग्ज सर्कल ठाण्यात.''

''पण रवी, आधीच आपली अशी ओढग्रस्त. त्यात आता हा पुन्हा खर्च आला. सगळंच बिघडतंय.''

''त्याची का चिंता करतेस. यंदा कंपनीला चांगलाच प्रॉफिट झालाय. तगडा बोनस मिळेल असंच सगळेजण म्हणताहेत.''

''त्याचा तुझ्यासाठीच उपयोग झाला असता. धड चांगले कपडे नाहीत तुझ्याकडे. तो पैसा सगळा या नाठाळ कार्ट्यावर खर्च करावा लागणार.'' वैतागानं आई म्हणाली.

रवी काहीच बोलला नाही. आईचंही बरोबर आहे, हे त्यालाही पटलं होतं.

''पण आपण का खर्च करायचा? त्या बाईंनी यांना पाठवलं होतं ना तिथं दंगामस्ती करायला. मग तिनंच हा खर्च करून का नाही सोडवायचं त्याला. शिवाय वकीलही आहे ना ती? तिनंच याचं वकीलपत्र घ्यायला हवं, खरं तर.''

''नाही. तुझं म्हणणं तसं बरोबरच आहे, निर्मला; पण तो एकटाच आहे का? सोडवायचं तर त्या मॅडमला सगळ्यांनाच सोडवावं लागेल. इतका पैसा नसेल तिच्याकडे.''

''तसा पैसा आहे भरुचा मॅडमकडे. गडगंज संपत्ती आहे. आमच्या कंपनीतही ती डायरेक्टर आहे; कारण मिस्टर जमशेट भरुचा, आमच्या कंपनीचे चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, म्हणजेच मालक. यांचीच बायको आहे ती.''

''आहे ना. मग तिला हा खर्च करायला काय झालं?''

''तुला नाही कळायचं, निर्मला. हे असंच असतं. राजकारणात नेत्यांना कधीच काही तोशीस पडत नसते. त्यांचं कधीच काही नुकसान होत नाही. त्यांच्या इशाऱ्यावर नाचणाऱ्या या तरण्या मुलांचाच शेवटी बळी जातो; पण हे आपल्या पोराला कळत नाही हेच तर आपलं दुर्दैव.''

पण रवीला काही खर्च करावाच लागला नाही. अटक केलेल्या सगळ्यांना तंबी देऊन, दुसऱ्या दिवशी सोडून देण्यात आलं. त्यात सुधीन्द्रचीही सुटका झाली. तो तिथून तडक घरी आला तो ओरडतच.

''आई, भूक लागलीय प्रचंड. खायला दे.''

''मलाच खा आता.'' आई वैतागून म्हणाली.

सुधीन्द्रने चमकून आईकडे बघितलं.

''काय झालंय?''

''तिला काय विचारतोस, काय झालंय ते? पराक्रमच गाजवून आलायस की नाही. तिनं काय आरती ओवाळायला हवी तुला?''

''जाऊ दे ना, बाबा.'' रवीनं सर्वांनाच शांत करण्याचा प्रयत्न केला. ''पकडल्यापासून काही खायला दिलं गेलं नसेल त्याला.''

''तर काय! जवळजवळ चोवीस तास उपाशी आहोत आम्ही सगळे.''

''तुझी ती मॅडम का नाही घेऊन आली सगळ्यांसाठी डबे? किमान पक्षी वडा-पाव तरी?''

''त्यांना काय हेच काम आहे का? शिवाय पोलिसांनाही कळायला नको, आम्ही माणसंच आहोत. आम्हाला माणसांसारखं वागवायला नको. ते काही नाही, मॅडम म्हणतात तसंच व्हायला हवं. या सगळ्यांना काढून टाकून कारभार एआयच्या हातात द्यायला हवा.''

''एआय? हे काय नवीन खूळ?''

''एआय म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स. संगणकीय बुद्धिमत्ता. या माणसांचे, त्या जजेसचे मेंदू सडले आहेत. गंजले आहेत. त्यांच्या जागी अधिक बुद्धिमान असलेल्या कॉम्प्युटरची नियुक्ती केली पाहिजे. न्यायालयीन कारभारासाठी एआय उपयुक्त असल्याचं तर परवा दस्तुरखुद्द सरन्यायाधीशच म्हणाले आहेत. त्यांनाच म्हणावं की, नुसतं बोलत काय बसता, अमलात आणा ना आपला विचार.''

''म्हणजे जज म्हणून त्यांच्या खुर्चीवर चक्क एका कॉम्प्युटरला बसवायचं? तो करेल व्यवस्थित न्यायनिवाडा?'' आश्चर्यानं बाबांनी विचारलं.

''का नाही करणार? कॉम्प्युटर नेहमी तर्कसंगत विचारच करतात. उगीचच भावनांना बळी नाही पडत. शिवाय माणसाच्या जिवाला धोका

पोहोचेल असं काहीही न करण्याचा त्यांचा नियमच आहे. रोबोंच्या वागणुकीचा तो पहिला नियम आहे; त्यामुळे ते कधीच कोणालाही फाशीची शिक्षा सुनावणार नाहीत.''

''पण ते खून करण्यापासून खुन्याला तर आवरू शकणार नाहीत ना?''

''तेही करतील. त्यांच्याकडे पोलीस खात्याची कामगिरी सोपवा. आता तर माणसाच्या मेंदूत कोणकोणते विचार चालू आहेत यांचा मागोवा घेऊ शकणारे रोबो तयार केले गेले आहेत. ते मग ज्याच्या डोक्यात खून करण्याचे विचार घोळत आहेत, ते वाचून त्याला वेळीच त्यापासून थांबवू शकतील. खूनच नाही झाले की, मग ते करणाऱ्याला फाशीचीच काय पण कोणतीच शिक्षा करण्याची गरज उरणार नाही. माणुसकीचीच वागणूक होईल ती; पण आता अशा माणुसकीची अपेक्षा एआयकडूनच करता येईल. उलट माणसानंच माणुसकीला फाटा दिलाय.''

''पर्व... '' काहीतरी विचारण्यासाठी रवीन्द्रनं तोंड उघडलं; पण मग विचार बदलून तो उठला.

''आई, मी निघतो. नाहीतर मला कामावर जायला उशीर होईल. आज आमच्या कंपनीच्या बोर्डाची मीटिंग आहे. बहुतेक बोनसचा डिसिजन घेतला जाईल, असंच सगळे म्हणताहेत. बघू या. कदाचित संध्याकाळपर्यंत ते कळेलही.''

पण संध्याकाळी रवी आला तो तणतणतच!

''कुठं आहे सुध्या? तो आणि त्याचे ह्युमन राइट्स? तो आणि त्याचं एआय?''

''अरे, झालं काय?'' आई-बाबांनी एकसाथ विचारलं. रवी असा भडकलेला त्यांनी कधीच पाहिला नव्हता. तो विनाकारण डोक्यात राख घालून घेणार नाही याची त्यांना खात्री होती. म्हणूनच तेही आश्चर्यचकित झाले.

''सुध्या कुठं आहे? त्याने याचा जाब द्यायलाच हवा.''

त्या आरडाओरड्यानं आत झोपलेला सुधीन्द्रही बाहेर आला.

''तू, तू...?'' त्याच्याकडे बोट दाखवत तावातावानं रवी म्हणाला. राग अनावर होऊन त्याच्या तोंडून शब्दच फुटत नव्हता.

''तुझी ती भरुचा मॅडम, तिनंच तुझ्या डोक्यात ते एआयचं खूळ भरवलं ना?''

''खूळ काय म्हणतोस? माणुसकी विसरत चाललेल्या या जगाला ताळ्यावर आणण्याचा सर्वांत चांगला उपाय आहे तो.''

''डोंबलाचा उपाय! काय केलंय तुझ्या या, या मॅडमनं माहिती आहे?''

''काय केलं? काल मॅडमनी मोर्च्यानंतर घेतलेल्या सभेत ज्युडिशिअरीमध्ये एआय आणण्याची मागणी केली सरकारकडे. ह्युमन राइट्सचं उल्लंघन होणार नाही यासाठी.''

''पण आज तिनंच ह्युमन राइट्सचं उल्लंघन केलंय. आज आमच्या बोर्डाची मीटिंग होती. तिथं तिनं सगळ्यांना भुरळ पाडली एआयची आणि कंपनीत त्याची तातडीनं अंमलबजावणी करण्याचा निर्णय घ्यायला लावला.''

''ब्राव्हो! ग्रेट! मॅडम आहेतच धाडसी!''

''कोणाच्या जीवावर? तुझ्या-माझ्याच ना? कंपनीत एआय आणणार म्हणजे काय माहीत आहे बाबा? आम्हा सगळ्यांना डच्चू देऊन आमच्या जागी रोबो कामगार आणण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजे त्यांना पगार द्यायला नको. पगार नाही; त्यामुळे पगारवाढही नाही, ओव्हरटाइम नाही, प्रॉव्हिडंट फंड नाही, बोनस नाही, मेडिकल फॅसिलिटी नाही, लीव्ह नाही. काहीच नाही. कोणताच खर्च नाही. मग काय? किमती कमी ठेवता येणार असल्यामुळे विक्रीही जबरदस्त! तीही सगळी एआयच्या माध्यमातून ऑनलाइन. म्हणजे, मार्केटिंग स्टाफ नको, सेल्स स्टाफ नको. कोणताच नको. सगळा प्रॉफिटच प्रॉफिट! कंपनीची भरभराट. म्हणून तर बोर्डानं ताबडतोब मान्य केला तो प्रस्ताव. आता फक्त ते रोबो येईपर्यंतच आमचे जॉब टिकून राहतील. त्यानंतर मालकांशिवाय कंपनीत माणूस म्हणून उरणार नाही. सध्या जी माणसं आहेत, त्यांच्या अधिकारांबद्दल कोण बोलणार, सुधीन्द्र? आता काय करणार आहे तुमचं ह्युमन राइट्स ऑर्गनायझेशन? सांग. मीच सांगतो. हातावर हात बांधून स्वस्थच बसणार आहे. सरकारविरुद्ध मोर्चे काढणं सोपं असतं रे! पण आपल्याच चेअरमनविरुद्ध मोर्चा काढण्याची, त्यांना माणुसकीची जाणीव करून देण्याची तुम्हा कोणामध्ये हिंमतच नाही. तुम्ही फक्त आमच्यासारख्या गोरगरिबांनाच ह्युमन राइट्स शिकवा. माणुसकीचे धडे द्या. बलात्काराला बळी पडून जीव गमावलेल्या त्या निष्पाप मुलीचे ह्युमन राइट्स तुम्हाला दिसत नाहीत. दिसतात ते फक्त माणुसकीला काळिमा फासणाऱ्या गुन्हेगारांचे, म्हणूनच आताही तुम्हाला आम्हा राबराब राबणाऱ्या कामगारांचे ह्यूमन राइट्स दिसणार नाहीत. दिसतील ते त्या माणुसकीला धुत्कारून लावणाऱ्या तुमच्या मॅडमचे.''

दमल्यासारखा, अंगातलं त्राण गेल्यासारखा रवीन्द्र दिवाणावर कोसळला. आई-बाबा धावत त्याला सावरायला आले. सुधीन्द्र दिङमूढ होत, त्याच्याकडे पाहत चूपचाप उभा राहिला.

**balphondke@gmail.com**



टाक्यातून झिरपे ऊब...
जशी हुबेहूब आईची माया...
मूर्तिमंत सुखाचा सूर...
आळवते 'लडिवाळ सुधा'...



सुधा मूर्ती



तीन हजार टाके | सर्पाचा सूड | गरुडजन्माची कथा | त्रिशंकू | कल्पवृक्षाची कन्या | गोष्टी माणसांच्या | वाइज अँड अदरवाइज




बकुळा | महाश्वेता | डॉलर बहू | सामान्यांतले असामान्य | परीघ | अस्तित्व | पुण्यभूमी भारत



हरवलेल्या मंदिराचे रहस्य | आजीच्या पोतडीतल्या गोष्टी | सुकेशिनी | थैलीभर गोष्टी | स्वर्गाच्या वाटेवर काहीतरी घडलं... | पितृऋण | आयुष्याचे धडे गिरवताना

# प्राचीन विज्ञान

लीना दामले



परवा छोट्या दोस्त मंडळींना खगोलशास्त्रातल्या गमतीजमती सांगत होते. सूर्यमालेत सगळ्यात मोठा असतो सूर्य; पण तो फक्त आपल्यासाठी. पुढे मी सांगणार होते की, आकाशात जे तारे दिसतात ते म्हणजे सूर्यच आहेत; तेवढ्यात सहा वर्षांचा नील एकदम म्हणाला, ''अवकाशात खूप सूर्य आहेत, हो ना?'' मला त्याच्या बोलण्याची खूप गंमत वाटली आणि कौतुकही! आताच्या छोट्या छोट्या मुलांनाही हे माहीत आहे; पण गंमत बघा, अगदी काही वर्षांपूर्वी जेव्हा खगोलशास्त्रात एवढी प्रगती झालेली नव्हती, तेव्हा कोणी म्हटले असते की, विश्वात अनेक सूर्य आहेत, असे आपल्या पुराणात सांगितले आहे, तर त्या सांगणाऱ्याची यथेच्छ टिंगल केली गेली असती. तुमच्या पुराणातली वानगी (वांगी नव्हे) पुराणातच ठेवा, काय हा वेड्यासारखा बोलतोय, अशी त्याची संभावना झाली असती; पण आता अशाच अनेक गोष्टी पुराव्याने सिद्ध झाल्या आहेत. उदाहरणार्थ, विश्वामध्ये असंख्य सूर्य आहेत, हीच गोष्ट घ्या किंवा अनंत कोटी ब्रह्मांडे असू शकतात ही घ्या. अनंत कोटी ब्रह्मांडे ही संकल्पनाही आपल्या पुराणातलीच आहे जी शब्दशः खरी ठरली आहे. त्यासाठी आपल्या सर्वच प्राचीन वाङ्मयाचा सखोल अभ्यास व्हायला हवा असे मला वाटते.

ज्ञानेश्वरी वाचताना अकराव्या अध्यायातील काही ओव्या वाचून मला आश्चर्याचा धक्का बसला. त्यातल्या काही ओव्या आणि आधुनिक विज्ञान यातील साम्य बघून मी थक्क झाले. त्यातील काही भाग बघा,

**११वा अध्याय - ज्ञानेश्वरी आणि आधुनिक विज्ञान**

*जेथ उन्मीलन होत आहे दिठी ।*
*तेथ पसरती आदित्यांचिया सृष्टी ।। १४१ ।।*

ज्ञानेश्वरीतील अर्थ : ज्या ठिकाणी विश्वरूप भगवंताची दृष्टी उघडते, त्या ठिकाणी सूर्यांच्या सृष्टी पसरतात.

याचा astronomical अर्थ काढायचा झाला तर मला वाटते... आपल्याच आकाशगंगेत असे अनेक तारे सापडले आहेत, ज्यांच्याभोवती ग्रहमाला आहेत. आजच्या घडीलाच जवळजवळ तीन हजारच्या जवळपास असे तारे माहिती आहेत. त्या ग्रहमाला आणि तारे म्हणजे अनेक सूर्यांच्या सृष्टीच म्हणाव्या लागतील आणि अशा असंख्य दीर्घिकांत असंख्य सूर्यांभोवतीच्या ग्रहमाला असतील. श्रीकृष्णाला हेच दाखवायचे असेल का?

*इया मूर्तीचिया किरीटी । रोगमूळी देखे पां सृष्टी ।*
*सुरतरु तळवटी । तृणांकुर जैसे ।।१४८।।*

ज्ञानेश्वरीतील अर्थ : अर्जुना, ज्याप्रमाणे कल्पतरुच्या बुडाशी गवताचे शेकडो अंकुर असतात, त्याप्रमाणे या विश्वमूर्तीच्या प्रत्येक केसाच्या बुडाशी सृष्टी पाहा.

येथे शेकडो अंकुर असतात असे म्हटले आहे, त्याप्रमाणे खरोखरच विश्वात शेकडो तारे, शेकडो दीर्घिका आणि शेकडो दीर्घिका गट आहेत, असे आधुनिक संशोधन सांगते. सृष्टी म्हणजे दुसरे काय असू शकते?

*आणि वाताचेनि प्रकाशे । उडतां परमाणू दिसती जैसे ।*
*भ्रमत ब्रह्मकटाह तैसे । अवयव संधी ।।१४९।।*

ज्ञानेश्वरीतील अर्थ : आणि ज्याप्रमाणे वाऱ्याने उडणारे परमाणू प्रकाशात दिसतात, त्याप्रमाणे विश्वरूपाच्या सांध्यात अनेक ब्रह्मांडे वर-खाली जाताना दिसतात. हे अगदी शब्दशः खरे आहे. Laniakea या नावाचे असंख्य दीर्घिकांचे जाळे आहे, ज्यात अनेक दीर्घिका एकमेकींशी filamentsनी जोडलेल्या आहेत, असे शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे आणि या दीर्घिकाही स्थिर नाहीत. १४९व्या ओवीमध्ये जे म्हटले आहे, त्याच्याशी याचे साधर्म्य जाणवते.

*एथ एकैकाचिया प्रदेशीं । विश्व देख विस्तारेशीं ।*
*आणि विश्वाही परौते मानसीं । जरी देखावे वर्ते ।।१५०।।*

ज्ञा. अर्थ : या विश्वरूपाच्या एकेका भागावर तू संपूर्ण विस्तारासह विश्व पाहा आणि तुझ्या मनाला जर विश्वाच्याही पलीकडे पाहावे असे वाटत असेल, तर त्याविषयीही येथे मुळीच अडचण नाही.

इथे विश्वापलीकडेही अनंत विश्वे आहेत, हे आधुनिक विज्ञानालाही मान्य आहे. ते कुठवर पसरले आहे, हेच माहिती नाही.

*म्हणे केवढें गगन एथ होतें । तें कवणें नेले पां केउतें ।*
*ती चराचरें महाभूतें । काय जाहली ।।१८८।।*

ज्ञा. अर्थ : अर्जुन म्हणाला, येथे एवढे मोठे आकाश होते, ते कोण कोठे घेऊन गेला? ते स्थावरजंगम पदार्थ आणि महाभूते कोठे गेली?

एखादा अंतराळवीर जेव्हा पृथ्वी सोडून अवकाशात जातो, तेव्हा पृथ्वीचे वातावरण जेथे संपते तिथे गेल्यावर वरचे आकाश नाहीसे झाले असे वाटणे अगदी स्वाभाविक आहे. अर्जुनालाही विश्वरूप बघण्यासाठी पृथ्वीचे कवच भेदून पलीकडे बघताना असे म्हणावेसे वाटले असेल.

*दिशांचे ठावही हारपले । अधोर्ध्व काय नेणो जाहले ।*
*चेइलिया स्वप्न तैसे गेले । लोकाकार ।।१८९।।*

ज्ञा. अर्थ : पूर्वादिक दिशांचा मागमूसही राहिला नाही. वर-खाली हे कोण जाणे कोठे गेले? जागे झाल्यावर ज्याप्रमाणे स्वप्न नाहीसे होते, त्याप्रमाणे सृष्टीचा आकारही नाहीसा झाला.

दिशांचा मागमूसही उरला नाही, ही गोष्ट आपल्याला पृथ्वीवर बसून पटणारच नाही; पण अंतराळात गेल्यावर मात्र हे तंतोतंत पटेल. हे एक मोठ्ठे शास्त्रीय सत्य आहे.

*नाना सूर्यतेजप्रतापें । सचंद्र तारांगण जैसें लोपे ।*
*तैसी गिळिली विश्वरुपे । प्रपंचरचना ।।१९०।।*

ज्ञा. अर्थ : अथवा सूर्याच्या तेजाच्या सामर्थ्याने चंद्रासह सर्व नक्षत्रांचा समुदाय लोपून जातो, त्याप्रमाणे या विश्वरूपाने ही सृष्टीची रचना गिळून टाकली.

हे म्हणणेही सयुक्तिकच आहे. दिवसा सूर्यप्रकाशात सर्व नक्षत्रे दिसेनाशी होतात, म्हणजे जणू सूर्याने त्यांना गिळून टाकले आहे असे म्हणता येते. तसेच इथे सृष्टी म्हणजे आपली पृथ्वी धरली तर विश्वाच्या अफाट पसाऱ्यात ती कुठेच्या कुठे नाहीशी होईल यात काही आश्चर्य नाही.

*तयांही माजी एकैकें । सवियाची भयानकें ।*
*काळरात्रीची कटकें । उठावली जैसी ।।१९१।।*

ज्ञा. अर्थ : त्यातदेखील कित्येक मुखे जणू काय प्रलयरात्रीच्या सैन्याने उठाव केला आहे, अशी सहजच भयंकर होती.

*कीं यें मृत्युसिचि मुखे जाहली । हो कां जे भयाची दुर्गे*
*पन्नासिली ।*

*कीं महाकुंडे उघडली । प्रळयानळाची ॥२००॥*

ज्ञा. अर्थ : किंवा ही मृत्यूलाच तोंडे उत्पन्न झाली आहेत अथवा जणू काय भयाचे किल्लेच रचलेले आहेत अथवा प्रलयाग्नीची महाकुंडेच उघडलेली आहेत.

अवकाशात मुक्त संचार करण्याची संधी मिळाल्यावर अर्जुनाला जे जे दिसले ते भयंकर वाटणे स्वाभाविक आहे. शिवाय अवकाशात संचार करायचा तर प्रचंड वेगाला पर्याय नाही. 'Gravity' किंवा 'Interstellar' सारखे चित्रपट पाहताना हे लक्षात येते. पृथ्वीच्या वातावरणाबाहेर; पण तिच्या भोवतीच्या कक्षेत फिरताना तो वेग, त्या यानावर येऊन आदळू पाहणारे ते अवकाशातील छोटे तुकडे या सगळ्याची कल्पनेनेच प्रचंड भीती वाटते. अधांतरी असण्याची आणि अवकाशात भरकटण्याची जबरदस्त भीती असते. शिवाय अतिदूर अंतराळात मोठे तारे, मोठ्या दीर्घिका किंवा कृष्णविवरे बघण्याची संधी मिळाली तर प्रत्यक्षात कराल अशी मृत्यूची मुखे बघितल्यासारखेच आहे; कारण यातील प्रत्येकाच्या प्रचंड गुरुत्वाकर्षण शक्तीमुळे कुठलीही वस्तू केव्हा त्यात खेचली जाईल ते कळणारही नाही. ही सर्व मृत्यूची कराल मुखेच आहेत, नाही का?

*दिवी सूर्यसहस्रस्य । भवेद युगपदुत्थिता ।*
*यदि भाः सदृशी सा । स्याद भासस्तस्य महात्मनः ॥१२॥*

(पहिल्या nuclear टेस्टच्या वेळी स्फोटानंतर निर्माण झालेले तेज बघून Robert Openhammer यांना हाच श्लोक आठवला होता. शिवाय याच अध्यायातील ३२वा श्लोक त्या वेळी त्यांना आठवला होता, असे त्यांनी स्वतः नमूद केले आहे.)

ज्ञा. अर्थ : आकाशामध्ये सहस्रावधी सूर्यांची प्रभा जर एकदम उत्पन्न झाली तर, ती (काहीशी) त्या महात्म्या (श्रीहरीच्या) प्रभेसारखी होईल. श्रीकृष्णाच्या अंगकांतीची अथवा तेजाची अपूर्वता कशासारखी होती म्हणून सांगावे? तर प्रलयकाळी बारा सूर्यांचा जो एकच मिलाफ होतो, तसेच ते हजारो दिव्य सूर्य एकाच वेळी उगवले तरी त्याची तुलना श्रीकृष्णाच्या तेजाशी होणार नाही.

आता इथे प्रलयकाळीचा सूर्य कसा असेल ते आधी पाहू : प्रलयकाल येणार तो पृथ्वीवरच, अन्य कुठेही नाही. शिवाय सूर्याच्या आयुष्यातला प्रलयकाल म्हणायचा झाला तर त्याच्यातील इंधन संपल्यानंतर जेव्हा तो प्रसरण पावेल, लाल राक्षसी स्थितीत येईल, मोठा होईल, त्या स्थितीत तो किती तेजस्वी होईल ती स्थिती. पृथ्वीवरून त्याचे तेज बघणे अशक्य होईल, कारण त्याचा पृष्ठभाग प्रसरण पावून पृथ्वीच्या जवळ येईल; पण सूर्य नेहमीसारखा प्रकाशात असताना १२ सूर्य हा उल्लेख नेहमी येतो. इथे रामदास स्वामींनी दासबोधाच्या १३व्या दशकात चौथा समास पूर्ण प्रलय निरुपण केले आहे.

*तेथे अक्रा रुद्र खवळले । बारा सूर्य कडकडिले ॥*
*पावकमात्र येकवटले । प्रलयेकाळी ॥७॥*

त्यावर मला असे म्हणावेसे वाटते की, १२ सूर्य म्हणजे सूर्याचीच १२ तऱ्हेची किरणे त्यातून बाहेर पडतात, ती तर नव्हेत? Electromagnetic स्पेक्ट्रम बघितला तर त्यात गॅमा किरण, एक्स-रे, अतिनील, दृश्य प्रकाशातील सात रंगांच्या सात वेगवेगळ्या तरंगलांबी, अवरक्त किरण आणि रेडिओ किरण असे १२ वेगवेगळे किरणांचे प्रकार होतात. हेच १२ सूर्य समजायचे का? आणि असे हजारो सूर्य एकत्र उगवले तरी त्याची बरोबरी भगवंताच्या तेजाशी होणार नाही, हे खरेच आहे; कारण या ब्रह्मांडात हजारो नव्हे तर अब्जावधी सूर्य आहेत, अब्जावधी आकाशगंगा आहेत.

पुन्हा अकराव्या अध्यायाकडे वळू या.

*लेलिह्यासे ग्रसमानः । समन्ता लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ।*
*तेजोभिरापूर्य जगत्समग्रं । भासस्तवोग्राः प्रतपन्ति विष्णो ॥३०॥*

ज्ञा. अर्थ : विश्वरूपाच्या अक्राळविक्राळ रूपाचे वर्णन यात आले आहे. कितीही गिळंकृत केले तरी याचे पोट भरत नाही. हीच गोष्ट एखाद्या दीर्घिकेला किंवा कृष्णविवराला लागू होते. त्यांच्या पोटात कितीही घातले तरी ते अजून खायला तयार असतात. मोठ्या दीर्घिका छोट्या दीर्घिकेला खातात, तर छोट्या दीर्घिका ताऱ्यांना गिळंकृत करतात आणि विश्वरूपाला तर असंख्य मुखे आहेत, असे वर्णन केले आहे. तसेच या विश्वात आ वासून बसलेले असंख्य तारे, दीर्घिका आणि कृष्णविवरे आहेत. तीच विश्वरूपाची खरी खरी अक्राळविक्राळ मुखे.

ही अशी साम्यस्थळे बघून चकित व्हायला होते.

*एथचीही दिठी करपत । सूर्य खद्योतु तैसे हारपत ॥*
*ऐसे तीव्रपण अद्भुत । तेजाचे यया ॥३००॥*

ज्ञा. अर्थ : येथे (विश्वरूपाच्या तेजात) दृष्टी करपून जाते आणि सूर्य काजव्यांसारखे या तेजात मावळून जातात. तसेच विश्वाच्या या अफाट पसाऱ्यात असंख्य ताऱ्यांच्या, दीर्घिकांच्या आणि तेजोमेघांच्या पुढे आपला एक सूर्य काजव्यांसारखाच म्हणावा लागेल. जणू या महातेजाच्या महासमुद्रात सृष्टी बुडून जाते.

*जळतया गिरीचिया गवखा । माजी घापती पतंगाचिया झाका ॥*
*तैसे समग्र लोक देखा । इये वदनी पडती ॥४२५॥*

ज्ञा. अर्थ : पेट घेतलेल्या डोंगराच्या दरीमध्ये ज्याप्रमाणे पतंगाचे समुदाय उड्या घालतात, त्याप्रमाणे पाहा, हे सर्व लोक त्या तोंडामध्ये येऊन पडत आहेत.

हे वर्णन तर तंतोतंत एखाद्या कृष्णविवराला लागू पडावे. पेटत्या मुखात म्हणजे कृष्णविवराच्या मुखात त्याच्याभोवती अतिवेगाने फिरणारे तारे आणि जे काही असेल ते स्वाहा होत असते तसे.

*परि जेतुले येथ प्रवेशले ।*
*ते तातलिया लोहे पाणीचि पा गिळिले ॥*
*वहिवटीहि पुसिले । नामरुप तयांचे ॥४२६॥*

ज्ञा. अर्थ : ते कृष्णविवर म्हणजे जणू तापलेले लोखंड आणि तापलेल्या लोखंडावर पाणी टाकले तर ते जसे क्षणात शोषले जाते तसाच तर कृष्णविवरात पदार्थ शोषला जातो.

*आणि येतुलाही आरोगण । करीता भुके नाही उणेपण ॥*
*कैसे दीपन असाधारण । उदयले यया ॥४२७॥*

ज्ञा. अर्थ : आणि इतकेही खात असताना भूक काहीच कमी होत नाही. याच्या जठराग्नीला कितीतरी विशेष प्रखरता आली आहे. हेही कृष्णविवराच्या बाबतीत खरेच आहे. त्यात कितीही पदार्थ पडला तरी तो शोषला जातोच.

समर्थ रामदास स्वामींनी सृष्टीच्या उत्पत्ती आणि लयाबद्दल जे वर्णन दशक १३, समास ३ व ४ मध्ये केले आहे ते वाचताना त्यांना आधुनिक विज्ञानाचे सखोल ज्ञान होते की काय असे म्हणावेसे वाटते. ते वर्णन वाचून तोंडात बोटे घालण्याची वेळ येते.

तसेच दशक १५, समास ८ मध्ये सूक्ष्म जीवांबद्दल लिहिले आहे.

*रेणूहून सूक्ष्म किडे । त्यांचे आयुष्य निपटची थोडे ॥*
*युक्ती बुद्धी तेणेचि पाडे । त्यामध्ये ॥१॥*

त्या काळी सूक्ष्मदर्शक यंत्र नक्कीच नव्हते. मग स्वामींनी इतके तंतोतंत बरोबर कसे लिहिले असेल? जे लिहिलंय ते पूर्ण शास्त्रीय सत्य आहे, यात काही शंका नाही. आजच्या काळात ज्या गोष्टी सूक्ष्मदर्शकाशिवाय दिसणार नाहीत, त्यांच्याबद्दल आपल्याला काही कळू शकत नाही, ते त्या काळी समर्थांनी कसे जाणले?

ते म्हणतात, धुळीच्या कणाहूनही अगदी लहान असे सूक्ष्म किडे आहेत. जसा त्यांचा आकार लहान तसे त्यांचे आयुष्यही अत्यंत छोटे. ते किडे इतके लहान असतात की, त्यांना मुंगीदेखील प्रचंड मोठी वाटावी, जणू काही एखादा हत्ती चालला आहे असे वाटावे. आजच्या काळात आपल्याला याचे काही नवल वाटणार नाही; कारण आपल्याला माहिती आहे की, सूक्ष्म किटाणू, जिवाणू यांच्यामुळे असंख्य रोग होतात किंवा त्यातले काही आपल्याला उपयुक्तही असतात.

*अनुरेणाऐसे जिनस । त्यांचे आम्ही विराट पुरुष ॥*
*आमचे उदंडची आयुष्य । त्यांच्या हिसेबे ॥३१॥*

अणूरेणूसारखे जे अतिशय लहान पदार्थ आहेत, त्यांच्या दृष्टीने आपण माणसे म्हणजे जणू विश्वाएवढे विराट पुरुष. त्यांच्या हिशेबाने आपले आयुष्यदेखील अतिशय दीर्घ. या ठिकाणी समर्थांच्या ज्ञानाबद्दल आपण पामर काय बोलणार? आत्ताच्या अत्याधुनिक पार्टिकल ॲक्सिलरेटरमध्ये दिसणारे; पण खरेतर अत्यंत अल्प आयुष्यामुळे न दिसणारे कण यापेक्षा काय वेगळे आहेत?

या वेगवेगळ्या उदाहरणांवरून असे लक्षात येईल की, सहजच बघायला गेलं तर इतक्या गोष्टी आपल्या प्राचीन ग्रंथांत सापडतात. सखोल अभ्यास केला तर किती रहस्ये उकलतील कोण जाणे! आपल्या पूर्वजांना सांकेतिक भाषेत लिहायची सवय होती. संस्कृत भाषेच्या आणि विज्ञानाच्या जाणकार मंडळींनी एकत्रितपणे यावर संशोधन करावे अशी त्यांना विनंती कराविशी वाटते. कदाचित काही ठिकाणी असे संशोधन चालू असेलही. Openhammerसारख्या शास्त्रज्ञाला अणुस्फोटानंतरचा प्रकाश बघून गीतेतल्या अकराव्या अध्यायातील श्लोक आठवतो? असंख्य परदेशी लोक संस्कृत शिकून घेऊन आपल्या वेद, उपनिषदांचा अभ्यास करताहेत. आपण मात्र आपल्या हातातल्या हिऱ्याला पारखण्यात कमी पडतोय का?

**lee.dams@gmail.com**



# वासांसि जीर्णानि यथा विहाय (पुनर्जन्म)

शशिकांत काळे



'सदानंद यास,

आज दुपारी ४ वाजता माझ्या ब्लॉकवर येऊन भेट.'

- विवेक.

बस! एवढी एकाच ओळीची चिठ्ठी मला विवेककडून मिळाली होती. महिन्यापूर्वी विवेक जसा अकस्मात नाहीसा झाला होता, तसाच तो परत आलेला कळत होतं. खरं म्हणजे हे त्याला फोनवरसुद्धा सांगता आलं असतं आणि जर तो फोनवर बोलला असता तर हातातलं काम टाकूनसुद्धा मी त्याची खबरबात घ्यायला गेलो असतो; पण त्याने औपचारिकपणे चिठ्ठी पाठवली होती आणि मला ४ वाजता भेटायला बोलावले होते. म्हणून मीपण ४ वाजण्यापूर्वी न जाण्याचं ठरवलं होतं; पण सुलभाला बातमी सांगाविशी वाटली म्हणून तिला फोन केला. तिलाही तशीच एका ओळीची चिठ्ठी मिळाली होती. म्हणून तीदेखील विचारात पडली होती. शेवटी चिठ्ठीत लिहिल्याप्रमाणे दोघांनी ४ वाजता विवेककडे जायचं ठरवलं.

विवेक असा अचानक का नाहीसा झाला, याबद्दल आमची खूप चर्चा व अंदाज करून झाले होते. २५ वर्षांचा विवेक देखणा होता. तो आणि सुलभा एकत्र हिंडतफिरत होते. सुलभा बी.ए. झाल्यावर त्यांचा लग्न करायचा विचार होता. विवेक एकटा, सडाफटिंग राहणारा. त्याला आगापिछा म्हणजे कोणीच नातेवाईक नव्हते. त्याचा खर्च मुंबईतील एका सॉलिसिटर फर्ममार्फत होत होता. त्याच्या खात्यात नियमितपणे ठरावीक रक्कम जमा होत होती. ती त्याला पुरेशी ठरत होती. आकस्मिक कारणांसाठी जास्त रक्कम लागली तरी ती गरज भागवली जात होती. नाही म्हणायला जेव्हा हॉस्टेलमध्ये त्याचं नाव घालायचं ठरलं, तेव्हा रजिस्टरमध्ये भावेनामक गृहस्थांची नोंद त्याचे पालक म्हणून केली गेली होती. ते गृहस्थ अधूनमधून त्याला येऊन भेटत; पण त्याच्या पूर्वायुष्याबद्दल मात्र ते कधीच बोलले नाहीत किंबहुना त्यांनासुद्धा विवेकच्या पूर्वायुष्याची माहिती नसावी. विवेक सज्ञान झाल्यावर त्यांचे पालकत्वपण संपले होते.

थोडक्यात, विवेकचे गतआयुष्य हे एक गूढ होते. त्यावर एक अभेद्य पडदा पडलेला होता. सुरुवातीला इतरांप्रमाणेच त्याला (त्याच्यापेक्षा इतरांनाच) आपल्या आई-वडिलांबद्दल कुतूहल वाटे; पण काही काळातच त्याने सत्य स्वीकारले होते की, हे गूढ कधीच उलगडणार नाही. तेव्हा जर कोणी विचारलं तर 'वडील अज्ञातवासात' एवढंच उत्तर तो देई. दुसरा एखादा अशा परिस्थितीत मानसिक ताणाने खचला असता; पण विवेक खरोखरच सभ्य, सालस, उमद्या व्यक्तिमत्त्वाचा तरुण होता. त्याने आपलं मानसिक स्वास्थ्य ढळू दिलं नव्हतं, म्हणूनच त्याच्या अशा अचानक नाहीसं होण्याचं कारण लक्षात येत नव्हतं.

मी त्याला शाळेत असल्यापासूनच ओळखत होतो. एकाच बाकावर बसत होतो. अभ्यास करत होतो. कॉलेजमध्ये केव्हातरी सुलभा त्याच्या जीवनात आली. परिचय वाढला आणि आता त्यांनी एकमेकांची सोबत जन्मभरासाठी पक्की करायचा विचार केला होता. मॅनेजमेंटचा कोर्स केल्यानंतर त्याला 'विजय इंटरनॅशनल'मध्ये नोकरीही लागली. खरं म्हणजे कोणताही अर्ज वा मुलाखतीशिवाय त्याला ती नोकरी कशी मिळाली, हे एक गूढच होतं; पण विवेकची कॉलेजमधील प्रगती चांगली होती. छाप पाडणारं व्यक्तिमत्त्व होतं; सर्वसाधारणपणे चांगल्या कंपन्या अव्वल दर्जाच्या व्यक्तींच्या शोधात असतात आणि इतर कुणाची नजर पडण्यापूर्वीच त्यांना उचलत असतात; पण गंमत म्हणजे अजूनपर्यंत तरी 'विजय इंटरनॅशनल'ने अशा उमेदवारांची विचारणा केली नव्हती. तरीसुद्धा त्याच्या थेट नेमणुकीचं पत्रच त्याच्या नावे पाठवलेलं होतं. खुद्द प्रिन्सिपॉलनीच त्याला आपल्या केबिनमध्ये बोलावून ते पत्र त्याला दिलं होतं. त्यांच्या बोलण्यातलं आश्चर्य जरी लपलं नव्हतं तरी त्यांनी त्या कंपनीबद्दल शिफारस मात्र केली होती. त्या कंपनीचं मुख्य कार्यालय लंडनला होतं; त्यामुळे पुढे-मागे परदेशी जाण्याचा योगही आला असता. म्हणजे नेमणुकीच्या पत्रात तरी तसं एक कलम होतं.

विवेकच्या नाहीसं होण्यानंतर मी त्याच्या ऑफिसमध्येदेखील चौकशी केली होती; पण कोणालाही त्याबद्दल कल्पना नव्हती. नवीन नोकरीबरोबरच त्याला कंपनीने नवीन ब्लॉकही घेऊन दिला होता. नवीन शेजार, त्यात हा सडाफटिंग, म्हणजे शेजाऱ्यांनासुद्धा काहीच माहिती नव्हती.

मी दुपारी साडेतीन वाजता सुलभाच्या घरी गेलो. तिथून मग आम्ही दोघे विवेकच्या ब्लॉकवर पोहोचलो. इतके दिवस रडवेली दिसणारी सुलभा आता आक्रमक झाली होती. विवेकला जाब विचारणार होती; पण मीच तिला शांत केलं. विवेकने दार उघडलं, तेव्हा त्याला बघून आम्हाला धक्काच बसला. कित्येक दिवसांचा आजारी वाटत होता. डोळे खोल गेले होते. दाढीचे खुंट वाढलेले दिसत होते. मुख्य म्हणजे नेहमीचा हसरा विवेक कुठल्या कुठे हरवला होता. त्याच्या चेहऱ्यावर काळजीपेक्षा अपराधीपणाचीच भावना दिसत होती.

"या! बसा." सोफ्याकडे बोट दाखवत तो म्हणाला. आम्ही बसलो तरी हा गप्पच! थोड्या वेळाने मीच उठलो आणि फ्रिज उघडत म्हणालो, "सुलभा, थंड पाणी हवं का?" सुलभाने मान डोलवली. विवेक तर मान वर करूनही बघायला तयार नव्हता. शेवटी मीच सुलभाला म्हटलं, "सुलभा, जरा चहा कर. म्हणजे तरी याचं तोंड उघडेल. नाहीतर इथेच रात्र होईल." सुलभा विवेककडे संमतीसाठी बघत उठली; पण विवेक काहीच बोलला नाही. सुलभाने चहा करून आणला. आम्ही सुरुवात केली, तर विवेक टेबलावरच्या कपाकडे तसाच बघत बसला होता. शेवटी त्याचा हात पुढे ओढून त्याच्या हातात गरम कप देत म्हटलं, "आधी चहा घे. नाहीतर अंगावर सांडेल."

त्या गरम चटक्याने तो थोडा भानावर आला आणि त्याने चहाचा कप तोंडाला लावला. गरम चहा पोटात जाताच त्याचा चेहरा थोडासा निवळला, तेव्हा मीच संभाषण पुढे चालू केलं.

"विवेक! तू बोलावलंस म्हणून आम्ही दोघं इथे आलो आहोत. तू जाताना कुठे जातो आहेस, केव्हा परतणार आहेस, काहीच सांगितलं नव्हतंस. तसंच तू परत आल्याचंदेखील

आम्हाला कळायला मार्ग नव्हता; पण तू आम्हाला बोलावलं आहेस. का बोलावलं आहेस ते माहीत नाही. विचारलं तरी सांगशील याची खात्री वाटत नाही. म्हणजे सांगावं की सांगू नये याबद्दल अजून तुझा निर्णय झालेला दिसत नाही. तसं असेल तर आम्ही आता निघतो. तुझा निर्णय झाला की, परत येऊ किंवा एकटी सुलभा येईल; पण असे नुसतेच किती वेळ बसून राहणार?''

''नको, नको. आताच सांगतो. एकदाच काय तो सोक्षमोक्ष होऊ दे. मी कोण, हा प्रश्न इतके दिवस मला सतावत नव्हता. आजही मी कोण होतो किंवा आहे हे कळलं नसतं तर बरं झालं असतं असं मला वाटतं. हे मी माझ्या दृष्टीने नाही तर सुलभाच्या दृष्टीने म्हणतो आहे.'' विवेक म्हणाला.

''पण तू जन्माने कुणी का असेनास. त्याचं आता काय? तुझा भूतकाळ, जन्म सगळं गूढ आहे, हे सर्वांना माहीत आहे. तसं मलाही माहीत आहे. मग आजच हा मुद्दा कुठून आला? आणि होतो म्हणजे काय? जाण्यापूर्वी तू विवेकच होतास ना आणि आजही विवेकच आहेस ना?'' इतका वेळ दाबून ठेवलेला सुलभाचा राग बाहेर पडला.

''अं ऽऽ हं! बरोबर आहे. जाण्यापूर्वी मी विवेकच होतो; पण मी खरा कोण आहे ते मला आता कळलं आहे.'' विवेकने खुलासा केला.

विवेक बराच सावरला होता. म्हणून ते संभाषण चालू ठेवण्यासाठी मी म्हटलं, ''ठीक आहे. आता सांग की, तू खरा कोण आहेस?''

विवेक क्षणभर थांबला. त्याने मनाची तयारी केली आणि खाली मान घालून सांगू लागला. ''दिवाळीनंतरची गोष्ट आहे. तू तुझ्या मामाकडे गेला होतास. त्या रात्री मी जेवून ब्लॉकवर आलो. माझ्या पाठोपाठ एक गृहस्थही आले, जणू ते माझीच वाट बघत होते. मी त्यांना पहिल्यांदाच पाहत होतो. त्यांनी माझ्या हातात एक बंद पाकीट ठेवलं. ते पाकीट माझ्या परिचयाचं होतं. जरी मला माझे पैसे मुंबईतील फर्मकडून मिळत होते तरी ती फर्म लंडनच्या एका फर्मतर्फे व्यवहार पाहत होती. पूर्वीसुद्धा मला मि. इयान स्मिथ यांच्या सहीची पत्रं आली होती; पण हे पत्र जरा जाड आणि जड होतं. खरं म्हणजे नोकरीला लागल्यानंतर मला त्या मदतीची गरज भासत नव्हती, हे खरं आहे; परंतु त्या पैशाची मला सवय झाली होती किंबहुना मला तो माझा हक्कच वाटत होता. त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे माझ्या पूर्वायुष्याशी जोडलेला तो एकमेव दुवा होता, असं म्हणायला हरकत नाही. जर मी तो दुवा तोडला असता तर मी माझ्या भूतकाळाला कायमचा अंतरण्याची मला भीती वाटत होती. पाकिटात मि. इयान स्मिथ यांच्या सहीचं पत्र आणि विमानाचं एक तिकीट होतं. पत्रातील मजकूर असा होता.

श्री. विवेक संझगिरी यांस,

आपणास कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे की, ज्या ट्रस्टतर्फे आपल्या देखभालीची व्यवस्था बघितली जाते, त्यातील काही तरतुदींची पूर्तता करण्याची वेळ येऊन ठेपलेली आहे. या पत्रासोबत मुंबई ते लंडन विमानाचे तिकीट पाठवत आहे, तेव्हा पत्र घेऊन येणाऱ्या गृहस्थासोबत ताबडतोब निघावे. आपल्या रजेची व्यवस्था केलेली आहे. काही अपरिहार्य कारणामुळे आम्ही आपणास पुरेशी सूचना देऊ शकलो नाही, त्याबद्दल दिलगीर आहोत; परंतु आपल्या आयुष्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या क्षणी आपली उपस्थिती अनिवार्य असल्याने आपण ताबडतोब निघणे आवश्यक आहे. इकडे आल्यावर प्रत्यक्ष खुलासा होईलच.

आपला,

इयान स्मिथ.

पत्र घेऊन येणाऱ्या गृहस्थांनाही यापेक्षा जास्त माहिती नव्हतीच. मला वेळच्या वेळी विमानात बसवून देण्याची त्यांची जबाबदारी होती. म्हणून ते प्रवासासाठी बॅग घेऊनच आले होते. मी माझी जुजबी तयारी केली. पासपोर्ट घेतला आणि निघालो. त्यांनी खाली टॅक्सी उभी करून ठेवलेलीच होती. तू इथे नसल्याने तुला कळवायचा प्रश्नच नव्हता आणि सुलभाला तरी काय सांगणार होतो? त्यामुळे आम्ही तसेच निघालो. मी विमानात बसेपर्यंत ते गृहस्थ माझ्याबरोबर होते. मला एक सुचले नाही की, तुला मी लंडनला जात असल्याची चिठ्ठी द्यावी; पण मला तरी लंडनचा पत्ता कुठे माहीत होता. लंडन विमानतळावर पोहोचलो, तेव्हा चांगलीच थंडी पडलेली होती. इयान स्मिथ माझ्या स्वागतासाठी विमानतळावर आले होते. मी पहिल्यांदाच त्यांना प्रत्यक्ष भेटत होतो; त्यामुळे मी त्यांना ओळखण्याचा प्रश्नच नव्हता; पण त्यांच्याकडे बहुधा माझा फोटो असावा; कारण त्यांनी मला लगेच ओळखलं. मला पाहताच पुढे होत त्यांनी माझं सामान घेत स्वतःची ओळख करून दिली. इयान स्मिथ हे पन्नाशीच्या पुढचे गृहस्थ होते. उंच, अंगाने शिडशिडीत होते. त्यांचं नाक धारदार होतं. सर्वसाधारण इंग्रज गृहस्थाप्रमाणे गोरे, घारे डोळे होते. प्रथमदर्शनी तरी माणूस करारी वाटला. कदाचित व्यवसायामुळेही असेल; पण माणूस मुद्देसूद आणि मितभाषी वाटला.

माझ्या नावाने हॉटेलमध्ये खोली राखून ठेवलेली होतीच. मला वाटलं होतं की, गाडीत तरी स्मिथ काही खुलासा करतील; पण त्यांनी मला त्या दिवशी विश्रांती घ्यायला सांगितली. दुसऱ्या दिवशी ते मला डॉ. बरोज यांच्याकडे घेऊन जाणार होते. दुसऱ्या दिवशी ठरलेल्या वेळी स्मिथ माझ्या रूमवर येऊन मला डॉ. बरोज यांच्याकडे घेऊन गेले. डॉ. बरोज यांचे हॉस्पिटल व प्रयोगशाळा ही दोन इमारतींमध्ये विभागली गेली होती. आम्ही त्यांच्या ऑफिसमध्ये पोहोचलो. डॉक्टर बरोज साठीला पोहोचलेले गृहस्थ वाटत होते. डोक्याला टक्कल, किंचित स्थूल, बारीक काडीचा सोनेरी चश्मा आणि हसतमुख चेहरा, स्थूलपणाकडे झुकणारी शरीरयष्टी असली तरी हालचालींत चपळता होती. सदा घाईत असल्यासारखे चालत. आमच्या येण्याची कल्पना स्मिथ यांनी अगोदरच दिलेली असावी किंवा रिसेप्शनिस्टने तसं त्यांना कळवलं असावं; कारण आम्ही त्यांच्या केबिनजवळ पोहोचेपर्यंत ते दार उघडून तयारच होते. मला पाहताच पुढे येऊन त्यांनी माझे हात हातात घेऊन दाबले. त्यात व्यवहार नव्हता तर आपुलकी होती, जणू आपल्याच जुन्या परिचिताला भेटत आहोत अशी त्यांची पकड होती. जोरजोराने हात हलवत ते म्हणाले, ''Welcome Vijay!'' पण स्मिथ यांनी त्यांना सावरलं. ''अरे डॉक्टर! हा विजय नाही. हा विवेक आहे. विवेक संझगिरी.''

''ओह! सॉरी विवेक.'' डॉक्टर सावरून घेत म्हणाले; पण माझे हात त्यांच्या हातातच राहिले.

''जाऊ द्या ना डॉक्टर. गेले दोन दिवस काय चाललं आहे तेच मला समजत नाही. मि.स्मिथही काही खुलासा करत नाहीत; तेव्हा तुम्ही मला विजय म्हणा किंवा विवेक म्हणा, मला तरी काही फरक पडत नाही.'' मी पटकन बोलून गेलो.

खरं म्हणजे मी असं पटकन बोलायला नको होतं; पण गेल्या दोन दिवसांच्या काळात विचार करून करून माझा मेंदू थकला होता. माणसाला संकटाची भीती वाटत नाही. उलट संकटाचं स्वरूप शक्य तितक्या लवकर कळावं असं वाटत असतं; कारण एकदा संकटाचं स्वरूप कळलं की, त्याला तोंड द्यायला (किंवा पळ काढायला म्हणा) माणूस तयार होतो. त्याला भीती वाटते ती अनिश्चिततेची. या तणावाखालीच माणूस कोलमडून पडतो. प्रवासात असताना असं वाटत होतं की, आता गेली २५ वर्षं मिळणारे पैसे बंद होणार असं सांगणार असतील. नाहीतरी नोकरीला लागल्यापासून माझं त्या पैशावाचून अडत नव्हतंच आणि तेवढं सांगण्यासाठी मला लंडनला आणण्याची गरज नव्हती. ते पैसे ते केव्हाही बंद करू शकले असते; पण आता लंडनमध्ये आणखी एका व्यक्तीची – डॉ. बरोज यांची भर पडली होती आणि डॉ. बरोज यांनी ज्या आपुलकीने माझे हात हातात घेतले होते ती आपुलकी कृत्रिम वाटत नव्हती. त्यांच्या उत्साहावरून तरी ते मला निराश करणार नव्हते अथवा धक्का देणार नव्हते. ''काय स्मिथ, इथे बसून बोलू या की सरळ चेंबरमध्ये जाऊ या?'' डॉ. बरोजनी विचारलं.

''मला वाटते, चेंबरकडेच जाऊ या आणि नंतर केबिनमध्ये परत येऊ. म्हणजे शांतपणे बोलता येईल.'' स्मिथ यांनी सुचवलं.

''चला तर मग,'' डॉ. बरोज म्हणाले आणि त्यांनी हातांनी पुढे व्हायला सुचवलं.

स्मिथना हा प्रकार माहीत असावा. आम्ही तिघेही दुसऱ्या इमारतीमधील चेंबरकडे निघालो. चेंबर म्हणजे एक मोठी खोलीच होती. त्या खोलीत एका काचेच्या पार्टिशनमागे एक पेटी ठेवलेली होती. त्या पेटीला काही वायर्स आणि नळ्या जोडलेल्या होत्या. त्या पेटीजवळ आम्ही उभे राहिलो. डॉ. बरोजनी त्या पेटीवरची एक छोटी झडप बाजूला केली. आत एक स्त्रीदेह तरंगत होता. झडपेतून फक्त चेहराच दिसत होता. ती स्त्री अगदी शांतपणे झोपलेली दिसत होती. मृत्यूचं कोणतंही चिन्ह तिच्या चेहऱ्यावर दिसत नव्हतं. जणू काही तिला जागं केलं तर ती आपल्याबरोबर बोलूही शकली असती, असं वाटत होतं. मला ती स्त्री दाखवण्याचा उद्देश कळला नव्हता. बहुधा त्या स्त्रीमुळेच माझा उदरनिर्वाहाचा खर्च होत असावा असा माझा तर्क होता. मी बघत असताना डॉ. बरोज आणि स्मिथ दोघेही माझ्या चेहऱ्यावरचे भाव निरखत होते. थोडा वेळ पाहून मी परत फिरलो आणि म्हणालो, ''मि. स्मिथ, मला वाटतं, याच माझ्या ट्रस्टच्या ट्रस्टी असाव्यात. माझ्या उपकारकर्तीचं नाव आणि अधिक माहिती मला मिळू शकेल का? त्यांच्या दर्शनामुळे माझ्या मनावरचं दडपण कमी झालं आहे. आता आणखी एक प्रश्न. माझ्याकडून आता ट्रस्टच्या काय अपेक्षा आहेत?'' मागे वळताना माझ्या लक्षात आलं की, त्या पेटीवर एक नेमप्लेट होती. त्यावर नाव कोरलेलं होतं - 'नंदिनी केळकर' आणि त्यावरची तारीख होती सुमारे २३ वर्षापूर्वीची. माझ्या आवाजातील कृतज्ञता कृत्रिम नव्हती. कोण कुठली नंदिनी केळकर. माझ्यासाठी पैसा खर्च करते आणि अनामिक राहते. का?

''चला, आपण आता माझ्या केबिनमध्ये बसू या. तिथंच मी तुला सगळं सांगतो.'' डॉ. बरोज झडप बंद करीत म्हणाले आणि आम्ही तिघं त्यांच्या केबिनमध्ये परत आलो. केबिनमध्ये खुर्च्यांवर येऊन बसल्यावर डॉक्टर म्हणाले, ''हं स्मिथ, तू सुरुवात करतोस का?''

''हो, हो, अवश्य; कारण ट्रस्टी म्हणून मलाच पुढाकार घ्यायला हवा.'' स्मिथ म्हणाले आणि त्यांनी सुरुवात केली. ''मि. विवेक, आपण आता ज्या नंदिनी केळकर यांना पाहिलंत, त्यांच्या इच्छेनुसार आमच्या फर्मने आतापर्यंतचा कारभार पाहिलेला आहे. आणखी एका अनिवार्य गोष्टीची पूर्तता करण्यासाठी तुम्हाला व्यक्तिशः इथे येणं भाग होतं; परंतु वेळेअभावी आम्ही आपल्याला पूर्वसूचना देऊ शकलो नाही, याबद्दल क्षमा मागतो.

''आपण आता ज्या नंदिनी केळकरांना पाहिलंत, त्या गेली २४ वर्षं शीतनिद्रेत आहेत. आणखी १५ दिवसांनी त्यांना या शीतनिद्रेतून बाहेर काढलं जाईल. त्यांच्या इच्छेनुसार ज्या क्षणी त्यांना जागृतावस्था येईल, त्या क्षणी आपली उपस्थिती असणं आवश्यक आहे. आता त्या शीतनिद्रेबद्दल आणि जागृतावस्थेबद्दल डॉ.बरोज आपल्याला माहिती देतील. ठीक आहे ना डॉक्टर?'' डॉक्टरांकडे पाहत स्मिथ म्हणाले.

''हं, मि.विवेक, शीतनिद्रा ही गोष्ट जरी अगदी प्रचलित नसली तरी ती अपवादात्मक परिस्थितीत वापरली जात आहे. त्याला मुख्य कारण म्हणजे ही पद्धत फार खर्चिक आहे. एवढंच नव्हे, तर या दीर्घ काळाच्या शीतनिद्रेत असताना अनेक गोष्टी, अपघात, उत्पात घडू शकतात. म्हणजे नुसते पैसे खर्च करूनही अंतिम उद्दिष्ट साध्य होईलच याची खात्री देता येत नाही. म्हणून कुणी फारसं या भानगडीत पडत नाही. शीतनिद्रा ही अवस्था जिवंतपणीच आणावी लागते. तरच त्या पेशी कार्यक्षम राहू शकतात. तसंच ते तापमान विशिष्ट कालबद्ध कार्यक्रमानुसारच कमी करावं लागतं. नाहीतर फ्रॉस्टबाइटसारखे दुष्परिणाम होऊ शकतात. तसंच ज्याप्रमाणे शीतनिद्रेत नेताना तापमान हळूहळू कमी केलं जातं, त्याप्रमाणे शीतनिद्रेतून बाहेर येतानासुद्धा कालबद्ध कार्यक्रमानुसारच तापमान वाढवीत जावं लागतं. आता आपण येथे आला आहात, तेव्हा नंदिनीला शीतनिद्रेतून जागं करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात करायला हरकत नाही.'' डॉ.बरोज म्हणाले.

''डॉक्टर, मला वाटतं की, त्यापूर्वी मि.विवेक यांचे डीएनए प्रिंट्स, फिंगर प्रिंट्स यासारखे रिपोर्ट फाइलला असणं आवश्यक आहे.'' मि.स्मिथ मध्येच म्हणाले.

''त्यासाठीच तर मि.विवेकना इकडे आणणं आवश्यक होतं. मि.विवेक, मला वाटतं, आजच्या दिवस तुम्ही इथेच राहावं. डॉक्टर, किती वेळ लागेल त्याप्रमाणे मी गाडी पाठवतो.''

''काळजी करू नकोस. काम झालं की, मीच त्याला हॉटेलवर सोडायची व्यवस्था करीन.'' डॉ.बरोज म्हणाले. ते दोघं आपापसांत ठरवत होते. माझ्या संमतीची आवश्यकता भासत नव्हती. मला गृहीतच धरलं होतं. त्यांचे हेतू काय आहेत हे मला कळत नव्हतं. या चाचण्यांचा आणि माझ्या संमतीचा काय संबंध आहे. या चाचण्यांमुळे माझं काहीच नुकसान होणार नव्हतं, तेव्हा विरोधासाठी विरोध करण्याची माझी इच्छा

नव्हती. शिवाय हॉटेलमध्ये बसून कंटाळा आला असता. इथे डॉ.बरोज होते. बोला-चालायला मोकळेढाकळे होते. मी संमतिदर्शक मान हलवताच ''गुड बॉय'' म्हणत माझ्या पाठीवर थोपटलं आणि म्हणाले, ''चल, पॅथॉलॉजिकल डिपार्टमेन्टमध्ये जाऊ या. बरं आहे स्मिथ, मी तुला उद्या कळवतो. उद्या येताना तुझे कागद घेऊन ये. मग त्याच वेळी याची संमतीची सही घेऊन टाकू.'' स्मिथना निरोप देत डॉ. बरोज म्हणाले. त्यांना सोडायला आम्ही दरवाजापर्यंत गेलो होतो आणि स्मिथ गेल्यानंतर आम्ही त्यांच्या पहिल्या मजल्यावरच्या पॅथॉलॉजिकल डिपार्टमेन्टकडे निघालो. तो सबंध दिवस मी त्यांच्या हॉस्पिटलमध्येच काढला. मला वाटलं होतं की, मी डॉक्टरांबरोबर बोलून नंदिनी केळकर किंवा माझ्याबद्दलसुद्धा अधिक माहिती काढू शकेन; पण डॉक्टर मला डिपार्टमेन्टमध्ये सोडून त्यांच्या कामाला निघून गेले. त्यांची लॅब असिस्टन्ट माझ्याबरोबर होती. तिला विचारण्यात काहीच अर्थ नव्हता. मी एक VIP आहे यापलीकडे तिला जास्त काही माहिती नव्हती. सर्व चाचण्या करून झाल्यानंतर तिने डॉक्टरांना फोनवरून सांगितलं. डॉक्टरांनी त्यांच्या ड्रायव्हरला सूचना देऊन ठेवलेल्या होत्याच. मला फोनवरच निरोप देऊन ते आपल्या कामाला लागले. मी त्यांना न भेटताच हॉटेलवर परत आलो होतो. माझे प्रश्न माझ्यासमोर तसेच होते. ही नंदिनी केळकर कोण? तिचा-माझा संबंध काय आहे? मी जर तिचा वारसदार (मुलगा) असेन तर ती केळकर आणि मी संझगिरी कसा? मुख्य म्हणजे जर मीच तिचा एकुलता एक वारसदार असेन, तर एवढी मोठी प्रचंड संपत्ती स्वतः किंवा वारसदाराला देऊन टाकण्याऐवजी मी भारतात आणि इथे ती स्वतः शीतनिद्रेत जाण्यामागे काय प्रयोजन आहे? या २५ वर्षांच्या काळात माझे किंवा तिचे जर बरे-वाईट झाले तर या संपत्तीचा कोणाला उपयोग होणार? किंवा आता ती जागी झाली की, माझे काय? जरी ही संपत्ती किती मोठी होती हे मला माहीत नव्हते तरी त्या संपत्तीचा उपभोग काही प्रमाणात तरी मी घेतलेला होता आणि कदाचित उर्वरित काळासाठी मी त्यापासून वंचितही झालो असतो. तसे असेल तर त्या संमतिपत्रावर मी का म्हणून सही करावी आणि आपल्याच पायावर धोंडा पाडून घ्यावा? याची काय तिला कल्पना नसेल? मग तिने केवळ वैज्ञानिक प्रयोगासाठी तर आपला देह दिला नाही ना? माझ्या प्रश्नांना कोण उत्तरं देईल? डॉ. बरोज की इयान स्मिथ? मला पैशाचा मोह नव्हताच; त्यामुळे सही नाकारण्याचा माझा विचारही नव्हता; त्यामुळे जास्त डोकं न शिणवता जे जे होईल ते ते पाहावे असा विचार करून स्वस्थ झोपून गेलो. दुसऱ्या दिवशी इयान स्मिथने गाडी पाठवली होती. गाडीतून त्यांच्या ऑफिसवर गेलो. त्यांची सॉलिसिटर फर्म मोठी आणि नावाजलेली होती; पण मि.स्मिथ माझ्या केसमध्ये (की नंदिनी केळकरच्या) खास लक्ष घालत होते. मी त्यांच्या केबिनमध्ये गेल्यावर त्यांच्या सेक्रेटरीला कोणाला आत सोडू नकोस असं सांगून ते मला म्हणाले, ''जरा माफ करा. हे एवढं हातातलं काम संपवतो. तोपर्यंत कॉफी घेऊ या.'' आणि इंटरकॉमवरून त्यांनी स्वतःकरता चहा तसेच माझ्यासाठी कॉफी मागवली. ''मलाही चहाच आवडेल, मि. स्मिथ.'' मी त्यांना सांगितलं.

''काय? चहा? कॉफी नको?'' स्मिथना त्याचं खूपच आश्चर्य वाटलं. त्यांना तसं का वाटावं हे मला कळेना.

''का? काही अडचण आहे का? मग मला कॉफीसुद्धा चालेल; पण जरा कडक सांगा. भारतात फिल्टर कॉफी मिळते तशी बहुधा इथे मिळणार नाही. म्हणून चहा म्हणालो.'' मी खुलासा केला.

''अरे, नो प्रॉब्लेम! माझा चहा येतोच आहे. मला वाटलं होतं, तुला कॉफी आवडेल म्हणून, पाहिजे तर मी बनवतो तुला हवी तशी! पिऊन तर बघ; पण आग्रह नाही. तुला चहा हवा तर आज चहाच घे. कॉफीचं नंतर कधीतरी बघू.'' असं म्हणत त्यांनी परत दोन चहाची ऑर्डर दिली. चहा येईपर्यंत ते त्यांची कागदपत्रं पाहत होते. 'आता थोडा वेळ आमच्या कामात व्यत्यय येऊ देऊ नकोस' असं सेक्रेटरीला बजावून स्मिथ खुर्चीवर रेलून बसत म्हणाले, ''हं, आता बोल. काल झाल्या का सगळ्या टेस्ट्स? डॉक्टर काय म्हणाले?''

''हो झाल्या असाव्यात बहुतेक; पण डॉक्टरांची भेट झाली नाही. ते तुम्हाला फोन करणार होते ना?'' मी विचारलं.

''हो येईलच त्याचा फोन; पण त्याची खात्री पटल्यानंतरच येईल. त्याच्या या स्वभावामुळे नंदिनी त्याच्याकडे सुरक्षित आहे.'' स्मिथ म्हणाले. तोच धागा पकडून मी विचारलं, ''मि.स्मिथ, एक विचारू? या नंदिनी केळकर कोण? त्या शीतनिद्रेत का गेल्या आहेत आणि त्यांना जागं करण्यासाठी माझ्या परवानगीची का आवश्यकता आहे?''

''सांगतो ना. त्यासाठीच तर तुला इथे बोलावलं आहे.'' मि.स्मिथ सांगू लागले.

''भारत व इंग्लंड यांच्यात गेली चार-पाच शतके तरी संबंध आहेत. अनेक भारतीय कुटुंबे इंग्लंडमध्ये पिढ्यान्‌पिढ्या स्थायिक झालेली आहेत. तशी कित्येक इंग्लिश कुटुंबेसुद्धा भारतात स्थायिक झालेली आहेत. काहींनी आंतरजातीय विवाह केले आहेत. तर काहींनी स्वप्रांतीय जोडीदार निवडले आहेत. केळकर कुटुंब हे त्यांपैकीच एक आहे. त्यांच्या प्रत्येक पिढीतील मुलगा आणि मुलगी लहानपणाचा काळ भारतातच घालवते. तिथले रीतिरिवाज आणि संस्कृतीचा परिचय करून घेते. कदाचित त्यामुळेही असेल; पण केळकर कुटुंबाच्या सुनासुद्धा भारतातून आयात केलेल्या असतात. हा विनोद सोड; पण खरी परिस्थिती अशीच आहे. मुलींच्या बाबतीत आई-वडील जरी फारसे आग्रही नसले तरी त्यांना त्यांची भावी सून मात्र भारतातच वाढलेली हवी असते. अर्थात, इथे वाढलेल्या मुलांवर अशी आवड लादणं कठीण असतं, हे खरं असलं तरी केळकर कुटुंबातील मुले आई-वडिलांच्या इच्छेला मान देत आलेली आहेत. नंदिनी केळकर हीसुद्धा त्याच परंपरेनुसार भारतात वाढलेली आहे. या केळकर कुटुंबाच्या किती पिढ्या इथे वाढल्या आहेत, हे मलासुद्धा नक्की सांगता येणार नाही; पण माझ्या माहितीप्रमाणे गेली २०० वर्षं तरी केळकरांचे व्यापार-उद्योग इथे चालू आहेत. भारताशी संबंध राखल्यामुळे भारतातही त्यांचे उद्योग विस्तारलेले आहेत. 'विजय इंटरनॅशनल' ही त्यांची कंपनी भारतातील कारभार सांभाळते.''

''ओह! म्हणजे मी जिथे नोकरीला आहे ती कंपनी! तरीच मला इंटरव्ह्यूशिवाय नोकरी मिळाली. मला वाटतं, तुम्हीच तो प्रयत्न केला असावा.'' मी म्हणालो.

''तुझा अंदाज बरोबर आहे. आमच्या फर्मतर्फेच त्या कंपनीच्या कामावर २५ वर्षं देखरेख होत आहे. एकदा नलिनी जागी झाली आणि

कारभार पाहू लागली की, माझी जबाबदारी संपेल. असो. तर विजय केळकर हा त्या घराण्याचा शेवटचा वारस होता. हा विजय अतिशय सभ्य, सालस आणि हुशार मुलगा होता. विजय, मी आणि डॉ. बरोज तिघंही वर्गमित्र होतो.''

''अरे! बरी आठवण झाली. अजून डॉक्टरांचा फोन का नाही आला,'' असं म्हणत त्यांनी डॉ.बरोजना फोन लावला. डॉक्टर काही कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यांच्या सेक्रेटरीने फोन घेतला आणि निरोप सांगितला. दुसऱ्या दिवशी जेवणानंतर आम्हाला बोलावलं आहे. तसेच माझ्या सर्व टेस्ट झाल्या का, काही बाकी आहेत का, त्याचे निकाल अजून का मिळाले नाहीत याबद्दल तिला काहीच माहिती नव्हती. ''ठीक आहे. उद्या दुपारी येतो म्हणून डॉक्टरांना सांग,'' असं म्हणत त्यांनी फोन बंद केला आणि माझ्याकडे वळून म्हणाले,

''मि.विवेक, आपल्याला उद्या डॉक्टरांकडे जायचं आहे. मला वाटतं, तुम्हालाही कंटाळा आला असेल, तेव्हा आता जरा आराम करा. उद्या दुपारी मी येतो, तुम्हाला न्यायला. मग परस्पर डॉक्टरांकडे जाऊ या, OK.'' इयान स्मिथने जणू माझा निरोपच घेतला होता. मलासुद्धा केळकर घराण्याचा इतिहास ऐकण्यात स्वारस्य नव्हतंच. मला कळायला हवं होतं माझं जन्मरहस्य. ही नंदिनी केळकर कोण? तिचा-माझा संबंध काय? विजय केळकर हाच जर शेवटचा वारस असेल तर मी? छे! डॉक्टर बरोजनी मला पहिल्यांदा विजय म्हणूनच हाक मारली होती; पण स्मिथनी त्यांना सुधारलं होतं. मी विजय नाही, विवेक आहे. म्हणजे माझ्यात त्यांना विजयचाच भास झाला असेल; पण मी विवेक संझगिरी आहे. केळकर नाही. शिवाय विजय हा केळकर घराण्याचा शेवटचा वारस होता, असं स्मिथ म्हणाले, म्हणजे केळकर घराण्यात आता नंदिनीशिवाय इतर कोणी हयात नसावं. नाहीतर तिला जागं करण्यासाठी त्यांनी त्यांची परवानगी घेतली असती.

''मि.स्मिथ, मला वाटतं की, केळकर कुटुंबीयांपैकी आता कुणीही हयात नसावं. नाहीतर नंदिनीला जागं करण्यासाठी त्यांचीच परवानगी घेतली असती. नाही का?'' मी उघडपणे विचारलं.

''मला वाटतं, या विषयावर आपण नंतर बोलू या,'' स्मिथ म्हणाले आणि त्यांनी मला निरोप दिला. दुसऱ्या दिवशी आम्ही डॉ.बरोज यांच्या हॉस्पिटलवर जरा उशिराच पोहोचलो. डॉक्टर तयारच होते. खुर्चीवर बसल्यावर त्यांनी दोन कप चहा आणि माझ्यासाठी कॉफी सांगितली, तेव्हा स्मिथ म्हणाले, ''अरे, कॉफी नको. विवेकसाठीदेखील चहाच सांग. तो कॉफी घेत नाही.'' मी डॉक्टरांची रिॲक्शन टिपली. त्यांनासुद्धा स्मिथसारखाच धक्का बसलेला होता. मला कळेना, ही मंडळी मला कॉफी आवडते असं गृहीत धरून का बसली होती; पण मी काही बोललो नाही; कारण मी विचारल्यावर मला त्यांनी काही सांगितलं असतंच असं नाही. ''सगळ्या टेस्ट कन्फर्मेटिव्ह आहेत, त्याचे हे सर्व रिपोर्ट्स. मि.विवेक, आता तुम्ही या कागदावर सह्या करा. म्हणजे आपल्याला पुढील कार्यक्रमाला सुरुवात करता येईल, म्हणजे आमच्याकडून सर्व तयारी आहेच. फक्त एक फॉरमॅलिटी म्हणून सही करा.'' डॉ.बरोज म्हणाले. मी स्मिथ यांच्याकडे सहेतुक पाहिलं आणि विचारलं, ''मि.स्मिथ, मला वाटतं, माझ्या कालच्या प्रश्नाचं उत्तर तुम्ही आता द्यावं.'' डॉ.बरोज गोंधळून आम्हा दोघांकडे पाहत होते. शेवटी स्मिथ म्हणाले, ''मि.विवेक, तो प्रश्न इथे अप्रस्तुत आहे आणि मला वाटतं, त्या प्रश्नाचं खरं उत्तर आपल्याला नंदिनीकडूनच मिळेल. आम्ही फक्त तिच्या इच्छेनुसार कार्यवाही करत आहोत. तिच्या इच्छेनुसार फक्त तुझ्या संमतीनेच ही कार्यवाही होऊ शकणार आहे.''

''आणि समजा, मी नकार दिला तर किंवा अपघाताने मीच यापूर्वी मृत्यू पावलो असतो तर?'' मी विचारलं.

''जर आपण या अगोदरच मृत्यू पावला असता आणि मानसिकदृष्ट्या अपंग झाला असतात तर सांगायला खेद होतो की, नंदिनीची ही शीतनिद्रा कायमच्या निद्रेत परिवर्तित केली गेली असती. तशी कायदेशीर तरतूद तिने तिच्या इच्छापत्रात करून ठेवलेली आहे. खरं आहे ना, डॉक्टर?''

''आणि खरंच सांगतो की, आम्हाला काही गोष्टींचा अंदाज आहे; पण सत्य गोष्ट फक्त नंदिनीलाच माहीत आहे. म्हणून आम्ही तुला काही सांगत नाही आहोत. तुझ्या आडमुठेपणामुळे कोणाचाच फायदा होणार नाही. फक्त हकनाक एक जीव मात्र जाईल.'' स्मिथ म्हणाले.

''त्याबरोबर मला मिळणारे पैसेसुद्धा बंद होतील. खरं ना?'' मी विचारलं.

''चूक आहे. अजूनही काही अपघाती कारणांमुळे नंदिनी जर परत सामान्य स्त्री होऊ शकली नाही तरीसुद्धा तुमची देखभाल याच ट्रस्टमार्फत होत राहील.''

''काल तुम्हाला म्हटलं होतं की, विजय, मी आणि डॉक्टर वर्गमित्र होतो. नंदिनी ही विजयची पत्नी होती. म्हणून सर्व गोष्टींकडे आम्ही फक्त व्यवहार म्हणून पाहात नाही. तर त्यात आमची भावनिक गुंतवणूकसुद्धा आहे, म्हणूनच केळकर घराण्याचं हित जपणं आम्हाला आवश्यक वाटतं. तिचा शीतनिद्रेचा काळ आणखी वाढवणं योग्य होणार नाही. म्हणून मला वाटतं, तुम्ही आजच सही करावी, म्हणजे नंदिनीच्या इच्छेनुसार ठरलेल्या दिवशी ती डोळे उघडू शकेल. त्या वेळी तुमचाच चेहरा तिच्या दृष्टीस पडावा, अशी तिची इच्छा आहे.'' स्मिथ म्हणाले. मला पैशांत खरोखरच स्वारस्य नव्हतं; पण माझं जन्मरहस्य नंदिनीजवळ होतं. म्हणून मी सही करून मोकळा झालो. आता पुढचे पंधरा दिवस मी मोकळाच होतो. आता १५ दिवसांनंतर नंदिनी डोळे उघडणार होती. त्या वेळी तिच्या समोर जाऊन उभं राहायचं होतं; पण उत्सुकता म्हणून मी रोज डॉ.बरोज यांच्याबरोबर जाऊन नंदिनीची प्रगती बघणार होतो. इयान स्मिथ कायदेबाज व मितभाषी होते. याउलट डॉ.बरोज यांची पहिली भेट आठवली, त्या भेटीतील त्यांचा आपुलकीचा स्वर आणि स्पर्श आठवला. बोलायलाही स्मिथपेक्षा ते अघळपघळ होते. म्हणजे डॉ.बरोज मऊ माती होती. खोदली तर काहीतरी हाताला लागलं असतं. नंतरच्या १५ दिवसांत डॉ.बरोज यांच्याकडून आणखी थोडी माहिती मिळाली. तीदेखील सलग नाही. तुकड्यातुकड्यांनी. केळकर कुटुंबाच्या गेल्या काही पिढ्या इंग्लंडमध्येच स्थायिक झालेल्या होत्या. त्यांचे बरेच उद्योग आणि व्यवसाय होते. विजय हा त्या कुटुंबातील एकुलता एक मुलगा. त्या कुटुंबाच्या परंपरेनुसार काही काळ तो भारतात वाढला आणि भारतीय संस्कृतीशी परिचित झाला. माई केळकर भारतातील, म्हणून त्यांच्या माहेरी भावाकडेच त्यांचं वास्तव्य होतं. विजय मोठा झाल्यावर

नंदिनीबरोबर त्याचा विवाह झाला. नंदिनी स्वतः डॉक्टर होती. तिला संशोधनात रस होता. त्याप्रमाणे इंग्लंडला आल्यावर तिने डॉ.बरोज यांच्याबरोबर संशोधनाला सुरुवात केली. विजय, डॉक्टर आणि स्मिथ यांच्या मैत्रीत नंदिनीही मिसळून गेली. डॉक्टर बरोज यांच्या मते नंदिनी खरोखरच हुशार होती. जर ती शीतनिद्रेत गेली नसती तर गेल्या २५ वर्षांत खरोखरच काही क्रांतिकारक शोध तिच्या नावावर जमा झाले असते; पण या सगळ्या जर आणि तरच्या गोष्टी होत्या. एका वीकएन्डला नंदिनी आणि विजय हायवेवरून वेगाने जात असताना त्यांच्या गाडीला जबरदस्त अपघात झाला. ड्रायव्हिंग करणारा विजय जबर जखमी झाला. नंदिनी मात्र जखमी होऊनही बचावली होती. तिनेच धावपळ करून विजयला हॉस्पिटलमध्ये आणलं होतं; परंतु विजय वाचू शकला नाही. माणसाची इच्छा जबरदस्त असते. जोपर्यंत आशा आहे, तोपर्यंत माणूसच काय पण प्रत्येक प्राणिमात्र प्रयत्न करत असतो. इथे तर नंदिनी आणि विजय एक जीव, दोन देह असं त्यांचं प्रेम होतं. जर शक्य असतं तर तिने आपल्या आयुष्यातील काही वर्षसुद्धा विजयसाठी दिली असती; पण नंदिनी स्वतः डॉक्टर असल्याने तिला विजयच्या शेवटाची कल्पना असावी; म्हणून तिने अगोदरच तातडीने व्यवस्था केली. विजयचं पार्थिव गोठवून ठेवण्याची व्यवस्था तिने केली होती. पैशाचा प्रश्नच नव्हता. जरी तो पैसा विजयला वाचवू शकला नव्हता, तरी त्याचा देह गोठवलेल्या अवस्थेत जपून ठेवू शकत होता. एकुलत्या एक मुलाच्या निधनाने विजयच्या आई-वडिलांनी हाय खाल्ली; पण नंदिनी त्यांना धीर देत होती. कधीतरी ती विजयला या जगात आणणार होतीच; पण केव्हा ते मात्र निश्चित सांगता येत नव्हतं. नंदिनीचे प्रयोग चालूच होते. साधारण दोन-तीन वर्षांनंतर नंदिनीने शीतनिद्रेत जायचा निर्णय जाहीर केला. त्या निर्णयाने डॉ.बरोज हबकूनच गेले. त्यांनी त्यातील धोके तिला समजावून सांगितले. तिची बुद्धिमत्ता अशी बंदिस्त व्हावी हे त्यांना त्या वेळीसुद्धा पटलं नव्हतं; पण नंदिनी तिचा विचार बदलायला तयारच नव्हती. पैशाच्या पाठबळावर तिने त्यांची संशोधन शाळा आणि हॉस्पिटल बांधून घेतलं. हवी ती उपकरणं मागवली आणि डॉ.बरोज यांच्या ताब्यात दिली. इयान स्मिथच्या मदतीने तिने एक ट्रस्ट तयार केला आणि त्याच्यावर ट्रस्टी नेमले. त्या ट्रस्टतर्फेच माझा चरितार्थ चालणार होता. मीच का? तर डॉ.बरोज यांच्या मते ज्या दिवशी विजयचा मृत्यू झाला, त्याच दिवशी म्हणे माझा जन्म झाला होता. तोसुद्धा नंदिनीच्या जन्मगावी भारतात. निव्वळ योगायोग! दुसरं काय? मला खात्री होती की, डॉ. बरोजना यापेक्षा जास्त माहिती असावी; पण त्यांनी त्याबाबत मौन पाळलं होतं. नंदिनीच्या शीतनिद्रेत जाण्यानंतर विजयचे आई-वडील फार काळ जगले नाहीत; कारण त्यांना धीर द्यायला आता नंदिनी नव्हती; पण त्यांनी एक गोष्ट केली. त्यांच्या सर्व मिळकतीचा ट्रस्ट करून त्यांनी स्थापन केलेल्या ट्रस्टबरोबर जोडून दिला होता; कारण नंदिनी मृत्यू पावलेली नव्हती, तर शीतनिद्रेत गेली होती. ती शीतनिद्रा आणखी २५ वर्षांनंतर भंग पावणार होती. त्यानंतर तिला त्या संपत्तीचा उपयोग होऊ शकला असता. नंदिनीने शीतनिद्रेत जाण्यापूर्वी स्मिथ यांच्याकडे एक लिफाफा दिलेला होता. त्यावरील सूचनेनुसार तो लिफाफा १५ दिवसांपूर्वी उघडला गेला होता. त्यामधील अटीनुसार नंदिनीने डोळे उघडण्याच्या वेळी मी तिथे असणं आवश्यक होतं. नंदिनीची पहिली दृष्टी माझ्यावर पडणार होती. याच कारणामुळे मला या गोष्टीची आगाऊ कल्पना देण्यात आली नव्हती. इतरही काही सूचना होत्या. आता नंदिनीची शीतनिद्रेतून जागृतावस्थेत येण्याची क्रिया पूर्ण होत आली होती. इतक्या वर्षांच्या निद्रेनंतर हातपाय आखडणं साहजिकच होतं. डोळेपण सरावलेले नसतात. म्हणून त्यांचा ताण हळूहळू दूर करणं आवश्यक असतं. नंदिनी जरी पेटीबाहेर आली होती तरी अजून ऑपरेशन टेबलवरच होती. काही उपकरणं अजूनही जोडलेली होतीच; कारण आतड्यांची पचनक्रिया पूर्ववत व्हायला आणखी थोडा वेळ जायला हवा होता; पण आज तिचे डोळे उघडणार होते. मी, स्मिथ आणि डॉ. बरोज टेबलाभोवती उभे होतो. डॉक्टरांनी तिच्या डोळ्यांवरची पट्टी हलकेच दूर केली आणि तिला म्हणाले, ''नंदिनी, हळूच डोळे उघड. बघ, तुझ्यासमोर कोण उभं आहे.'' तिने हलकेच डोळे उघडले आणि माझ्याकडे पाहिलं. मग परत डॉक्टरांकडे पाहिलं. डॉ. बरोज यांनी होकारदर्शक मान हलवली आणि नंदिनीचे ओठ विलग होऊन पहिला शब्द बाहेर पडला, ''विजय... विजय.'' पण तेवढेही श्रम तिला झेपले नसावेत. तिने पुन्हा डोळे मिटून घेतले. डॉक्टरांनी तिथल्या उपकरणांवरून नजर फिरवली आणि मला म्हणाले, ''ती परत ग्लानीत गेली आहे. आपण उद्या परत भेटू या.'' मी सुटकेचा निःश्वास टाकला. अखेर माझी पालनकर्ती जीवनात परत आली होती. मी एका ऋणातून मुक्त झालो होतो; पण एक गोष्ट मला खटकत होती. तिला माझं नाव माहीत नव्हतं. तरीसुद्धा इतर कोणत्याही नावाऐवजी तिने मला 'विजय' म्हणूनच का हाक मारली? विवेक म्हणून का नाही? डॉक्टरांच्या पाठोपाठ आम्हीही केबिनमधून बाहेर पडलो. केबिनमध्ये आल्यावर मी त्यांना हाच प्रश्न विचारला. त्यावर ते फक्त हसले आणि त्यांनी त्यांच्या ड्रॉवरमधून एक फोटो काढून माझ्या हातात दिला. त्या फोटोत चार तरुण व्यक्ती होत्या. त्यांपैकी दोघांना मी लगेचच ओळखलं आणि इतर दोघांना ओळखायला जरा ताण द्यावा लागला; कारण त्या दोन तरुण व्यक्ती म्हणजे तरुणपणचे डॉ. बरोज व इयान स्मिथ होते आणि दोन परिचित व्यक्ती म्हणजे नंदिनी आणि खुद्द मीच होतो. मी गोंधळून डॉक्टर व स्मिथ यांच्याकडे पाहत होतो; तर डॉक्टर माझ्याकडे पाहत हसत होते. शेवटी मला कडकडून मिठी मारत डॉक्टर म्हणाले, ''जिंकलो, विजय आपण जिंकलो. नंदिनी परत आली आहे. कॉंग्रॅच्युलेशन्स विजय, कॉंग्रॅच्युलेशन्स! तिने तुला ओळखलं आहे.'' मी मिठी सोडवून घेत म्हणालो, ''डॉक्टर, मी विवेक संझगिरी आहे. विजय केळकर नाही. मी विजयसारखा दिसत असेन म्हणून नंदिनी फसली असेल; पण मी विजय नाही, विवेक आहे.'' डॉ. बरोज जरा वरमले; पण त्यांचा आग्रह तसाच होता. मान हलवत ते म्हणाले, ''खरं आहे. तू विवेक आहेस तसा विजयही आहेस. काय स्मिथ, मी म्हणतो ते बरोबर आहे ना? हा आपला विजयच आहे. आता नंदिनीनेसुद्धा त्याला ओळखलं आहे. अरे, हे बघ तुझे सगळे रिपोर्ट्स. हे फिंगर प्रिंट्स, हे डीएनए प्रिंट्स. हे थर्मोप्रिंट, हे सगळे विजयचेच आहेत. तू विजय आहेस. केळकर घराण्याचा वारस विजय केळकर तूच आहेस.''

आता स्मिथही पुढे सरसावले आणि माझे हात हातात घेऊन म्हणाले, ''श्री. विजय केळकर. आता माझ्या डोक्यावरचा भार हलका झाला आहे.

डॉक्टर, मला वाटतं, आता त्याला दुसरं पाकीट द्यायला हरकत नाही. चल, जरा कडक कॉफी घेतल्यावर तुला बरं वाटेल. सॉरी, तू अजून विवेकच आहेस, तेव्हा चहाच घेऊ. डॉक्टर, तिघांसाठी चहा मागवा. आज रात्री आपण विजयचं पुनरागमन साजरं करू या. कसं?''

''अरे! पुनरागमन कसलं? पुनर्जन्म म्हण; पुनर्जन्म!'' डॉ. बरोज म्हणाले.

मी खरोखरच गोंधळून गेलो होतो. एक डॉक्टर आणि एक सॉलिसिटर. दोघेही ठामपणाने सांगत होते की, मी विजय केळकरच आहे आणि मी जर खरोखरच विजय केळकर असलो तर मग फक्त बरोज व स्मिथ यांचीच वये का वाढली? नंदिनीचं एक ठीक आहे. ती शीतनिद्रेत होती; पण मी तर शीतनिद्रेत नव्हतो ना? मला लहानाचा मोठा करणारे अनेक साक्षीदार भारतात होते. विजय केळकर मात्र मेलेला आहे. त्याचं प्रेत नष्ट झालेलं आहे. खरंच का नष्ट झालं आहे? त्याचं पार्थिव गोठवून ठेवल्याचं डॉक्टर बरोज म्हणाले होते. आज तेच पार्थिव तर या लोकांनी जिवंत केलं नाही ना? डॉक्टर फ्रॅन्केस्टाईनसारखं. त्यांनी माझा, विवेकचा आत्मा किंवा मेंदू वापरला आहे का? मी चक्रावून गेलो होतो. तो ताण माझ्या चेहऱ्यावर दिसत असला पाहिजे. माझी अवस्था पाहून डॉक्टरांनी चहाबरोबर दोन गोळ्या दिल्या. डॉक्टरांनी त्या रात्री माझी व्यवस्था त्यांच्याच हॉस्पिटलमध्ये केली होती. दुसऱ्या दिवशी मी जागा झालो त्याची वर्दी त्यांना लगेचच दिली गेली होती. बहुधा डॉक्टरही रात्रभर इथे हॉस्पिटलमध्येच राहिले असावेत. मी उठून बसलो होतो. डॉक्टरांनी आल्या आल्या माझी नाडी पाहिली आणि समाधानाने मान हलवून म्हणाले, ''छान आहे. आता ब्रेकफास्ट घेऊ, तू फ्रेश हो. मग परत नंदिनीकडे जाऊ.'' मी डॉक्टरांना हात धरून शेजारी कॉटवर बसवून घेतलं आणि म्हणालो, ''डॉक्टर, मला खरं सांगा, मी कोण आहे? मी विजय नाही. मग मला ती भूमिका पार पाडायला का सांगता आहात. नंदिनी माझी उपकारकर्ती आहे हे कबूल आहे. तिच्या समाधानासाठी किंवा वैद्यकीय उपचारांचा एक भाग म्हणून मी ती भूमिका वठवायला तयार आहे; पण त्यासाठी मला विजयच्या आयुष्याची थोडी तरी कल्पना द्या. नाहीतर माझं तोतयेपण उघडं पडेल. तो मानसिक आघात तिला कोलमडवून टाकेल; कारण मी तोतया विजय आहे हे कधी ना कधी तरी तिला कळणारच आहे. आणि मी काही कायमचा - नंदिनीचा नवरा विजय म्हणून इथे राहू शकणार नाही. माझं सुलभाशी लग्न ठरलं आहे, तेव्हा मला भारतात परत गेलंच पाहिजे.'' डॉक्टरांनी माझ्या खांद्यावर हात ठेवला आणि थोडा वेळ तसेच बसले. नंतर सुस्कारा सोडत बोलू लागले, ''माझ्या मनातील भीती खरी ठरली आहे; त्याला आता काळच उत्तर देईल. तरीपण मी तुला ठामपणे सांगतो. तू नंदिनीचा खराखुरा विजय केळकरच आहेस. विस्तृतपणे सांगायला आता वेळ नाही. तू काही काळ तरी विरोध करू नकोस. ती आत्ताच शीतनिद्रेतून उठलेली आहे. तिचे मनोव्यापार, आठवणींचे तपशील अजून तरी संक्रमणावस्थेत असण्याची शक्यता आहे. झोपेतून उठलेल्या माणसाला आजूबाजूची परिस्थिती आकलन व्हायला काही क्षण जावेच लागतात. मग तिची तर दीर्घ निद्रा होती. एक लक्षात ठेव, विजय आणि नंदिनी दोघेही आमचे चांगले मित्र आहेत. तेव्हा तुमचं भावी आयुष्य सुखाचं जाईल याची मी काळजी घेईन. त्यासाठी आवश्यक वाटलं तर मला काही शस्त्रक्रियाही कराव्या लागतील; पण विजय, मला थोडा वेळ दे. आता मला काही विचारू नकोस. मी नंतर तुला सगळं सांगेन; पण आता आटप लवकर. नंदिनी तुझी वाट बघत असेल.'' मला बळजबरीने उठवत डॉक्टर म्हणाले.

नंदिनी माझी उपकारकर्ती होती. तिच्यासाठी तरी मला विजयची भूमिका पार पाडायलाच हवी होती. मी त्यांच्याबरोबर निघालो. नंदिनी माझी वाटच पाहत होती. अजून काही वायर्स व नळ्या जोडलेल्या होत्याच. इतक्या दीर्घ काळानंतर पचनसंस्था परिपूर्ण व्हायला वेळ लागणार होता, असं डॉक्टर म्हणाले होते. तोल सांभाळणंही सवयीनेच जमणार होतं. म्हणून तिला उठायची परवानगी नव्हती. मला पाहताच तिच्या डोळ्यांत स्फुल्लिंग चमकलं. मी जवळ जाताच तिने माझा हात हातात धरून ठेवला. ''विजयऽऽ विजय, काहीतरी बोल ना.'' ती म्हणत होती. मी काय बोलणार होतो? ''कशी आहेस?'' ''आता कसं वाटतं?'' याव्यतिरिक्त मी तरी काय बोलणार होतो. मी अगतिकपणे डॉक्टरांकडे पाहिलं, तेव्हा तेच माझ्या मदतीला आले आणि म्हणाले, ''नंदिनी, फार बोलायचं नाही असं मी त्याला सांगितलं आहे. तूसुद्धा जास्त बोलू नकोस. त्रास होईल.'' त्या दिवशीची मुलाखत तेवढ्यावरच संपली. अर्थात, त्या श्रमांनीदेखील ती थकली होती; पण तिची शक्ती झपाट्याने परत येत होती. आणखी दोन दिवसांनी ती हिंडूफिरू लागेल, असं डॉक्टर म्हणाले. बाहेर आलो, तेव्हा इयान स्मिथही आलेले होते. ''काय म्हणते आहे नंदिनी?'' त्यांनी विचारलं. ''ठीक आहे. लवकरच नॉर्मलला येईल.'' असं डॉक्टरांनी उत्तर दिलं. आम्ही त्यांच्या केबिनमध्ये येऊन बसलो. मी सुरुवात केली.

''डॉक्टर, आता मला सांगा, मी कोण आहे? आणि मला विजयची भूमिका का करायला सांगता आहात? मी जर विवेक संझगिरी आहे तर माझे नुसते फिंगर प्रिंट्स नाही, तर इतरही प्रिंट्स विजयशी कसे जुळतात? सगळेच प्रिंट्स जुळणे ही जवळजवळ अशक्य गोष्ट आहे. का हासुद्धा एक कटाचाच भाग आहे. आज नंदिनी मला सारखी काहीतरी बोल म्हणून सांगत होती. मी काय बोलणार होतो? कारण मी विजय नाही.'' स्मिथ आणि बरोज एकमेकांकडे पाहत होते.

''स्मिथ, हा म्हणतो ते खरं आहे. आता नंदिनीला फार काळ थोपवता येणार नाही.'' काल त्याला त्याचं पाकीट द्यायचं राहिलं होतं. ''मि.विवेक, आज तुम्ही हे पाकीट घेऊन जा. नंदिनीने हे तुमच्यासाठीच ठेवलेलं आहे,'' असं म्हणून त्यांनी त्यांच्या टेबलाच्या खणातून एक पाकीट काढून माझ्या हाती ठेवलं.

''त्यानंतर मी हॉटेलवर परत आलो आणि मग वाचू लागलो. ते पत्र वाचेपर्यंत माझ्या मनात विवेक की विजय, असा नुसताच गोंधळ चालू होता; पण ते पत्र वाचल्यानंतर एक मोठा स्फोट होऊन मेंदूच निकामी झाल्यासारखं झालं आहे. नंदिनीशी वागताना मी विवेक आहे हे विसरू शकत नाही तर सुलभाशी बोलताना मी विजय आहे, याची टोचणी लागते; त्यामुळे एकट्या सुलभाशी बोलायचा धीर होत नाही. हेच ते पत्र.'' विवेक एक पत्र पुढे करीत म्हणाला ''वाच.''

शेवटी नंदिनीने ते पत्र विजयला लिहिलेले होते. तिने विश्वासाने ते विवेकला वाचायला दिले. मला ते पत्र वाचणे अनुचित वाटले म्हणून मी

ते पत्र त्याला तसेच परत केले. ''ठीक आहे. तुला वाचायचे नसेल तर नको वाचूस; पण मी कोण? या सुलभाला पडलेल्या प्रश्नाचे उत्तर या पत्रात आहे, तेव्हा मीच पत्र वाचून दाखवतो.'' विवेक म्हणाला.

प्रिय विजय,

हे पत्र तू वाचत असशील, तेव्हा मी शीतनिद्रेतून जागी झालेली असेन. माझ्या पूर्वस्मृती परत आलेल्या असतील, असे मी गृहीत धरते आहे. जग तुला आणि तू स्वतःला जरी विवेक म्हणून ओळखत असलास तरी तू मात्र माझा विजयच आहेस. मला तो दिवस आठवतो. आपण वीकएण्डसाठी जात होतो. तू गाडी चालवत होतास, तेव्हा आपल्या गाडीला जबरदस्त अपघात झाला. मी शेजारी असल्याने थोड्याफार दुखापतींवर निभावले; पण तुला जेव्हा डॉ.बरोज यांच्या हॉस्पिटलमध्ये आणलं, तेव्हाच सर्वांनी आशा सोडलेली होती; पण मी निराश झाले नव्हते. म्हणजे तुझा मृत्यू अटळ होता, हे मलाही कळलं होतं. म्हणून मी डॉक्टरांना विश्वासात घेतलं होतं आणि मृत्यूनंतर तुझं शरीर गोठवून ठेवलं होतं. तुझ्या शारीरिक अवयवांची एवढी मोडतोड झालेली होती की, वाचला असतास तरी जिवंत प्रेत एवढंच शिल्लक राहिलं असतं. मला ते नको होतं. मला माझा विजय एकसंध पाहिजे होता. आपला अर्धवट राहिलेला संसार मला पुरा करायचा होता. त्यासाठी मी एक मार्ग शोधला होता. त्याला डॉक्टर बरोज यांचीही साथ मिळाली. तुझ्या मृत्यूनंतर मी अविरत प्रयत्नांनी तुझा क्लोन किंवा प्रतिरूप तयार केले होते. त्यासाठी सतत दोन वर्षं प्रयत्न चालू होते. मी स्वतःच डॉक्टर, संशोधक होते. जोडीला बरोज आणि त्यांच्या हॉस्पिटलची साथ होती. क्लोनिंगसाठी मी माझं बीजांड वापरलं होतं तर केंद्रक मात्र तुझ्या शरीरातील पेशींपासून घेतला होता. या बाबतीत मी तुझ्या आई-वडिलांनाही सांगितलं नाही. मी शीतनिद्रेतून बाहेर आले की, आपण दोघं त्यांना भेटायला जाऊन, त्यांना आश्चर्यचकित करू. त्यांना आपला विजय परत मिळाल्याचं समाधान मला पाहायचं आहे. आता तू म्हणशील की, त्यांच्यापासून लपवून ठेवण्याचं कारण काय? कारण त्यांच्या मते असे अनैसर्गिक प्रयोग करणं योग्य नव्हतं. त्यापेक्षा मी पुनर्विवाह करावा आणि केळकर कुटुंबाचा व्यवसाय सांभाळावा असं त्यांचं मत आहे; पण मला माझा विजयच पाहिजे आहे. दुसऱ्या कुणाचाही मी जोडीदार म्हणून विचार करूच शकत नाही. म्हणूनच जर गेल्या २५ वर्षांत तुझं काही बरंवाईट झालं असतं आणि तू माझा विजय राहिला नाहीस तर मला शीतनिद्रेतून जागं न करण्याबद्दल मी डॉ.बरोज यांना सांगितलं होतं; पण तुझं नाव आणि ठावठिकाणा त्यांना माहीत नव्हता; तर स्मिथ यांना विवेक संझगिरी ठाऊक आहे; पण तो माझा कोण ते माहीत नव्हतं. योग्य वेळी ती माहिती ते एकमेकांना देतील याबद्दल मला खात्री आहे. तुझा क्लोन मी भारतातच वाढवायचं ठरवलं होतं. त्यानुसार माझ्या माहेरच्या गावची माझी मावस बहीण तयार झाली होती. म्हणून तू भारतात विवेक संझगिरी म्हणून वाढलास. माझी खात्री आहे की, तुला तुझ्या दुसऱ्या बालपणीसुद्धा उत्तम संस्कार मिळाले असतील; कारण संस्कार हे विकत मिळत नसतात. विजय मी वेडी असेन, तुला भारतीय पुराणे माहीत असतील. पार्वतीने शंकरासाठी अनेक जन्म तप केले. जळत्या चितेतसुद्धा उडी घेतली; पण तिने महादेवाची पत्नी होण्याचा ध्यास मात्र सोडला नाही. ही नंदिनी तशीच आहे असे समज. पार्वतीने धगधगत्या यज्ञकुंडाला समर्पण केले. मी शीतनिद्रेत गेले होते. पुराणात पार्वतीचा पुनर्जन्म होता, तर आता महादेवाचा (तुझाच) पुनर्जन्म झालेला आहे, तेव्हा विजय जेथून आपला संसार संपला होता, तेथूनच आपण आपला संसार पुढे सुरू करणार आहोत.

गेली २५ वर्षं - तुझी आणि फक्त तुझीच वाट पाहणारी

– **नंदिनी**

वाचलेलं पत्र माझ्या आणि सुलभाच्या पुढे ठेवत विवेक म्हणाला, ''मला खरंच कळत नाही की, मी काय करू? गेले आठ दिवस मी आणि नंदिनी एकत्र वावरतो आहोत. काही वेळा नंदिनी खूप जवळ येते; पण डॉ.बरोजनी सांगितलं आहे की, स्त्रीची नैसर्गिक अवस्था म्हणजे मासिक पाळी व्यवस्थित झाल्याशिवाय तिचे सर्व व्यवहार नॉर्मल झाले आहेत, असं म्हणता येणार नाही. म्हणूनच तिने अजूनपर्यंत तरी मर्यादा ओलांडलेली नाही. ती संयम राखून आहे. म्हणूनच मी त्या कालावधीत भारतात परत आलो आहे. मला केव्हाही लंडनला परत जावं लागेल. मी जर परत गेलो नाही तर नंदिनी हाय खाईल. तिने खरोखरच माझ्यावर जिवापाड प्रेम केलेलं आहे. प्रत्यक्ष मृत्यूशी झुंज घेतली आहे. मी सुलभाला विसरू शकत नाही किंवा नंदिनीशीही प्रतारणा करू शकत नाही. मी नंदिनीचा विवाहित पती आहे आणि सुलभाचा व माझा विवाह अजून तरी झालेला नाही. तुम्हीच सांगा. आता मी काय करू?''

खोलीत एक निःशब्द शांतता पसरली होती. विवेक खाली मान घालून बसला होता. सुलभा कॉटला मागे टेकून बसली होती. मी ते पत्र हातात घेऊन परत एकदा वाचत होतो.

***

**भाग २**

माझं पत्र वाचून झालं तरी विवेक आणि सुलभा तसेच स्तब्ध बसून होते. विवेकची मानसिक अवस्था मी समजू शकत होतो. विवेक मानसिक तणावाखाली होता यात शंकाच नाही; पण सुलभा, तिचं काय? इतके दिवस दोघंही हिंडलीफिरली. ज्याला आपण आपला भावी पती म्हणून निवडलं, तो एके दिवशी अचानक नाहीसा होतो आणि परतल्यावर सांगतो, ''मी तुझा होऊ शकत नाही; कारण माझी पहिली पत्नी अस्तित्वात आहे.'' सुलभाची स्थिती काय झाली असेल, तिला अशी पुतळ्यासारखी स्तब्ध झालेली पाहून मला शंका आली. मी तिच्या डोळ्यांसमोरून हात फिरवला. नजर तशीच स्थिर राहिली. मग मी तिला गदागदा हलवलं तर ती तशीच आडवी झाली. मग मात्र माझा धीर सुटला. सुलभाला झटकन उचलून कॉटवर ठेवली, विवेकला तिच्याजवळ बसायला सांगितलं. पलीकडच्याच बिल्डिंगमध्ये डॉक्टरांचा दवाखाना होता. धावतच जिना उतरून डॉक्टरांच्या केबिनमध्ये घुसलो. डॉक्टर

एका पेशंटला तपासत होते. त्यांना सुलभाच्या स्थितीबद्दल सांगितल्यावर त्यांनी इतर पेशंट्सना जरा थांबायला सांगितलं आणि थोडी जुजबी औषधं व सामानाची बॅग घेऊन माझ्याबरोबर वर आले. सुलभा अजून तशीच पडलेली होती. विवेक तिच्या तोंडावर पाणी मारून, वारा घालत होता. डॉक्टरांनी तिला तपासून काही धोका नसल्याचं सांगितलं. हा फक्त मानसिक धक्क्याचा परिणाम होता. तिचे डोळे उघडेच होते. डॉक्टरांनी तिला एक झोपेचं इंजेक्शन दिलं आणि विश्रांतीचा सल्ला दिला. आता खरी अडचण आली; ती रात्रभर विवेकच्या ब्लॉकवर राहू शकणार नव्हती. सुलभाच्या घरी तरी काय सांगणार? शेवटी सुलभाच्या भावाला फोन करून बोलावलं आणि ॲम्ब्युलन्स करून घरी पोहोचवलं. नशीब एवढंच की, तिचे वडील गावाला गेले होते; पण घरी आल्यावर त्यांना हे कळणारच होतं. आजचं मरण उद्यावर ढकललं गेलं होतं. त्या रात्री मी विवेकच्या ब्लॉकवरच राहिलो. त्याची परिस्थिती फारशी चांगली नव्हती; पण तो पुरुष होता, असं म्हणण्यापेक्षा त्याच्या मनाची पूर्वतयारी झालेली होती. सुलभाला बसणारा धक्का त्याला तसा अपेक्षित होता; पण त्याची तीव्रता किती असेल याचा त्याला अंदाज नव्हता. म्हणून तर त्याने सुलभाबरोबर मलासुद्धा हजर राहायला बोलावलं होतं. सुलभाच्या भावाला जरी मानसिक धक्का एवढंच कारण सांगितलं होतं; तरी तिच्या वडिलांना सर्व हकिकत सांगणं भागच होतं. प्रश्न होता की, ते किती समजूतदारपणे वागणार होते याचा; कारण विवेक काही दिवस बेपत्ता झाल्याचं त्यांना माहीत होतंच. त्यांना हे माहीत नव्हतं की, तो परत आला आहे. आणि त्या काळात भयंकर मोठी उलथापालथ झालेली आहे. रात्री मीच चहा केला, विवेकला बळजबरीने पाजला. त्याच्या अवस्थेकडे बघून त्याने केव्हा खाल्लं होतं याचा अंदाज येत नव्हता. येताना बरोबर पाव आणला होता. तोसुद्धा खायला लावला; कारण काही झालं तरी शरीर आपलं काम करतच होतं. धावपळ झाली होती. पोटातल्या भुकेने रात्री शांत झोप लागली असती की नाही याची शंकाच होती. खाल्ल्यावर जरा बरं वाटलं. विवेक तसाच बसून होता. शेवटी मीच विषय काढला.

''विवेक, आता पुढे काय करायचं ठरवलं आहेस?'' मी विचारलं.

''कशाबद्दल?'' विवेकने शांतपणे विचारलं.

''कशाबद्दल म्हणजे? याच्याबद्दलच. तुझा पुढचा काय बेत आहे? म्हणजे इथेच राहणार आहेस की परत लंडनला जाणार आहेस?'' मी विचारलं.

''खरं सांगू? मी गोंधळून गेलो आहे. मी आज इथे जो अस्तित्वात आहे तो नंदिनीमुळेच तर आहे. नंदिनी नसती तर मी इथे दिसलो तरी असतो का? तिने नुसताच मला पुनर्जन्म दिलेला नाही, तर तिने स्वतःसुद्धा हाच पती मिळावा म्हणून कठोर तपःसाधना केलेली आहे. सुलभाच्या किंवा तुझ्या दृष्टीने मी जरी विवेक असलो तरी तिच्या दृष्टीने मी विजयच आहे. तो विजय प्राप्त करून घेण्यासाठी तिने गेली २५ वर्षं समाधीत घालवली आहेत. जगातील सर्व उपभोग दूर सारून तिने ती वर्षं एक प्रकारे मृतावस्थेत घालवलेली आहेत. तिचं माझ्यावरचं प्रेम सुलभापेक्षा कणभरही कमी नाही. डॉ.बरोज यांच्या प्रयोगशाळेत गेल्या २५ वर्षांतील एखादी लहानशी चूकसुद्धा नंदिनीचं जीवन संपवू शकली असती. तो धोका तिने माझ्यासाठीच पत्करलेला होता ना? अरे! मला कळत का नाही. मी मिळणार नाही, या कल्पनेनेच सुलभाला इतका जबरदस्त धक्का बसलेला आहे; पण तिकडे नंदिनीचा विजय खरोखरच अपघातात छिन्नविच्छिन्न होऊन मेला होता, तो प्रचंड आघात तिने सहन केला. एवढंच नव्हे तर जिद्दीने उभी राहून विचारपूर्वक निर्णय घेतले. आयुष्याचा जुगार खेळली ती नंदिनी. मग तिने जर माझी अपेक्षा धरली तर त्यात तिचं काय चुकलं? सुलभाचं माझ्यावर प्रेम आहे हे खरं; पण मी नाही म्हटल्यावर तिला आपला मार्ग शोधता येईल, तिचे आई-वडील, भाऊ तिला सावरायला, परत उभं राहायला मदत करतील; पण नंदिनीचं काय? तिला धीर द्यायला, आधार द्यायला कोण आहे? मी नाही म्हटल्यावर हाय खाऊन ती जीव देईल रे.'' विवेक म्हणाला.

''म्हणजे तू नंदिनीकडे परत जायचं ठरवलं आहेस तर! जर तसंच ठरवलं असशील तर भारतात परत कशाला आलास? जाताना तू न सांगता निघून गेला होतास. तुझा कोणताच ठावठिकाणा आम्हाला माहीत नव्हता. कालांतराने सुलभासुद्धा तुझी आठवण विसरली असती आणि मग तिने नवीन आयुष्य सुरू केलं असतं किंवा तुझी वाट बघत अविवाहित राहिली असती. तरी तुला त्याचं काहीच सोयरसुतक नव्हतं. फार तर एखाद्या वर्षाने तुझ्या मृत्यूची बातमी कळवून द्यायची होतीस. तो आघातही काही काळाच्या विरहानंतर तिने सोसला असता.''

''विवेक, तू परत येऊन फार मोठी चूक केलीस. अकारण सुलभाच्या मनावर आघात केला आहेस. तुला तुझा मार्ग मोकळा होता; पण मग सुलभाचं आयुष्य का उद्ध्वस्त केलंस?'' मी विचारलं.

''असं म्हणू नकोस रे. खरं सांगू, मी स्वतःच गोंधळून गेलो आहे. मला कुणाच्या तरी सल्ल्याची गरज आहे आणि मला सल्ला देणारे तू आणि सुलभा दोघेच तर आहात. म्हणून मी सवड मिळताच भारतामध्ये परत आलो. ही हकिकत मी सुलभाला सांगायला नको होती; पण भारतात परतल्यावर सुलभाला भेटल्याशिवाय राहणं मला शक्यच नव्हतं. त्यातही माझ्या गूढपणे नाहीसं होण्याचा खुलासा करणं अपरिहार्यच होतं. मी फसवलं, असं सुलभाला वाटता कामा नये, असं मला वाटत होतं. खरं म्हणजे मी फक्त तुलाच एकट्याला भेटून तुझा सल्ला घ्यायला हवा होता. तिला बोलवायला नको होतं. माझं चुकलंच.'' विवेक म्हणाला. ''पण आता यातून मार्ग कसा काढायचा ते सांग.''

''उद्या बघू,'' असं म्हणून मी त्याला झोपायला सांगितलं.

विवेक म्हणत होता त्यात तथ्य होतं. आज जो विवेक आमच्यासमोर उभा होता तो नंदिनीमुळे होता. मग भले तो तिचा विजय का असेना. आजच्या घटकेपर्यंत तरी तो विवेक म्हणून वाढला होता, तो शिकला होता नंदिनीच्या पैशावर. नंदिनीने जर निर्णय घेतला नसता, पैशांची व्यवस्था केली नसती तर विवेक अस्तित्वातच येऊ शकला नसता. खरा घोटाळा झाला होता तो विवेक हाच विजय आहे, हे लपवून ठेवल्यामुळेच! जर विजयचा क्लोन इंग्लंडमध्येच वाढवला गेला असता तर किंवा त्याला पहिल्यापासूनच सत्य सांगितलं असतं तर ही परिस्थिती उद्‌भवली नसती; पण नियतीच्या मनात काय होतं कुणास ठाऊक? नंदिनीने विजयला वाढविण्यासाठी भारताची निवड केली होती. एवढंच नव्हे तर विजयचं अस्तित्व पुसून टाकून त्याला विवेक हे नवीन नाव दिलं होतं; पण यात सुलभाचा तरी काय दोष आहे? समजा, विवेकऐवजी

विजय असता तरी त्याचं प्रेम थोडंच थांबणार होतं? आणि विजय जरी भारताऐवजी इंग्लंडमध्येच वाढला असता तरी तो सुलभाऐवजी कोणा सॅलीबरोबर गुंतण्याचीही शक्यता होतीच की. मला वाटतं, नंदिनीने बहुधा याच कारणासाठी इंग्लंडऐवजी भारताची निवड केलेली असावी. भारतापेक्षा इंग्लंडमधील वातावरणात, तेसुद्धा भावी २५ वर्षांत, त्याचीच जास्त शक्यता तिला वाटली असेल. शिवाय तिच्या सासू-सासऱ्यांचाही क्लोनिंगला विरोध होताच. विवेक नाव देऊन तिने इयान स्मिथलाही अंधारात ठेवलं होतं. तिच्या दृष्टीने तिने योग्य निर्णय घेतला होता; कारण ती चर्चा तरी कोणाबरोबर करणार होती?

भारतात पुनर्जन्माची अनेक उदाहरणं आहेत. त्या बहुतेकांच्या कथा अशाच आहेत. पुनर्जन्मानंतर काही काळ ती व्यक्ती सर्वसामान्यांप्रमाणेच वागते; मग अचानक तिला मागील जन्माच्या आठवणी येतात. त्या आठवणी तिला मूळ ठिकाणी किंवा संबंधित व्यक्तीकडे खेचून नेतात; पण कालांतराने त्या आठवणीही पुसट होत जातात. ओढ कमी होते आणि ती व्यक्ती परत चालू काळाबरोबर समरस होते.

क्लोनिंगमध्ये काय होतं कुणास ठाऊक! मूळ व्यक्तीवर स्मृती कितपत शाबूत राहतात. आवडीनिवडी बदलतात का? बदलत असाव्यात; कारण विजयला कॉफी आवडत होती, तर विवेकला चहा आवडतो. तसं असेल तर विवेकला नंदिनीबद्दल खरीखुरी ओढ वाटण्याची शक्यताही बदलू शकेल. थोडक्यात, काळ हेच या प्रश्नाचं उत्तर असू शकेल. दुसऱ्या दिवशी विवेक जागा झाला, तेव्हा त्याला थोडी हुशारी वाटत होती. उठल्या उठल्या त्याने सुलभाची चौकशी केली, तेव्हा सगळं आटोपून नंतर सुलभाकडे जाण्याचं ठरवलं होतं; पण त्याआधी मी तिला फोन करणार होतो. फोन तिच्या आईनेच घेतला. सुलभा अजून जागी झाली नव्हती. त्यांनी जास्त चौकशी करण्यापूर्वीच मी फोन बंद केला. आता विवेकबरोबर व्यवस्थित बोलता येणार होतं. तो आता नीट विचार करू शकणार होता. सुलभाकडे मी सकाळीच जायचं ठरवलं. ब्रेकफास्ट, अंघोळ आटोपल्यावर मी सुरुवात केली.

''हे बघ विवेक. जे झालं आहे किंवा घडून गेलं आहे, त्याबद्दल आता विचार करण्यात अर्थ नाही. आपण आहे त्या परिस्थितीतून मार्ग काढायला हवा. आता सद्यःस्थितीचं विश्लेषण करू या.

१) तुझं सुलभावर प्रेम आहे; तसंच सुलभाचंही तुझ्यावर प्रेम आहे.

२) नंदिनीचं तुझ्यावर प्रेम आहे; पण तुझं नंदिनीवर प्रेम नाही, तर ती तुझी उपकारकर्ती म्हणून तू तिच्याकडे बघतो आहेस.

३) नंदिनीने तुझ्यासाठी अगदी मृत्यूचा धोकाही पत्करला आहे.

४) सध्याचं तुझं आयुष्य हे नंदिनीच्याच प्रयत्नांतून साकारलेलं आहे. एवढंच नव्हे, तर तुझी सध्याची नोकरीसुद्धा त्यांच्याच ट्रस्टमार्फत मिळालेली आहे. तेव्हा इयान स्मिथ यांच्याकडून प्रथम या ट्रस्टबद्दलची माहिती मिळव. म्हणजे हा पैसा कुणाचा आहे? विजयचा की नंदिनीचा? विजय जर कायदेशीररीत्या मृत्यू पावलेला असेल तर त्या पैशांची मालकीण नंदिनीदेखील असू शकेल. तू सांगितल्याप्रमाणे नंदिनी जर परत सामान्य स्त्री होऊ शकली नसती तर ट्रस्टकडून तुला पैसा मिळत राहिला असता; पण आता नंदिनी पूर्णपणे नॉर्मल झाली आहे, तेव्हा एखाद्या वेळी ती तुझा पैसा थांबवूही शकेल.'' विवेकला हळूहळू माझं बोलणं पटत होतं, असं दिसलं. तरी तो म्हणाला, ''पण त्या सुलभाचं काय करायचं? तिची समजूत कोण काढणार? मला तर तिच्यासमोर जायचा धीरच होणार नाही; कारण काल तू तिची अवस्था पाहिलीस. तू होतास म्हणून सगळं निभावलं. म्हणूनच मला वाटतं की, ते कामही तूच करावंस.''

''ठीक आहे; मी बोलेन सुलभाशी. तिच्या वडिलांनासुद्धा सगळं समजावून सांगावं लागेल. तूदेखील इयान स्मिथ आणि डॉ. बरोजना लगेचच पत्र टाक, मी निघतो.'' मी म्हटलं. सुलभाकडे मी येत असल्याचा फोन करून कळवलं होतंच; त्यामुळे ती सगळं आटोपून बसली होती. सुलभाचे वडील घरी नव्हते; पण चिंताग्रस्त आई मात्र होती. त्यांना पटेल असं काहीतरी कारण सांगणं भाग होतं. म्हणून मी त्यांना खऱ्या-खोट्याचं मिश्रण करून सांगितलं. ''तुम्हाला माहीत आहेच की, विवेकचा खर्च एका ट्रस्टमार्फत केला जातो. तो ट्रस्ट इंग्लंडमध्ये आहे. वयाच्या २५व्या वर्षी काही अटींची पूर्तता करण्यासाठी त्याला तातडीने इंग्लंडला जावं लागलं होतं, त्या अटींच्या पूर्ततेमध्ये काही अडचणी आल्या आहेत. त्यांचे निराकरण व्हायला वेळ लागेल; त्यामुळे विवेक अस्वस्थ झालेला आहे; पण काळजी करू नका. सर्व काही ठीक होईल.'' एवढं सांगून मी सुलभाशी बोलायला म्हणून सटकलो. मी सुलभाशी बोलतो, असं विवेकला सांगून मी इथे आलो होतो तरी मलाच कळत नव्हतं की, मी सुलभाशी काय बोलणार होतो? प्रत्यक्ष विवेकने सुलभाशी बोलणं वेगळं आणि मी बोलणं वेगळं. विवेकच्या वतीने मी सुलभाला कोणतंही आश्वासन देऊ शकत नव्हतो. विवेक तर काही बोलायला किंवा सांगायला तयार नव्हता. माझा हेतू फक्त कालहरणाचा होता; कारण पहिला धक्का ओसरून जायला काही काळ जावाच लागला असता. सुलभा आता बरीच सावरली होती. अर्थात जरी ती अंघोळ-वेणीफणी करून बसली होती तरी रडून डोळे लाल झालेले होते. मी खोलीत गेल्यावर तिनं माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाली, ''बैस.'' मी बसलो. प्रथम तिलाच सुरुवात करू दे म्हणून गप्पच बसलो होतो.

''आता कसं वाटतंय? बरं आहे ना?'' माझ्या बोलण्यातील औपचारिकपणा जाणवण्याइतकं तरी तिचं लक्ष होतं की नाही माहीत नाही; पण उत्तर आलं, ''ठीक आहे.'' परत काही काळ दोघंही गप्पच! तेवढ्यात सुलभाची आईच आत आली आणि विचारलं, ''काय रे, चहा घेणार का?''

''नको आई. या वेळेला कशाला त्रास.'' मी म्हटलं. त्यावर त्या म्हणाल्या ''अरे घेऽ रे थोडा. सुलभासाठीही करतेच आहे. सकाळपासून नुसती बसून आहे. एक कप चहाशिवाय काही घेतलेलं नाही. म्हटलं, थोडंफार खाऊन घे. तर म्हणते भूक नाही. आता तू आलाच आहेस तर समजाव तिला. विवेकशी भांडण वगैरे झालं की काय? तसं असतं तर रागावलेली दिसली असती; पण ती तर काहीच बोलत नाही. तू म्हणतोस की, विवेकला परत लंडनला जावं लागणार आहे. काम असलं तर जायलाच हवं आणि कायमचा तर नाही ना जात आहे?''

''आई,'' सुलभा ओरडली. ''उगाच काहीतरी बोलू नकोस आणि समजा, अगदी कायमचा जरी गेला तरी मी काय करू शकणार आहे? मी काय त्याची लग्नाची बायको थोडीच आहे त्याला अडवायला आणि जरी असते, तरी लग्नानंतरही पुरुष जातातच ना तिकडे? करतातच ना दुसऱ्या

बायको?'' ती तडकली.

''सुलभाऽऽ शांत हो.'' मी तिला अडवत म्हणालो.

सुलभाही ओशाळली आणि म्हणाली, ''सॉरी, आई असं कर. थोडा चहा घेऊन ये. जमलं तर थोडं खायलासुद्धा कर. भूक लागली आहे.'' सुलभाच्या आई कानकोंड्या होऊन उभ्या होत्या. शेवटी मीच म्हटलं, ''आई, विवेकच्या अनपेक्षित निर्णयाने तिला जरा धक्का बसला आहे. मी बोलतो तिच्याशी आणि मघाशी नको म्हटलं खरं; पण थोडा चहा करा बुवा आणि काहीतरी खायलाही करा. सुलभाला कंपनी देईन म्हणतो.'' आई गेल्यावरसुद्धा सुलभा खाली मान घालून बसली होती. शेवटी मग मीच सुरुवात केली.

''हे बघ सुलभा, काल आपल्या तिघांच्यामध्ये जे बोलणं झालं आहे, ते तुझ्या घरीसुद्धा कोणाला माहीत नाही, असं मी गृहीत धरतो; कारण तू ते सांगायच्या मनःस्थितीत नव्हतीस आणि मीदेखील त्यांना काही सांगितलेलं नाही. तुझ्या आईंना फक्त एवढंच सांगितलं आहे की, ज्या ट्रस्टतर्फे विवेकला पैसे मिळत होते, त्या ट्रस्टच्या काही अटींची पूर्तता करण्यासाठी त्याला परत इंग्लंडला जाणं भाग आहे. हे बोलताना मी मुद्दामच कालमर्यादेचा उल्लेख केलेला नाही. तुझ्या वडिलांची हीच समजूत राहू दे, असं मला वाटतं.''

''दुसरी एक गोष्ट लक्षात घे. तू किंवा विवेक दोघांच्याही परिस्थितीत फारसा फरक नाही. तोसुद्धा तुझ्याइतकाच अस्वस्थ किंवा निराश झालेला आहे. जरी या परिस्थितीला तू किंवा तो जबाबदार नसलात तरी अनाहूतपणे त्यात गोवले गेले आहात. म्हणून मला वाटतं की, तुम्ही दोघांनी कोणताही निर्णय घेण्यापूर्वी परत एकदा भेटून बोलावं. हे सर्व सांगणं सोपं आहे, हे मला कळतं; पण काळ हा उत्तम वैद्य आहे. कालांतराने तो सर्व जखमा बुजवतो, तेव्हा माझ्या मते काळच या परिस्थितीवर उपचार ठरू शकेल.''

''मी विवेकशी बोललो आहे. पहिल्या प्रथम मी त्याला मिळणाऱ्या पैशाबद्दल खुलासा करून घ्यायला सुचवलं आहे; कारण त्या ट्रस्टच्या नियम व अटी काय आहेत, याची त्याला कल्पना नाही, तेव्हा त्याने जर त्या अटींचा भंग केला तर त्याचे परिणाम काय होतील, तेसुद्धा त्याला माहीत नाही. एखाद्या वेळेस त्याची नोकरीदेखील जाऊ शकेल; कारण जे लोक त्याला नोकरीवर ठेवू शकतात ते काढूही शकतील आणि अशा कंपनीने काढून टाकलेल्यांना दुसरी नोकरी मिळणं तर फार कठीण जातं. जर ते पैसे मिळणे बंद झालं तर त्याच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा राहील. खरं म्हणजे आपण यापूर्वीच त्याच्या सांपत्तिक स्थितीची माहिती करून घ्यायला हवी होती; परंतु मिळणारे पैसे भरपूर असल्याने त्याने व आपणही मैत्रीपोटी कधीच ही चौकशी केली नाही, हे खरं आहे. जर उदरनिर्वाहाचं साधनच नष्ट झालं, तर तुमचा भावी संसार कसा चालणार, याचासुद्धा विचार करायला हवा; कारण प्रेमामुळे संसारातील अडचणी जरी सुसह्य झाल्या तरी त्यामुळे पोटा-पाण्याचा प्रश्न मात्र सुटत नाही. एक मात्र खरं आहे. विवेकचं तुझ्यावरील प्रेम खरं आहे; बनावट नाही. म्हणून तर तो निव्वळ तुझ्यासाठीच भारतात परत आला. तुला सोडून दुसरीबरोबर लग्न करण्याचा विचारही त्याला सहन व्हायचा नाही. म्हणून तो हताश झाला आहे. याउलट नंदिनी त्याची जीवनदात्रीच आहे. तिला दुखावणं विवेकसारख्या माणसाला फारच क्लेशदायक ठरणार आहे.'' मी बोलत होतो; पण सुलभाकडून काहीच प्रतिक्रिया येत नव्हती. मी बोलत होतो ते तिच्यापर्यंत पोहोचत होतं की नाही हेही मला कळत नव्हतं. मलासुद्धा बोलताना अवधान राखूनच बोलावं लागत होतं; कारण सुलभाच्या आई केव्हाही आत आल्या असत्या. एखाद-दुसरा वावगा शब्द त्यांच्या मनात संशय निर्माण करून गेला असता.

''सुलभाऽऽ ए सुलभाऽऽ मी काय म्हणतो आहे ते तुला कळतं आहे ना?'' मी विचारलं.

''अं ऽऽ हो हो, कळतंय ना.'' सुलभा म्हणाली.

''मग मला सांग ना, तुला काय वाटतं ते. काहीतरी बोल ना. म्हणजे मी परत गेल्यावर विवेकला सांगेन, तुला काय म्हणायचं आहे ते. खरं म्हणजे तोच येणार होता; पण परत तुम्ही दोघं एकमेकांसमोर आल्यावर काय झालं असतं याचा काही अंदाजच येईना. म्हणून मी एकट्याने यायचं ठरवलं; कारण काही गोष्टी मी त्रयस्थ म्हणून बोलू शकतो. विचार करू शकतो. तूसुद्धा त्याच्या परोक्ष स्पष्ट बोलू शकशील असं वाटतं. म्हणून माझे विचार तुझ्यासमोर मांडले आहेत; पण तू तर काहीच बोलत नाहीस.'' मी म्हणालो.

''बघ ना. सकाळी उठल्यापासून अशीच घुम्म बसलेली आहे. चारदा म्हटलं म्हणून अंघोळ आणि वेणीफणी तरी केली. काही विचारलं तर काही उत्तर नाही. दोन-दोनदा विचारलं तर फक्त मुंडी हलवते. तिचे वडीलदेखील गावाला गेले आहेत. माझा तर जीव हबकून गेला आहे.'' सुलभाची आई आत येत म्हणाली. ''हं, उपमा केला आहे तो प्रथम खा. कालपासून तिच्या पोटात काही नाही. मी म्हटलं, अशी उपाशी राहिली तर आणखी दुसरे आजार होतील. हं घ्या, करा सुरुवात. मग बोला सावकाश. चहासुद्धा आणतेच आहे.'' उपम्याची बशी आमच्या हातात देत त्या म्हणाल्या. सुलभाने हातानेच बशी दूर सारली, तेव्हा मीच ती बशी उचलून तिच्यासमोर धरली आणि म्हणालो, ''हे बघ सुलभा, असा त्रागा करू नकोस. उपाशीपोटी विचार करायला जमत नाही. तेव्हा थोडं तरी खाऊन घे. मला कंपनी म्हणून तरी थोडंसं खा ना.'' तरी सुलभा हलली नाही, तेव्हा मी परत म्हटलं,

''ठीक आहे. उपोषणामुळे प्रश्न सुटणार आहेत, असं जर तुला वाटत असेल, तरी हरकत नाही; पण उपोषणाआधी तसं जाहीर करायला हवं. म्हणजे विरोधी पक्षाला तडजोडीला वाव मिळतो. तू उपोषणाची नक्की तारीख सांग, म्हणजे विवेकलासुद्धा निरोप पाठवतो. मग तुम्ही दोघे खुशाल उपोषण करा. पाहिजे तर अगदी शेजारी शेजारी बसून करा.'' विनोदाचा आश्रय घेत मी म्हटलं. ''पण सुलभाबाई, आताचं म्हणजे सकाळपासूनचं हे उपोषण माझ्या हातून उपमा घेऊन सोडावं, अशी मी आपणास विनंती करतो.'' माझ्या नाटकी अभिनयाला सुलभाच्या आईने तोंडाला पदर लावून दाद दिली. सुलभाचे ओठही थोडे विलग झाले आणि आईच्या दिशेने नजरेने मी केलेल्या इशाऱ्याचा अर्थ समजून तिने बशी हातात घेतली; कारण आईसमोर चर्चा करणं शक्य नव्हतं आणि जर ती बशी घेतली नसती तर त्या तिथेच उभ्या राहिल्या असत्या.

''हे ठीक झालं ना आई. आता थोड्या वेळाने चहा आला तरी हरकत नाही. सुलभाला हवा तर आणखी थोडा उपमा आणा. तिला नंतर

उपोषणाला बसायचं आहे ना. त्यापूर्वी जरा भरपेट खाऊ दे.'' मी म्हटलं.

''मला नको आणखी, तूच घे हवा तर... कारण तुलाच धावपळ करायची आहे.'' बऱ्याच वेळाने सुलभा एवढे मोठे वाक्य बोलली. आई गेल्याची खात्री करून घेतल्यावर मी परत सुरुवात केली.

''हे बघ सुलभा, अजूनपर्यंत तरी खरी हकिगत तुमच्या घरी माहीत झालेली नाही; पण मला आता तुझं मत काय आहे ते सांग. हा सगळा गुंता आपण आपल्या तिघांतच ठेवून सोडवायचा की तुझ्या आई-वडिलांना सरळ सगळं सांगून, त्यांची मदत घ्यायची? आज ना उद्या त्यांना या सर्व गोष्टी समजणारच आहेत.''

''प्रतिकूल तेच घडेल असं गृहीत धरावं, म्हणजे मनाची आघात सोसायची तयारी होते, असे म्हणतात; कारण समजा, विवेक कायमचा इंग्लंडला निघून गेला तरी तुला आणि तुझ्या वडिलांना पुढचा काहीतरी विचार करायलाच हवा ना. मग आताच त्यांना का सांगू नये? एखाद्या वेळी त्यांनासुद्धा काही उपाय सुचू शकेल. काय तो निर्णय घे; कारण जितक्या लवकर तू तुझं आयुष्य पूर्ववत चालू करशील तितकं बरं; त्यामुळे विवेकदेखील निश्चिंत मनाने परत जाईल. तुझ्याशी प्रतारणा केली असं त्याला वाटता कामा नये.''

''याउलट जर त्याच्या मनाचा निश्चय होत नसला तरी तुझ्याकडून भावी काळात मिळणाऱ्या सहकार्यामुळेही त्याचा इंग्लंडला जाण्याचा निर्णय बदलू शकेल; पण त्यासाठी तुम्हा दोघांनी पुनःपुन्हा भेटलंच पाहिजे; कारण एकाच भेटीत हा निर्णय होईल असं नाही. मी दोन-चार दिवसांनी पुन्हा चक्कर मारीन, तेव्हा मला तो सांगितलास तरी चालेल.'' मी माझं बोलणं संपवून थांबलो; पण सुलभाकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. लगेच मिळेल अशी अपेक्षाही नव्हतीच. म्हणून तर दोन दिवसांनी येण्याचा वायदा केलेला होता. आईंनी चहा आणला होता. तो घेऊन उठलो आणि निघताना त्यांना म्हणालो, ''बरं आहे आई, निघतो मी आता. सुलभाची तब्येत ठीक आहे. आता तिला विश्रांती घ्यायला सांगा. एक-दोन दिवसांनी चक्कर मारीनच. विवेकचीसुद्धा जायची तयारी करायची आहे. तारीख ठरली की, कळवतोच.''

आता मला दोन आघाड्या सांभाळायच्या होत्या. विवेकने पत्रं लिहिली किंवा नाही बघायला हवं होतं. माझा अंदाज खरा ठरला. विवेक नुसताच बसून राहिला होता. मग मीच इयान स्मिथ यांना लिहायच्या पत्राचा मसुदा तयार केला व त्याला दाखवला.

मि. इयान स्मिथ यांस,

माझ्या लंडन येथील वास्तव्यात आपण आणि डॉ.बरोज यांच्याकडून मिळालेल्या सहकार्याबाबत धन्यवाद! तिथे घडलेल्या अनपेक्षित प्रसंगांमुळे मी पुरता गोंधळून गेलो होतो; त्यामुळे त्या मानसिक अवस्थेमध्ये मी आपले आभार मानू शकलो नाही म्हणून प्रथम मी आपली माफी मागतो. कृपया खालील गोष्टींचा खुलासा केल्यास मी आपला आभारी होईन.

१) विजय केळकर यांच्या मृत्यूनंतर क्लोनिंग पद्धतीने माझा पुनर्जन्म झाला हे मान्य आहे. तसेच माझा सांभाळ व पालनपोषण श्रीमती नंदिनी केळकर यांनी निर्माण केलेल्या ट्रस्टमार्फतच होत आहे; परंतु श्री. विजय यांच्या मृत्यू(?)नंतर त्यांच्या संपत्तीचं काय झालं? म्हणजे श्रीमती नंदिनी या त्या संपत्तीच्या एकमेव वारस ठरल्या का? का ती संपत्ती श्री.विजय यांच्या नावेच राहिली आणि त्याचा ट्रस्ट केला गेला होता.

२) क्लोनिंग ही प्रक्रिया जरी इंग्लंडमध्ये पूर्ण झाली असली तरी माझा जन्म इंग्लंडमध्ये न होता भारतात झाला आहे; त्यामुळे माझे राष्ट्रीयत्व भारतीयच आहे, तेव्हा सध्याच्या कायद्यानुसार मी इंग्लंडमध्ये स्थायिक होऊ शकेन का?

३) श्री. विजय व नंदिनी केळकर यांचा त्या काळात झालेला विवाह हा आजच्या घटकेसही कायदेशीर ठरेल का? की आता विवेक संझगिरी याला नंदिनी केळकरशी पुनर्विवाह करावा लागेल?

भावी काळात कोणत्याही अडचणी येऊ नयेत या दृष्टीने मी आपला सल्ला विचारत आहे. आतापर्यंत आपण माझे व श्रीमती नंदिनी यांचे हित, ट्रस्टी म्हणून सांभाळले आहे आणि यापुढेही सांभाळाल यात संशय नाही. म्हणून ही विनंती करीत आहे.

आपला,<br>
विवेक संझगिरी

दुसरे पत्र नंदिनीसाठी होते.

श्रीमती नंदिनी हीस,

रिवाजाप्रमाणे मी खरं म्हणजे प्रिय नंदिनी असं लिहायला पाहिजे; परंतु प्रत्यक्षात आपला 'प्रिय' म्हणून संबोधण्याइतका परिचय अजून झालेला नाही, असं मला वाटतं. लंडनमध्ये आल्यावर ज्या घटना घडल्या, त्या धक्क्यातून मी अजून तरी पूर्णपणे सावरलो नाही. भारतामध्ये परतल्यावर निवांतपणे विचार केल्यावर काही गोष्टींचा खुलासा आवश्यक वाटल्यामुळे हे पत्र लिहीत आहे.

मि. इयान स्मिथ यांना मी स्वतंत्र पत्र पाठवीत आहेच. ते माझ्या कायदेशीर अस्तित्वाबद्दल खुलासा करतीलच; परंतु आपल्या दोघांमधील संबंध हे कायदेशीर नसून, भावनिक आहेत, म्हणून आपले विचार किंवा खुलासा अपेक्षित आहे.

१) मी इंग्लंडमध्ये आल्यानंतर आपल्या लेखी जरी माझं अस्तित्व विजय म्हणूनच असलं तरी कायदेशीररीत्या किंवा प्रत्यक्षात श्री. विजय मृत म्हणून घोषित झाल्याने, आपल्याला या विवेक संझगिरीबरोबर पुनर्विवाह करावा लागेल असं वाटतं.

२) श्री. विजय यांचा क्लोन इंग्लंडमध्ये न वाढवता भारतात पाठविण्याचा आपला काय हेतू होता? तो हेतू सफल झाला असं आज आपल्याला वाटतं का?

३) भारतीय वातावरणात वाढलेला असल्यामुळे, तसेच गेल्या २५ वर्षांतील कालावधीत झालेल्या सामाजिक बदलांमुळे श्री. विजय आणि विवेक यांच्या आचारविचारांत फरक पडलेला असणे स्वाभाविक आहे, याचा विचार आपण २५ वर्षांपूर्वी जरी केलेला नसला तरी आज केला आहे का?

४) श्री. विजय किंवा केळकर कुटुंबाचा व्यवसाय पुढे

चालविण्याची क्षमता माझ्यात उतरली असेल किंवा नाही, हे आज तरी सांगता येणार नाही. तरीसुद्धा मी पूर्ण सामर्थ्यानिशी हे आव्हान पेलेन याचा मला विश्वास वाटतो; परंतु तसा विश्वास आपल्याला वाटतो का? आपण माझ्या (विजयच्या) प्राप्तीसाठी पत्करलेल्या धोक्याबद्दल मला अतीव आदर आहे; कारण तसेच प्रेम असल्याशिवाय हा प्राणांतिक धोका कुणीही पत्करला नसता, हे सत्य आहे. या प्रेमापोटी मी इंग्लंडला येण्याचा विचार करीत आहे. कृपया आपल्या भावी सहजीवनाच्या दृष्टीने मी उपस्थित केलेले मुद्दे विचारात घ्यावेत, असे प्रामाणिकपणे वाटते. तरी गैरसमज नसावा.

आपला,

विजय/विवेक संझगिरी.

सुलभाला मी दोन दिवसांची मुदत दिली होती. त्याआधीही तिचा फोन येऊ शकला असता; पण दुसऱ्या दिवशीच विवेक माझ्याकडे आला. त्याच्या हातात तार आणि विमानाचे तिकीट होते.

''हे बघ, नंदिनीने मला ताबडतोब बोलावलं आहे. मागच्या वेळी मी न सांगता निघून गेलो होतो. या वेळेस तसे करणार नाही म्हणून तुला सांगून जातो आहे. सुलभाला भेटून तिला आणखी मनस्ताप देण्याची माझी इच्छा नाही. तू वेळप्रसंग बघून हे तिच्या कानावर घाल. पत्रांची उत्तरं यायला वेळ लागेल, त्यापेक्षा प्रत्यक्ष जाऊनच नंदिनी आणि स्मिथ यांच्याबरोबर बोलेन. खरं म्हणजे असा पळ काढणं मला बरं वाटत नाही; पण सुलभावर मी केलेला आघातही मी विसरू शकत नाही. सुलभाला तोंड दाखवणंसुद्धा मला लाजिरवाणं वाटतं. तिकडून मी तुझ्याशी संपर्क साधेनच. परत आलो तर भेटूच; नाहीतर सुलभाला सांग, मला क्षमा कर.'' विवेकला पुढे बोलवेना. मी त्याच्या खांद्यावर थोपटून म्हणालो, ''ठीक आहे. मी समजू शकतो. फुकटचा सल्ला द्यायला हरकत नाही; पण एक सुचवतो.''

''जर तू विजय म्हणून तिकडेच उर्वरित आयुष्य काढणार असशील तर सुलभाला पूर्णपणे विसरून जा. तरच तू आणि नंदिनी सुखी व्हाल. कालांतराने एखादे वेळी सुलभा तुला विसरेल, अशी आशा करू या; पण जर तूसुद्धा तिला विसरू शकला नाहीस तर मात्र तुम्ही तिघंही जन्मभर दुःखीच राहाल.''

विवेकचा मी तिथेच निरोप घेतला. त्याला विमानतळावर पोहोचवायलासुद्धा गेलो नाही. सुलभाच्या दृष्टीपुढून तो नाहीसा झाला होता. कमीतकमी माझ्या डोक्यावरचं एक ओझं तरी दूर झालं होतं. आता फक्त सुलभालाच सांभाळायचं होतं. विवेक आता प्रत्यक्षच स्मिथ आणि नंदिनीला भेटणार होता; त्यामुळे ती पत्रं पोस्टात टाकण्याची वेळच आली नाही.

***

आज विवेकची चिठ्ठी आली. मागच्यासारखीच संदिग्ध! हॉटेल प्रेसिडेंट, मुंबईच्या कागदावर लिहिलेली होती. हॉटेलच्या रूम नं.१००६ मध्ये संध्याकाळी ४ वाजता येण्याविषयी लिहिलं होतं. येताना सुलभालाही घेऊन यायला सांगितलं होतं. तिला वेगळी चिठ्ठी पाठविल्याचं लिहिलं होतं. म्हणजे विवेक भारतात परत आला होता तर. मला वाटलं की, एकदा त्याला फोन करून खुलासा विचारावा. मग विचार बदलला. जर फोनवर बोलण्यासारखं काम असतं, तर त्यानेच फोन केला असता. हे पत्र किंवा चिठ्ठी पाठवली नसती. मागच्या अनुभवावरून मन साशंक झालं होतं. सुलभाही सावरली होती. याचा अर्थ असा नव्हता की, ती विवेक प्रकरण विसरली होती; पण पूर्वीसारखी नुसतीच उदास बसून राहत नव्हती. मी सुलभाला फोन लावला. तिलाही पत्र मिळालं होतं.

''मी येत नाही. तू एकटाच जा.'' सुलभाने झटकून टाकलं; पण मग मीच तिला समजावलं. मी तिला म्हटलं, ''हे बघ सुलभा, विवेक आता मुंबईला आला आहे आणि ज्या अर्थी त्याने तुलाही भेटायला बोलावलं आहे, त्या अर्थी तुला पुन्हा दुखावण्याचा त्याचा हेतू नसावा; कारण मागचा सगळा प्रकार तुम्हा दोघांनाही सारखाच तापदायक ठरला होता आणि त्या जखमेची खपली काढून तुला दुःख देण्याइतका तो नक्कीच निर्दय किंवा दुष्ट नाही, तेव्हा माझं ऐक. आपण त्याला भेटायला जाऊ या. तो तसाच अडचणीत असल्याशिवाय त्याने परत भारतात यायचा आणि आपल्याला भेटायचा निर्णय घेतलेला नसणार. तसेच ज्या अर्थी त्याने आपल्याला भेटायची इच्छा दर्शवली आहे, त्या अर्थी त्याला आपल्या सल्ल्याची गरज आहे, असं दिसतं. मला वाटतं, तू यावंस आणि त्याला भेटावंस. तू येणार नसलीस तर मीपण जात नाही; कारण जर फक्त माझ्या जाण्याने काम होण्यासारखं असतं तर त्याने मलाच गुपचूप भेटायला बोलावलं असतं.''

माझ्या बोलण्याचा सुलभावर परिणाम झाल्यासारखा वाटला. ती माझ्याबरोबर यायला तयार झाली. आमच्या भेटीबद्दल आज तरी घरी न सांगण्याचं ठरवलं. चार वाजता आम्ही हॉटेल प्रेसिडेंटवर पोहोचलो. आम्ही येत असल्याची वर्दी रिसेप्शनिस्टने दिली. आम्ही वर गेलो. विवेकनेच रूमचं दार उघडलं.

''वेलकम, वेलकम! या, आत या!'' विवेक बाजूला होत म्हणाला. माझ्या मागे सुलभा संकोचून उभी होती. परिस्थिती जर वेगळी असती तर तीच अधीरतेने पुढे झाली असती; पण आज काय घडणार आहे, याचा अंदाज येत नव्हता. मी आत गेलो. सुलभा दारातच घोटाळली. मी तिला ''आत ये'' म्हटलं; पण तिने पाऊल उचललं नाही. शेवटी विवेकच अधीरपणे पुढे झाला. आणि ''अगं, आत ये ना,'' असं म्हणत तिचा हात धरण्यासाठी पुढे सरसावला, तेव्हा सुलभा मागे सरकत म्हणाली, ''हं, येते ना आत; पण दरवाजा तर मोकळा करा.'' विवेक ओशाळला. ''खरंच, लक्षातच आलं नाही माझ्या.'' मग बाजूला होत म्हणाला, ''हं, आता मार्ग मोकळा आहे, तू निःसंकोचपणे आत येऊ शकतेस.'' त्याने मार्ग या शब्दावर हेतुपुरस्सर जोर दिला होता. खोलीत सोफ्यावर २५ वर्षांची एक देखणी तरुणी बसलेली होती. ती नुसतीच रूपवान नव्हती, तर खानदानी रुबाबही तिच्या बसण्यात दिसत होता. आम्हाला पाहताच ती उठून उभी राहिली. ''या! बसा.'' विवेक म्हणाला. ''मी ओळख करून देतो. या श्रीमती नंदिनी केळकर. कै. विजय केळकर यांच्या पत्नी आणि ही सुलभा, माझी वाग्दत्त वधू आणि हा माझा मित्र सदानंद.'' नंदिनीने हात जोडून नमस्कार केला. ''बसा ना.'' ती मृदू आवाजात म्हणाली. मी आणि

सुलभा या अनपेक्षित धक्क्याने अवाक झालो होतो. तिथे नंदिनीसुद्धा असेल, अशी कल्पनाही आम्हाला आली नव्हती. नंदिनी जर एवढी देखणी आणि श्रीमंतही असेल तर विवेक तिच्याकडे आकर्षिला गेला यात काहीच आश्चर्य नव्हतं.

''अरे! बसा ना. असे किती वेळ उभे राहणार?'' विवेक म्हणाला आणि आम्ही बसलो. ''बसा ना. आरामात बसा. काय घेणार? थंड की गरम?'' रूम सर्व्हिसचा नंबर दाबत त्याने विचारलं. कोणीच बोलत नाही असं पाहून त्याने चहाची ऑर्डर दिली. मग सुलभाकडे वळून म्हणाला, ''सुलभा, कशी आहेस? वाळलेली दिसतेस.'' ते ऐकून सुलभाला रडूच फुटलं. विवेक पुढे सरकला; पण सुलभा संकोचून मागे सरकली. माझी स्थिती जरा विचित्र झाली होती. नक्की काय परिस्थिती आहे याचा अंदाज येत नव्हता. सुलभा माझ्या आग्रहाखातर आली होती. तिने घरीही सांगितलं नव्हतं. मागच्यासारखा जर काही प्रकार झाला असता तर माझी परिस्थिती फारच अवघड झाली असती; पण विवेकच्या चेहऱ्यावरचा ताण नाहीसा झालेला दिसत होता. म्हणजे माझ्या अंदाजाप्रमाणे परिस्थिती सुलभाच्या बाजूने झुकत होती; पण सुलभा आल्यापासून तिने विवेकच्या चेहऱ्याकडे पाहिलंसुद्धा नव्हतं; कारण जर का परत धक्का बसला असता तर? हीच भीती तिला वाटत होती. का नाही वाटणार? दुधाने तोंड भाजल्यावर माणूस ताकसुद्धा फुंकून पितो, नाही का? म्हणून मीच म्हटलं,

''विवेक, सुलभाची मनःस्थिती फार नाजूक झाली आहे. तू गेल्यानंतर ती कितीतरी दिवस आजारीच होती. तुझी चिठ्ठी मिळाल्यानंतरही ती इकडे यायला तयार नव्हती. मीच तिला बळजबरीने इकडे आणलं आहे. नुसतं दुःखच नव्हे तर अवचित पुढे आलेलं सुखसुद्धा तिला सहन करायला अवघड जात आहे, तेव्हा तिला सावरायला जरा वेळ दे.''

''हे बघ सुलभा, जरा आत जाऊन तोंड धुऊन ये. विवेक इतक्या दिवसांनी भेटतो आहे. जरा हसतमुखाने बोला.'' सुलभा उठून आत बाथरूममध्ये गेली, तेव्हा मी म्हटलं, ''हं, बोल आता. आम्हाला परत का बोलावलं आहेस? सुलभा आता कुठे सावरली आहे आणि मला वाटतं की, आणखी धक्के तिला सोसवणार नाहीत.''

''मिसेस नंदिनी केळकर, आपण विवेकच्या आयुष्यात येण्यापूर्वीच या दोघांनी विवाह करण्याचं ठरवलं होतं. तुमचा जरी दोष नसला तरी त्या दोघांचं आयुष्य उद्ध्वस्त करायला आपणच कारणीभूत झाला आहात.''

''सदानंद,'' विवेक मला अडवत म्हणाला, ''तुझा काहीतरी गैरसमज होतो आहे. उगाच वाटेल तसे आरोप करू नकोस.''

''विवेक, सदानंदला बोलू दे.'' नंदिनी शांत स्वरात म्हणाली, ''तो म्हणतो ते खरं आहे. अजाणतेपणाने का होईना मी तुमच्या आयुष्यात वादळ उठवलं आहे आणि त्याची भरपाई मलाच करावी लागणार आहे.''

''ये सुलभा. इकडे ये. बैस. चहा आलेला आहे. तो आधी घेऊ या. त्याने तुला थोडं बरं वाटेल. चहा झाल्यावर आपण पुढे बोलू या.'' नंदिनी बाहेर येणाऱ्या सुलभाकडे पाहत म्हणाली.

एव्हाना माझ्या एक गोष्ट लक्षात आली होती, ती म्हणजे नंदिनी केळकर त्याला विजय न म्हणता विवेक म्हणत होती.

***

''मी शीतनिद्रेतून बाहेर आले, त्याला जवळजवळ एक महिना झाला होता. या एक महिन्याच्या कालावधीत जरी मी सगळीकडे - बाहेरसुद्धा हिंडत असले तरी माझ्यावर अनेक निर्बंध होते. शरीराला अनेक उपकरणं जोडलेली असायची. ती २४ तास माझ्या शारीरिक क्रियांचे तपशील नोंदवून हॉस्पिटलकडे पाठवत असत. अगदी झोपेतसुद्धा हे चालूच असे. थोडक्यात, तो महिनाभर मी जणू डॉ.बरोज यांच्या नजरकैदेतच होते. माझी झोप, धावणे, शारीरिक किंवा मानसिक उत्तेजना, माझ्या हृदयाची धडधड दाखवत असत. इसीजी, रक्तदाब मोजणारी उपकरणं डॉक्टरना २४ तासांचे आलेख पुरवत असत. मला त्या प्रत्येक गोष्टीचं स्पष्टीकरण द्यावं लागत होतं. माझ्या जागृतीनंतर लगेचच स्मिथने माझ्या बंगल्याची साफसफाई करून घेतली होती. आठ दिवसांनंतर मी आणि विजय माझ्या घरी राहायला गेलो. माझ्या प्रत्येक हालचालीची बातमी डॉ.बरोजकडे पोहोचत असल्याने त्यांनी विजयच्या बाबतीत दिलेली सूचना पाळण्याशिवाय गत्यंतरच नव्हते आणि सुलभा, माझ्यावर विश्वास ठेव. अजूनपर्यंत आम्ही एकत्र राहत असलो तरी त्याअर्थाने आम्ही दूरच राहिलो आहोत.''

***

''ओ.के.! परफेक्ट.'' डॉ.बरोज नंदिनीची फाइल मिटत म्हणाले. ''नंदिनी सगळे रिपोर्ट्स नॉर्मल आहेत म्हणजे तू आता अगदी नॉर्मल नंदिनी झाली आहेस. २५ वर्षांपूर्वीची नंदिनी केळकर. तू आता तुझं आयुष्य परत चालू करू शकतेस. तुझ्या अंगावरची सर्व उपकरणं आज काढून घेतली जातील. म्हणजे उद्यापासून तू तुझं मुक्त आयुष्य जगायला मोकळी आहेस. म्हणजे यापुढे तुझ्यावर माझी नजर असणार नाही. तरीसुद्धा काही दिवस तरी जपून राहा. जास्त ताणतणावापासून दूर राहा. तशी गरज पडलीच तर तू कोणत्याही हॉस्पिटलमधून माझ्याशी संपर्क साधू शकशील.''

''स्मिथलासुद्धा तसे कळवतो. तशी त्याच्याकडून सगळी तयारी झालेली आहे; पण तुझ्यावर जादा ताण नको म्हणून मीच त्याला थोपवून धरलं होतं. आता उद्यापासूनही तू कामावर जाऊ शकतेस. विजयलाही बोलावून घेतो. एक मोठा कालखंड संपला आहे, त्याबद्दल तुझं अभिनंदन! आणि भावी आयुष्याबद्दल शुभेच्छा!''

''विजय केव्हा परत येतोय? तो आल्यावर एक पार्टी अरेंज करू या. त्या वेळी तुम्हा दोघांना परत इंट्रोड्यूस करू या; कारण गेल्या २५ वर्षांत सगळंच बदललं आहे.'' डॉ. बरोज म्हणाले.

''खरंच डॉक्टर, गेल्या २५ वर्षांत सगळं सगळं बदललं आहे, फक्त मीच बदललेली नाही; त्यामुळे माझा गोंधळ उडालेला आहे. झोपेतून जागं व्हावं आणि आपण एका अनोळखी जगात असावं असं वाटतं आहे. तू, स्मिथ, आपण अगदी बरोबरचे होतो ना? पण आज तू माझे वडील शोभशील इतका मोठा आणि प्रौढ वाटतोस.

''स्मिथने घर अगदी उत्तम ठेवलं आहे. मला केवढा उत्साह आणि आनंद वाटत होता घरी यायला. विजयच्या आई-वडिलांना मी सांगितलं होतं की, एक दिवस मी विजयला नक्की परत आणीन; पण त्यांचा विजय पाहायला तेच या जगात नाहीत हे मला काय माहीत? स्मिथने मला

सांगितलं की, मी असते तर त्यांना धीर दिला असता; पण माझ्या शीतनिद्रेमुळे त्यांना सावरायला, धीर द्यायला कुणीच राहिलं नव्हतं. मला वाटतं, त्यांच्या मृत्यूला मीच कारणीभूत आहे.'' नंदिनी भावनाविवश होऊन म्हणाली.

''शांत हो नंदिनी, शांत हो,'' डॉ.बरोज तिच्या पाठीवर हात ठेवत म्हणाले, ''तू आता म्हणालीस ते खरं आहे. आपण जरी बरोबरचे होतो, तरी मी आणि स्मिथने तुझ्यापेक्षा थोडेथोडके नाही तर २५ वसंत ऋतू जास्त अनुभवले आहेत. नुसते वसंत ऋतूच नाही, तर २५ जास्त हिमवर्षावही अनुभवले आहेत. २५ वर्षांपूर्वी तारुण्याच्या जोशात काहीतरी नवीन करण्याच्या ईर्ष्येने तुला साथ दिली आणि आजही वडीलकीच्या अधिकाराने तुझ्याबरोबरच आहे. म्हणून सांगतो, तू आता घरी जा. परत कधीतरी ये. आपण या विषयावर बोलू या.'' दुसऱ्या दिवशी नंदिनी डॉ.बरोजकडे गेली, तेव्हा तिचा चेहरा उतरलेला होता.

''हं बोल, काय म्हणतेस? विजयशी बोललीस का? काय म्हणत होता विजय? केव्हा येतो आहे?'' डॉ.बरोजनी विचारलं. उत्तरादाखल नंदिनीने फक्त नकारात्मक मान हलवली.

''म्हणजे, तू बोलली नाहीस? की तो येणार नाही?'' डॉक्टरांनी परत विचारलं.

''मीच बोलले नाही.'' नंदिनी म्हणाली.

''मग त्याचा तरी फोन आला होता का?'' डॉ.बरोज यांनी विचारलं.

''मला नाही वाटत की, तो आपणहून फोन करेल म्हणून. त्याला जर माझी काळजी असती तर त्याने मला फोन केले असते. इतक्या दिवसांत त्याचा एकदाही फोन आलेला नाही. मी त्याच्या ऑफिसमध्येही फोन केला होता. तो ऑफिसमध्येदेखील गेलेला नाही. मला वाटतं की, मीच आता भारतात जावं आणि पाहावं तो काय करतो ते.'' नंदिनी म्हणाली.

''नंदिनी, त्याचे जरी फोन आले नसले तरी तू त्याला फोन करीत असशीलच ना?'' डॉ.बरोज म्हणाले.

''करते ना; पण त्याची जेवढ्यास तेवढीच उत्तरे असतात. डॉ. हे आताच नाही. इथे असतानासुद्धा तो असाच वागत होता. माझा विजय, पूर्वीचा बोलका विजय राहिलेला नाही. तो आता संपूर्ण बदललेला आहे; पण तोच कशाला, आता सगळंच बदललेलं आहे. फक्त मीच जुनी आहे.'' नंदिनी खिन्न होत म्हणाली.

''आणखी एक सांगते; ऐक. मागे एकदा मी तुला म्हणाले होते, आपण चौघे बरोबरचे; पण आता तू आणि स्मिथ माझ्या वडिलांच्या वयाचे वाटता. का कुणास ठाऊक; पण विजयसुद्धा मला वेगळा वाटतो. मी पहिल्यांदा घरी गेले, तेव्हा ते घर पाहून मी अगदी खूश झाले होते. सगळं अगदी जसंच्या तसं होतं. घरातली माणसं सोडून; पण घराबाहेर पाऊल टाकल्यावर कळत होतं की, सगळं बदललेलं आहे. आमच्या शेजारची ॲना २५ वर्षांपूर्वी जी आईचं बोट धरून शाळेत जात होती, ती आता तिच्याच मुलीला कडेवर घेऊन उभी असलेली मला दिसली. त्या वेळी मला टाटा करतानाचं दिसणारं तिच्या चेहऱ्यावरचं हास्य आता लोप पावलं होतं. तिच्या नजरेत मला भेटण्याची ओढ नव्हती, तर निव्वळ एखाद्या शो-पीसबद्दल वाटणारं कुतूहल होतं. आजूबाजूचा परिसर, दुकानं, सगळं सगळं अपरिचित वाटत होतं. म्हणजे दुकानं तीच होती; पण काउंटरमागचे चेहरे बदलले होते. शेवटी दुकान म्हणजे घरासारखी निर्जीव वास्तू; पण घराला घरपण जसं त्या घरात राहणाऱ्या माणसांमुळेच येतं, तसेच दुकानदारामुळे दुकानाला स्वतःचं व्यक्तिमत्त्व येतं, नाही का?'' नंदिनी विचारत होती.

''त्याने काय फरक पडतो? आपल्याला पाहिजे ती वस्तू मिळाल्याशी कारण.'' डॉ.बरोज म्हणाले.

''डॉक्टर, उगाच वेड पांघरून पेडगावला जाऊ नकोस. आपण दुकानात जातो ते माल खरेदीसाठीच हे फक्त ५० टक्के खरं आहे; कारण तोच माल इतर ठिकाणी मिळत असूनसुद्धा आपण त्या एखाद्या विशिष्ट दुकानातच का जातो? किंवा एखादं विशिष्ट दुकान का टाळतो? अरे, दुकानच कशाला, आपण तिघं बघ ना, तू शास्त्रज्ञ, मी डॉक्टर आणि स्मिथ सॉलिसिटर. आपली मैत्री झालीच ना? दुकानदाराचं पण तसंच असतं; पण ज्या दुकानात मी पूर्वी आवर्जून जात होते, तिथे आता जावंसं वाटत नाही.

''कदाचित त्याला इतरही कारणं असतील. २५ वर्षांपूर्वी जे ब्रॅन्ड्स मिळत होते, ते आता उपलब्धच नाहीत. म्हणजे मी जर ते ब्रॅन्ड मागितले तर मीच हास्यास्पद ठरते. ज्यांना माहीत आहे ते समजून घेतात; पण इतरांचं काय? प्रत्येक ठिकाणी हाच अनुभव येतो आणि मग वाटतं नकोच ती खरेदी. रस्त्यांवरून धावणाऱ्या गाड्यांची मॉडेल्स वेगळी, फॅशन्स वेगळ्या, भाषासुद्धा बदललेली आहे.'' नंदिनी सांगत होती.

''हे बघ नंदिनी, तू असं का समजत नाहीस की, तू अगदी नवीन गावात, नवीन देशात आलेली आहेस, सगळ्या गोष्टी नवीन शिकायच्या आहेत. समजून घ्यायच्या आहेत.'' डॉक्टर म्हणाले.

''त्यालासुद्धा माझी तयारी आहे. नवीन शिकायला माझी ना नाही; पण जे बुद्धीला पटलं ते मनाला पटेलच असं नाही. सध्याचा विजय माझ्या बुद्धीला पटतो; पण मनाला भावत नाही, हेच खरं दुःख आहे.''

''का? हा विवेक म्हणजे १०० टक्के विजयच आहे. त्याचे सगळे मेडिकल रिपोर्ट्स तेच सांगताहेत. मग तुलाच ते का पटत नाही?''

''डॉक्टर, मी काय म्हणते आहे, ते तुला नक्कीच ठाऊक आहे. तुला एक साधी गोष्ट सांगते. विजयला कॉफीच आवडत असे. चहा तर तो कधीच घेत नसे. तुला तरी आठवतं का त्याने कधी चहा घेतलेला? काही नसेल तरी त्याला चाले; पण तो चहा घेत नसे.''

''याउलट 'हा' विजय फक्त चहाच घेतो. तुला माहीत नाही. त्या दिवशी माझी किती विचित्र परिस्थिती झाली होती. आम्ही जेव्हा पहिल्या दिवशी आम्ही बंगल्यावर गेलो, तेव्हा रात्री जेवण झाल्यावर मी त्याला गप्पा मारायला ड्रॉइंग रूममध्ये बोलावलं. वाटलं होतं, जुन्या आठवणी काढून बोलत बसू. त्याच्यासाठी म्हणून मुद्दाम कॉफी बनवून घेतली होती; पण त्याने कॉफी नाकारली. चहाच हवा म्हणाला. त्याला म्हटलं तर त्याने सावरून घेतलं की, मला कंपनी म्हणून तो चहाच घेणार आहे. अरे, हे जर त्याने २५ वर्षांपूर्वी म्हटलं असतं तर मला खरोखरच आनंद झाला असता. अरे, त्या वेळचा त्याचा विरोधही मला आवडत होता; पण आता त्याचा तोंडदेखला समंजसपणा मला खटकला. त्यानंतर आमच्या गप्पा रंगल्याच नाहीत.'' नंदिनी सांगत होती.

''नंदिनी, भारतात चहाच जास्त प्रमाणात प्यायला जातो. कॉफी खास

करून साउथ इंडियामध्येच घेतली जाते, तेव्हा लहानपणापासून महाराष्ट्रातच वाढलेल्या या विजयला चहाच आवडला तर त्यात गैर काय आहे.'' डॉक्टर म्हणाले.

''एवढंच नाही. तर त्यानंतरही आमच्या गप्पा रंगल्या नाहीत; पण हळूहळू मला एक गोष्ट कळू लागली. आमच्या म्हणजे दोघांमधल्या सामाईक अशा आठवणीच आमच्याकडे नाहीत. त्याने त्याच्या आई-वडिलांना पाहिलेलं नाही, लंडन पाहिलेलं नाही, इंग्लंड पाहिलेलं नाही. शाळेतील मित्र आठवत नाहीत. अरे, तू किंवा स्मिथ यांच्याबद्दलही तो बोलत नाही.

''डॉक्टर, तुला काही खासगी गोष्टी सांगते. ज्या फक्त नवरा-बायकोमध्येच सीमित असतात. गोष्टी असतात साध्याच; पण त्या दोघांच्या संबंधात त्या महत्त्वाची भूमिका बजावत असतात. तशीच एक गोष्ट आहे. आमच्या हनिमूनच्या रात्री मी गुलाबी रंगाचा गाउन घातला होता. त्यानंतरही आमच्या फक्त लग्नाच्या वाढदिवसालाच मी तो गाउन घालत असे. डॉक्टर, तू सांगितलेल्या सूचनेकडे दुर्लक्ष करून एका रात्री मी मुद्दाम तो गाउन घातला होता; पण विजयने त्याच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष केलं. मी त्याचं त्या गोष्टीकडे मुद्दाम लक्ष वेधून घेतलं. तरीसुद्धा त्याच्या वागण्यात काहीच फरक पडला नाही. एखाद्या प्रेयसीने आपल्या प्रियकरासाठी खास तयारी करावी आणि प्रियकराने मात्र तिच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करावं यासारखा तिला झोंबणारा दुसरा अपमान नाही, हे मी तुला सांगायला पाहिजे असं नाही; पण नवरा-बायकोच्या संबंधांतील असे अनेक संकेत असतात, मग ते शब्द असतील, गंध असतील किंवा कटाक्ष असतील, ते त्यांच्या कामजीवनात अत्यंत महत्त्वाचे असतात. त्याने उद्दीपित होणे किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष केल्याचे नाटक करणे हे कामजीवनाची रंगत वाढवत असतात आणि हे कामजीवन म्हणजे फक्त चार भिंतींआडच्या शयनगृहातीलच कामजीवन नाही तर चारचौघांतही हे शब्द, वाक्ये किंवा कटाक्ष इतरांना जरी साधे वाटले तरी त्या दोघांसाठी खास अर्थ घेऊन बोलले जातात. खरं आहे ना मी म्हणते ते? डॉक्टर, गेल्या दोन-तीन आठवड्यांच्या आमच्या सहजीवनात याचा संपूर्ण अभाव आहे. तू आम्हाला शारीरिक जवळीक निषिद्ध असे सांगितले होतेस; पण शाब्दिक शृंगार तर वर्ज्य नव्हता ना? अरे, त्यावरसुद्धा मी समाधान मानलं असतं; पण डॉक्टर, अगदी कोणतीही गोष्ट त्याच्या पूर्वस्मृती जागवू शकत नाही. नाही, हा माझा विजय नाहीच, हा तर विजयच्या शरीरातील विवेक आहे.''

डॉ.बरोज थोडा वेळ तसेच गप्प राहिले आणि म्हणाले, ''नंदिनी, झालं तुझं बोलून? मग आता मी सांगतो ते ऐक. तू म्हणते आहेस तसंच आहे. हा शरीराने जरी विजय असला तरी मनाने विवेकच आहे. आपण विजयचे डीएनए घेतले होते. त्या डीएनएमध्ये त्याच्या शरीराच्या ढाच्याच्या स्मृती होत्या; पण मेंदू ही सतत बदलणारी संकल्पना आहे. मेंदू आजूबाजूच्या परिस्थितीनुसार शिकत असतो. विचार करत असतो आणि निर्णयही घेत असतो. याच कारणामुळे एकाच परिस्थितीत शहरात वाढलेली व्यक्ती आणि जंगलात राहणारी व्यक्ती वेगवेगळ्या प्रकारे निर्णय घेतात.'' आपल्या विजयचा मेंदू आणि त्यावरचे संस्कार पूर्णपणे भिन्न आहेत. त्याच्या मेंदूला गेल्या महिन्यापर्यंत नंदिनी माहीत नव्हती, तर त्याचे आई-वडील किंवा स्मिथ यांच्या स्मृती तरी त्याच्या मेंदूत कुठून असणार? अपघातामुळे स्मृती हरवण्याच्या घटना घडतात. तरी त्या घटना मात्र त्याच्या स्मृतीत, मेंदूत कायमच्या नोंदवलेल्या असतात. फक्त त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा मार्ग बंद झालेला असतो. म्हणजे पासवर्ड विसरलेल्या प्रोग्रॅमसारखं असतं. तो पासवर्ड मिळेपर्यंत तरी ते ज्ञान उपलब्ध नसतं.

''विज्ञान पुनर्जन्म मानत नाही; कारण विज्ञानाला तो त्याच्या पद्धतीने सिद्ध करता येत नाही; पण भारतासारख्या देशात पुनर्जन्मावर विश्वास ठेवला जातो. अध्यात्माच्या दृष्टीने जीव किंवा आत्मा हा अविनाशी आहे आणि ज्याप्रमाणे आपण आपली जुनी वस्त्रं बदलून नवीन वस्त्रं धारण करतो, त्याप्रमाणे हा आत्मा वेगवेगळ्या शरीरांमध्ये वास्तव्य करत असतो. वैज्ञानिकदृष्ट्या स्त्रीने निर्माण केलेले बीजांड आणि पुरुषाचे शुक्रजंतू यांच्या मिलनातून नवीन जीव निर्माण होतो; पण एक गोष्ट लक्षात घे, हे मिलन मग ते नैसर्गिक असो, टेस्ट ट्यूब बेबी असो किंवा क्लोनिंग असो, प्रायोगिकरीत्या करता येते; पण त्यामुळे 'जीव' निर्माण होईलच याची खात्री देता येत नाही. असा 'जीव' तयार होणं हे तथाकथित अपघातानेच घडत असतं. विज्ञानाचं तरी त्यावर नियंत्रण नसतं.

''पुनर्जन्मवादी लोक असं मानतात की, जेव्हा आत्म्याला पुनर्जन्म घ्यायची इच्छा होते, तेव्हाच तो या फलित बीजांडात प्रवेश करतो आणि तो 'जीव' वाढीला लागतो. नाहीपेक्षा हे मिलन फक्त भौतिक क्रियाच ठरते. हा प्रवेश करणारा आत्माच आपल्याबरोबर मागील जन्माची कर्मफळं घेऊन येतो. जेव्हा क्लोनिंगच्या शक्यतेचा विचार प्रसिद्ध झाला, तेव्हापासून हे शास्त्र भस्मासुर ठरेल, असा गदारोळ उठला होता; त्यामुळे हजारो हिटलरांची फौज तयार करता येईल, असं म्हटलं जात होतं; पण ते सर्व व्यर्थ आहे. विज्ञानाला ना हिटलर बनवता येतील ना जीझस. प्रत्येक आत्मा हा त्याच्याबरोबर पूर्वजन्मीचे भोग घेऊनच येत असतो. ही आहे पुनर्जन्मवाद्यांची विचारसरणी.

''क्लोनिंग हे फक्त शरीर देतं. मन किंवा संस्कार देत नाही. म्हणूनच भिन्न शरीरे असलेलं सैन्य एकाच प्रकारच्या विचाराने वागते आणि लढते. गेल्या शतकातील हिटलरचे अनुयायी हे हिटलरचे क्लोन नव्हते, तरी ते एकविचाराने लढले. एवढंच नव्हे तर त्यानंतरही जवळजवळ अर्ध्या शतकानंतरसुद्धा त्याच्या विचारांचा पगडा जर्मन जनतेवर राहिलेला होता. जे आमच्या शास्त्राला सिद्ध करता येत नाही, ते आम्ही स्वीकारत नाही. त्या दृष्टीने तरी आम्ही अंधश्रद्धाळूच आहोत; पण जे अनुभवाला येते ते नाकारताही येत नाही.

''नंदिनी, विज्ञानाच्या मदतीने तुझ्या विजयचा शारीरिक पुनर्जन्म आम्ही करून दिला आहे; पण मानसिक विजय मात्र आम्हाला निर्माण करता आलेला नाही. म्हणून विज्ञानवादी असलो तरी माझा तुला सल्ला आहे. मी तुझ्यापेक्षा २५ वसंत ऋतू जास्त पाहिलेले आहेत. त्या अनुभवाच्या अधिकारानेही समज; माझा सल्ला ऐक. विजय आणि नंदिनीचं जेवढं सहजीवन नियतीला अपेक्षित होतं तेवढंच तुम्हाला मिळालं आहे. काळ हा अपरिवर्तनीय आहे, तेव्हा पूर्वीचे दिवस परत येतील ही भाबडी आशा तू सोडून दे. विवेकला त्याचं स्वतःचं आयुष्य जगू दे. तुझं किंवा विजयचं आयुष्य त्याच्यावर लादू नकोस. मला वाटतं,

'तुझ्या विजयला' सुखी करण्याचा हाच एक उपाय आहे.'' डॉ.बरोज यांनी त्यांचं बोलणे संपवलं.

''नाही डॉक्टर, माझा नवरा विजय मिळावा म्हणून का मी गेली २५ वर्षं शीतनिद्रेचा धोका पत्करला? केळकर घराण्याचा एवढा मोठा व्याप स्मिथने उगाचच का सांभाळला? अरे, ही केळकर घराण्याची संपत्ती त्यांच्या वारसाकडे सुपूर्द करण्याचीच माझी इच्छा आहे. मी जर आता माघार घेतली तर या सगळ्या तपश्चर्येचा काय उपयोग? माझी सारी धडपड केळकर घराण्याला वारसा देण्यासाठीच आहे. अरे, मला जर फक्त वैवाहिक सुखच हवं असतं तर मी २५ वर्षांपूर्वीच दुसरं लग्न केलं असतं; पण मग तो वारसा केळकर घराण्याचा झाला नसता. मला वाटलं होतं की, हा विजय माझाच राहील. आम्ही दोघं परत एकत्र येऊ. माझ्या उदरी विजयचा, केळकर घराण्याचा अंश वाढवीन; पण तू म्हणतोस तसंच असावं. नियतीच्या मनात काय होतं ते आपल्याला कळलं नाही. मी याच्यातून काहीतरी मार्ग काढीन.'' नंदिनी निर्वाणीच्या स्वरात म्हणाली आणि उठून चालू लागली. डॉक्टरांनी नंदिनीला समजावण्याचा निष्फळ प्रयत्न केला; पण त्यात पुरेसा जोर नव्हता. नंदिनी गेल्यावर त्यांनी स्मिथला फोन लावला आणि ताबडतोब विवेकला बोलावून घेण्याची व्यवस्था करायला सांगितलं.

***

नंदिनी सांगत होती, ''विवेकला मी नाही तर स्मिथने बोलावून घेतलं होतं. विवेक आला, तोपर्यंत माझा विचार पक्का झाला होता. केळकर घराण्याला हवा असणारा वारस मी देणारच आहे. तो वारससुद्धा विजय हा पिता आणि मी त्याची माता असाच असावा ही माझी इच्छा आहे. तो वारस माझ्या उदरीच वाढणार आहे. स्मिथने मला समजावलं आहे, त्याप्रमाणे माणसाचा मेंदू निष्क्रिय झाला की, ती व्यक्ती अधिकृतरीत्या किंवा कायदेशीररीत्या मृत म्हणून घोषित केली जाते आणि आता तर विजयचा मेंदूच अस्तित्वात नाही; त्यामुळे कायदेशीररीत्या विवेक हा विजय ठरू शकत नाही; त्यामुळे विवेक हा माझा कायदेशीर पती ठरू शकत नाही. जर मी बळजबरी केली तरी तो तुझ्यात गुंतल्यामुळे माझ्याशी रममाण होऊ शकणार नाही, हे स्पष्ट आहे; त्यामुळे आपण तिघंही दुःखी होऊ. विज्ञानाच्या जोरावर मी नियतीशी झुंज देण्याचा प्रयत्न केला; पण आज तरी नियतीचा विजय झाल्यासारखा दिसतो आहे. डॉ.बरोजने म्हटल्याप्रमाणे नियतीच्या मनात होतं तेवढंच सहजीवन मी विजयबरोबर उपभोगलं आहे; पण अजून तरी संपूर्ण हार मानलेली नाही. विज्ञानाच्या साहाय्याने मी माझं ईप्सित साध्य करायचं ठरवलं आहे; पण सुलभा ते तुझ्या संमतीनेच होईल. त्यासाठी मी स्वतः तुला भेटायला भारतात आले आहे


''डॉ. बरोज यांनीही मला साथ द्यायचं कबूल केलं आहे. होय, माझ्या विजयचा क्लोन मी माझ्या गर्भात वाढवणार आहे. तो खराखुरा केळकर घराण्याचा वंशज असेल. मला वाटतं, सुलभा, माझा एवढा तरी हक्क तू मान्य करशील.''

**svkale39@gmail.com**



# नॅनोशेल

डॉ. संजय ढोले



विशाखाला खूपच अशक्तपणा होता... त्यामुळे थकवा जाणवत होता. उभं राहणं तर सोडाच; पण नुसतं बसणंही शक्य नव्हतं. अंग टाकावंसं वाटत होतं... अंगात त्राणच नव्हतं... डोळे खोल गेले होते आणि त्याखाली काळी वर्तुळं उमटली होती.

आताही विशाखानं भिंतीला मान टेकून, डोळे बंद केले होते. छाती धपापत होती... डोळ्यांच्या कडा किंचितशा ओलावल्या होत्या. शेजारीच विशाखाची मुलगी स्वीटी हातात रिपोर्ट घेऊन विमनस्कपणे बसली होती. तिचं लग्न झालं होतं... आणि एक तिला तान्ही मुलगीही होती. आईचं मात्र ती सुरुवातीपासून हिरिरीने करीत होती. विशाखाची घालमेल तिच्या लक्षात आली. स्वीटीनं रिपोर्ट बाजूला ठेवले आणि हळूच विशाखाच्या मानेला हात घालून तिला स्वतःच्या मांडीवर झोपवलं. आताशा स्वीटी जणू विशाखाची आई झाली होती. तिनं विशाखाला थोपटत विचारलं...

विशाखानं डोळे मिटलेलेच होते... बोलण्याचे त्राणही नसल्याने तिनं फक्त नकारार्थी मान हलवली... तिचा श्वासोच्छ्वास मात्र जोरात सुरू होता. स्वीटीनं हळूच विशाखाच्या केसातून बोटे फिरविली... आईची स्थिती बघून तिचं मनही व्याकुळ झालं होतं.

मंगेशकर हॉस्पिटलच्या त्या सेक्शनमध्ये इतर डॉक्टर्स, नर्सची धावपळ सुरू होती. या ग्राउंड फ्लोअरवरील सेक्शनमध्ये बऱ्याच सुपर स्पेशालिटी डॉक्टर्सच्या केबिन होत्या... आणि त्या त्या डॉक्टर्सच्या केबिनबाहेर त्यांचे रुग्ण बसलेले होते... काही केबिन्सवर लाल दिवे लागले होते. म्हणजे तिथे डॉक्टर्स आले होते... डॉ. शिंगमिरेंच्या केबिनवरचा लाल दिवा मात्र बंदच होता. याचा अर्थ अजून ते आले नव्हते... केबिनबाहेरच एक अटेन्डन्ट नोंदवही घेऊन बसली होती... आणि जसे येतील तसे रुग्णांची ओळीने नोंद करून घेऊ लागली. डॉ. शिंगमिरे महाराष्ट्रातीलच नाही तर भारतातील अग्रगण्य केमोथेरपिस्ट होते... आणि सुरुवातीपासून विशाखावर तेच उपचार करीत होते.

विशाखा स्वीटीच्या मांडीवर विसावली होती... तिचा डोळा लागल्यानं स्वीटीनं हळूच तिच्या अंगावर चादर ओढली होती.

तेवढ्यात लगबगीने एक व्यक्ती पुढ्यात आली आणि विशाखाच्या पायालगत बसत म्हणाली,

''स्वीटी, मला वाटतं, डॉक्टर आलेत... आपला नंबर तिसराच आहे... आईचा डोळा लागला वाटतं.''

स्वीटीनं कोपऱ्यातल्या केबिनकडे पाहिलं... लाल दिवा लागला होता. डॉ. शिंगमिरे आल्याचीच ती खूण होती... ती म्हणाली, ''होय, काका... आत्ताच आईचा डोळा लागला.''

पण आवाजानं विशाखा चुळबुळली... महत्प्रयासानं डोळे उघडत म्हणाली, ''थकवा आल्यानं डोळा लागला...''

''असू द्या... झोपून घ्या... अजून थोडा वेळ लागेल... आत्ताच डॉ. शिंगमिरे आले आहेत.''

त्याच वेळी अटेन्डन्टनी पहिला पेशंट डॉ. शिंगमिरेंकडे पाठविला होता. त्या व्यक्तीने त्याची नोंद घेतली.

ती व्यक्ती म्हणजेच पुणे विद्यापीठातील प्रसिद्ध संशोधक, प्राध्यापक डॉ. समर सुरवटे होते. विशाखा त्यांच्या बायकोची मोठी बहीण होती... प्रकृती अस्वास्थ्यामुळे नाशिकहून स्वीटीकडे पुण्याला आल्या दिवसापासून डॉ. समर सावलीसारखे सोबत होते... प्रत्येक वेळी स्वीटी आणि डॉ. समर विशाखासोबत होते. अगदी कर्करोगाचं निदान होईपर्यंत. स्वीटी, विशाखाचे पती रघुनाथ व मुलगा अंकुर आणि सून सर्वचजण खचले होते... डॉ. समर व त्यांची पत्नी मोनिकाने या सर्वांना सांभाळलं होतं, धीर दिला होता. त्या दिवसापासून डॉ. समर सतत सोबत होते... रघुनाथ रामोळे इंजिनिअर होते आणि कामानिमित्त बाहेर असत, तर मुलगा अंकुर नोकरीनिमित्त मुंबईला होता. स्वीटीनं मात्र विशाखाची संपूर्ण जबाबदारी घेतली होती. एका मुलीचं कर्तव्य ती आई बनून करत होती. डॉ. समरना तिचं विशेष कौतुक होतं.

डॉ. समर हे संशोधक होते... आणि अतिसूक्ष्म पदार्थांमध्ये त्यांचं राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधन सुरू होतं. शिवाय विद्यापीठातील ते एक महत्त्वाचं व्यक्तिमत्त्व होतं. अटेन्डन्टनं विशाखाच्या नावाचा पुकारा केला. डॉ. समरनं हळूच विशाखाला आधार देऊन उठवलं... हाताला धरून ते विशाखाला पुढे नेऊ लागले. स्वीटीने रिपोर्ट हातात घेतले आणि तीही त्यांच्यामागून निघाली. डॉ. समरनी विचारलं, ''स्वीटी, पेट स्कॅनचे रिपोर्ट घेतलेत ना?''

''हो, काका...''

विशाखा हळूहळू पावलं टाकत होती. तरीही तिला धाप लागत होती.

डॉ. समरनी हळूच डॉ. शिंगमिरेंच्या केबिनचं दार लोटलं आणि तिघांनीही आत प्रवेश केला.

डॉ. शिंगमिरे... बुटकेसे, बांधेसूद, सावळे व गोल चेहऱ्याचे, देखणे आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या लक्षात येताच, त्यांनी विशाखाला तपासणी बेडवर झोपायला सांगताच, स्वीटीने आधार देऊन विशाखाला तिथे झोपवलं.

स्वीटी आणि डॉ. समर, डॉ. शिंगमिरेंसमोर बसले. डॉ. शिंगमिरे म्हणाले,

''पेटचा रिपोर्ट आणलाय?... बघू, त्यात काय प्रगती आहे?''

स्वीटीनं लागलीच पेटचा रिपोर्ट डॉ. शिंगमिरेंसमोर ठेवला... डॉ. शिंगमिरेंनी रिपोर्ट डोळ्यांखालून घातला आणि इमेजेस पाहिल्या... त्यांचा चेहरा थोडा सुकलेला वाटला. ते म्हणाले,

''गुड!... छान प्रगती आहे... चार सें.मी. आकाराचा ट्यूमर आता कुठंच दिसत नाही... फक्त काही नोड्स व पॅचेस आहेत... केमोच्या किती सायकल्स झाल्या?''

''डॉक्टर, दहा झाल्यात...'' डॉ. समरनं सांगितलं.

''ठीक आहे... आधी मी त्यांना बघतो...'' डॉ. शिंगमिरे तपासणी टेबलाजवळ येत म्हणाले, ''हं, विशाखाताईऽऽ कसं वाटतंय?''

''बरं आहे डॉक्टर... पण थकवा खूप आहे...''

''बरं!... बघू या...'' डॉ. शिंगमिरेंनी विशाखाला चौफेर तपासलं... डोळे, जीभ, हृदयाचे ठोके चेक केले आणि विशाखाचा ड्रेस नीटनेटका करीत म्हणाले... ''उठा व आवरून घ्या.''

डॉ. शिंगमिरे पुनश्च आसनस्थ होत म्हणाले,

''मला वाटतं, आता आपण केमो थांबवायला हवं... आता यापुढे

त्यांना ते झेपेल असं वाटत नाही... कारण थोडी काविळीचीही लागण झाली आहे... मी त्यावर औषधं देतो.''

''पण डॉक्टर, ट्यूमरचं काय?... आटोक्यात आहे का?'' डॉ. समरनं शंका काढली.

''मोठ्या प्रमाणात आटोक्यात आहे... पण काही नोड्स आणि पॅचेस शिल्लक आहेत; पण यापुढे आता त्यांना केमो सूट होणार नाही.''

''मग पुढे काय डॉक्टर... ओव्हर द टाइम इट विल ग्रो अगेन,'' डॉ. समरनं स्पष्ट सांगितलं.

''होय!... कारण तो मिटॉसीस आहे... आता अजून एक मार्ग आहे... त्याने हा वाइप्ड आउट होऊ शकतो आणि दॅट इज द ओन्ली ऑप्शन,'' डॉ. शिंगमिरे म्हणाले.

''कुठला, डॉक्टर?'' स्वीटी अगतिकतेने म्हणाली.

''रेडिएशन चिकित्सा... ते ऑन्कॉलॉजिस्ट ठरवतील... पण मला वाटतं, लोकॅलाइज रेडिएशन चिकित्सा यावर परिणामकारक ठरेल.'' डॉ. शिंगमिरेंनी मार्ग सांगितला.

''सर!... काहीही हरकत नाही... वुई विल ऑप्ट दिस ऑप्शन,'' डॉ. समरनं सहमती दर्शवली.

''कारण तोच एक मार्ग आहे, डॉ. समर,'' डॉ. शिंगमिरे म्हणाले.

''येस सर, काही हरकत नाही... कुणाकडे जायचं?'' डॉ. समरनं विचारलं.

''ठीक आहे... मी आत्ताच बोलतो...''

डॉ. शिंगमिरेंनी मोबाइल काढला आणि नंबर प्रेस करून कानाला लावला.

''हं, जयश्री... मी डॉ. शिंगमिरे...''

''हं, बोला ना सर!'' पलीकडून आवाज आला.

''मी एक विशाखा रामोळे नावाच्या पेशंट पाठवतोय... लंग्ज मिटॉसीस मॅलग्नन्सी होती. शी हॅज ऑलरेडी गॉन अंडर टेन रिगरस सायकल ऑफ केमो... नाइंटी परसेन्ट हॅज बीन रिमूव्ह्ड. बट सम ऑफ द नोड्स ॲण्ड पॅचेस आर लेफ्ट... पुढचे केमो सहन करणं त्यांच्या प्रकृतीला शक्य दिसत नाही... मला वाटतं, रेडिएशन कॅन कन्ट्रोल दिस नोड्स... थोडं प्रायॉरिटीने बघून घेशील का?... आणि पुढच्या मोडॅलिटीज ठरवून घे... ठीक आहे?'' डॉ. शिंगमिरेंनी थोडक्यात पण सविस्तर सांगितलं.

''ठीक आहे, सर!... आत्ता पाठवता?''

''होय!... लगेच, मे बी विदिन फाइव्ह मिनिट दे विल रिच... बायऽऽ... ॲण्ड सी यू, जयश्री...''

''बाय सर... मी वाट पाहते.''

डॉ. शिंगमिरेंनी मोबाइल खिशात घातला आणि डॉ. समरकडे पाहत म्हणाले,

''डॉ. समर!... मी डॉ. जयश्री काटीकरांशी बोललो... त्या मुख्य व तज्ज्ञ ऑन्कॉलॉजिस्ट आहेत. त्या सर्व बघून पुढची ट्रीटमेंट ठरवतील... काळजी करू नका... सर्व ठीक होईल.'' डॉ. शिंगमिरे आश्वस्त करीत म्हणाले.

''डॉक्टर, कुठे आहे हा रेडिएशन चिकित्सा झोन?'' डॉ. समरनं विचारलं

''याच इमारतीत... मुख्य पोर्चमधून सरळ खाली तळघरात गेलं की, तिथे रेडिएशन चिकित्सा सुविधा आहे... आपण दोन मिनिटांत पोहोचाल.'' डॉ. शिंगमिरेंनी दिशा दाखवली.

''थँक यू, सर! तुम्ही सांगितल्याप्रमाणे आम्ही निश्चितच रेडिएशन चिकित्सेचा विचार करू,'' डॉ. समर आदराने म्हणाले.

''दॅट इज द ओन्ली ऑप्शन वुई हॅव.'' डॉ. शिंगमिरेंनी सांगितलं.

''ओके सर... आम्ही आत्ताच जातो... थँक यू.'' डॉ. समरनं हात जोडले व उभे राहिले.

स्वीटीने, विशाखाला हाताशी धरून उठवलं... कपडे नीटनेटके करून, तिघंही केबिनबाहेर पडले... त्या वेळी डॉ. शिंगमिरे क्षणभर शून्यात पाहत राहिले. दुसरा पेशंट पुढ्यात आला, तेव्हा ते भानावर आले.

डॉ. समर आणि स्वीटी विशाखाला घेऊन तळघरात आले होते. तिथे बरेच रुग्ण बसले होते, तर काही झोपले होते. लाल दिवे असणाऱ्या खोल्यांमधून घर्रऽऽ घर्रऽऽ आवाज येत होता. ते इलेक्ट्रॉन प्रवेगक व गॅमा किरणांचे किरणोत्सारी स्रोत होते. कोपऱ्यात डावीकडे एक केबिन होती आणि त्यावर डॉ. जयश्री काटीकर नाव झळकत होतं. बाहेर तीन-चार रुग्ण बसले होते. स्वीटीनं विशाखाला एका खुर्चीत बसवलं आणि डॉ. समर रिसेप्शनिस्टकडे गेले. त्यांनी विशाखा रामोळे नाव सांगताच, रिसेप्शनिस्ट तत्काळ म्हणाली,

''एक मिनिट हं, सर!''

आणि ती आत गेली व लगेच बाहेर येत म्हणाली,

''सर!... तुम्ही आत जाऊ शकता.''

डॉ. समरना आश्चर्य वाटलं; कारण बाहेर काही पेशंट होते. विशाखाला घेऊन डॉ. समर व स्वीटीने केबिनमध्ये प्रवेश केला.

डॉ. जयश्री किडकिडीत, गोऱ्या आणि प्रसन्न होत्या. त्यांच्या चेहऱ्याची ठेवण आकर्षक होती. डॉ. समरना पाहताच त्या म्हणाल्या,

''बसा ना!... विशाखा रामोळे याच का?'' डॉ. जयश्रीने अंदाज बांधला.

स्वीटी आणि विशाखाही एव्हाना बसल्या होत्या. स्वीटी म्हणाली,

''होय!... याच विशाखा रामोळे. माझी आई.''

डॉ. जयश्रीनं स्मित केलं. विशाखाकडे पाहिलं. क्षणात त्यांनी न्याहाळून घेतलं व म्हणाल्या,

''रिपोर्ट बघू.''

पेट स्कॅनचे रिपोर्ट त्यांच्या हातात देत स्वीटी म्हणाली,

''कालच काढलेत.''

डॉ. जयश्रींनी क्षणात रिपोर्ट वाचून काढला आणि इमेजेसही पाहिल्या. पूर्वीचेही पेट रिपोर्ट पाहिले. ट्यूमर बऱ्यापैकी रुंदावला होता. प्रदीर्घ श्वास सोडत त्या म्हणाल्या,

''झोपा तिथे. बघून घेते.''

विशाखा लगेच तपासणी बेडवर झोपली. डॉ. जयश्रींनी काटेकोरपणे तपासलं आणि विचारलं,

''आता काही त्रास होतो का?''

''डॉक्टर, अशक्तपणा व थकवा खूप आहे. भूक लागत नाही; त्यामुळे निरस वाटतं.''

डोळे तपासत असतानाच, डॉ. जयश्रीने मोबाइल कानाला लावला.

''सर!... राइट नाऊ विशाखा रामोळे इज सफरिंग फ्रॉम जॉंडीस... शी इज फीलिंग टायर्डनेस... अशा स्थितीत... हो सर... हो सर... बघते... OK, थँक यू!''

डॉ. जयश्रीने मोबाइल बाजूला ठेवला आणि म्हणाल्या,

''डॉ. शिंगमिरेंनी काविळीवर ट्रीटमेन्ट दिली आहे का?''

''होय!... मॅडमऽऽ...'' डॉ. समरने हातात प्रिस्क्रिप्शन दिलं... त्या पुढे म्हणाल्या, ''काविळीचा प्रादुर्भाव आहे; त्यामुळे त्यांना थकवा आहे. केमोमुळे प्रतिकारशक्ती कमी झाल्याने असं होतं. डॉ. शिंगमिरेंनी औषधं दिलेली आहेत. ती घ्या. आठ दिवसांनंतर आपण विशाखाची रेडिएशन चिकित्सा सुरू करू या...''

''मॅडम! एक विचारू?'' डॉ. समरनं विचारलं.

''विचारा ना,'' डॉ. जयश्री म्हणाल्या.

''त्याचा उपयोग होईल ना? नेमकं कुठलं रेडिएशन तुम्ही वापरणार आहात? आय मीन व्हॉट मोडॅलिटीज?'' डॉ. समरनं सरळ विचारलं.

''एक मिनिट... सांगते.''

तेवढ्यात डॉ. जयश्रींचे दोन वैद्यकीय भौतिकशास्त्रज्ञ तिथे आले. त्यांनी कॉम्प्युटर स्क्रीनवर पेटच्या इमेज दृग्गोचर केल्या आणि म्हणाल्या,

''हे बघा... इथे हे मॅलिग्नन्ट नोड्स आहेत आणि पॅचेस. त्यांनाच आपल्याला नेस्तनाबूत करायचंय. डॉ. शिंगमिरेंच्या मते त्यांना आता केमो सहन होणं शक्य नाही; त्यामुळे रेडिएशन हा पर्याय आहे. मी तर म्हणेन संजीवनी आहे. इलेक्ट्रॉन किंवा गॅमा किरणांच्या साह्याने आपल्याला या नोड्सचा नायनाट करायचा आहे. यात दोन पद्धती आहेत.'' डॉ. जयश्रींनं डॉ. समरकडे बघून सांगितलं.

''कुठल्या?'' डॉ. समरचा स्वाभाविक प्रश्न.

''पहिली म्हणजे आयएमआरटी म्हणजेच तीव्र अपरिवर्तित किरण चिकित्सा आणि दुसरी म्हणजे रॅपिड आर्क. पहिल्या चिकित्सेत किरणांची तीव्रता नियंत्रित करून, फक्त ट्यूमरच्या जागीच मात्रा दिली जाते. फक्त विषारी पेशींनाच टार्गेट केलं जातं. यामध्ये जास्तीतजास्त पेशींचं जतन केलं जातं. दुसऱ्या चिकित्सेत मात्र तीव्रता नियंत्रणासोबतच प्रवेगक ३६० अंशांमध्ये फिरवून फक्त विषारी पेशींचाच वेध घेतला जातो. यामध्ये चांगल्या पेशींचा नायनाट होत नसल्याने, रुग्णाला कुठल्याही प्रकारचा त्रास होत नाही. मला वाटतं, विशाखासाठी दोन्हीही लागू पडतील. यात आयएमआरटी कमी खर्चिक असून, रॅपिड आर्कचा खर्च मात्र लाखात जाऊ शकतो.'' डॉ. जयश्रींनी स्पष्ट सांगितलं.

''मॅडम, पैशाचा प्रश्न नाही. तुम्हाला विशाखाताईंसाठी कुठली पद्धत योग्य वाटते, तिचाच आम्ही स्वीकार करू.'' डॉ. समरने सहमती दर्शवली.

''मला वाटतं, यांच्यासाठी रॅपिड आर्क योग्य ठरेल. या अशा टप्प्यात आपण कुठलीही जोखीम घेणं योग्य नाही.'' डॉ. जयश्री म्हणाल्या.

''ठीक आहे. वुई विल गो फॉर रॅपिड आर्क.'' डॉ. समर पुढे म्हणाले, ''मॅडम, कधी येऊ आम्ही?''

''मला वाटतं, पुढच्या आठवड्यात - सोमवारी. तोपर्यंत त्यांची कावीळही बरी होईल. वुई विल स्टार्ट दिस थेरपी.'' डॉ. जयश्रींनी अंतिमतः ठरवलं.

''ठीक आहे. आम्ही सोमवारी येऊ.'' डॉ. समर म्हणाले.

त्याच वेळी डॉ. जयश्रीचे सहकारी म्हणाले,

''सर, आपण डॉ. समर ना? पुणे विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागात असता ना?''

''होय!'' डॉ. समर आश्चर्याने म्हणाले.

''सर! मला ओळखलंत?''

डॉ. समरनं निरखून पाहिलं; पण ओळख पटत नव्हती. त्यांची स्थिती पाहताच तो पुढे म्हणाला,

''कसं ओळखणार सर! तुम्ही संशोधनानंतर त्याच वर्षी व्याखाता म्हणून रुजू झाला होतात आणि मी तुमच्याकडे प्रोजेक्ट केला होता. सर, मी तुमचा विद्यार्थी अमोघ वैद्य. इथं मेडिकल फिजिसिस्ट आहे आणि हा कुलदीप जाधव. आम्ही दोघंही तुमचे विद्यार्थी आहोत.''

आता डॉ. समरना आठवलं. त्यांना अतिशय आनंद झाला. ते म्हणाले,

''अरे अमोघ, कुलदीप किती बदललात रे तुम्ही. ओळखूच आला नाहीत; पण तुम्ही मात्र मला ओळखलंत हं! थँक यू!'' डॉ. समर ओशाळले.

कुलदीप डॉ. जयश्रीकडे पाहत म्हणाला,

''मॅडम, सर आमचे आवडते शिक्षक होते.''

''आणि मित्रही! त्यांनी आम्हाला खूप सांभाळून घेतलं.'' अमोघनं पुढे सांगितलं.

दोघंही भरभरून बोलत होते. शेवटी अमोघ म्हणाला,

''सर, मॅडमनी सुचवलेला मार्ग अतिशय उत्तम आहे. शिवाय आम्ही दोघंही आहोत. आम्हीच उपचार करणार आहोत. तुम्ही निर्धास्त राहा.''

डॉ. समर रिलॅक्स झाले. स्वीटीच्या चेहऱ्यावरचा ताणही निवळला, तर विशाखाचा चेहरा फुलला होता. डॉ. समरनी सर्व सुविधा पाहिल्या. सोमवारी स्वतः येण्याचं आश्वासन देऊन, डॉ. समर, स्वीटी, विशाखा घरी परतले.

डॉ. समरनी विशाखा व स्वीटीला त्यांच्या घरी सोडलं होतं आणि डॉ. समर पुन्हा विभागात रुजू झाले होते. दरम्यान, त्यांनी मोनिकाला सगळं इत्थंभूत सांगितलं होतं.

आल्या आल्या डॉ. समर प्रयोगशाळेत गढून गेले होते. काही नॅनोशेल व पदार्थांवर त्यांचे प्रयोग चालू होते आणि त्यांनी ग्राफिन, कॅडमिअम सल्फेट, झिंक, सोनं आणि चांदीचे सूक्ष्म कण वापरून मानवी शरीराला झेपतील, असे नॅनोशेल तयार केले होते आणि त्यांचा उपयोग त्यांनाही कर्करोगाच्या चिकित्सेसाठी करायचा होता. राष्ट्रीय पेशी व कोशिका केंद्रातील संशोधिका डॉ. सुनीता राणेंसोबत त्यांचे संशोधनाचे प्रयोग चालू होते. या नॅनोशेलची किमया त्यांना पाहायची होती. आता त्या दृष्टीने पावले पडू लागली होती.

राष्ट्रीय पेशी विज्ञान केंद्रातील संशोधिका डॉ. सुनीता राणेंबरोबरचं डॉ. समरचं काम एका महत्त्वपूर्ण टप्प्यावर होतं. डॉ. सुनीता या पेशी विज्ञानातील तज्ज्ञ होत्या आणि कर्करोगाच्या विविध पेशींवरील त्यांचं बहुतांश संशोधन राष्ट्रीय पातळीवर गाजलेलं होतं. तर डॉ. समर अतिसूक्ष्म पदार्थ विज्ञानात तज्ज्ञ असल्याने, डॉ. सुनीताशी संशोधन पातळीवर चांगली देवाण-घेवाण होऊ लागली होती. विद्यार्थ्यांनाही त्याचा फायदा होत होता. विकसित नॅनोशेलच्या साहाय्याने कर्करोगाच्या पेशींचा नायनाट करण्याचा महत्त्वाचा संशोधन प्रकल्प डॉ. समरनी हाती घेतला होता. या कामी डॉ. सुनीता यांची खूपच मदत होत होती; कारण नॅनो पदार्थांची चाचणी प्रथम उंदरांवर त्यांच्याच माध्यमातून करणं शक्य होत होतं.

काही दिवसांपूर्वीच डॉ. समरनं प्रयोगशाळेत ग्राफिन हा मूलभूत पदार्थ घेऊन कॅडमिअम सल्फेट, झिंक, सोनं व चांदीचे पदार्थ वापरून नॅनोशेल विकसित करण्यात यश मिळविलं होतं आणि चाचणीसाठी त्यांनी ते डॉ. सुनीतांकडे हस्तांतरित केलं होतं. त्याच्या सकारात्मक परिणामांची ते वाट पाहत होते.

डॉ. समरनं मोबाइल काढला आणि नंबर प्रेस करत कानाला लावला.

''हॅलोऽऽ समर सर...''

''सुनीता, नॅनोशेलचा प्रयोग काय म्हणतोय?'' डॉ. समर, डॉ. सुनीताला एकेरी नावानेच संबोधित करत; कारण वयाने त्या लहान होत्या; पण कर्तृत्वाने मात्र मोठ्या होत्या, याची जाणीव डॉ. समरना होती.

''सर!... तुम्ही सांगितल्याप्रमाणे नॅनोशेल कर्करोगबाधित उंदरांमध्ये सोडण्यात आलेत.''

''मग, काही परिणाम?'' डॉ. समर अधीरतेने मध्येच म्हणाले.

''नाही सर!... पण एक मात्र खरं...'' डॉ. सुनीता विचार करून उत्तरल्या.

''काय?'' डॉ. समरनं प्रश्नार्थक मुद्रेने विचारलं

''नॅनोशेल मात्र अनुमानानुसार फक्त कर्करोग पेशींनाच चिकटलेले आहेत.'' डॉ. सुनीतानं सांगितलं.

''दॅट्स गुड! सुनीता. खूपच छान! किमान नॅनोशेलमध्ये फक्त कर्करोग पेशींना शोधण्याचे गुणधर्म आहेत, ही जमेचीच बाजू आहे; पण ते शेल कर्करोग पेशींना इजा पोहोचवून त्यांचा नायनाट करत आहेत का?'' डॉ. समरने उत्सुकतेने विचारलं.

''नाही ना सर, खरं तर मी त्याचीच वाट पाहतेय. कर्करोग पेशींना शोधणं हा तसा खूप छान परिणाम आहे; पण तेवढं पुरेसं नाही; कारण त्यांच्यात कर्करोगाच्या पेशींचा नायनाट करण्याचे गुणधर्म विकसित करायला हवेत.'' डॉ. सुनीतानं इच्छा व्यक्त केली.

''बरोबर आहे तुझं, सुनीता. किती दिवस झाले नॅनोशेल उंदराच्या शरीरात टाकून?''

''सर, दोन दिवस झाले.'' डॉ. सुनीताने माहिती दिली.

''अजूनही तसेच आहेत?'' डॉ. समरची शंका.

''हो, सर!''

''सुनीता, मला वाटतं, तू हा प्रयोग तसाच कंटिन्यू कर. मी नॅनोशेलचे इतर गुणधर्म शोधण्याचा प्रयत्न करतो आणि आय विल गेट बॅक सून. OK'' डॉ. समर निर्वाणीचं बोलले.

''OK, सर !'' मी प्रयोग चालू ठेवून निरीक्षण करते आणि तुमची वाट पाहते. बाय सर!''

''बाय''

मोबाइल खंडित झाला. डॉ. समर विचारमग्न झाले. नॅनोशेलचे बहुतांश गुणधर्म त्यांनी शोधून काढले होते. यात एक मात्र चांगलं झालं होतं... नॅनोशेल फक्त कर्करोगांच्या पेशींनाच शोधून चिटकत होते; पण त्यांचा नायनाट करत नव्हते.

अखेर त्यांच्या डोक्यात एक कल्पना तरळून गेली. त्यांचा चेहरा खुलला. त्यांनी संशोधक विद्यार्थी किशोर गव्हाणेला हाक मारली; कारण तोच या नॅनोशेलच्या संशोधनावर प्रयोग करीत होता. किशोर हजर होताच म्हणाला,

''सर, बोलावलंत मला?''

''होय, किशोर, बैस!'' किशोर खुर्चीत बसत व अपेक्षेने पाहत राहिला.

डॉ. समर पुढे म्हणाले,

''किशोर, तू नॅनोशेल विकसित केलेत ना?''

''होय सर!''

''त्यावर एक शेवटचा प्रयोग करायचा आहे!'' डॉ. समर विचार करत म्हणाले.

''कोणता सर? तुम्ही सांगा. मी लगेच अमलात आणतो.'' किशोर म्हणाला.

''आपल्याकडे उपारुण किरणे म्हणजेच इन्फ्रारेडिएशनचा स्रोत आहे ना?''

''हो, सर! आहे... आणि तोही चांगलाच प्रखर आहे.'' किशोरनं माहिती दिली.

''गुड! खुल्या वातावरणात आणि पाण्यात नॅनोशेल टाकून त्यावर किमान अर्धा तास उपारुण किरणांचा मारा कर आणि मला सांग काय घडतं ते.'' डॉ. समरनं दिशा दिली.

''सर, हा खूपच महत्त्वाकांक्षी प्रयोग आहे. मी आत्तापासूनच सुरुवात करतो!'' किशोर उत्साहानं उत्तरला.

''नॅनोशेल आहेत?'' डॉ. समरचा प्रश्न.

''नाही ना सर! ते सर्व राणे मॅडमना दिले होते; पण मी आज रात्रभरात नॅनोशेल मिळवतो; कॉम्बिनेशन तेच ठेवायचं ना सर?'' किशोरनं विचारलं.

''होय किशोर! मुख्य म्हणजे बेस ग्राफिन, त्यावर कॅडमिअम सल्फेट व नंतर झिंक, सोनं आणि चांदीच्या अतिसूक्ष्म कणांचा लेप... असाच क्रम राहू दे; कारण हे कॉम्बिनेशन कर्करोग पेशींना शोधून चिकटतात हे सिद्ध झालं आहे. फक्त आता त्यावर उपारुण किरणांचा मारा करून काय घडतं हे बघायचंय.'' डॉ. समरनं क्रम सांगितला.

''नेमकं काय होऊ शकेल, सर?'' किशोरनं विचारलं.

''बघू या! कदाचित हे नॅनोशेल संपूर्ण उपारुण किरणे शोषून घेऊन, गुणधर्मांचं वेगळं रहस्य उलगडतील असं वाटतं. लेट अस होप फॉर द बेस्ट! किशोर, गो अहेड! मला उद्यापर्यंत या संदर्भातील परिणाम हवे

आहेत.'' डॉ. समरनं अपेक्षा व्यक्त केली.

''शुअरऽऽ सर! मी आत्ताच प्रयोगाला लागतो.''

किशोर माघारी वळला आणि डॉ. समरना थोडं बरं वाटलं. या दिशेला त्यांना निश्चितच काहीतरी गवसणार होतं.

दिवसभर दगदग झाली होती. स्वीटीला मोबाइल करून डॉ. समरनं विशाखा ठीक असल्याची खात्री करून घेतली. काविळीची औषधं सुरू झाली होती.

रात्र झाली होती. डॉ. समर नॅनोशेलवरील काही संशोधन पेपर हातात घेऊन विभागाबाहेर पडले. थोड्याच वेळात त्यांची कार विद्यापीठाबाहेर होती.

गेले तीन महिने डॉ. समर विशाखासोबत होते. तसं पाहता त्यांचं नातं पत्नी मोनिकाकडून होतं; पण ऋणानुबंध घट्ट होते. शिवाय स्वीटी मुलगी म्हणून सावलीसारखी विशाखासोबत होती. स्वीटी लाघवी मुलगी होती आणि डॉ. समर तिला मुलगीच मानत होते; त्यामुळे अशा प्रसंगात स्वीटीला डॉ. समरचा मोठाच आधार होता. कुठलाही चिकित्सक निर्णय डॉ. समर घेत होते. विशाखाचा पती रघुनाथ आणि मुलगा अंकुर अधूनमधून येऊन जात असत; कारण उपचारांसाठी पैसा उभा करणं ही मोठी जबाबदारी रघुनाथवर येऊन पडली होती आणि ते कुठंही पैसा कमी पडू देत नव्हते. पुण्यातील दवाखाना मात्र पूर्णपणे स्वीटी, डॉ. समर पाहत होते. शिवाय मोनिकाचीही साथ होती. उपचाराचा कुठलाही निर्णय डॉ. समर घेत होते.

सहा महिन्यांपूर्वी नाशिकमध्येच विशाखाचा खोकल्याचा त्रास बळावत गेला. उपचार सुरू झाले; पण डॉक्टरांच्या दुर्लक्षामुळे किंवा चुकीच्या निदानामुळे विशाखाची तब्येत कमालीची खालावत गेली. शेवटी स्वीटी तिला पुण्यात घेऊन आली आणि डॉ. समरच्या साहाय्याने तज्ज्ञ डॉक्टरांना रेफर केलं. अचूक निदान करताकरता त्यात दोन आठवडे निघून गेले आणि शेवटी फुफ्फुस व अन्ननलिकेमध्ये ट्यूमर शोधला गेला. तो मिटॉसीस असल्याने त्याचे पडसाद पेट स्कॅनमध्ये इतर ठिकाणीही दिसले. ऑपरेशन शक्य नसल्याचे डॉक्टरांनी सांगितले. केमो थेरपी हा एक पर्याय होता. शेवटी तोच स्वीकारावा लागला; कारण लवकरात लवकर कर्करोगाच्या वाढीवर नियंत्रण मिळविणं गरजेचं होतं. त्यानुसार मंगेशकर हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टर शिंगमिरेंच्या मार्गदर्शनाखाली केमोच्या चौदा सायकल्स ठरल्या आणि एका जीवघेण्या प्रवासाला सुरुवात झाली होती.

केमो रोगही मारत होता आणि माणूसही! केमोच्या दहा सायकल्सपर्यंत विशाखानं कमालीची सहनशीलता दाखवली; पण तद्नंतर मात्र विशाखामध्ये केमो सहन करण्याची शक्तीच उरली नाही. ट्यूमर बऱ्यापैकी नियंत्रित झाला होता; पण काही नोड्स व पॅचेस उरले होते आणि विशाखाची परिस्थिती पाहता आता केमो देणं शक्य नव्हतं; कारण तेवढं त्राणच नव्हतं; म्हणून रेडिएशनचा पर्याय आला. नोडस्‌चा नायनाट करणं गरजेचंच होतं. नाहीतर ट्यूमर पुन्हा चौपट वेगाने वाढण्याची भीती होती.

रेडिएशनचा पर्याय डॉ. समरनं स्वीकारला; पण काविळीची लागण झाल्याने तत्काळ रेडिएशन चिकित्सा देणं योग्य नव्हतं; त्यामुळे आठ दिवसांनंतर काविळ बरी झाल्यावर, रेडिएशन चिकित्सेची पहिली मात्रा देण्याचं ठरलं होतं. सर्व नोड्सचा नायनाट करण्यासाठी एकूण वीस ग्रे एवढी रेडिएशन मात्रा देण्याची गरज असल्याचं डॉ. जयश्रीनं स्पष्ट केलं होतं आणि एका बैठकीत जास्तीतजास्त दोन ग्रे एवढीच मात्रा मानवी शरीराला दिली जात होती. त्यानुसार रेडिएशनच्याही एकूण दहा सायकल्स लागणार होत्या. विशाखाची खरं तर हीच खरी कसोटी होती; पण पर्यायही नव्हता.

घरी आल्या आल्या पत्नी मोनिकाला डॉ. समरनं सर्व सांगितलं होतं. मोनिका तशी मनानं हळवी होती. तिच्या डोळ्यांत अश्रू जमा झाले, ती म्हणाली,

''माझ्या ताईच्या जीवनात काय वाढून ठेवलंय? बरी होईल ना हो ती?''

''अगं, तोच तर प्रयत्न चालू आहे.'' डॉ. समरनं मोनिकाला समाजावलं.

''पण तिला पुन्हा या रेडिएशनच्या दहा सायकल्स झेपतील का हो ?'' मोनिकाचा रास्त प्रश्न.

''अगं, बघू या. जोपर्यंत त्यांना झेपेल तोपर्यंत देऊ. नंतर बघू. काहीतरी मार्ग निश्चित निघेल. सध्या कर्करोग नियंत्रित करणं गरजेचं आहे. तू काळजी करू नकोस. आठ दिवसांनंतर रेडिएशन चिकित्सा करणार आहोत. त्यांना थोडीशी काविळीची लागण आहे. ती बरी झाली की, उपचार सुरू होतील. हवं तर विशाखाताईंशी मोबाइलवर बोलून घे. बरं वाटेल त्यांना.''

डॉ. समरनं मोनिकाला थोपटलं आणि फ्रेश व्हायला बाथरूममध्ये शिरले. मोनिकाने लागलीच मोबाइल केला आणि ती विशाखाताईंशी बराच वेळ बोलत राहिली. त्यांचा खोलवर गेलेला आवाज मोनिकाला जाणवला. तरीही ती बोलतच राहिली.

पाच-सहा दिवसांनंतर काविळीचा प्रादुर्भाव कमी झाला होता. तसा रिपोर्टही आला होता.

रेडिएशनच्या पहिल्या सायकलसाठी सोमवारी डॉ. समर, स्वीटी, विशाखाला घेऊन हजर झाले होते. कुलदीप व अमोघने विशाखाचा ताबा घेतला होता. डॉ. जयश्रीही सोबत होत्या. पुढचे रेडिएशन उपचार कुलदीप व अमोघच करणार होते. डॉ. समर आणि स्वीटी मात्र कुलदीपच्या केबिनमध्ये बसले होते.

विशाखानं रेडिएशन झोन व प्रवेगक ग्रॅंट्रीत प्रवेश केला होता आणि सगळ्या मोडॅलिटीज ठरवून कुलदीप व अमोघ नियंत्रण कक्षात आले. अमोघने कॉम्प्युटरचा ताबा घेतला होता.

कुलदीपनं डॉ. समर व स्वीटीला नियंत्रण कक्षात बोलावून घेतलं आणि आत विशाखा जिथे झोपली होती ते दृश्य दाखवलं. कुलदीप व अमोघ डॉ. समरचे विद्यार्थी असल्यानेच केवळ हे शक्य होत होतं. नाहीतर नियंत्रण कक्षात कुणालाही प्रवेश नसे.

विशाखा निपचित पडली होती. भव्य प्रवेगकाची ग्रॅंट्री होती. अमोघने रेडिएशनची मात्रा स्थिर केली आणि प्रवेगक चालू केला. फक्त दोन मिनिटं आणि पहिली सायकल पूर्ण झाली होती. विशाखा स्वतः चालत, हसतमुखाने बाहेर आली. तिला उत्साह वाटत होता. आता थकवा नसला

तरी अशक्तपणा होता; पण रेडिएशनची मात्रा अशी जाणवलीच नव्हती. ती उत्साहात होती. विशाखाच्या चेहऱ्याकडे पाहून डॉ. समर व स्वीटीला बरं वाटलं. कुलदीप, अमोघ आणि डॉ. जयश्रीचा निरोप घेऊन डॉ. समर व स्वीटी विशाखाला घेऊन बाहेर पडले. पुढच्या सोमवारी त्यांना पुन्हा यायचं होतं.

रेडिएशनच्या तीन सायकल्स व्यवस्थित झाल्या; पण चौथ्या सायकलला विशाखाला त्रास जाणवू लागला. उलट्या व अंगाची लाही लाही होऊ लागली. डॉ. जयश्रींनी औषधं लिहून दिली; पण त्याने फारसा फरक पडला नाही. पाचव्या सायकलला मात्र विशाखाला पुन्हा आधार देऊन आणावं लागलं आणि डॉ. जयश्रींनी त्यांना तपासणी टेबलावर घेतलं. प्रकृती ढासळलेलीच होती. या वेळी मोनिकाही सोबत होती. डॉ. जयश्रीने मोबाइल काढला आणि कानाला लावला. पलीकडून आवाज आला.

''हं, बोल जयश्री.'' डॉ. शिंगमिरे म्हणाले.

''सर!... विशाखा रामोळे पेशंट...''

''हं माहिती आहे... बोल ना!'' डॉ. शिंगमिरे मध्येच बोलले.

''शी इज डिटेरिओरेटिंग व्हेरी फास्ट!'' डॉ. जयश्रीनं सांगितलं.

या बोलण्याकडे डॉ. समरचं काळजीपूर्वक लक्ष होतं. ते चुळबुळले.

''किती सायकल्स झाल्यात?'' डॉ. शिंगमिरेंनी माहिती विचारली.

''सर, चार. आज पाचवी होती; पण आय डोन्ट थिंक शी विल टॉलरेट.'' डॉ. जयश्रीने वस्तुस्थिती सांगितली.

''जयश्री, मला वाटतं, यू टेक अ ब्रेक. त्यांना रेडिएशन झेपत नाही. यू स्टॉप इट. लेट हर इम्प्रूव्ह. वुई विल थिंक लेटर.'' डॉ. शिंगमिरे म्हणाले.

''ठीक आहे, सर!''

डॉ. जयश्रीने मोबाइल बंद केला आणि डॉ. समरकडे पाहत म्हणाल्या,

''डॉ. समर, मला वाटतं, आपण रेडिएशन थांबवू या; कारण त्यांच्या प्रकृतीची अवस्था वाईट आहे. मी काही औषधं लिहून देते. वन्स शी इम्प्रूव्हज, देन वुई विल गिव्ह अदर सायकल. तोपर्यंत लेट हर टेक अ रेस्ट.''

''मॅडम, मी ऐकलंय सर्व. तुम्ही म्हणाल तसं.'' डॉ. समर म्हणाले. स्वीटीलाही कळून चुकलं होतं. तिचा कंठ दाटून आला. ती काहीच बोलली नाही; पण डॉ. समरनं मात्र तिला धीर दिला. मोनिकानं विशाखाला हळूच आधार देऊन उठवलं. ड्रेस नीटनेटका केला आणि तिघांनीही डॉ. जयश्रीचा निरोप घेतला. कुलदीप व अमोघ डॉ. समरना मुख्य द्वारापर्यंत पोहोचवायला आले होते. अमोघ म्हणाला,

''सर! लेट अस होप फॉर द बेस्ट! बरेच नोड्स नाहीसे झालेत; पण आताशा त्यांचं शरीर साथ देत नाही.''

''शुअर!... अमोघ, कुलदीप तुमची खूप मदत झाली... आणि अजून पुढेही लागेल. थँक यू!'' डॉ. समरनं आभार व्यक्त केले.

''सर! आम्ही हे सगळं तुमच्याकडूनच शिकलोय.'' कुलदीप म्हणाला.

डॉ. समरने फक्त स्मित केलं आणि त्यांचा निरोप घेतला. विशाखाला व्हीलचेअरवर बसवून ते पार्किंगकडे जाऊ लागले. मोनिका सावकाश व्हीलचेअर ढकलत होती.

कार सेनापती बापट रस्त्यावरून चालली होती. तेवढ्यात डॉ. समरचा मोबाइल वाजला. त्यांच्या कानात मायक्रोफोन होता. ते म्हणाले

''हॅलोऽऽ''

''सर! मी किशोर!''

''हं किशोर, बोल, काही परिणाम?''

''होय सर! तुम्ही सांगितल्याप्रमाणे नवीन ग्राफिन व धातूचे नॅनोशेल तयार केले आणि त्याच्यावर उपारुण किरणांचाही मारा केला.''

''मग काय झालं किशोर?'' डॉ. समर अधीरतेने ड्राइव्ह सीटवर नीटनेटके बसले. त्यांची उत्सुकताही वाढली.

तेवढ्यात मोनिका म्हणाली,

''अहो, नंतर बोला. तुम्ही ड्रायव्हिंग करत आहात.''

तिला फक्त खुणेनेच थांबवत डॉ. समर किशोर पुढे काय म्हणतोय ते ऐकू लागले.

''सर, तुम्ही सांगितल्याप्रमाणे वातावरण व पाण्यात नॅनोशेल टाकून, उपारुण किरणांच्या माऱ्याने तापमान वाढलंय.'' किशोरनं परिणामच सांगितला.

''काय म्हणतोस किशोर. किती?'' पुन्हा डॉ. समरची उत्सुकता.

''सर, किमान शंभर डिग्री.''

''दोघांत?'' डॉ. समरचा प्रश्न.

''नाही सर, पाण्यात टाकलेल्या नॅनोशेलचा; पण वातावरणात असणारे नॅनोशेलही कमालीचा चटका जाणवण्याइतपत तापलेत.'' किशोरनं वस्तुस्थिती सांगितली.

''व्हेरी गुड!... किशोर, खूप छान काम केलंस. एक काम करशील?''

''काय सर?''

''आत्ताच उपारुण किरणांचा स्रोत घेऊन तू एन.सी.सी.एस.मध्ये सुनीता राणेंकडे जा. मी त्यांच्याशी बोलतो.'' डॉ. समरनं दिशा दाखवली.

''OK सर, आत्ताच जातो.'' किशोर तत्काळ उत्तरला.

...आणि किशोरनं मोबाइल बंद केला. ड्रायव्हिंग करत असतानाच डॉ. समरनं मोबाइलवर डॉ. सुनीताचा नंबर काढला आणि प्रेस केला. पलीकडे रिंग जाऊ लागली.

मोनिका सारखं थांबवत होती; पण डॉ. समर मात्र ऐकत नव्हते. हा फार महत्त्वाचा प्रयोग असल्याचं या वेळी मोनिका आणि स्वीटीला त्यांनी सांगितलं. पलीकडून आवाज आला,

''हं सर, सुनीता बोलतेय.''

''सुनीता... ते उंदीर ज्यांत नॅनोशेल इंजेक्ट केले आहेत, ते तसेच आहेत का?''

''होय! सर, पण त्यांच्या ट्यूमरमध्ये काहीही फरक दिसत नाही.'' डॉ. सुनीताने वस्तुस्थिती सांगितली.

''सुनीता, एक काम कर! माझा संशोधक विद्यार्थी किशोर तुझ्याकडे उपारुण किरणांचा स्रोत घेऊन येत आहे. त्या किरणांचा मारा या उंदरांवर आहे त्या परिस्थितीत कर. किशोर तुला मदत करेल.'' डॉ. समर

निर्वाणीचं म्हणाले होते.

''येस सर, मी फारशी खोलात जाणार नाही; कारण तुम्ही काहीतरी विचार केलेला असणारच. मी प्रयोग करते, सर.'' डॉ. सुनीता ठामपणे म्हणाली होती.

''गुड!... सुनीता, आय वॉज एक्स्पेक्टिंग द सेम स्पिरीट फ्रॉम यू... होप फॉर द बेस्ट रिझल्ट... बाय.'' डॉ. समर आनंदाने म्हणाले.

''OK सर, बाय.'' डॉ. सुनीतानेही लागलीच प्रतिसाद दिला.

डॉ. समरनं मोबाइल बंद केला आणि एका वेगळ्याच उत्साहात ॲक्सिलरेटरवर पाय ठेवला. कार वेगाने पळत होती. मोनिकाने सवयीनुसार हळू चालविण्याचा संकेत दिला.

मोनिका, स्वीटीकडेच थांबली. डॉ. समर पुन्हा विद्यापीठातील प्रयोगशाळेत येऊन दाखल झाले होते.

किशोर आणि डॉ. समर पुन्हा एकदा नॅनोशेलच्या प्रयोगात गढून गेले होते आणि पुनःपुन्हा परिणामांची पुनरावृत्ती पाहून हर्षोल्हासित होत होते.

त्याच रात्री विशाखाची प्रकृती ढासळल्याने तिला मंगेशकर हॉस्पिटलमध्ये डॉ. शिंगमिरेंच्या देखरेखीखाली दाखल करून घेण्यात आलं होतं. सलाइन व काही ॲन्टिडोस देण्यात येत होते. स्वीटी आणि मोनिकाची पुन्हा धावपळ सुरू झाली होती. आता केमो व रेडिएशन दोन्ही चिकित्सा देणं शक्य नव्हतं.

तीन दिवसांनंतर पुन्हा पेट स्कॅन करण्यात आले आणि शरीराच्या वेगवेगळ्या भागांत ट्यूमर पुन्हा दृग्गोचर होताना दिसला. डॉ. शिंगमिरेही हवालदिल झाले. रेग्युलर औषधं सुरू करण्यात आली होती.

रघुनाथ व अंकुरही आले होते. डॉ. जयश्रीही एकदा तपासून गेल्या होत्या; पण आता रेडिएशनचीही कुठलीच शक्यता उरली नव्हती.

तेवढ्यात मंगेशकर हॉस्पिटलमध्ये असतानाच डॉ. समरना मोबाइल आला. त्यांनी तो अधीरतेने कानाला लावला.

''सर मी सुनीता.''

''हं, बोल सुनीता.''

''सर! हे नॅनोशेल कमालीचे आहेत. उपारुण किरणांचा मारा करताच उंदरांमधील कर्करोग पूर्णतः नष्ट झाला. दे आर रिकव्हरिंग व्हेरी फास्ट... कर्करोगाची एकही पेशी आढळत नाही.'' डॉ. सुनीतानं सांगितलं.

''काय म्हणतेस सुनीता, वंडरफुल! मला हेच अपेक्षित होतं. थँक्स, खूप मोठं काम केलंस तू... आउटस्टँडिंग.'' डॉ. समरना अत्यानंद झाला होता. त्यांचे शब्दच बाहेर पडत नव्हते.

''सर! आउटस्टँडिंग! तुम्ही ग्रेट आहात! मी फक्त माध्यम आहे. सर, हे संशोधन कर्करोगाच्या रुग्णांना जीवनदान ठरणार आहे.''

''काय? जीवनदान? पुन्हा बोल.'' डॉ. समरना पुन्हा हे शब्द ऐकायचे होते.

''होय सर, जीवनदान आणि तेही मानवाला.'' डॉ. सुनीता पुनश्च उत्तरली.

''म्हणजे हा प्रयोग आपण मानवावर करू शकतो?'' डॉ. समरचा आशादायी स्वर.

''होय! का नाही? पण तसा पेशंट मिळणं गरजेचं आहे.'' डॉ. सुनीताने अपेक्षा व्यक्त केली.

डॉ. सुनीतानं सांगताच, डॉ. समरच्या डोक्यात लख्खकन प्रकाश पडला आणि ते उत्तेजित होत म्हणाले,

''सुनीता, असा पेशंट माझ्याजवळ आहे. आपण त्याच्यावरच हा प्रयोग करू. तू आता मंगेशकर हॉस्पिटलला येऊ शकतेस का?'' डॉ. समरनं सरळच विचारलं.

''हो सर, का नाही? मी निघतेच.'' डॉ. सुनीता अधीरतेने म्हणाली.

''निघ! तोपर्यंत मी किशोरलाही बोलावतो. आपण सर्वच डॉ. शिंगमिरेंना भेटू. मी वाट पाहतो.'' डॉ. समरनं मोबाइल बंद केला होता.

दरम्यान, डॉ. समरनं किशोरला नॅनोशेल व उपारुण किरणांचा स्रोत घेऊन येण्यास सांगितलं.

डॉ. सुनीता, किशोर येताच, रघुनाथना विशाखाजवळ ठेवून स्वीटी व मोनिकासोबत डॉ. समरनी डॉ. शिंगमिरेंच्या केबिनमध्ये प्रवेश केला. त्याच वेळी डॉ. समरनी डॉ. जयश्री यांनाही विनंती केली आणि त्याही हजर झाल्या होत्या.

सर्वजण डॉ. शिंगमिरेंसमोर स्थानापन्न झाले. एकूणच गंभीर वातावरण पाहून डॉ. शिंगमिरे म्हणाले,

''मला माहीत आहे, तुम्ही का आला आहात. विशाखाताईंची प्रकृती खरंच आता नाजूक आहे. दिवसेंदिवस त्यांचा ट्यूमर वाढत चालला आहे. कुठल्याही उपचारांना त्या प्रतिसाद देत नाहीत. मला वाटतं, फार तर तीन ते चार दिवस. तेही लाइफ सपोर्ट सिस्टिम वापरली तर... पुढे शुगर, ब्लडप्रेशर कमी होऊन ग्लानीत जातील. आय एम सॉरी, तुम्ही सर्वांनीच खूप प्रयत्न केलेत.'' डॉ. शिंगमिरे हताशपणे बोलले आणि थांबले.

''डॉ. शिंगमिरे म्हणताहेत ते खरं आहे. देअर इज नो ऑप्शन.'' डॉ. जयश्री म्हणाल्या.

या वेळी डॉ. समरनी सगळीकडे पाहिलं. घसा खाकरला आणि ते म्हणाले,

''मान्य आहे, डॉ. शिंगमिरे. आपण सर्वांनीच प्रयत्नांची पराकाष्ठा केली; पण निसर्गापुढे जाणे शक्य नाही.''

डॉ. जयश्रीकडे वळत डॉ. समर म्हणाले, ''डॉ. जयश्री, तुम्ही म्हणालात देअर इज नो ऑप्शन; पण आम्ही ऑप्शन दिला तर? एका प्रयोगाचा पर्याय आम्ही दिला तर?''

''मी नाही समजलो! कुठला ऑप्शन? कुठला पर्याय?'' डॉ. शिंगमिरे न समजून उत्तरले.

''म्हणजे, एका प्रयोगाचा पर्याय. डॉ. शिंगमिरे मी प्रथम ओळख करून देतो. या डॉ. सुनीता राणे. राष्ट्रीय पेशी विज्ञान केंद्रामध्ये त्या संशोधिका आहेत. कर्करोगाच्या पेशींवरील त्यांचं संशोधन नावाजलेलं आहे आणि मी स्वतः नॅनो पदार्थांतील तज्ज्ञ, शास्त्रज्ञ. हा माझा संशोधक विद्यार्थी किशोर गव्हाणे. आम्ही ग्राफिन, कॅडमिअम सल्फाइड, झिंक, सोनं व चांदी असे वाहक, अर्धवाहक व धातू घेऊन यशस्वी नॅनोशेल तयार केले आणि त्यावर उपारुण किरणांचा मारा केला तर ते प्रचंड तापमान निर्माण करतात. नुकताच हा प्रयोग डॉ. सुनीता यांनी कर्करोगबाधित उंदरांवर केला आणि मला सांगायला आनंद वाटतो, ऑल द रॅट्स आर फ्री फ्रॉम कॅन्सर,'' डॉ. समरनं थोडक्यात पण स्पष्ट

सांगितलं.

"काय म्हणता डॉ. समर! कर्करोग पूर्णतः नष्ट. वंडरफुल!..." डॉ. शिंगमिरे आश्चर्याने उद्गारले.

"अनबिलिव्हेबल!" डॉ. जयश्रीही आश्चर्यचकित झाल्या.

"होय! डॉक्टर, हे खरं आहे. मी स्वतः पेशी विज्ञानातील तज्ज्ञ आहे. अविश्वसनीय असं काही नाही. डॉ. समरसारख्या नामवंत शास्त्रज्ञाने हे नॅनोशेल विकसित केले आहेत अॅण्ड आय अॅम प्राउड टू से दॅट दिज नॅनोशेल्स आर वर्किंग व्हेरी नाइस! अॅण्ड वाइपनिंग आउट द कॅन्सर फ्रॉम रूट इटसेल्फ!" डॉ. सुनीता कमालीच्या आत्मविश्वासानं बोलत होत्या.

मोनिका, स्वीटी, अंकुर बघतच राहिले. ते सर्व काय बोलताहेत हे त्यांना कळत होतं. मोनिकाला आपल्या नवऱ्याचा - डॉ. समरचा सार्थ अभिमान वाटत होता. तिला भरून आलं. विशाखाताईसाठी डॉ. समरनं किती केलं होतं याची जाणीव तिला होती. डॉ. शिंगमिरे म्हणाले,

"मग माझ्याकडून काय अपेक्षा आहे?"

"सर! हा प्रयोग कुठल्याही मानवावर केलेला नाही; पण तो आम्हाला विशाखाताईंवर करायचा आहे." डॉ. समरनं सरळ सांगितलं.

"काय? हे कसं शक्य आहे?" डॉ. शिंगमिरे आश्चर्याने म्हणाले. डॉ. जयश्रींचाही तोच भाव होता. डॉ. शिंगमिरे पुढे म्हणाले "अहो, पण नैतिकतेचा प्रश्न उद्भवेल ना!"

"डॉक्टर, मी ते बघते. माझ्याकडे सर्व फॉरमॅलिटिज आहेत." डॉ. सुनीता आत्मविश्वासानं पुढे बोलल्या, "सर, काहीही असो; पण या प्रयोगाला परवानगी द्याच; कारण हा यशस्वी झाला तर मानवासाठी मोठं दार खुलं होणार आहे. कुणाला तरी जोखीम घ्यावीच लागेल." डॉ. सुनीता बोलायचं थांबल्या. डॉ. समरही आशेनं पाहत होते. डॉ. शिंगमिरे म्हणाले,

"ठीक आहे. प्रयोगही तुमचा आणि पेशंटही तुमचाच. निर्णय तुमच्या हाती आहे."

"सर, तुम्ही म्हटल्याप्रमाणे माझी आई फार तर दोन-तीन दिवस जगू शकेल. मग हा आमच्या काकांचा प्रयोग करायला काहीच हरकत नाही. फायदा झाला नाही तरी नुकसानही नाही; पण फायदा झालाच तर समस्त मानवजातीला त्याचा उपयोग होऊ शकेल. नातेवाईक म्हणून मी परवानगी देतो." अंकुर प्रथमच प्रगल्भतेने बोलला होता.

स्वीटी व मोनिका अंकुरकडे पाहतच राहिल्या. अंकुर खरंच प्रगल्भ झाला होता.

"ठीक आहे. प्रयोग करू या. कधी?" डॉ. शिंगमिरेंनी विचारलं.

"सर! आत्ताच." डॉ. समर तयारच होते.

"काय! तुम्ही तयारीनिशीच आला होतात?" डॉ. शिंगमिरेंना आश्चर्य वाटलं.

"होय! कारण सूक्ष्म कणांना लागतं काय?" किशोरच्या हाताकडे निर्देश करत डॉ. समर पुढे म्हणाले, "फक्त तो उपारुण किरणांचा स्रोत आहे, बस! आता फक्त शरीरात नॅनोशेल सोडायला तुमची मदत लागेल."

"OK. लेट्स गो. आय अॅम रेडी." डॉ. शिंगमिरे उठत म्हणाले.

सगळेच बाहेर पडले आणि विशाखाला अॅडमिट केलं होतं त्या खोलीत आले. रघुनाथ तिथेच होते. विशाखा आता ग्लानीत जायला लागली होती.

कुठल्याही नर्सची मदत न घेता, डॉ. शिंगमिरेंनी स्वतः नॅनोशेलची पावडर सलाइनमध्ये टाकली आणि थेंबांचा वेग वाढवला. नॅनोशेल द्रव्यामध्ये मिसळले आणि त्यांनी विशाखाच्या शरीरात प्रवेश करायला सुरुवात केली. या वेळीही विशाखाचे डोळे मिटलेलेच होते.

किमान तीन तास थांबणं अपेक्षित होतं. तद्नंतर पुन्हा पेट स्कॅन करण्यात आले आणि जागोजागी नॅनोशेलनी कर्करोग पेशींचा ताबा घेतल्याचे पाहून, डॉ. शिंगमिरे हर्षोल्हासित झाले व म्हणाले,

"डॉ. समर, खरंच की! तुमच्या नॅनोशेलनी फक्त कर्करोग पेशींनाच जखडून ठेवलेलं आहे; पण त्यांचा नायनाट कसा होईल?" डॉ. शिंगमिरेंनी शंका व्यक्त केली.

"थोडं थांबा, डॉ. शिंगमिरे. आता या उपारुण किरणांचा मारा करताच हे नॅनोशेल त्यांचा कसा नायनाट करतात ते बघाच." डॉ. समरनं सांगताच किशोर कामाला लागला. डॉ. सुनीताही मदत करीत होत्या. जिथे जिथे कर्करोग लोकेट झाला होता आणि नॅनोशेलनी ताबा घेतला होता, त्या ठिकाणी सतत अर्धा तास उपारुण किरणांचा मारा करण्यात आला. उपारुण स्रोत प्रखर होता. ही कृती बराच वेळ चालली. पुन्हा एकदा पेट स्कॅन करण्यात आलं आणि डॉ. शिंगमिरे व डॉ. जयश्री आश्चर्याने पाहतच राहिले. नॅनोशेलनी सर्वच पेशींना जाळून टाकलं होतं आणि एखाद्या सुरक्षारक्षकासारखे ते नॅनोशेल तिथे फिरत होते कर्करोग पेशींच्या शोधात; डॉ. शिंगमिरे उत्स्फूर्तपणे म्हणाले,

"डॉ. समर, काय शोध लावलात तुम्ही हा! मिलेनिअम शोध आहे! समस्त मानव जातीवर तुम्ही उपकार करून ठेवलेत. हॅट्स ऑफ टू यू! प्रथम माझं तुमच्याकडे दुर्लक्ष झालं! पण यू आर अ जेम." डॉ. शिंगमिरे चक्क उभे राहिले.

"होय सर. खरं आहे ते. मीही माझे सहकारी कुलदीप व अमोघकडून यांच्याविषयी खूप ऐकलंय. मीही नतमस्तक होते." डॉ. जयश्रीनेही कृती केली.

डॉ. समर ओशाळत म्हणाले,

"डॉक्टर, असं करू नका. माझ्यावरचा तुम्हा दोघांचा विश्वासच मोठा आहे. यात माझ्या सहकारी सुनीताचाही खूप मोठा हात आहे. हे असे नैतिकतेचे प्रयोग केवळ मी त्यांच्यामुळेच करू शकलो." डॉ. सुनीताही हसत नतमस्तक झाल्या. मानवावरचा प्रयोग यशस्वी झाला. किशोरचंही कौतुक केलं गेलं.

विशाखाने डोळे उघडले होते. तरतरी आली होती. मोनिका, स्वीटी, अंकुर व रघुनाथ तिच्याकडे झेपावले.

पुढे सलग दोन दिवस उपारुण किरणांचा मारा करण्यात आला मग उरल्यासुरल्या कर्करोग पेशीही नॅनोशेलने खाऊन टाकल्या.

सलग पंधरा दिवस विशाखा हॉस्पिटलमध्ये होती. या दरम्यान तिची प्रकृती झपाट्याने सुधारली. ताकद आली आणि आता चेहऱ्यावर तेजही आलं होतं.

स्वीटी आवेगाने विशाखाला बिलगून रडली होती.

डॉ. समरच्या एक मात्र लक्षात आलं होतं. नॅनोशेल विशाखाच्या शरीरातच होते आणि वातावरणातील उपारुण किरणे ते शोषून घेऊन, उष्णता निर्माण करू लागले; त्यामुळे विशाखाला उन्हात त्रास होऊ लागला; पण यावर उपाय म्हणून डॉ. समरनी उपारुण किरणांना थोपवून धरेल असा अंगरखाच तयार करून दिला होता. त्यानं मात्र विशाखाचं जीवन सुसह्य झालं होतं; पण कालांतराने ही त्रुटीही दूर होणार होती; कारण वातावरणात उपारुण किरणांची प्रखरता तशी कमीच होती; त्यामुळे पुढे विशाखाचा त्रास आपोआपच कमी होणार होता.

सोळाव्या दिवशी विशाखाला डिस्चार्ज देण्यात आला.

या वेळी स्वतः डॉ. समर, मोनिका, स्वीटी, अंकुर व रघुनाथ न्यायला होते.

डॉ. शिंगमिरे आणि डॉ. जयश्रीही दारापाशी येऊन थांबले. डॉ. सुनीता व किशोर खास यावेळी उपस्थित होते.


विशाखा सर्वसाधारण स्त्रीप्रमाणे चालत आली आणि गाडीत बसली. ती आली ...तिनं पाहिलं ...आणि तिनं जिंकलं... असंच तिच्याकडे बघून वाटत होतं.

डॉ. समरनी कार चालू केली. डॉ. शिंगमिरेंनी विजयाचा अंगठा उंचावला. सर्वजण स्मित करीत होते. कारनं हळूच पुढे वळण घेतलं.

या वेळी डॉ. समर नावाचं व्यक्तिमत्त्व डॉ. शिंगमिरेंच्या डोळ्यांपुढे भव्य होत गेलं. अवकाशात न मावणारं असं; कारण मानवजातीवर त्यांचे मोठेच ऋण झाले होते.

**sddhole@gmail.com**


**नवं कोरं**




दक्षिण आफ्रिकेतल्या सामूहिक चळवळीत स्वत:तले नेतृत्वगुण
उमजले आणि त्यातून एक राष्ट्रपिता जन्माला आला...
अशा महात्म्याच्या जीवनाची चलतचित्रे मांडणारं अद्भुत व्यक्तिचरित्र..

मूळ लेखक - जोसेफ लेलिव्हेल्ड
अनुवाद - मुक्ता देशपांडे

पृष्ठसंख्या : ४४०
किंमत : ₹४९५

**महात्मा गांधी**
**आणि त्यांचा भारतीय संघर्ष**




पहिल्या महायुद्धाला जबाबदार असणाऱ्या नेत्यांची
पोलखोल करणारा अनमोल दस्तऐवज...
एका दडलेल्या इतिहासावरचा प्रखर प्रकाशझोत...


**दडलेला इतिहास**

मूळ लेखक - जेरी डॉशेर्टी । जिम मॅकग्रेगर
अनुवाद - स्नेहलता जोशी

पृष्ठसंख्या : ५७०
किंमत : ₹६५०

# कवितांमधलं विज्ञान

## अनुवाद : सुप्रिया वकील



**प्रेम खूपसे भौतिकशास्त्रासारखे असते**

प्रेम खूपसे भौतिकशास्त्रासारखे असते
त्याला अभ्यास लागतो
हे समजून घेण्यासाठी की,
त्याचे आणि तुमचे वस्तुमान
कसे आकर्षित होते...
हे समजून घेण्यासाठी की,
त्याच्या शरीराच्या उष्णतेचे वहन कसे होते
आणि तुमच्या हृदयाची गती कशी वाढते,
दोघांपैकी कुणी त्याचा परिणामही जाणून घेण्याआधी.

तुम्हाला वाटते,
तुम्हाला गती कळते
तुम्ही भरारी घेताना
त्याचा वेग तुमच्या वेगाशी
मिळताजुळता आहे
असे गृहीतच धरता
पण तुम्ही न्यूटनचा गतीचा तिसरा नियम विसरता
त्याचा परिणाम म्हणून
एक चुकीचा विद्युतभार
सगळे सर्किट उद्ध्वस्त करतो
मग तुम्ही हेलकावे खाऊ लागता,
कक्षेतून बाहेर फेकले जाता;
अखेर तुम्ही अतिउष्ण हवेचे
'व्हेरिएबल्स' मोजू लागता...

**– मॉरीन डोअल्लास**



**वारा कुणी पाहिलाय?**

वारा कुणी पाहिलाय?
ना तुम्ही पाहिलाय; ना मी.
पण जेव्हा झाडाची पाने थरथरतात
तेव्हा वारा त्यातून धावत असतो.

वारा कुणी पाहिलाय?
ना तुम्ही पाहिलाय; ना मी.
पण झाडे जेव्हा माथा झुकवतात
तेव्हा वारा तिथून लहरत असतो.


**– क्रिस्टिना रोजेट्टी**



### मी विद्वान खगोलशास्त्रज्ञाचे व्याख्यान ऐकले तेव्हा

मी विद्वान खगोलशास्त्रज्ञाचे व्याख्यान ऐकले तेव्हा,
माझ्यासमोर मांडले जात होते
पुरावे आणि आकड्यांचे स्तंभ.
मला दाखवण्यात आल्या
तक्ते आणि आकृत्या,
बेरजा, वजाबाक्या वगैरे
ते विद्वान खगोलशास्त्रज्ञ
टाळ्यांच्या कडकडाटात व्याख्यान देत होते, तेव्हा
मी तिथे हजर होतो.
लवकरच मला भयंकर कंटाळा आला,
आणि वैतागसुद्धा!
मी भटकत राहिलो बाहेर... एकटा
रात्रीच्या गूढ, ओल्या
वातावरणात
आणि त्या नीरव शांततेत
अधूनमधून पाहत राहिलो
ताऱ्यांकडे

**– वॉल्ट व्हिटमन**



### विज्ञानाचा भयंकर स्वर

फुलपाखरांमध्ये असते यंत्रणा
आणि भुंग्यांमध्ये प्रेरणा
डेजीला लागू होते हायड्रॉलिक्स
आणि विचित्र यंत्रे झाडासाठी

जर आपण किलबिलणारे पक्षी पाहिले
क्ष-किरण आणि वैज्ञानिक नजरेतून
तर दिसेल आपल्याला चाकाची गती

आणि असा विचार करणारी सगळी माणसे
विसावतील लवकरच जमिनीखाली
अशी मला आशा आहे.

**– वॅशेल लिंडसे**



### हिवाळी झाडे

पेहराव चढवण्या-उतरवण्याचे
सगळे जटिल सोपस्कार
पूर्ण झालेत!
चंद्र झिरपतोय हळुवार
लांबसडक फांद्यांतून.
हमखास येणाऱ्या हिवाळ्यासाठी
कळ्यांना सज्ज करून
झोपी जातात गारठ्यात
शहाणी झाडे

**– विल्यम कार्लोस विल्यम्स**

supriyawakil@gmail.com

# पुस्तकाच्या पानांतून...

कधी इथल्या मातीतलं अस्सल,
तर कधी देशोदेशीच्या संस्कृतीचं प्रतिबिंब असणारं अनुवादित,
वाचणाऱ्या प्रत्येकाचं आयुष्य समृद्ध करणारं साहित्य
आमच्या माध्यमातून आपल्या भेटीस येत राहिलं आहे...
येत राहील...
कोरोना काळातील अडथळ्यांची शर्यत पार करून
ही नवी पुस्तकं यावर्षी येत आहेत आपल्या भेटीस...
या पुस्तकांच्या पानातला हा अर्क...

## कॉकTale कार्निव्हल

रोचक, रंजक, रोमांचक कथोत्सव

गाभुळलेल्या चंद्रबनात

नो नॉट नेव्हर

मदाम बटरफ्लाय

होऊन दे!

लेडी जल्लाद

आत्मवंचना


रुबाई

जालियनवाला बाग

## भन्नाट प्रीतीचं टिप्पूर चांदणं -

# गाभुळलेल्या चंद्रबनात

सोपान खुडे



महाराष्ट्राच्या रगेल आणि रंगेल मातीत तमाशाचा जन्म झालेला आहे. ती महाराष्ट्राची जिवंत लोककला आहे. पेशवेकालापासून तमाशाचा विकास होत होत आजचा आधुनिक तमाशा सिद्ध झालेला आहे. पेशवे काळात तमाशात वग नव्हता. १८५०-६०च्या दरम्यान उमा बाबाजी सावळजकरांनी तमाशात वग सादर केला. 'मोहना बटाव' हा तमाशात सादर झालेला पहिला वग होय. १८८५-८६च्या आसपास स्त्रीने तमाशात प्रवेश केला. पवळा हिवरगावकर ही तमाशात काम करणारी पहिली स्त्री होय. त्यापूर्वी पुरुषच स्त्रीवेश धारण करून तमाशात नाचकाम करीत होते. १९२५-३०च्या काळात मोठ्या संख्येने स्त्रिया तमाशात काम करू लागल्या अन् तमाशाच्या बोर्डावरचा पुरुष नाच्या हळूहळू अस्तंगत होत गेला. स्त्रियांमुळे तमाशा अधिक आकर्षक दिसू लागला. अधिक संख्येने मराठी माणूस तमाशाकडे आकर्षित झाला. अशिक्षितांबरोबर सुशिक्षितही तमाशा पाहू लागले. अनेक साहित्यिकांना तमाशा हा लेखनाचा विषय झाला. ते तमाशा या विषयावर कथा-कादंबऱ्या लिहू लागले. सुप्रसिद्ध साहित्यिक अण्णा भाऊ साठे यांनी 'वैजयंता' ही कादंबरी लिहून तमाशाच्या बोर्डावर नाचणाऱ्या नर्तिकेची व्यथा-वेदना मांडलेली आहे. आनंद यादव यांनी 'नटरंग' ही कादंबरी लिहून तमाशात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या पण दुर्लक्षित, उपेक्षित राहिलेल्या नाच्याला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. याच परंपरेतील विश्वास पाटील यांच्या लेखणीतून प्रसवलेली, तमाशाच्या पार्श्वभूमीवर चितारलेली 'गाभुळलेल्या चंद्रबनात' ही कादंबरी आहे.

सिने-नाट्यसृष्टीतील नटनट्यांच्या प्रेमप्रकरणांवर अनेक कथा-कादंबऱ्या आल्या; मात्र तंबू-कनातीमध्ये फिरणाऱ्या, वाऱ्या-वावधनामध्ये लोकरंजन आणि लोकप्रबोधन करणाऱ्या तमाशा कलावंतांच्या प्रेमभावनेची कोणत्याही मराठी साहित्यिकाने दखल घेतली नाही. या पार्श्वभूमीवर विश्वास पाटील यांनी तमाशा कलावंतांचं प्रेम या विषयावर लिहिलेली 'गाभुळलेल्या चंद्रबनात' ही पहिलीच कादंबरी आहे. म्हणून ती महत्त्वपूर्ण ठरते.

विश्वास पाटील यांची वेगळी ओळख करून देण्याची गरज नाही. 'पानिपत', 'झाडाझडती', 'महानायक', 'संभाजी' अशा दर्जेदार कादंबऱ्या लिहून मराठी साहित्यात ते कादंबरीकार म्हणून सुप्रतिष्ठित झालेले आहेत. 'गाभुळलेल्या चंद्रबनात' ही कादंबरीच्या आकृतिबंधातून साकारलेली तमाशात काम करणाऱ्या बाकेराव आणि रंगकली यांची एक आगळीवेगळी प्रेमकहाणी आहे. रंगकली ही तमाशासम्राट अर्जुना पवार यांची लेक आहे. ती नाचगाण्यात, अभिनयात पारंगत आहे. आपल्या कलागुणांच्या सामर्थ्यावर तिने आपल्या वडिलांचा तमाशा वेगळ्या उंचीवर नेलेला आहे. बाकेराव हा उत्तम गायक-अभिनेता, उत्कृष्ट सोंगाड्या आहे. त्याचा आणि गगनअप्पाचा तमाशाचा फड आहे. 'तुका चालला वैकुंठाला' या वगामुळे तो तमाशा फड नावारूपाला आलेला आहे.

अर्जुना पवार यांचा तमाशा फड सुरळीत चाललेला असताना अचानक रंगकलीच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळते. त्याला कारण ठरते शासनाने मुंबईमध्ये आयोजित केलेली तमाशा स्पर्धा, या तमाशा स्पर्धेत बाकेराव आणि रंगकली यांच्यामध्ये सवाल-जवाब झडतात. बाकेरावच्या कलागुणांवर रंगकली फिदा होते आणि त्याच्या प्रेमात पडते. यामुळे अर्जुना पवार यांना धक्का बसतो. ते अस्वस्थ होतात. त्यांच्या मनाची तगमग होते; कारण रंगकली सतरा-अठराच्या उंबरठ्यावरची तर बाकेराव पन्नाशी ओलांडलेला. त्याची यापूर्वीच दोन लग्नं झालेली. रंगकलीला वयाने बाप शोभावा असा होता तो. असे विसंगत, विजोड प्रेम अर्जुना पवाराला मान्य नव्हते. तो रंगकलीला समजावून सांगण्याचा प्रयत्न करतो. बाकेरावाच्या प्रेमात आकंठ बुडालेली रंगकली आपल्या वडिलांचं ऐकत नाही. तिला बाकेरावाबरोबर लग्न करायचं असतं. त्या लग्नातील धोके अर्जुना पवार रंगकलीच्या लक्षात आणून देतात; पण ते धोके स्वीकारण्याची तयारी तिने ठेवलेली असते. ती आपल्या विचारापासून परावृत्त होत नाही. शेवटी ती बाकेरावाबरोबर लग्न करते. बाकेरावाचा आणि रंगकलीचा सहजीवनाचा प्रवास सुरू होतो. तमाशा फडातून रंगकली गेल्यामुळे अर्जुना पवाराचा तमाशा फड बंद पडतो; पण बाकेरावाचा तमाशा जोरात चालू लागतो.

बाकेराव आणि रंगकली यांचे प्रेम शेवटपर्यंत टिकते का? त्यांचा तमाशा फड चालू राहतो का? त्यांच्या सहजीवनात कोणत्या अडचणी येतात? त्या अडचणी कोण निर्माण करते? त्यांच्या प्रेमाचा शेवट कसा होतो? या प्रश्नांच्या उत्तरासाठी आणि त्यांचे वादळी सहजीवन जाणून घेण्यासाठी 'गाभुळलेल्या चंद्रबनात' ही कादंबरी वाचली पाहिजे. या कादंबरीत बाकेराव, रंगकली, अर्जुना पवार, चारूस्वामी, गगनअप्पा, युवराज पाटणे ही प्रमुख पात्रे आहेत. त्यांच्या उक्ती-कृतीतून घटना, प्रसंग घडतात आणि कथानक पुढे सरकत राहते. बाकेराव आणि रंगकली यांच्या प्रेमसंबंधाच्या निमित्ताने संपूर्ण तमाशाचे विश्व या कादंबरीमध्ये अवतरलेले आहे. तमासगिरांचे तमाशा बोर्डावरचे कलाजीवन, राहुटीतील खासगी जीवन, त्यांचं लग्न, त्यांचा प्रवास, प्रवासात येणारी संकटं, त्यांचे हेवेदावे, माया-ममता, द्वेष-मत्सर, श्रद्धा, अंधश्रद्धा या साऱ्यांचं दर्शन विश्वास पाटील या कादंबरीत घडवतात. या कादंबरीमुळे ज्यांना तमाशाची माहिती नाही त्यांना तमाशाची माहिती होईल आणि ज्यांना तमाशाची माहिती आहे त्यांना पुन:प्रत्ययाचा आनंद घेता येईल. या कादंबरीतील बाकेराव, रंगकली, गगनअप्पा, चारूस्वामी या पात्रांचे चित्रण ठसठशीत झालेले आहे. कादंबरी वाचल्यानंतर बराच वेळ ही पात्रं आपल्या मनात रेंगाळत राहतात.

विश्वास पाटील यांनी कादंबरीमध्ये तमाशाचे वास्तव चित्रण केले असल्यामुळे या कादंबरीला संदर्भग्रंथाचे मूल्य प्राप्त झालेले आहे.

कादंबरीमध्ये शाहिरी कवनांचा आणि स्वरचित गाण्यांचा विश्वास पाटील यांनी अतिशय समर्पकपणे उपयोग केलेला आहे. हा एक वेगळा प्रयोग त्यांनी केलेला असून, त्यात ते पूर्णपणे यशस्वी झालेले आहेत. रंगकलीच्या सौंदर्याचे वर्णन करण्यासाठी त्यांनी एका शाहिराच्या गवळणीचा उपयोग केलेला आहे. गवळणीमध्ये चंद्रावलीच्या सौंदर्याचे वर्णन केलेले आहे, तशीच रंगकली देखणी आहे. चंद्रावलीच्या आणि रंगकलीच्या सौंदर्यात फरक नाही हेच गवळणीचा वापर करून सूचित केले आहे. बाकेराव आणि रंगकली यांच्यातील प्रेमाच्या संवादासाठी 'मोहना बटाव' या वगातील लावणीचा उपयोग सूचकतेने प्रेम व्यक्त करण्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.

संवाद हे या कादंबरीचे बलस्थान आहे. सुंदर, खटकेबाज,

खुसखुशीत संवाद लिहिलेले आहेत. या संवादांतून चमकदार पण वास्तववादी वाक्ये आलेली आहेत. वानगीदाखल काही उदाहरणे सांगता येतील.

१. एकवेळ ढासळलेला बुरूज नव्यानं बांधता येईल; पण चिमटीतून निसटलेली जवानी माणसाच्याच काय पण देवाच्या बापालाही पुन्हा सापडणार नाही.

२. नटराज तुमच्यासाठी देव असेल तर माझ्यासाठी दानव कसा होईल हो.

३. दूध आटलेल्या गायीचा अन् आवाज फाटलेल्या बाईचा उपयोग काय?

४. सोन्याचा पाऊस दारात पडून गेला; पण मला माझ्या फाटक्या ओट्यात नाय साठवता आला.

अशा वाक्यांची कादंबरीमध्ये ठिकठिकाणी पखरण केलेली आहे. कादंबरीची भाषा ग्रामीण ढंगाची असून, ओघवती आहे. सखूबाईला नाही नवरा अन् सर्जेरावला नाही बायको, गावाची हागणदारी तिथं कलावंताची वतनदारी, झुलता गडी आणि फिरता पलंग, नाय पटलं, नाय रेटलं तर मोडू खाटलं अशा ग्रामीण म्हणींचा आणि ढासू, काळीजफाडू, चलिंदर गुंडगुळे, झिरकं, गावंदरी, गटांगळ्या अशा ग्रामीण शब्दांचा वापर केल्यामुळे भाषेची खुमारी वाढलेली आहे आणि कादंबरी वाचनीय झालेली आहे. तमाशाची एक वेगळी संस्कृती आहे. तमाशातील स्त्री-पुरुष लग्न करताना रंग, वय, जात, धर्म, पंथ यांना महत्त्व देत नाहीत. स्त्रियांचे तमाशातील कलावंतांशीच प्रेमसंबंध असतात. त्यांच्याशीच त्या लग्न करतात किंवा लग्न न करता नवरा-बायकोप्रमाणे राहतात. हे लक्षात न घेता काही साहित्यिक आपल्या कथा-कादंबऱ्यांत तमाशातील स्त्रीचे गावातील पाटील, सरपंचाबरोबर किंवा एखाद्या धनिकाबरोबर प्रेमसंबंध जुळवतात. असे वास्तवात अपवादात्मकच घडू शकते. असे घडणे फारच दुर्मिळ आहे, हे लक्षात घेऊन विश्वास पाटील यांनी बाकेराव आणि रंगकली ही प्रियकर-प्रेयसीची दोन्ही पात्रे तमाशातीलच घेतलेली आहेत. म्हणूनच त्यांची कादंबरी वास्तववादी झालेली आहे. त्यात कृत्रिमपणा आलेला नाही. काही साहित्यिक संगीतबारी आणि तमाशा यातील फरक लक्षात घेत नाहीत. ते तमाशा म्हणून संगीतबारीचे वर्णन करतात. तर कधी संगीतबारी म्हणून तमाशाचे वर्णन करतात. त्यामुळे त्यांची कलाकृती तमाशावरची आहे की संगीत बारीवरची आहे, तेच कळत नाही. विश्वास पाटील यांनी अशी चूक केलेली नाही. त्यांनी शेवटपर्यंत कादंबरीत तमाशाचाच बाज राखलेला आहे.

तमाशामध्ये काही विशिष्ट शब्द आहेत, जसे बल्ल्या, बिगारी, सुरत्या, तंबू-राहुटी शिलकाराची लावणी, टाकणीची लावणी, अदाकारी यांचा सयुक्तिक असा वापर या कादंबरीमध्ये करण्यात आलेला आहे. वरील सर्व घटक कादंबरीमध्ये तमाशाचे वातावरण निर्माण करण्यास पोषक ठरलेले आहेत.

विश्वास पाटील यांनी तमाशाचा बारकाईने अभ्यास करून कादंबरी लिहिलेली आहे, हे कादंबरी वाचताना लक्षात येते. त्यांच्या या कादंबरीचे मराठी वाचक निश्चितच स्वागत करतील. तमाशाच्या रंगपीठावर रंगलेली बाकेराव आणि रंगकलीची ही प्रेमकहाणी प्रत्येकाने आपल्या काळीज कुपीत हळुवारपणे जपून ठेवावी अशीच आहे. कादंबरीचा शेवट काव्यात्मक पद्धतीने केलेला आहे. तो मनाला हुरहूर लावणारा आहे. ही कादंबरी मराठी वाचकांनी आवर्जून वाचावी. चांगले साहित्य वाचल्याचे नक्कीच समाधान मिळेल. सुंदर कादंबरी प्रकाशित केल्याबद्दल मेहता प्रकाशनाला धन्यवाद देतो. विश्वास पाटील यांच्या हातून अशाच उत्तमोत्तम कलाकृती निर्माण व्हाव्यात, अशी सदिच्छा व्यक्त करतो आणि थांबतो.


नवं कोरं




स्वतंत्र राष्ट्राचा उदय ते सत्तरीतलं जाणतेपण...
स्वातंत्र्योत्तर भारताच्या जडणघडणीचा समग्र मागोवा...

सत्तरीतला भारत

मूळ लेखक - रोशन दलाल
अनुवाद - जोसेफ तुस्कानो
पृष्ठसंख्या : ४००
किंमत : ₹३९५
Book Available

नवं कोरं

## एचएमएस युलिसिस





शब्दांचा जादूगार अॅलिस्टर मॅक्लीनच्या कुंचल्यातून साकारलेली...
मृत्यूचा अविरत सामना करत सागरी आव्हानांशी दोन हात करणाऱ्या
दुसऱ्या महायुद्धातील सैनिकांची शौर्यगाथा...

मूळ लेखक - अॅलिस्टर मॅक्लीन
अनुवाद - अनिल काळे
पृष्ठसंख्या : ३६४
किंमत : ₹४५०
Book Available

TBC 29 - 1

---

## चेसिंग टुमॉरो




सिडनी शेल्डनच्या कल्पक साहित्यबीजातून साकारलेली ट्रेसी
आणि तिच्या अद्भुत साहसांची उत्कंठावर्धक कथा...

मूळ लेखक - सिडनी शेल्डन । टिली बॅगशॉ
अनुवाद - मेघना जोशी
पृष्ठसंख्या : ३५६
किंमत : ₹४५०

TBC 29 - 2

---

## रिव्हर गॉड




नाइल नदीच्या काठावरील प्राचीन इजिप्तचं वैभव आणि
तात्कालीन सौंदर्यवादी विचारसरणीचं प्रतिक असणारी लालित्यपूर्ण कादंबरी...


मूळ लेखक - विल्बर स्मिथ
अनुवाद - सुभाष जोशी
पृष्ठसंख्या : ६७२
किंमत : ₹७५०

TBC 29 - 3

# मदाम बटरफ्लाय

**मूळ लेखक : रेई किमुरा**

**अनुवाद : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके**



जपानी परंपरेनुसार एकदा एखाद्या व्यक्तीला घरात बोलावलं की, ती तुमची पाहुणी असते. मग तुम्हाला तिच्याबद्दल वैयक्तिक स्तरावर किती का राग असेना, तिचं स्वागत योग्य प्रकारे केलं जातं.

या रीतीला अनुसरून सुझुकीनं पट्कन ग्रीन-टी आणि राइस कुकीज समोर आणल्या.

''मी अशी अचानक येऊन उभी राहिले म्हणून माफी मागते तुमची. मला हेन्रीनं पाठवलं आहे, तुमच्या मुलाबद्दल बोलण्यासाठी. मला वाटतं, तुम्ही त्याला जिन्सेई म्हणता, हो ना? हेन्रीला आपल्या मुलाची काळजी वाटते. स्वाभाविकच आहे म्हणा. जे काही आणि जसं काही झालं त्यामुळे तुमची मन:स्थिती काय असेल, तेही मी समजू शकते, कारण मी स्वतः स्त्री आहे. पण एक लक्षात घ्या, की इथे हेन्री, किंवा तुम्ही किंवा मी महत्त्वाचे नाही.'' शांत स्वरात हेलेनने बोलायला सुरुवात केली. ''या सगळ्यात बाळाची काही चूक नाही. तो अगदी निरागस आहे. तो धड इथला नाही किंवा तिथला नाही. पण त्याला तो काय करणार?

''विशेषतः जपानमध्ये अशा मिश्र पालकांच्या मुलांना कशा परिस्थितीला तोंड द्यावं लागतं, ते हेन्रीला आणि मलाही चांगलंच ठाऊक आहे. त्यांना कुणी स्वीकारत नाही. ते सगळ्यांमध्ये मिसळू शकत नाहीत. जिन्सेईचं बालपण इथे जपानमध्ये गेलं तर त्याचं काय होईल, हीच काळजी हेन्रीला आणि मला आहे.''

आपल्या बोलण्याचा च्यो-च्योवर काय परिणाम होतो आहे, ते पाहायला हेलेन थोडी थांबली. च्यो-च्योचा चेहरा पांढराफटक पडला होता. तिला बोलणं सुचत नव्हतं. कितीतरी वेळानं ती कशीबशी म्हणाली,

''म्हणजे? काय म्हणायचं आहे तुम्हाला? जिन्सेईला अमेरिकेला घेऊन जायचं तुमच्या आणि पिंकरटन सानच्या मनात आहे का?''

''हे पहा, त्याच्या वडिलांच्या मते त्याच्या भविष्याच्या दृष्टीनं हे सर्वोत्तम ठरेल. त्याला पुढे खूप संधी उपलब्ध होतील. मी तर ऐकलं आहे की, मिश्र रक्ताच्या मुलांना जपानी समाजात स्वीकारलं जात नाही. म्हणून हेन्रीची खास विनंती आहे तुम्हाला, की जिन्सेईला आमच्याबरोबर अमेरिकेला येऊ दे.''

त्यावर च्यो-च्योनं नकारात्मक मान हलवली. ते पाहून हेलेनचं मन विषण्ण झालं.

''अमेरिकेसारख्या दूरच्या देशात, जिथे तो कोणाला ओळखतही नाही, तिथे त्याला तुमच्याबरोबर पाठवून देऊ म्हणता? शक्यच नाही!'' च्यो-च्योचा अगतिक पण ठाम स्वर उमटला. आता तिला राहवेना. तिच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा लागल्या. खाली चटईवर त्यांचं थारोळं साचू लागलं.

तिचं दुःख पाहून हेलेनचा जीव कळवळला. हे सारं अशाप्रकारे व्हायला नको होतं. कदाचित हेलेनची ही योजनाच चुकीची आणि अवास्तव होती. मुकाट्यानं अमेरिकेला परत जाण्यात शहाणपण होतं का?

नवल म्हणजे हेलेनला त्या कधीही न पाहिलेल्या मुलाबद्दल मनापासून कणव वाटली. जपानमध्ये कसं जगणार होता तो? डोक्यावर वडिलांचं छत्र नाही. चांगल्या शिक्षणाची हमी नाही. समाजात स्वीकारतील याची शक्यता नाही. किती दुर्दैवी परिस्थितीत हे हाफू मूल जन्माला आलं होतं!

ही समोर बसलेली तरुणी. किती हलाखीची परिस्थिती होती तिची! पण ती आई होती त्या मुलाची. हेलेन जाणून होती की, कोणत्याही आईपासून तिचं मूल हिसकावून घेता येत नसतं. त्या आईनं तसं मान्य केलं तर आणि तरच तिचं मूल नेता आलं असतं. जिन्सेईला अमेरिकेला नेण्यासाठी हेलेन मनापासून प्रयत्न करत होती. तिला खात्री होती की, जिन्सेईवर ती पोटच्या मुलासारखी माया करेल, त्याला लाडाकोडात वाढवेल, पैशानं आणि प्रेमानं जे काही विकत घेता येईल, ते सगळं ती त्याला अमेरिकेत घेऊन देईल. तरीही ती त्या मुलाला त्याच्या आईपासून ओढून घेऊ शकली नसती. तिनं जरी बाळंतपण अनुभवलं नसलं तरी, एका आईच्या आणि तिच्या पोटच्या पोराच्या नात्याची कल्पना ती करू शकत होती.

हे विचार मनात येताच पुढे होत च्यो-च्योच्या जवळ जात तिनं तिला मिठी मारली. एका स्त्रीला दुसऱ्या स्त्रीच्या वेदनेची कल्पना आली होती. मग पट्कन ती जायला उठली.

''काही हरकत नाही.'' निघण्याआधी तिनं बोलायला सुरुवात केली. ''तुम्ही जर जिन्सेईला तुमच्यापासून दूर पाठवू शकत नसाल, तर तुम्हाला कुणी दोष देऊ शकणार नाही. हेन्रीचं एवढंच म्हणणं होतं की, अमेरिकेत जिन्सेई अधिक चांगल्या प्रकारे वाढेल. शिक्षण, सोयी, सुविधा... आणि आत्मविश्वाससुद्धा. त्याचा अभिमान वाटला असता तुम्हाला. पण तुम्ही त्याची आई आहात. त्याला पाठवायला तुम्ही स्वतः तयार व्हायला हवं.

''साधारण तीन दिवसांनी आमचं जहाज परत जायला निघेल. तुमचा विचार बदलला तर शार्पलेसच्या हाती निरोप पाठवा आम्हाला. या अशा परिस्थितीत माझी भेट घ्यायला तयार झालात म्हणून मनापासून आभारी आहे. आमच्यामुळे तुम्हाला जे दुःख सहन करावं लागलं, त्याबद्दल पुन्हा एकदा माफी मागते मी तुमची. हे सगळं असं घडलं नसतं तर फार बरं झालं असतं. च्यो-च्यो सान, मी हे अगदी मनापासून सांगते आहे.''

हेलेनसमोर उभी असलेली जेमतेम विशीतील च्यो-च्यो, तिचा निरागसपणा, चांगुलपणा, एकट्यानं मूल वाढवायचं तिच्यापुढे असलेलं आव्हान; या सगळ्यानं हेलेन कासावीस झाली. क्षणभर तिला बेंजामिन पिंकरटनचा प्रचंड संताप आणि तिरस्कार वाटला. या तरुण, निरागस मुलीचं आयुष्य असं नासवायची काय गरज होती त्याला? तिनं विश्वास टाकला होता त्याच्यावर. आपल्या वाग्दत्त वधूला तोंडघशी पाडायचं होतं, तर गुलछर्रे उडवण्यासाठी कितीतरी मुरलेल्या मुली मिळू शकल्या असत्या ना बेंजामिनला!

तितक्यात बाजूच्या खोलीतून लहान मुलाच्या खिदळण्याचा आवाज आला. हेलेनचं मन बाळासाठी व्याकूळ झालं. त्या बाळाला कुशीत घेण्याची तीव्र इच्छा तिच्या मनात दाटली. त्याला आपल्याबरोबर अमेरिकेला नेऊन, उत्तम आयुष्य देण्यासाठी, त्याच्यावर जिवापाड प्रेम करण्यासाठी ती काय वाट्टेल ते द्यायला तयार होती.

आपल्याच्यानं आता एक शब्दही बोलला जाणार नाही, हे लक्षात येऊन ती पट्कन तिथून निघाली. शक्य तितक्या झपझप चालत ती त्या घरातून बाहेर पडली. अत्यंत व्यावहारिक आणि तर्कशुद्ध विचारसरणीची हेलेन सहसा भावनांच्या आहारी जात नसे. पण आज मात्र तिच्या

अंतःकरणात कालवाकालव झाली होती. एका पुरुषानं दोन स्त्रियांना फसवलं होतं. च्यो-च्योच्या या भेटीनंतर तिच्या मनात बेंजामिन पिंकरटनबद्दल कडवटपणा दाटला होता, यापुढे ती त्याच्यावर पूर्वीसारखं प्रेम कसं काय करू शकणार होती?

ती त्याच्याशी असलेलं विवाहबंधन तोडणार नव्हती. समाजात त्यांच्या कुटुंबाला आदराचं स्थान होतं, ते टिकवणं गरजेचं होतं. पण त्या दोघांमधील पती-पत्नीच्या नात्याला आता काही अर्थ उरला नव्हता. एका असहाय तरुण आईच्या डोळ्यांतून घळघळा वाहणारे अश्रू पाहून हेलेन पिंकरटनच्या मनात उलथापालथ झाली होती.

ती निघून जाताच च्यो-च्योनं इतक्या वेळ आवरून धरलेल्या भावनांना वाट करून दिली. तिचे हुंदके ऐकून सुझुकी धावत बाहेर आली. ''च्यो-च्यो सान, काय झालं?''

मग तिच्या लक्षात आलं की, नेहमीप्रमाणे वागण्याबोलण्याचे संकेत पाळायची ही जागा नाही आणि वेळही नाही. त्या अमेरिकन स्त्रीबरोबर च्यो-च्योचं काय बोलणं झालं होतं, हे तिला माहीत असताना पुन्हा आपल्या मालकिणीला त्या सगळ्यातून जायला लावण्याची गरज नव्हती.

आपण संकेत झुगारत आहोत याची जाणीव ठेवत ती खालमानेनं म्हणाली, ''च्यो-च्यो सान, मला काही सांगायची गरज नाही. बाजूच्या खोलीतून ऐकलं आहे मी सगळं. यावर काय बोलायचं, ते मला कळत नाहीये.'' आपण मर्यादा ओलांडत आहोत, या जाणिवेनं तिनं अस्वस्थपणे हात गुंतवून घेत पुढे म्हटलं, ''मला वाटतं, जेवणं होऊन जिन्सेई झोपला की, मग बोलू या आपण या विषयावर. तोवर आपण दोघीही थोड्या शांत होऊन नीट विचार करू शकू. माझी आई नेहमी म्हणायची की, आपण जेव्हा अतिशय चिंतेत असतो, तेव्हा आपली विचारशक्ती नीट काम करत नाही. अशा वेळेस महत्त्वाच्या आणि दुःखदायक बाबींची चर्चा कधीही करू नये.''

तिचं सांगणं पटल्यामुळे च्यो-च्योनं मान डोलावत संमती दर्शवली. काही न बोलता त्या दोघींनी स्वयंपाक केला. जिन्सेई मजेत खेळत होता. अगदी रोजच्यासारखं सगळं सुरू होतं. दुरून पाहणाऱ्याला कळलंही नसतं की, या दोघींच्या मनाची किती घालमेल होते आहे.

इतक्या दिवसांच्या सहवासानंतर सुझुकी च्यो-च्योची निव्वळ नोकर राहिली नव्हती. त्यांच्यात मैत्रीचं नातं निर्माण झालं होतं. त्यामुळे ती रोजच आपल्या मालकिणीबरोबर टेबलावर जेवायला बसत असे. जेवताना त्यांच्या गप्पा, हास्यविनोद होत. पण आज त्यांना विलक्षण ताण जाणवत होता. त्या दोघीही गप्प आहेत, हे जिन्सेईच्या लक्षात आल्याप्रमाणे तोही शहाण्यासारखा वागत होता. हट्ट नाही, खळखळ नाही; मुकाट्यानं जेवण संपवून तो आपल्या अंथरुणात झोपायला गेला. नेहमीप्रमाणे ओका साननं अंगाई म्हणावी, असा हट्टदेखील त्यानं केला नाही.

''आता मला सांग सुझुकी, की मी काय करावं?'' डबडबलेल्या डोळ्यांनी च्यो-च्योनं इतक्या वेळ आवरून धरलेल्या भावनांना वाट करून दिली. ''अमेरिकेत जिन्सेईला भेदभावाला, हाफू असण्याला सामोरं जावं लागणार नाही, हे हेलेनचं म्हणणं अगदी खरं आहे. त्याला तिथे सर्वोत्तम शिक्षण मिळेल. आयुष्यात पुढे उत्तम संधी मिळतील.

आज नागसाकीमध्ये फक्त अतिशय श्रीमंत आणि सत्ताधारी कुटुंब आपल्या मुलांना अमेरिकेत पाठवू शकतात. इथे जिन्सेईला आपल्या वडिलांचं संरक्षण पण नाही मिळणार. तो हाफू असल्यामुळे इथल्या समाजात त्याचा स्वीकार होणार नाही, हेसुद्धा खरं आहे. त्याला आयुष्यभर भेदभाव सहन करावा लागेल.

''पण सुझुकी, अगं हे सगळं खरं असलं तरी पोटच्या पोराला मी कसं काय इतक्या दूर जाऊ देऊ? तो डोळ्याला दिसणार नाही, त्याला जवळ घेता येणार नाही... कसं सोसवेल मला हे?

''आणि मी नाही जाऊ दिलं त्याला तर माझ्यासारखी स्वार्थी बाई नाही दुसरी! तो माझ्याजवळ राहावा म्हणून मी त्याला सगळ्या चांगली संधींपासून दूर ठेवणार. हे योग्य आहे का? हाफू म्हणून त्याचं जपानमधलं आयुष्य कसं असेल, हे माहीत असून मी असं वागावं का?

''सुझुकी सान, अगं सांग मला, मी करू तरी काय? मला तर काहीच समजेनासं झालं आहे.''

च्यो-च्योच्या प्रत्येक वाक्यात किती तथ्य आहे, हे सुझुकीला लक्षात आलं होतं. तिनं दोन्ही बाजूंनी विचार केला होता, तोही योग्य होता. पण सुझुकी नोकर होती. आपल्या मालकिणीच्या दृष्टीनं योग्य काय, अयोग्य काय  हे ती ठरवू शकत नव्हती. म्हणूनच, मनात आलेला पहिला विचार तिनं च्यो-च्योला बोलून दाखवला.

''तुम्ही जर जिन्सेईबरोबर अमेरिकेला जाऊ शकलात, त्याच्या जवळ राहू शकलात तर... सगळ्यात चांगला तोडगा हा वाटतो मला.''

ते ऐकताच च्यो-च्योनं खेदानं मान हलवली, ''नाही गं, ते शक्यच नाही. पिंकरटन सान आणि हेलेन नवराबायको आहेत. मग मी त्यांच्या आसपास असलेली कसं आवडेल त्यांना? मी जर त्यांना जिन्सेईला नेण्याची परवानगी दिली, तर कदाचित आयुष्यभर मला तो परत दिसणार नाही अशी तयारी ठेवावी लागेल मला. एकच आशा असेल मला की, एक ना एक दिवस माझ्या मुलाला आपल्या खऱ्या आईबद्दल समजेल आणि मी मरायच्या आधी तो परत येईल मला शोधायला.


''समजा, मी ठरवलं की, जिन्सेई नाही जाणार त्यांच्याबरोबर अमेरिकेला तर मारुयामा लेनच्या मागच्या गल्लीबोळात मोठा होईल तो. मी ना त्याला धड शिक्षण देऊ शकेन, ना चांगलं आयुष्य! छे! काय करावं, ते काही समजत नाही!''

त्या रात्री तिनं आपलं अंथरूण जिन्सेईच्या बाजूला पसरलं. ती आडवी झाली खरी, पण आज झोप रुसली होती तिच्यावर. रात्रभर ती आपल्या बाळाला थोपटत राहिली, नजरेत साठवत राहिली. कधीतरी थकूनभागून तिचा डोळा लागला.

पहाटे तिला जाग आली, तर तिची उशी अश्रूंनी भिजली होती. आपल्या बाळाला चांगलं आयुष्य मिळावं असं तिला वाटत असेल, तर त्याचा आयुष्यभराचा विरह स्वीकारणं भाग होतं. नाहीतर स्वार्थापोटी त्याला इथेच ठेवून पारंपरिक जपानमध्ये एका हाफूचं आयुष्य जगायला लावायचा निर्णय तिला घ्यायचा होता.

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित**
**'मदाम बटरफ्लाय' या रेई किमुरा लिखित आणि**
**डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके अनुवादित पुस्तकातून)**

## नवं कोरं




आगीनगाडी पाहून घाबरलेली जनता... विकासाच्या प्रवासाला समजलं गेलं भूतबाधा...
भारतातल्या पहिल्या आगीनगाडीच्या खुमासदार गोष्टींनी सजलेलं पुस्तक...


# कहाणी पहिल्या आगीनगाडीची

मूळ लेखक - राजेंद्र आकलेकर
अनुवाद - रोहन टिल्लू

पृष्ठसंख्या : २६०
किंमत : ₹३५०

Book Available

---



युरोप असो वा इटली... गल्ली असो वा दिल्ली...
थोडंफार कौतुक होतं, पण उडते कायम खिल्ली...
जगभरच्या म्हणीमधली 'स्त्री' दर्शवणारं अफलातून पुस्तक...


# नेव्हर मॅरी अ वुमन विथ बिग फीट

मूळ लेखक - मिनेक शिप्पर
अनुवाद - वर्षा वेलणकर

पृष्ठसंख्या : ५०८
किंमत : ₹६५०

Book Available

---




प्रतिभेला फुटणारे अंकुर आणि
कल्पनाविश्वाच्या स्रोतांचं खिळवून ठेवणारं
अभ्यासपूर्ण विवेचन...


# प्रतिभेचा इंद्रधनू

मूळ लेखक - जोना लेहरर
अनुवाद - डॉ. अजेय हर्डीकर

पृष्ठसंख्या : १९२
किंमत : ₹२५०

# लेडी जल्लाद

**मूळ लेखक : के. आर. मीरा**
**अनुवाद : रेश्मा कुलकर्णी-पाठारे**



''मी असं ऐकलंय की, त्या दिवशी तो कोण मुलगा आला होताऽऽ... तो पत्रकार? त्याने म्हणे, चेतनाचा हात मागितला आहे? खरं आहे का हे?''

''हो, खरं आहे; पण अजून आमचा निर्णय ठरायचा बाकी आहे. आता चेतना काही कुठली सामान्य मुलगी राहिलेली नाही. जगातली पहिली महिला जल्लाद झालेय ती. समस्त स्त्रीजातीसाठी स्वाभिमान आणि कणखरपणाचं द्योतक झालेय ती. बघू या, काय करायचं पुढे तेऽऽ... बरं, चेतू, चल तयार हो पटापट. आपल्याला निघायला हवं.''

बाबा मला कुठे न्यायचं म्हणत होते, याबद्दल मला काहीच ठाऊक नव्हतं. १ जूनपासून टी.व्ही. स्टुडिओला जावं लागणार आहे, एवढंच मला माहिती होतं; पण मग आता बाबा मला कुठे नेणार होते? आणि जर कुठे जायचं ठरलं होतं, तर मग संजीवकुमार सोबत का येणार नव्हता? आमच्यातल्या करारानुसार, घराबाहेरचा माझा सगळा वेळ त्याच्या अखत्यारित होता ना? मला हे सगळं बाबांना विचारावंसं वाटत होतं; पण तशी हिंमत झाली नाही. सुमारे ११ वाजता, स्वतः झकपक तयार होऊन, ते मलाही पटापट आवरायची घाई करू लागले. मी केसांच्या वेण्या बांधल्या आणि माझ्याजवळ असलेला एकुलता एक चांगला सलवार-कुडता अंगावर चढवला. फिक्या जांभळ्या रंगाच्या त्या पोशाखात मी एरवीपेक्षा चांगली दिसत होते. बस क्र. ६२ मध्ये वाजवीपेक्षा जास्तच गर्दी होती. अलिपूर कारागृहाच्या लाल भिंती नजरेस पडल्या, तसा माझ्या पोटात भीतीचा गोळा उठला. अजूनही संजीवकुमारचा पत्ता नव्हता. बाबा त्याच्याबद्दल काही बोलतही नव्हते. असं का?

कसं कोण जाणे; पण कदाचित माझ्या डोक्यातले विचार डोळ्यांत उतरलेले पाहून, बाबा अचानक म्हणाले,

''तो चांगला आहे. अगदी हुशारसुद्धा आहे. आपल्याला मदत करतोय. सगळं ठीक आहे; पण काही ठिकाणी पत्रकारांना विश्वासात नाही घेता येत. लक्षात ठेव...''

बाबा काय बोलत आहेत, हे मला नीटसं समजेना.

''चेतू, तुला सरकारी नोकरी मिळाली आहे. ही नोकरी देणारं सरकार तुझं खरं मायबाप आहे. त्यांच्यापुढे इतर कुणी नाही.''

आम्ही कारागृहामध्ये पोहोचेपर्यंत बाबा अजून काही बोलले नाहीत. मला दरवाजाबाहेर ठेवून, ते सिब्देव बाबूंच्या कार्यालयात गेले. थोड्या वेळाने, एका पोलिसाला सोबत घेऊन बाहेर आले आणि मला त्यांच्यासोबत येण्याचा इशारा केला. आपण कुठे चाललो आहोत याबद्दल त्यांनी काही सुतोवाच केलं नाही. थोड्या वेळाने, आम्ही दुसरा दरवाजा ओलांडून डावीकडे वळलो. तिथे पोहोचल्यावर, बाबा मला म्हणाले,

''चेतू, तिथे बघ. फाशीची शिक्षा ठोठावलेल्या गुन्हेगारांच्या कोठड्या तिकडे आहेत.''

मी डोळे विस्फारून पाहू लागले. बाबा दाखवत होते, त्या ठिकाणी एका ओळीमध्ये तीन खुराडेवजा कोठड्या होत्या. त्यांच्या दरवाजांवर जाळ्या लावलेल्या होत्या; त्यामुळे आतलं फारसं काही दिसत नव्हतं. त्यात, त्या कोठड्यांमध्ये लावलेल्या पिवळ्याजर्द दिव्यांमुळे तर अजूनच त्रासल्यासारखं होत होतं. पुढील आयुष्यात जेव्हा कधी त्या कोठड्यांचा विचार डोक्यात येई, तेव्हा सर्वप्रथम ते त्रासदायक पिवळे दिवेच समोर यायचे! असो. तर आम्ही तसेच पुढे चालत जाऊन, फाशीस्तंभाकडे पोहोचलो. थोड्या उंचीवर उभ्या असलेल्या फळीवर, एक उंच लांब लाकडी दांडा उभारलेला होता. त्याकडे निर्देश करत बाबा म्हणाले,

''फांसी काथ!''

बापरे! आजतागायत अनेकदा ज्या फाशीस्तंभाबद्दल असंख्य वेळा ऐकलं होतं, तो आज पहिल्यांदाच प्रत्यक्षात पाहत होते. भीती वाटत होती. समोर उभ्या असलेल्या निर्जीव लाकडी दांड्यावर इतक्या लोकांनी आपला प्राण सोडला आहे या विचाराने मला कसंनुसं व्हायला लागलं. माझं हे विचारचक्र सुरू असताना, बाबा मला फाशी कशी द्यायची याबद्दल प्रत्यक्ष माहिती देत होते. ''हे बघ चेतू, मी नेहमी सांगतो ना तुला, तोच हा आकडा - ज्यामध्ये दोरखंड अडकवला जातो. ही दोरखंड ओढण्यासाठी लागणारी कप्पी... गाठ इथे असायला हवी...'' बाबांचं बोलणं ऐकत असताना मला माझ्या मनाच्या कुपीत मोठा पक्षी अडकल्याचा भास होऊ लागला. तो पक्षी अडकलाय... बाहेर येण्यासाठी आटोकाट प्रयत्न करतोय... त्यासाठी माझ्या हृदयाला आतमधून आपल्या नखांनी व चोचीने घायाळ करतोय असे काहीबाही विचार मनात येऊ लागले.

बाबांच्या आवाजाने माझी तंद्री भंग पावली.

''चेतू, इकडे ये. हा बघ, खटका. हात लाव याला.''

जड पावलांनी पुढे येऊन मी खटक्याला हात लावला. माझ्या कित्येक पूर्वजांनी लीलया हाताळलेला तो जुनाट लोखंडी खटका सापाच्या कातडीसारखा गुळगुळीत आणि थंडगार होता! माझ्या पूर्वजांचीही कमाल होती बघा! आपलं पिढीजात कार्य अखंड सुरू राहावं यासाठी एक जल्लाद निवृत्ती किंवा मृत्यूच्या टप्प्यापर्यंत येऊन पोहोचला की, तो लगेच त्याच्या पुढच्या पिढीतल्या व्यक्तीला आपलं कार्य सुरू ठेवण्यासाठी तयार करत असे. न्यायदेवतेच्या चरणी पिढ्यान्‌पिढ्या चालू असलेली आमच्या घराण्याची सेवा अशीच अबाधित सुरू राहावी यासाठी सगळेच ग्रद्धा मलिक कंबर कसून उभे असतात. आज ती धुरा माझ्या हाती सोपवली गेली होती. एका अर्थी मला या गोष्टीचा अभिमान वाटायला हवा होता; पण तसं न वाटता, उलट मला त्याचा त्रास होत होता. कसलं कार्य आहे हे? काय अर्थ आहे या सगळ्याला? निरर्थक आहे सगळं!

नाइलाजाने, मी खटक्याला हात लावला आणि तो ओढण्याचा प्रयत्न केला; पण तो बऱ्यापैकी गंजलेला होता. बाबांनी प्रयत्न करून बघितला; त्यांनाही खटका उचलता आला नाही. ''खटका खूप गंजलाय, बाबू... तेल घालायला हवं,'' त्यांनी पोलिसाकडे तक्रार केली. पोलीस तेल आणायला गेला. बाबासुद्धा त्याच्यासोबत गेले.

मी फाशीस्तंभाच्या समोर उभी राहून, त्याकडे निरखून पाहू लागले. ढगाळलेल्या आभाळाच्या पार्श्वभूमीवर तो फाशीस्तंभ एखाद्या अपूर्ण राहिलेल्या शिल्पाकृतीसारखा दिसत होता. एका क्षणी मला असं वाटून गेलं की, मी इथे यापूर्वी बरेचदा येऊन गेले आहे. त्या विचाराने मला जरा सैलावल्यासारखं वाटलं. आमच्या घराण्याला हे काम नेमून दिलेलं आहे. गंगेतील पाणी जसं अखेर समुद्राला जाऊन मिळतं तसं; आमच्या घराण्यातली माणसं शेवटी याच कामाला लागतात. जल्लादाचं काम वरकरणी कितीही कठोर आणि संवेदनाहीन वाटत असलं तरी प्रत्यक्षात ते केवळ एक सरकारी, यांत्रिक काम असूच शकत नाही. विशेषतः

कोणतीही स्त्री, स्वतःच्या मनाशी प्रचंड द्वंद्व न करता (आणि त्या द्वंद्वामध्ये आपल्या मनावर ताबा न मिळवता) हे काम करू शकणार नाही.

इतक्यात, मला माझ्या मागे कुणीतरी उभं असल्याचा भास झाला. मी दचकून मागे पाहिलं. बघते तर, बाबा माझ्याकडे हसून बघत उभे होते.

''मी तुला काल मुद्दामच इथे घेऊन आलो नाही, चेतू. हे सगळं प्रत्यक्षात पाहून तुझी काय प्रतिक्रिया होईल याचा मला अंदाज येत नव्हता आणि जर तू इतरांसमोर घाबरली असतीस, तर हे काम आपल्याला मिळणं कठीण होतं; पण आता, मला तुझा खरंच अभिमान वाटतो; चेतू, तू खूप धीराची आहेस.''

बाबांच्या कौतुकावर काय प्रतिक्रिया द्यावी हे मला समजेना. त्या क्षणी त्यांना हे सांगणं अयोग्य वाटलं की, मी धीराने नव्हे, तर नाइलाजाने हे सगळं करायला तयार झाले होते.

तोंडावरचा घाम पुसत बाबा बोलू लागले,

''किती वर्षांनी येतोय मी इथे! पण प्रत्येक वेळी आलो की, पहिल्यांदाच येत असल्यासारखं वाटतं. हा भाग बघितलास, चेतू? पूर्वी इथे एक भिंत असायची. त्यावर दादूंची गणितं लिहिलेली असायची आणि त्या तिथे एक दरवाजा होता. इंग्रज अधिकारी त्या दरवाजामधून फाशी दिली जाताना बघत असत. आता हे बघ... या इथे डी.जी.पी., अधीक्षक आणि दंडाधिकारी उभे राहतात. गुन्हेगाराला आत आणलं जातं. मग त्याच्या तोंडावर काळा मुखवटा चढवला जातो आणि त्याचे हात बांधले जातात. दंडाधिकारी समोरच्या बाजूला उभे राहतात. त्यांनी आपल्या हातातला लाल रुमाल जमिनीवर पाडला की, जल्लादाने खटका ओढायचा असतो. रुमाल पाडणं ही खूण असते.''

मी स्तब्ध होऊन ऐकत होते.

''त्या वेळी जल्लादाने आपलं संपूर्ण लक्ष त्या रुमालावर केंद्रित करायचं असतं. मनातले इतर सगळे विचार, संभ्रम बाजूला सारून, फक्त त्या रुमालावर आपलं मन स्थिर करायचं असतं. त्या काही क्षणांसाठी तुमच्या आयुष्यामध्ये केवळ तो खटका आणि तो लाल रुमाल या दोनच गोष्टी आहेत, असं मानून चालायचं असतं.''

उसासा टाकत, बाबा पुढे म्हणाले,


''हे बघ बेटा, आपण केवळ न्यायदानाच्या कामामध्ये आपला खारीचा वाटा उचलत असतो. आता जतिंद्रनाथचंच बघ ना. आजारी आईसाठी औषधं आणण्याकरिता जात असलेल्या एका लहान मुलीला त्याने किती निर्दयपणे मारलं? त्या मुलीने त्याच्यासमोर किती गयावया केली असेल? तिला किती त्रास झाला असेल? पण त्याने तिचं ऐकलं का? नाही. त्या वेळी त्याच्या डोक्यावर सैतान स्वार झाला होता. सरकारचं काम आहे, समाजस्वास्थ्यासाठी या सैतानांचा खातमा करणं आणि जल्लाद म्हणून आपलं काम असतं अशा सैतानांचा प्राण हिरावून घेणं. तेच आपलं कर्म आहे; आपल्या पूर्वजन्मीच्या कर्मांचं फळ आहे.''

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित 'लेडी जल्लाद' या के.आर. मीरा लिखित आणि रेश्मा कुलकर्णी-पाठारे अनुवादित पुस्तकातून)**



पुराणकाळातील महाकाव्याला
आधुनिक कॉर्पोरेट युगाचा
साज चढवून सोप्या साध्या भाषेत
वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा
एक अनोखा प्रयत्न!

## कॉर्पोक्षेत्र
एम.बी.ए युगातील महाभारत




मूळ लेखक - दीपक कौल
अनुवाद - सावनी केळकर

पृष्ठसंख्या : १३२
किंमत : ₹१८०

Book Available

दहशतवादाचा जगातील
महत्त्वाच्या देशांमध्ये चाललेला हैदोस.
एक ट्रॅकर दहशतवादाचं हे जाळं
कसं भेदतो त्याचं नाट्यपूर्ण चित्रण
करणारी कादंबरी

## द किल लिस्ट




मूळ लेखक - फ्रेडरिक फोरसाइथ
अनुवाद - बाळ भागवत


पृष्ठसंख्या : २६०
किंमत : ₹३५०

Book Available

TBC 28 - 6

भावनातिरेकाच्या
आजच्या वातावरणात समाजभान
गढूळ होत चाललं आहे...
या स्थित्यंतराचं कथात्म रूप
म्हणजेच नाकोहस...

## नाकोहस





मूळ लेखक - पुरुषोत्तम अग्रवाल
अनुवाद - सुनीता देवस्थळी

पृष्ठसंख्या : १४८
किंमत : ₹१९५

Book Available

# जालियनवाला बाग

**लेखक : अमेय जाधव**



भिंतीजवळच्या सुट्या जागेतून मार्ग काढत आझाद व्यासपीठाच्या दिशेने सरकत होता. कार्यक्रम आटोपल्याने जो तो वाट काढत बाहेर जाण्यासाठी वळत होता. त्यामुळे गर्दीच्या विरुद्ध दिशेने निघालेल्या आझादला अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागत होता. तो व्यासपीठापासून तीन यार्डांपर्यंत आला होता. आता व्यासपीठावरील वक्ते मंडळीही व्यासपीठावरून उतरण्याची तयारी करत होते. वेळ दवडून उपयोग नव्हता. कोटाच्या खिशातील रिव्हॉल्व्हर बाहेर काढून त्याने व्यासपीठावर एकामागून एक सहा गोळ्या झाडल्या. गोळ्यांच्या बाराने थोडाफार धूर आझादच्या चेहऱ्याभोवती पसरला होता आणि त्या धुराच्या विळख्यातच त्याने व्यासपीठाकडे नजर फेकली. ओडवायर, लॅमिंग्टन, झेटलंड आणि लुई डेन व्यासपीठावर आडवे झाले होते. आपले काम झाले असे समजून हातात रिव्हॉल्व्हर उंच धरून तो 'मेक वे, मेक वे' असे ओरडत सभागृहाच्या दाराकडे निघाला.

गोळ्यांच्या एका पाठोपाठ सहा आवाजांनी सभागृहातील लोकांमध्ये घबराट पसरली. एका मागोमाग एक असे ते गोळ्यांचे आवाज काही जणांना बॉम्बच्या आवाजासारखे वाटले. घाबरून जो तो आपला जीव वाचवण्यासाठी पळू लागला. सगळे काही योजनेप्रमाणे व्यवस्थित चालले होते. आझादच्या अपेक्षेप्रमाणे लोक गोंधळून फक्त सभागृहाबाहेर पडण्याच्या प्रयत्नांत होते. त्यामुळे आझादकडे बघण्यास कुणासही वेळ नव्हता. अतिशय निर्धोकपणे हातात पिस्तूल धरून तो सभागृहाच्या दाराकडे पळत होता; पण तोच एक पन्नास-पंचावन्न वर्षांची एक बाई आझादला आडवी आली. आझादच्या कोटाची कॉलर धरून ती 'आय कॉट हिम. मी पकडले याला,' म्हणून जोरजोरात ओरडू लागली. मागचा पुढचा कुठलाही विचार न करता आझादने तिला मांजराच्या पिलागत उचलून गर्रकन फेकून दिले. त्यामुळे ती मागे जाऊन कोलमडली. पण इतक्यात त्या बाईच्या आसपास असलेल्या दोघांनी आझादवर झडप घातली आणि त्याला भुईवर पाडले. ते दोघे त्याला जमिनीवर दाबून धरत असतानाच तिसऱ्या एकाने त्याच्या हातातील रिव्हॉल्व्हर हिसकावून घेतले. आझादने दोघांना पछाडून उठण्याचा प्रयत्न केला; पण दोघांच्या शक्तीपुढे त्याची शक्ती कमी पडली. आतापर्यंत बरीचशी मंडळी त्याच्याभोवती जमली होती. त्यामुळे आता प्रयत्न करून काहीच उपयोग नाही, हे कळल्याने तो निपचित पडून राहिला.

तो पकडला गेला तसा सभागृहातील गोंधळ हळूहळू कमी झाला. कुतूहलाने सारे आझादभोवती जमू लागले. आपण ऐकलेले आवाज हे बॉम्बचे नसून गोळ्यांचे आहेत हे त्यांच्या लक्षात आले. व्यासपीठावरील जखमींकडे नजर जाताच मदतीचा ओघ तिथे वळला. जमलेल्या लोकांमध्ये कर्नल रेनहोल्ड नावाचा एक वैद्यकीय विभागाचा डॉक्टर होता. तो लगेचच प्राथमिक उपचारासाठी व्यासपीठावर आला. व्यासपीठावर लॅमिंग्टन आणि लुई डेन जखमांनी विव्हळत पडले होते. आझादच्या एका गोळीने लॅमिंग्टनची धमनी फाडली होती तर दुसऱ्या गोळीने लुई डेनचा हात मोडला होता. त्याच्या उजव्या हाताचा भाग छिन्नविच्छिन्न झाला होता. त्यांच्या जखमांवर मलमपट्टी करून त्यांना ताबडतोब सेंट जॉर्ज रुग्णालयात हलवण्यात आले. मग रेनहोल्ड झेटलंडकडे वळला. त्याचे डोळे बंद होते आणि शरीराची काहीच हालचाल नव्हती. त्याच्या जाकिटावर दोन ठिकाणी गोळ्या घुसून जळाल्याच्या खुणा होत्या. बहुतेक तो मेला असावा असे वाटून रेनहोल्ड त्याचा हात हातात धरून नाडीचे ठोके पाहू लागला. ठोके चालू होते. झेटलंडच्या सुदैवाने दोन्ही गोळ्या बंडीत आणि जाकिटात जळलेल्या भोकाजवळच अडकल्या होत्या. त्यामुळे थोडीफार किरकोळ जखम झाली होती. पण आपटल्याने त्याच्या बरगड्यांत कळ आली असल्याने तो मूर्च्छित होऊन पडला होता. त्याला ताबडतोब रुग्णालयात हलवण्याची सूचना करून तो निपचित पडलेल्या ओडवायरपाशी आला. तोंडघशी पडलेल्या ओडवायरला सरळ करून रेनहोल्डने त्याच्या शरीरावरून नजर फिरवली. ओडवायरला एकाखाली एक समांतर अशा दोन गोळ्या लागल्या होत्या. त्याचा शर्ट, कोट पूर्णपणे रक्ताने माखले होते. व्यासपीठावरही रक्त सांडलेले होते. रेनहोल्ड ओडवायरचे मनगट हाती धरून नाडी बघू लागला. ओडवायरचे ठोके बंद पडले होते. झेटलंडप्रमाणे ओडवायरचे नशीब सुदैवी नव्हते. दोन्ही गोळ्यांनी आपले काम बरोबर केले होते. रेनहोल्डने ओडवायरच्या कोटापाशी जळलेल्या भागाची पाहणी केली. ओडवायरच्या हृदयाजवळच जखम झाली होती. गोळी वरच अडकलेली होती. रेनहोल्डने ती गोळी घेतली. त्या वेळी ट्यूडर हॉललाच देखरेखीच्या कामासाठी हजर असलेल्या इन्स्पेक्टर रॉबर्ट विल्यम आणि जॉन मॅकविल्यम यांनी याप्रसंगी सारी सूत्रे हाती घेतली होती. रेनहोल्डने ती गोळी रॉबर्ट विल्यमकडे दिली. जॉन मॅकविल्यमने सभागृहात आल्यावर लगेचच बाहेर जाण्याची सारी दारे बंद केली होती. त्यामुळे संपूर्ण सभागृहात जळलेल्या दारूचा वास पसरला होता आणि दाराजवळ सारी भेदरलेली माणसे दाटीवाटीने जमा झाली होती. मॅकविल्यमने पुढे होऊन जमिनीवर निपचित पडलेल्या आझादच्या हातात बेड्या अडकवल्या. आझादला उभे करून त्याच्या घेतल्या गेलेल्या झडतीत मॅकविल्यमला एक लिनोलिअम सुरा, लाल रंगाची दैनंदिनी, काडतुसांची पिशवी सापडली. आझादला शेजारच्या खुर्चीवर बसवून मॅकविल्यम डिटेक्टिव्ह पोलिसांची वाट बघू लागला.

जवळपास पावणेपाच-पाचच्या सुमारास डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर डायटन आणि पोलीस इन्स्पेक्टर स्वेन आपल्या तुकडीसह सभागृहात पोहोचले. डायटनने सभागृहात प्रवेश करतानाच आझादकडे नजर फिरवली. आझाद बसल्या बसल्या स्वतःशीच हसत होता. डायटन तडक मॅकविल्यमपाशी आला.

''हॅलो ऑफिसर, मी डिटेक्टिव्ह इन्स्पेक्टर डायटन. या केसची तपासणी मी करत आहे. काय घडले ते तुम्ही मला सांगू शकता का?''

''हॅलो सर, काय घडले ते मी नक्की नाही सांगू शकत. मी सेक्शन ड्युटीवर होतो की तोच कॅक्स्टन हॉलमधून काही माणसे पळत येताना मी पाहिली. एका बाईला विचारणा केली तेव्हा ती म्हणाली की इथे गोळीबार झाला आहे. मी धावतच आत आलो. आतमध्ये हजर लोकांनी आधीच या इसमास पकडले होते,'' आझादकडे बोट दाखवत मॅकविल्यम म्हणाला.

''हूंऽऽ, बरं तुम्हाला काय वाटते? या माणसाची मनःस्थिती कशी असावी? मी आलो तेव्हा तो स्वतःशीच हसत होता. काय वाटते? तो नाटक करत असावा का?''

''शक्यता आहे, पण नक्की काही सांगू शकत नाही. त्याच्या

झडतीत या गोष्टी मिळाल्या.'' मॅकविल्यमने आझादच्या वस्तूंकडे बोट दाखवले.

''ठीक आहे. जोन्स, सर्व माणसांना खाली तळमजल्यावर घेऊन जा. त्यांचे नाव, पत्ते, कबुलीजबाब लिहून घे. तसेच प्रत्येकाची कसून झडती घे.'' आपल्या कनिष्ठ अधिकाऱ्याला डायटनने हुकूम दिला, तसा पडत्या फळाची आज्ञा मानून जोन्स साऱ्या उपस्थित लोकांना घेऊन खालच्या मजल्यावर गेला.

डायटन पुढच्या हालचालीबद्दल विचार करू लागला होता. एका ज्येष्ठ ब्रिटिश नागरिकाचा असा सर्वांसमक्ष खून होणे, ही फार मोठी गोष्ट होती. त्यामुळे या प्रकरणाचा लवकरात लवकर सोक्षमोक्ष लावणे गरजेचे होते.

''स्वेन, या इसमाला दुसऱ्या खोलीत घेऊन जा आणि त्याचा कबुलीजबाब घे.''

''आणि हो, जरा सावध राहा.'' स्वेन आझादला घेऊन निघणारच होता की डायटनने त्याला सावधानतेचा इशारा दिला.

स्वेन आपल्या चार शिपायांना सोबत घेऊन आझादला ट्यूडर हॉलच्या नजीकच्या खोलीत घेऊन गेला. डायटनने आता आझादच्या वस्तूंकडे नजर फिरवली आणि सर्वांत आधी त्याची नजर वेधली गेली आझादच्या दैनंदिनीवर. डायटनने दैनंदिनी चाळायला सुरुवात केली. त्याने लगेचच आजच्या दिवसाचे (१३ मार्चचे) पान उघडले. '3pm., कॅक्स्टन हॉल, एस.डब्ल्यू.१ मीटिंग' अशी एक संदिग्ध नोंद तिथे केली होती. शिवाय मायकेल ओडवायरचे नाव आणि त्याचा पत्ता लिहून त्यावर काट मारली होती. दैनंदिनीत बहुतेक ठिकाणी 'कृती', 'माझा शेवटचा महिना', 'दार उघडण्याचा एकमेव मार्ग', 'बदला', 'कसाई' अशा नोंदी होत्या. एका ठिकाणी 'लॉर्ड वेलिंग्टन – भूतपूर्व व्हॉईसरॉय' असे लिहिले होते व त्याखाली त्याचा पत्ता लिहिला होता. त्याखाली झेटलंडच्या नावाची नोंद होती व त्याचाही पत्ता लिहिला होता. त्याच्या मागच्याच पानावर 'कॅश अकाउंट-डिसेंबर' असे शीर्षक होते व त्याखाली 'सर एम. ओडवायर, सनी बँक, थर्लस्टन, साउथ डी' असे लिहिले होते.

एकंदरीत मामला भरपूर गंभीर होता आणि आरोपी इसम वेडा वगैरे नसून त्याने अतिशय चलाखीने योजना आखून ती प्रत्यक्षात आणली असल्याचे डायटनच्या लक्षात आले. डायटनने दैनंदिनीच्या पहिल्या पानावरील आझादच्या मॉर्निंगटन टेरेसवरील घराचा पत्ता बघितला. अधिकची माहिती तिथेच मिळू शकेल याची खात्री असल्याने डायटन आपला सहकारी इन्स्पेक्टर व्हाईटहेडला घेऊन तिथे पोहोचला. आझादच्या घरी डायटनला एकोणीसशे एकोणचाळीस सालची दैनंदिनी सापडली. त्यातही आझादने ओडवायरच्या दोन-तीन ठिकाणच्या घराचे पत्ते लिहिलेले आढळले. याशिवाय 'सिंग आझाद' नावावर असलेले एक राष्ट्रीय रजिस्ट्रेशन कार्डही सापडले.

आझादविरुद्ध भक्कम पुरावे जरी डायटनच्या हाती लागले असले तरी आझादचे या कृतीमागचे कारण मात्र अजूनही गुलदस्तात होते आणि संपूर्ण खोलीची झडती घेऊनही डायटनला ते समजू शकले नव्हते.

''तुला इंग्लिश समजते का?'' खोलीत जाताच आझादला खुर्चीवर बसवत स्वेनने विचारले.

''हो समजते.'' आझादने उत्तर दिले आणि लगेचच सावध होत तो पुढे म्हणाला, ''पण मी काहीच उत्तर देणार नाही. आता या चौकशीचा काहीच उपयोग नाही. सर्व काही संपले आहे. मी कसा निषेध केला ते तुम्हाला मग मी सांगेन. पण आता, आता काहीच उपयोग नाही.''

आझादला बसल्या जागेवरून व्यासपीठावर पडलेला ओडवायरचा मृतदेह दिसत होता.

''तो तिथे मरून पडला आहे. त्याची तीच लायकी आहे.'' ओडवायरच्या कलेवराकडे बोट दाखवत आझाद बोलत होता.

''तुझे नाव काय?''

''राम मोहम्मद सिंग आझाद.'' आझादने अगदी ताठ्यात उत्तर दिले.

स्वेनने आझादने झाडलेल्या चार गोळ्यांची रिकामी आवरणे आझादसमोर ठेवली.

''या काडतुसांना ओळखतोस का? ही तूच झाडली आहेत ना?''

आझादने काडतुसांच्या रिकाम्या आवरणावर नजर टाकली आणि तो जवळपास ओरडलाच.

''चारच? नो नो, ऑल द लॉट. सहा, सहा.'' म्हणत आपल्या दोन्ही हातांची मिळून सहा बोटे तो स्वेनला दाखवू लागला.

''ठीक आहे. तू सहा गोळ्या झाडल्यास. हो ना? बरं, आणि हा सुरा? हा का सोबत आणला होतास?'' आझादला त्याने सोबत आणलेला सुरा दाखवत स्वेनने विचारले.

''कँडन टाउनमध्ये मी राहत असल्यामुळे माझ्याजवळ गेले काही दिवस सुरा आहे.''

''बरं मग? कँडन टाउन आणि सुऱ्याचा काय संबंध?''

आझाद यावर काहीच बोलला नाही.

''ठीक आहे. तू हे का केलेस?''

''मला त्याच्याबद्दल प्रचंड चीड होती म्हणून मी हे केले. त्याची लायकी हीच आहे. मी कोणत्याही संस्था अगर सोसायटीचा सदस्य नाही.'' म्हणत आझाद शांत झाला.

आझाद गप्प झाला तसा स्वेन पुढचा प्रश्न विचारण्यास तयार झाला. पण तो काही विचारणार तोच आझाद पुन्हा उसळून बोलू लागला.

''मला पर्वा नाही. मी मरणाचा फारसा विचार करत नाही. म्हातारे होईपर्यंत मरणाची वाट बघत जगण्यात काय अर्थ आहे. हे काही ठीक नाही. त्यापेक्षा तरुणपणीच स्वतःचे ध्येय गाठण्यासाठी मरणे चांगले आणि तेच मी करत आहे.''

''ठीक आहे. पण एक लक्षात ठेव, तू इथे जे काही बोलशील ते मी कबुलीजबाबात लिहिणार आहे आणि ते कोर्टामध्ये तुझ्याविरुद्ध पुरावा म्हणून वापरले जाऊ शकते. तुला कळतंय ना, मी काय बोलतोय ते?''

''मी माझ्या देशासाठी बलिदान करतोय. त्यामुळे मी कोणालाच भीत नाही. मला वाचण्यासाठी वर्तमानपत्र मिळेल का?''

''काय?'' आझाद असे काही विचारेल याची अपेक्षा नसल्याने स्वेन उडालाच.

''काय? वर्तमानपत्र मिळेल का विचारले मी.'' आझादने अगदी

सहजतेने उत्तर दिले.

''नाही, तुला वर्तमानपत्र नाही मिळणार.'' म्हणत स्वेन कबुलीजबाब लिहीत असलेल्या सिडनेपाशी आला.

''बहुतेक वेडा वाटतोय किंवा तसे दाखवतोय तरी. जास्त काही हा सांगेल असे वाटत नाही. तू टिपून घेतलेस ना सारे?''

''येस सर.'' म्हणत सिडनेने कबुलीजबाबाचे कागद स्वेनपाशी दिले.

''झेटलंड मेला का?''

आझादच्या या पुढच्या प्रश्नाने स्वेन पुन्हा एकदा गोंधळला. आझादकडे बघत त्याने नकारार्थी मान हलवली. ते बघून आझाद खट्टू झाल्याचे स्वेनच्या लक्षात आले.

''हूं, तो मरायला हवा होता. मी अगदी इथे, इथे त्याला दोन गोळ्या मारल्या होत्या,'' आपल्या डाव्या पोटावरून हात फिरवत तो म्हणाला. ''तू रिव्हॉल्व्हर कुठून मिळवलेस?'' पुढचा प्रश्न विचारत स्वेनने कबुलीजबाबाचे कागद पुन्हा सिडनेपाशी दिले.

''रिव्हॉल्व्हर? बॉर्नमाउथला बारमध्ये एका सैनिकाकडून विकत घेतले मी ते. मी त्या बदल्यात त्याच्यासाठी मद्य खरेदी केले.''

''कोण होता तो? त्याचे नाव काय होते?''

''मला नाही माहीत.''

''कुठे राहतोस तू?''

आझाद काही न बोलता गप्प बसला.

''तुझ्या कुटुंबात कोण कोण असते?''

''माझे आई-बाबा मी चार-पाच वर्षांचा असतानाच वारले. मग भारतातली माझी संपत्ती विकून मी इथे आलो. मी आलो तेव्हा माझ्यापाशी फक्त दोनशे डॉलर्स होते.''

''इंडियात कुठे राहायचास तू?''

आझादने काहीच उत्तर दिले नाही.

''बरं, इथे कोणाकोणाला ओळखतोस?''

आझादने पुन्हा एकदा गप्प राहणेच पसंत केले.

''तुला तुझ्या बचावासाठी काही सांगायचे आहे का?''

आझादने खट्याळपणे हसत नकारार्थी मान हलवली.

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित**

**'जालियनवाला बाग' या अमेय जाधव लिखित पुस्तकातून)**


नवं कोरं




'मुद्राराक्षस' महानाट्याचे धागे सांधत महान राजनीतिज्ञ आर्य चाणक्याच्या विलक्षण चाणाक्षतेचा अचूक वेध घेणारी कादंबरी...


चाणाक्ष

लेखक - बाबू गंजेवार

पृष्ठसंख्या : २९६

किंमत : ₹३९५

Book Available




मराठ्यांच्या स्वराज्यरक्षणाच्या लढ्यातील तेजस्वी पर्व असणाऱ्या, शिवपुत्र छत्रपती राजाराम यांची कारकीर्द उलगडून दाखवणारी ऐतिहासिक कादंबरी.

शिवपुत्र राजाराम

लेखक - डॉ. प्रमिला जरग

पृष्ठसंख्या : ४८८

किंमत : ₹५९५

Book Available




संत कान्होपात्राचं भावविश्व चित्रित करणारी भक्तीरसानं ओथंबलेली मंजुश्री गोखले यांची कादंबरी

समर्पण

लेखक - मंजुश्री गोखले

पृष्ठसंख्या : २२०


किंमत : ₹२९५

Book Available

# प्रपात

**मूळ लेखक : अरुण शौरी**

**अनुवाद : अशोक पाथरकर**



## ‘घ्यावा असा अनुभव’

चार दिवसांनंतर, ८ नोव्हेंबर १९६२ ला, पंडितजी संसदेत एक ठराव मांडतात. त्यात भारताने चीनशी मैत्री करण्यासाठी केलेले प्रयत्न; सीमेबाबत जे वाद आहेत तसे वाद वाटाघाटी करून सोडवले जावेत यासाठी केलेले प्रयत्न नमूद केले आहेत. तो ठराव देशाला आणि संसदेला एका पक्क्या शपथेने बांधतो :

> आशा आणि श्रद्धा बाळगून हे सभागृह भारतीय जनतेचा दृढनिश्चय व्यक्त करत आहे की कितीही काळ लागला आणि कितीही तीव्र संघर्ष करावा लागला तरी भारताच्या पवित्र भूमीवर आक्रमण करणाऱ्यांना बाहेर हाकलले जाईल.

हा ठराव मांडतानाचे पंडितजींचे भाषण मिश्र आहे : त्यात दगा दिला गेल्याचा संताप आहे; सीमेचे रक्षण करण्यासाठी जास्त उपाय का केले नाहीत त्याचे स्पष्टीकरण आणि टीकाकारांवर – ज्यांचे भाकीत खरे ठरले होते त्या – त्यांच्या परिचित शैलीत ओढलेले फटकारे यांचे मिश्रण.

‘पाच वर्षे आपण चीनने उत्तरेकडीस सीमेपलीकडून केलेल्या आक्रमणाचे बळी झालो आहोत,’ पंडितजी म्हणतात. सुरुवातीला आक्रमणाचे स्वरूप छुपे होते. आज ‘आपल्या भूमीवर मोठ्या संख्येतील सेनेने प्रचंड आक्रमण केले आहे.’

‘...चमत्कारिक गोष्ट म्हणजे साम्राज्यवाद विरोधकांचे पुरस्कर्ते, म्हणजे पीपल्स गव्हर्नमेंट ऑफ चायना – चीन सरकार – साम्राज्यवादी आक्रमण आणि विस्तारवादाचा अवलंब करत आहे,’ पंडितजी म्हणतात. या ‘प्रचंड आक्रमणा’ने ‘आम्हाला धक्का बसला आहे.’ ‘आमचे स्वातंत्र्य आणि ऐक्याला निर्माण झालेला हा धोका...’ ‘या क्रूर आणि रानटी आक्रमणामुळे आम्हाला धक्का बसला आहे...’ पंडितजी नुकत्याच झालेल्या घटनांची उजळणी करतात... थागला रिज, धोला... १३ सप्टेंबरला त्यांनी एक धमकावणारे उत्तर पाठवले...

‘त्यांची तथाकथित सीमा फारच हलती आहे,’ पंडितजी आता म्हणतात – १९५९ मध्ये चीनचे आणि आपले दावे एकाच मापाने तोलण्याचा निष्पक्षपातीपणा दाखवला होता त्याच्या उलट. ‘त्यांना हवी तिथे ते सीमा दाखवतात आणि या बाबतीतसुद्धा ते परस्परविरोधी विधाने करत आहेत...’ पंडितजी चीनची वाटाघाटी करण्याची क्लृप्ती सांगतात, ‘अनेकदा आमच्या चर्चेदरम्यान आम्हाला सांगण्यात यायचे ते स्पष्ट नसायचे. आता आमच्या लक्षात आले आहे की ते जे शब्द बोलायचे त्यांना दोन अर्थ असायचे. त्यांचा अर्थ कसाही काढावा असे. आम्हाला एक आश्वासन द्यायचे आणि नंतर आम्ही तसे काही आश्वासन दिलेच नाही असे म्हणायचे...’

पंडितजी त्यांची चाऊ एन-लाय यांच्याबरोबर मॅकमहोन रेषेसंबंधी जी दीर्घ बोलणी झाली होती ती आठवतात. ‘आमचे दीर्घ बोलणे झाले आणि ते विसरू नये म्हणून ते झाल्याबरोबर मी ते लिहून काढले,’ पंडितजी सभागृहाला सांगतात, ‘त्यानंतर बऱ्याच काळाने मी माझ्या टिपणाचा सारांश चीन सरकारला पाठवला आणि त्यांनी त्याची सत्यताच नाकारली!’

‘मला फार आश्चर्य वाटले आणि मी दुखावलोही गेलो; कारण माझी खातरी होती,’ पंडितजी म्हणाले, ‘आम्ही बोलत होतो तेव्हा मी एकदाच नाही विचारलं, मी तोच प्रश्न दोनदा, तीनदा विचारला होता आणि त्यांनी निश्चित तेच उत्तर दिले होते...’ चाऊ एन-लाय यांनी मॅकमहोन रेषेबद्दल काय सांगितले होते ते पंडितजी सांगतात – चीनच्या दृष्टीने ते न्याय्य नसले तरी चीन सरकारने ती स्वीकारायचे ठरवले होते, कारण ती निर्णय झालेली बाब होती आणि चीन व भारत यांच्यात आता मैत्रीचे संबंध आहेत म्हणून...

नेफामधील ताज्या घटनांबद्दल चीनचे म्हणणे त्याच प्रकारात मोडते. ‘भारताने हल्ला केला आणि त्यांच्या सीमेवरील रक्षकांनी स्वत:चे केवळ रक्षण केले... मी कबूल करतो की सत्याचे हे पूर्ण विकृतीकरण आणि खोटे आहे. ते खरे आणि खरे आहे ते खोटे भासवण्याचा प्रयत्न बघून मी आश्चर्यचकित झालो आहे; कारण ते म्हणत आहेत त्याहून निराधार काहीही नसेल...’

‘आम्ही चीनच्या भूमीवर आक्रमण करत आहोत असे म्हणणे हे एकप्रकारे दुतोंडी बोलणे आहे जे माझ्यासारख्या सरळ मनाच्या माणसाला समजणे कठीण आहे,’ पंडितजी काहीसे पश्चात्तापाने आणि काही स्वत:च्या समर्थनासाठी म्हणतात.

नवी परिस्थिती फक्त भारतासाठीच नाही तर पूर्ण जगासाठी धोक्याची आहे... ‘एक विस्तारवादी, साम्राज्यवादी मन असलेले राष्ट्र एका नव्या राष्ट्रात आक्रमण करत आहे... उघड आक्रमण...’

गेल्या काही महिन्यांत चीनने सीमेपलीकडे त्याच्या सैन्याची जमवाजमव कशी केली याचे पंडितजी वर्णन करतात : ‘...आता त्यांना हे करणे सोपे होते, कारण तिबेटमध्ये त्यांची मोठी फौज आहे – चीन सैन्य जमवत असल्याच्या पूर्वीच्या अहवालाबद्दल त्यांनी कसा अविश्वास दाखवला होता ते आठवा. ‘किती आहे ते मला माहीत नाही. त्यांच्या ११ डिव्हिजन असायच्या आणि आता तिबेटमध्ये त्यांच्या १३ किंवा १४ डिव्हिजन आहेत असे मला समजते. एकट्या तिबेटमध्येच त्यांचे केवळ प्रचंड सैन्य आहे याची कल्पना करा.’

कर्नाळचे सदस्य स्वामी रामेश्वरानंद मध्येच बोलतात : ‘चिन्यांची मनोवृत्ती कशी आहे याची आता तरी तुम्हाला जाणीव व्हायला हवी.’

पंडितजी : ‘मला वाटतं माननीय सदस्यांना त्याबद्दल एवढे वाढत असेल तर आपण त्यांना सीमेवर पाठवू. कदाचित भाषणांमुळे चीनची खातरी पटेल...’

चीनला भूप्रदेशाचा फायदा कसा होता; त्यांच्या सैन्याला दीर्घकाळ तिथे असल्यामुळे उंचीवरच्या वातावरणाची सवय कशी झाली आहे; ‘गेल्या काही वर्षांत त्यांनी तिबेटभर रस्ते बांधले आहेत; आणि त्या अतिशय कठोर हवामानात रस्ते बांधायचे म्हणजे फक्त जमीन सपाट करायची आणि दगडधोंडे दूर करायचे...’ पंडितजी सांगतात. तसेच चीनने आपल्या सैन्याच्या विरुद्ध किती प्रचंड सेना उभी केली आहे आणि आपल्या एका जवानाच्या मागे त्यांचे ‘सहा, सात, आठ पट सैनिक कसे आहेत याबद्दल पंडितजी बोलतात.

सदस्य त्यांना मध्येच थांबवतात. जुने संसद सदस्य एच. व्ही. कामत मर्मभेदकपणे विचारतात, ‘आम्हाला तुम्हाला थांबवायचे नाही, तुम्ही तुमच्या पद्धतीने उत्तर देणे चालू ठेवा.’

‘मला वाटतं बहुतेक बोलणे अज्ञानातून येत आहे,’ पंडितजी

फटकारतात. ते काही अंशी खरे आहे – उदाहरणार्थ, आपले तिथे जे सैन्य होते त्याच्यावर चिनी सैन्याच्या दोन किंवा तीन डिव्हिजन हल्ला करतील याला आपली तयारी नव्हती...

'मला सांगा की *तुम्ही* काय करत होतात?' स्वामी रामेश्वरानंद मध्येच विचारतात.

अनेक लोक बोलू लागतात. गोंधळ माजतो.

'मला एवढेच जाणून घ्यायचे आहे की ते काय करत होते?' रामेश्वरानंद आग्रह धरतात. 'ते आपल्यावर आक्रमण करत होते तेव्हा हे काय करत होते?'

पंडितजी : 'स्वामीजींना अजून...'

एक सदस्य हिंदीत बोलतात : 'अडचण अशी आहे की स्वामीजींना ही भाषा समजत नाही. तुम्ही त्यांना समजावून सांगा.'

'मी अगदी तेच म्हणत होतो,' पंडितजी पुढे बोलतात –

या वेळेस हिंदीत – 'की स्वामीजींना काहीच समजत नाही.' आपल्या सैन्याकडे पुरेशी शस्त्रास्त्रे नव्हती या टीकेकडे पंडितजी वळतात. अनेक सदस्य मध्ये बोलतात.

'अनेक जण, ज्यांना शस्त्रांविषयी काहीही माहिती नाही ते शस्त्रांविषयी बोलत आहेत,' पंडितजी हताश होऊन बोलतात. गोंधळ चालूच राहतो.

पंडितजी थोडे नमते घेतात : 'मला तपशिलात शिरायचे नाही. मला एवढेच म्हणायचे होते की जी टीका होत आहे ती अंशत: योग्य आहे. पण बहुतेक अयोग्य आहे.' सरकारचे शस्त्रास्त्रे मिळवण्याबाबतचे धोरण ते समजावून सांगतात – ती परेदशांकडून विकत घेण्याऐवजी आपण स्वत: आपल्या देशात ती कशी बनवावीत; शिवाय आपण ती विकत घेतली असती तर 'आपल्याला प्रचंड पैसा खर्च करावा लागेल. आपले सगळे नियोजन वगैरे केरात जाईल... तो काही कोटी रुपयांचा प्रश्न नाही, हजारो कोटी लागले असते आणि आपली अर्थव्यवस्था ढासळली असती...' या क्षेत्रात शास्त्रीय संशोधन सुरू करण्यासाठी काय केले याची ते माहिती देतात... 'ते काहीही असले तरी जर चुका झाल्या असतील, दिरंगाई झाली असेल तर त्याबद्दल मला आताच बोलायचे नाही. अमुक-अमुक अधिकारी किंवा अमुक-अमुक मंत्री दोषी आहे असे म्हणणे चांगले नाही. एकप्रकारे आपण सगळे दोषाला पात्र आहोत.' सदस्यांना हे पटत नाही. त्यांना मध्येच तोडले जाते...[११]

चर्चा नंतरचे काही दिवस चालू राहते. एकशे पासष्ट सदस्य बोलतात.

१४ नोव्हेंबरला पंडितजी उत्तर देतात. तो त्यांच्यासाठी आनंदरहित वाढदिवस असतो. पंडितजी खूप विस्ताराने बोलतात – एकामागून एक स्पष्टीकरणे देतात, पण गेल्या काही आठवड्यांतील धक्कादायक घटनांमुळे ती निरर्थक बनतात.

ते एक लांबलचक ठराव मांडतात, ज्याचे, त्यांच्या मते सभागृह स्वागत करेल आणि तो स्वीकारेल. ते म्हणतात, 'ठरावात चीनने आपल्यावर आक्रमण केल्याबद्दल त्यांचे आभार मानणारा एक छोटा परिच्छेद घालणे योग्य झाले असते; कारण त्यांच्या कृतीमुळे भारताच्या चेहऱ्यावरील पडदा दूर झाला आहे...'

जनतेची प्रतिक्रिया ज्याप्रकारे आली त्याचे ते वर्णन करतात आणि धीरोदात्तपणाचे शक्य तेवढे अवसान आणून ते वाहवत जातात. पंडितजी म्हणतात, 'हा आपण सर्वांनी घ्यावा असाच अनुभव होता आणि आपल्या भावना आणि अनुभवात सहभागी होणे हा मोठा मान राहिला आहे...'

*'घ्यावा असाच?'* ज्या भेदक पराभवातून हा प्रतिसाद निर्माण झाला त्यापासून तो अलग करता येत नाही आणि राष्ट्राच्या सामुदायिक आठवणीत जो कायम राहणार आहे तो हा प्रतिसाद नाही, तर पराभवच.

'आमची कुठे कुठे चूक झाली असेल,' पंडितजी म्हणतात, 'कदाचित या आक्रमणाला तोंड देण्यासाठी आमची तयारी झाली नव्हती. आमची मानसिकता शांततेला महत्त्व देणारी झाली असेल.' आणि तेच मूलभूत कारण होते. आपली सज्जता नसण्यावर केलेल्या काही टीकेबद्दल पंडितजी म्हणतात, 'वेगवेगळे आरोप करून सदस्यांनी अन्याय केला आहे तो कोणा मंत्र्यावर किंवा आणखी कोणावर नाही तर आपल्या सशस्त्र दलांवर...' मूळ मुद्दा हा आहे की 'आपल्या पूर्ण मानसिकतेवर शांततेच्या मार्गाचा प्रभाव आहे. याचा अर्थ आम्ही युद्धाचा किंवा आपल्या देशाचे रक्षण करण्याचा विचार केला नाही असे नाही. ते अर्थातच सतत आमच्या मनात होतेच. पण कशाचा तरी नकळत पगडा असतो आणि मला वाटतं, अगदी अजूनसुद्धा आमच्यावर तोच पगडा आहे.'

क्षणभर हे खरे आहे असे समजू या. यापासून हा धडा घेणे आवश्यक आहे की १९६२च्या पराभवासारखी मनावर आघात करणारी गोष्ट टाळायची असेल तर देशाच्या जनतेने आणि नेत्यांनी असा पगडा झुगारून दिला पाहिजे.

पंडितजी एक शब्द पकडतात. एक सदस्य, फ्रँक अँथनी, त्यांच्या भाषणात म्हणाले आहेत की भारताने स्वत:ला थोडे क्रूर बनवले पाहिजे, नेहरूंनी जरा निर्दय बनायला हवे. 'मला अशी आशा आहे की माझ्यासारखा तुच्छ प्राणी तर सोडूनच द्या, पण आपला देश कधीही निर्दय होणार नाही, कारण निर्दय असण्यानेच कोणी बलवान होतो ही कल्पना विचित्र आहे...' त्यावरून आपली सांस्कृतिक मूल्ये, गांधीजी हे मूर्तिमंत नम्रता आणि शांती होते पण तरीही कणखर कसे होते...

त्यानंतर चीनचे सरकार आणि चीनची जनता यांच्यातील फरकाबद्दल...

अखेरीस पंडितजी एकदाचे सज्जतेकडे वळतात. केवळ शस्त्रास्त्रे आणि सशस्त्र दल असणे म्हणजे सज्ज असणे कसे नव्हे; आताची युद्धे ही सर्वांगीण युद्धे असतात – ती सर्वसमावेशक असतात, त्यांच्यासाठी संपूर्ण राष्ट्राची ऊर्जा आणि मनोबल एकवटणे आवश्यक असते...

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित**
**'आत्मवंचना' या अरुण शौरी लिखित आणि**
**अशोक पाथरकर अनुवादित पुस्तकातून)**

## नवं कोरं




सत्य-असत्याच्या कल्पनांपुढे आव्हान उभी करणारी
ज्येष्ठ लेखक एस.एल.भैरप्पा यांची नवी साहित्यकृती..

### साक्षी

मूळ लेखक - डॉ.एस.एल.भैरप्पा
अनुवाद - उमा वि. कुलकर्णी

पृष्ठसंख्या : ३२४
किंमत : ₹३९५

Book Available

---




समाजमन ढवळून काढणाऱ्या विषयांना
कलात्मकरीत्या हाताळणारी अरुंधती रॉय यांची
असीम आनंदाचा पंथ दाखवणारी कादंबरी


### द मिनिस्ट्री ऑफ अटमोस्ट हॅपिनेस

मूळ लेखक - अरुंधती रॉय
अनुवाद - सुप्रिया वकील

पृष्ठसंख्या : ४००
किंमत : ₹५५०

Book Available

---



कट्टरतावादाच्या विषात होरपळणाऱ्या विद्यार्थ्याच्या कुटुंबावर आधारलेली
अब्दुल्ला खान यांची अस्वस्थ करणारी कादंबरी..


### पटणा ब्लूज

मूळ लेखक - अब्दुल्ला खान
अनुवाद - रोहन टिल्लू

पृष्ठसंख्या : २७२
किंमत : ₹३६०

Book Available

---




मिठाई विकूनही आयुष्यातली कटुता टाळता न येणाऱ्या
जगन हलवायाच्या आयुष्याची आर.के.नारायण
यांच्या रंजक शैलीतील चित्तरकथा

### हलवाई

मूळ लेखक - आर.के.नारायण
अनुवाद - डॉ. श्रीमती मडिमन

पृष्ठसंख्या : १६८
किंमत : ₹२५०

Book Available

# आनंदनिधान फलाट

मूळ लेखक : चेतन जोशी
अनुवाद : मंजिरी धामणकर



घरी जाताना तो कुठेतरी हरवल्यासारखा चालत होता.
नाही, ते स्वप्न नव्हतं. कसं असेल? इतकं स्पष्ट, रंगीबेरंगी, लखलखीत, इतकं खरं. स्टेशनचं नावदेखील त्याला दिसलं होतं – कैवल्यनगरी.

याआधी ते कधीच कसं दिसलं नव्हतं – आणि फक्त काही स्टेशन्स मागे इतका सूर्यप्रकाश कसा असू शकेल? तो भांबावलेल्या अवस्थेतच घरी पोहोचला. बेल वाजवली. त्याच्या पत्नीनं – ईशानं दार उघडलं आणि पाठ फिरवून बेडरूममध्ये निघून गेली.

ते दिवास्वप्न नव्हतं याची प्रभू अजूनही खात्री करून घेत होता – नाही - ते लोक, पार्टी, सूर्यप्रकाश! आणि सगळ्यांना त्याचं नाव कसं काय माहिती होतं – रेल्वे स्टेशनवर पार्टी- वेडेपणा- कैवल्यनगरी- ते स्वप्नंच असणार; पण थोडा वेळ का होईना त्याला खाली उतरून पार्टीत सामील व्हायला नक्कीच आवडलं असतं.

***

रात्रीचे नऊ वाजले तरी प्रभू ऑफिसमध्येच होता. निराशेशी, चिडचिडीशी सामना करत बसला होता; त्याचा कॉम्प्युटर त्याच्याकडे डोळे वटारून बघत होता.
''तुझा प्राण गेला तरी ही डेडलाइन तुला पूर्ण करावीच लागेल.'' त्याचा बॉस घरी जाताना बजावून गेला होता. प्रभूनं रागानं दात-ओठ खात, वरवर हसून होकार दिला होता. घामेजलेल्या हातानं त्यानं खिशातले गेस्ट पास चुरगाळून टाकले – मेहदी हसन ग़ज़ल नाइटचे पास.

संध्याकाळी ५.३० वाजता त्यानं घरी फोन करून कार्यक्रम रद्द केला होता. ईशा भयंकर संतापली होती. त्यानं तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; पण त्याची भांडवलशाहीच्या बुजबुजाटातली फालतू नोकरी, त्याची संसाराबद्दलची कमी झालेली बांधिलकी, बदललेली ध्येयं आणि बिघडत जाणारं त्यांचं वैयक्तिक आयुष्य याबद्दल तिनं टीकेची झोड उठवली.

ईशा म्हणाली ते खरंच होतं. तो काय गमावत होता हे त्याला कळत होतं. कधीतरी प्रामाणिकपणाच्या क्षणी त्यानं स्वतःशी कबुली दिली होती की, काही वर्षांपूर्वी जर या नोकरीत पडला नसता तर एव्हाना तो गायक बनला असता, बऱ्यापैकी स्थान मिळवलेला गायक... आणि – आज तो इथे होता; श्रोत्यांमध्ये बसण्याचं भाग्यदेखील त्याच्या नशिबी नव्हतं.
अखेर मध्यरात्री अवसान गळालेल्या स्थितीत डेडलाइन पूर्ण झाली. जी लढाई मुळात लढायचीच इच्छा नव्हती ती जिंकून घरी जाण्यासाठी त्यानं शेवटची गाडी पकडली. डब्यातल्या तुरळक प्रवाशांमधून वाट काढत तो खिडकीजवळच्या सीटवर कोसळला. त्याच्या अंगात जराही ताकद नव्हती. आपल्याला मनापासून आवडणाऱ्या गोष्टींचा त्याग करणाऱ्या एखाद्या गुन्हेगाराप्रमाणे त्याला वाटत होतं. एका 'डेडलाइन'साठी त्यानं एका 'लाइव्ह' शो चा बळी दिला होता. आता तो मेहदी हसनच्या मैफलीत त्याच्या भावपूर्ण आवाजातल्या उत्तमोत्तम ग़ज़ला ऐकत असता तर काय बहार आली असती. गाडी सुरू झाली तसं तो गुणगुणू लागला. स्टेशन्स मागे पडत होती- एक - दोन - तीन - त्याला स्वतःलाच गायक व्हायला किती आवडलं असतं – *सकाळी रियाज, रात्री मैफल, जाईल तिथे टाळ्यांच्या गजरातून वाट काढत – आकांक्षा- इच्छा, आकांक्षा जर घोडे असते तर भिकारी त्यावर स्वार झाले असते.* त्याचा मूड आणखी काळवंडला, गाडी ज्या बोगद्यात शिरली होती त्याहीपेक्षा जास्त.

''एक ना एक दिवस मी ते करीनच,'' तो मोठ्यानं म्हणाला. त्याच्या आवाजामध्ये निग्रहाची छटा होती. बोगद्याच्या शेवटी दिसणारा उजेड – त्यानं खिडकीतून डोकावून पाहिलं, तेव्हा त्याला दिसला. प्रत्यक्षात तिथे होता. गाडी सुसाट चालली होती त्या प्रकाशाकडे – स्वच्छ, लख्ख प्रकाश! त्यानं आसपासच्या अंधाराकडे पाहिलं, डोळ्यांची उघडझाप केली, स्वतःला चिमटा काढला, केसांची बट ओढून बघितली. सगळं त्याला जाणवत होतं- तो झोपेत नव्हता. बोगद्याच्या शेवटी असलेला प्रकाशाचा झोत वेगानं जवळ येत होता. तो सावरून उठला आणि दारापाशी गेला.
''तुम्हाला उजेड दिसतोय का हो?'' त्यानं विचारलं. दमलेल्या सहप्रवाशाने डोळेसुद्धा न उघडता मान डोलवली.

''तो सूर्यप्रकाशच आहे ना?'' त्यानं पुन्हा विचारलं. दुसऱ्या माणसानं हसून मान डोलवली आणि तो पुन्हा हसला.

गाडीच्या गतीत त्याच्या हृदयाचे ठोके पडू लागले. गाडीचा वेग कमी झाला होता. प्रभू दांडीला धरून बाहेर वाकला. गाडी 'कैवल्यनगरी'च्या पाटीसमोर थांबली. फलाटावर गर्दी होती; पण वातावरण वेगळं होतं. कोणालाही घाई नव्हती. उंची लखनवी कपडे घातलेले लोक इतरांना मदत करत फिरत होते.
रंगीबेरंगी शेरवानी घातलेले पुरुष लोड-तक्क्यांनी सजवलेल्या उंची गालिचावर बसले होते. प्रत्येकासमोर झुरके मारायला हुक्का ठेवला होता. एका बाजूला मुख्य पाहुण्यांसाठी उत्तम बिछायत मांडली होती.

ही कोणती जागा होती? प्रभूला प्रश्न पडला. गर्दीच्या गोंगाटालासुद्धा कवितेची लय होती. सगळेजण उर्दूमिश्रित हिंदी बोलत होते. एखाद्या मैफलीचं वातावरण होतं.
''आइये जनाब,'' एका पांढरी दाढीवाल्याने अदबीने प्रभूचं स्वागत केलं. त्या थेट आमंत्रणानं प्रभू थबकला आणि त्यानं उत्तरादाखल नकारार्थी मान हलवली. तो माणूस सोडून देणार एवढ्यात पानानं रंगलेल्या तोंडाचा एक गृहस्थ ओरडला, ''प्रभू मियाँ, तुम्हाला आलंच पाहिजे. तुम्ही चांगले गायक आहात. उस्ताद मेहदी हसन येईपर्यंत त्यांच्या काही ग़ज़ला गाऊन मैफलीत जान आणा.''

''वल्लाह!'' सगळे त्याच्या दिशेनं हात उंचावून ओरडले.
''पण- पण, मी खरंच नाही –'' प्रभू मागे सरत पुटपुटला.

''इन्शाल्लाह! तुम्हाला आलंच पाहिजे.'' त्या माणसाने आग्रह करत त्याचा मोकळा हात धरला. प्रभूला अंगातून एक लहर चमकून गेल्याचं जाणवलं, विजेसारखी पण सुखद!
''मी उतरू की माझा हात सोडवून घेऊ?'' गाडी एक धक्का देऊन सुरू झाली, तरी तो अजूनही विचारांच्या गुंत्यात फसला होता. त्याचा हात त्या माणसाच्या पकडीतून झटकन सुटला. कित्येक माणसं हात उंचावून त्याला बोलवत होती.

'कृपा करून उतरा जनाब, तुमच्याशिवाय मैफल बेजान होईल.' त्या

माणसानं पुन्हा मनधरणी केली. प्रभू दारात उभा होता आणि गाडी त्याला लालभडक उन्मादाकडून काळोख्या, उदास वास्तवाकडे घेऊन जात होती. त्यानं डोळे मिटून मान हलवली. जेव्हा त्यानं डोकं परत बाहेर काढलं, तेव्हा त्याचे डोळे अंधारानं माखले होते.

तो त्याच्या आसनावर बसला – गोंधळून. तो सगळा आभास कसा असू शकेल? ते लोक – ते त्याच्याशी बोललेदेखील. प्रत्येक गोष्ट कल्पनेची भरारी वाटत होती – रात्र, लोकल – पण माझा हात धरलेल्या हाताचं काय? मी ते आमंत्रण स्वीकारायला हवं होतं का? मी एक-दोन ग़जला म्हटल्या असत्या, कदाचित मी म्हणायला हव्या होत्या.

त्यानं हताश होऊन मान हलवली. त्यानं हातची संधी गमावली होती – अनेक वर्षांपूर्वी गमावली होती तशीच – एक दिवस गायक बनण्याच्या आशेनं त्यानं रियाज केला होता – की तोही आभासच होता?

''नाही, नक्कीच नाही. पुढच्या वेळी मी मुळीच मागे हटणार नाही. कुठेतरी मला निश्चयानं पाऊल रोवायलाच हवं – पुढच्या वेळी मी खाली उतरणार आहे – पुढच्या वेळी–''

दुसऱ्या दिवशी सकाळी प्रभू स्टेशनवर आला तो - ही कैवल्यनगरी खरोखर आहे की त्याचा दृष्टिभ्रम आणि असली तर कुठे आहे- याचा शोध घेण्याच्या निश्चयानंच तो तिकीट खिडकीजवळ येऊन रांगेत उभा राहिला.

''एक कैवल्यनगरी रिटर्न,'' तो म्हणाला आणि प्रतिक्रियेची वाट बघू लागला.

''कुठली लाइन?''

''सेन्ट्रल,''

''सेन्ट्रल लाइनवर अशी कुठलीच जागा नाही.''

''आहे,'' तो ठासून म्हणाला.

''मी इथे बत्तीस वर्षांपासून काम करतोय आणि मला इतर स्टेशन्सबाबत इतर कोणाहीपेक्षा जास्त –''

प्रभू ताडकन तिथून निघून गेला.

''कैवल्यनगरीला कसं जायचं हो?'' त्यानं स्टेशनमास्तरला विचारलं.

''मी तुम्हाला खात्रीनं सांगू शकतो की, असं कुठलंही स्टेशन नाही. हां, कदाचित एखादी कॉलनी किंवा सोसायटी असू शकेल. बाकीचा पत्ता काय आहे?''

प्रभू मान हलवून निघाला.

''अहो, तुम्ही ते पुस्तक विकत का घेत नाही?'' पुस्तक विक्रेत्यानं ओरडून विचारलं.

प्रभू गेली २० मिनिटं 'प्रवासी गाइड - मुंबई' या पुस्तकाची पानं चाळत होता.

''मला पाहिजे ते यात नाही,'' अनुक्रमणिकेत 'क' खाली कल्याण ते कुर्ला या नावांवर पुन्हा एक नजर फिरवून प्रभू उत्तरला.

''तुमच्याकडे मुंबईचा तपशीलवार नकाशा आहे का?'' त्यानं विचारलं.


''आहे–पण –''

''मी विकत घेणार आहे.'' प्रभूनं त्याची काळजी दूर केली.

नंतर एका बाकावर बसून त्यानं नकाशा बारकाईनं अभ्यासला, क पासून सुरू किंवा नगर – नगरी नं शेवट होणारा शब्दन्‌शब्द तपासला.

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित 'कॉकटेल कार्निव्हल' या चेतन जोशी लिखित आणि मंजिरी धामणकर अनुवादित पुस्तकातून)**


नवं कोरं



बंदिस्त रंगमंचाच्या सुरक्षित अवकाशापल्याड रानामाळांत,
उरसा–जत्रांत अभिनयाच्या श्रेष्ठ पताका झळकावणाऱ्या
गावकुसाबाहेरील कलावंतांची श्रेष्ठ परंपरा मायमराठीत होती.
त्या फिरत्या चाकावरच्या रंगफडात फुललेली बेमिसाल प्रेमकहाणी !


लेखक - विश्वास पाटील

पृष्ठसंख्या : ३१२
किंमत : ₹३९५

Book Available

झाडाझडती... नव्हे, झुलल्या चंद्रकेनात

## नवं कोरं




भारतीय सर्जनशील मनावर गोंदण कोरणारी
बिभूतिभूषण बॅनर्जी यांची अभिजात बंगाली कादंबरी


### पथेर पांचाली

मूळ लेखक - बिभूतिभूषण बॅनर्जी
अनुवाद - प्रसाद ठाकूर

पृष्ठसंख्या : ३३६
किंमत : ₹३९५

Book Available

---




व्यक्ती आणि घटनांमधील परस्पर संबंधांची
कारणमीमांसा करत अज्ञाताचा शोध घेणाऱ्या कथा


### अज्ञात

लेखक - डॉ. छाया महाजन

पृष्ठसंख्या : १२८
किंमत : ₹१८०

Book Available

---




कायेची किमया, कायेचा गंध, आयुष्यभर फेर धरणारा कायेचा रंग..
ज्ञानपीठ विजेत्या डॉ. प्रतिभा राय यांचा अंतर्मुख करणारा साहित्याविष्कार..


### काया

मूळ लेखक - डॉ. प्रतिभा राय
अनुवाद - राधा जोगळेकर

पृष्ठसंख्या : २००
किंमत : ₹२९५

Book Available

---




चीनच्या 'थांग' साम्राज्याच्या रंगीबेरंगी जगातील धुरंधर सम्राज्ञी... सुंदर, आकर्षक आणि कावेबाजही... राजलोभासाठी पोटच्या पोरांचा जीव घेणारी... रतिक्रीडांमध्ये पारंगत असणारी आणि चक्क पुरुषांचा जनानखाना उघडणारी... सातव्या शतकातील चीनच्या सोनेरी युगाचं प्रतीक असणाऱ्या 'उ छाव्'च्या आयुष्याचा प्रवाही पट मांडणारी सत्यकथा.

### स्वर्गकन्या

मूळ लेखक - नायजेल कॉथॉर्न
अनुवाद - मीना कर्णिक

पृष्ठसंख्या : ३०४
किंमत : ₹४२०

# तंबूतला सिनेमा

लेखक : सुप्रिया वकील



**प**रवा बऱ्याच दिवसांनी गावाकडं जाण्याचा योग आला. अगदी वेशीपासूनच बदलाचं वारं जाणवू लागलं. जुन्या खुणा पुसून त्या ठिकाणी बरंच काय काय नवं, अनोळखी दिसत होतं. असाच एक मोठा बदल ठळकपणे जाणवला, तो म्हणजे तंबूतल्या सिनेमाचं (म्हणजेच सिनेमाच्या तंबूचं) कुठं अस्तित्वच नव्हतं. त्या ठिकाणी दुकानगाळ्यांच्या चौकोनी रांगा दिसू लागल्या. काही ठिकाणी कॉम्प्लेक्स उभी राहताना दिसत होती. काहीतरी हरवल्यासारखं वाटलं... आणि मन भूतकाळात गेलं. त्या काळी टीव्ही आणि त्यावरचा सहज उपलब्ध चकचकाट नव्हता. गावातली एकमेव करमणूक म्हणजे तंबूतला सिनेमा. सिनेमाच्या या 'गृहा'ला 'टुरिंग टॉकीज' म्हटलं जात असलं तरी ते असायचं एकाच जागी... कायम. तिथं दिवसातून फक्त एकच खेळ असायचा... रात्रीचा, दहा ते एक. (अर्थात, ते चित्रपटाच्या लांबीवर आणि मध्ये रीळ किती वेळा तुटून व्यत्यय आणतंय यावर अवलंबून असायचं!) गावची जत्रा असायची त्या वेळी अंधार पडल्यापासून ते पहाटेपर्यंत... अगदी उजाडेपर्यंत तीन-चार काय होतील तेवढे खेळ दाखवले जात असत. जवळपासच्या खेड्यांतून आणि वाड्या-वस्त्यांवरून बैलगाड्या भरून माणसं सिनेमाला येत असत.

टॉकीजची जागा कनात लावून बंदिस्त केली जायची. वर खुल्या आकाशाचा मांडव असायचा आणि समोर पडद्यावर आगळ्यावेगळ्या विश्वाची सफर घडायची. असा हा तंबूतला सिनेमा आमच्या त्या वेळच्या भावविश्वाशी खास जोडलेला असायचा.

शाळेतून घरी येताना वाटेत सिनेमाचं पोस्टर दिसायचं. त्याच्या रंगरूपावरून व आकारावरून सिनेमा बदलला आहे का ते दुरूनच समजायचं. मग बरेचजण त्या पोस्टरचं रस्त्यात थांबून निवांतपणे अवलोकन, रसग्रहण व विश्लेषण करायचे.

''आयला, जबरदस्त टोलेजंग चित्रपट... ॲक्शनपॅक्ड... तुफान हाणामारीने नटलेले...'' अशी पोस्टरवरच्या मजकुराची पारायणं व्हायची. पोस्टर करणाऱ्याचं भाषिक ज्ञान आणि शाळकरी वयातलं 'ज्ञान' पाजळण्याचा उत्साह यामुळं 'टोलेजंग चित्र', 'ॲक्शनपॅक्ड' वगैरे सिनेमाच्या 'प्रमोशन'साठी वापरलेले शब्द कोणत्याही 'रूपात' कानावर पडायचे शिवाय. 'अमिताभ बच्चन, परवीन बॉबी, प्राण, विनोद खन्ना, सनी देवल, अमरीश पुरी' अशी सगळी नटमंडळी 'बोली' भाषेत पोस्टरवर असायची.

तंबूतल्या सिनेमाला 'ॲडव्हान्स बुकिंग' वगैरे प्रकार नसायचा आणि हाउस फुल्ल होऊन समोर पडद्याला नाक लागायची वेळ आली तरी सहसा 'हाउसफुल्ल'चा बोर्ड लागत नसे. माणसं प्रेमानं आणि दाटीवाटीनं एकमेकांना सामावून घेत, 'फर्स्ट डे फर्स्ट शो'चा आनंद मिळूनमिसळून घेत असत. (मग दुसऱ्या दिवशी वर्गात त्या त्या गमतीजमती आणि 'स्टोरी' ऐकवण्याचा कार्यक्रमही होत असे.) सिनेमाला जायचं म्हटलं की, घरातली मोठी माणसं अभ्यासाची न चुकता का आठवण करून देतात ते मात्र तेव्हा कळायचं नाही. त्याचा रागही यायचा... पण... लक्षात कोण घेतो!) तंबूतल्या सिनेमाला खुर्च्या वगैरे अर्थातच नसत; त्यामुळं भारतीय बैठक सक्तीचीच असे. तिथं बाल्कनी, फर्स्ट क्लास वगैरे आर्थिक तफावतीचे स्तरही नसत. फक्त मागच्या बाजूला कट्टा बांधलेला असे. त्या कट्ट्यावरची जागा बायकांची आणि पुरुष पुढच्या बाजूला अशी विभागणी असे. काही वेळा दोरी बांधून ही विभागणी केली जात असे. सिनेमाला जायचं म्हटलं की, सतरंजी-पांघरूण अशा तयारीनिशी सज्ज होऊन जावं लागत असे. बाकी सिनेमादरम्यान 'खाणं' हा प्रकार फारसा नसायचा.

सिनेमा सुरू होण्याआधी तासभर स्पीकरवरून गाणी वाजवली जायची आणि सिनेमा सुरू होणार असा संकेत देणारी विशिष्ट धून वाजली की, बाहेर रेंगाळणारे लगबगीनं आत येऊन बसायचे आणि आत सैलावून बसलेले 'अटेन्शन' व्हायचे. एकमेकांसाठी जागा 'धरणं' हाही प्रकार असायचा. त्यावरून काही वेळा चकमकीही झडत असत. अखेर सिनेमा सुरू व्हायचा, त्यासोबत टाळ्या-शिट्ट्याही घुमायच्या आणि क्षणार्धात सगळं वातावरण बदलून एक खास 'माहोल' तयार व्हायचा.

ज्यांना कुठल्याही ठिकाणी वेळेवर पोहोचलं तर 'शप्पथ आहे,' असं कुणीतरी वचनात जखडून ठेवलेलं असावं अशी माणसं सिनेमालासुद्धा न चुकता उशिराच पोहोचतात, काहींना अपरिहार्यपणे तर काहींना अनपेक्षित उशीर होतो. अशांपैकी कुणी अंधारात धडपडत, ठेचकाळत सिनेमाला उशिरा यायचं. तोवर तिथं ऐसपैस पसरून स्थिरावलेली कुटुंबं लहान मुलांना शेजारी किंवा आसपास झोपवून, त्यांना नीट पांघरूण वगैरे घालून, आपापल्या हद्दी 'फिक्स' करून सिनेमात रंगलेली असायची. अशा वेळी हा अधूनमधून येणारा व्यत्यय ''आगं बाई, सर की बाजूला...'' किंवा ''आत्ता... तुडीवतीस काय गं पोरास्नी टवळे' अशा सात्त्विक संतापानं झटकला जात असे.

समोर सिनेमानं वेग घेतला की, इकडं काहींचं धावतं समालोचन सुरू होत असे. ''हा ऽऽऽस्सं, हाण त्याला... जाऊ दे झाडून... शाब्बास तेच्या मारी...'' असं अखंड सुरू असे. त्यातसुद्धा पुरुष आणि बायका असं विभाजन असल्यामुळं 'पंच'च्या जागाही वेगवेगळ्या ठिकाणाहून येत. त्या रुपेरी विश्वात माणसं इतकी रंगलेली असत की, ''हाण त्याच्या आयला त्याच्या... हूं ऽऽ... आर तिच्या! ते आडवं आलं बग.'' असे उत्स्फूर्त उद्गार पडद्यावरच्या मारामारीत, नायकाच्या विजयात आणखी 'रंग' भरत असत. ''आगं हिचा मुडदा बशीवला भिताडासंगं... किरडी मोडली याची... आगं ये गतकाळे...'' असा खास अहेर महिला आघाडीकडून पडद्यावरच्या व्हिलन फौजेला लाभत असे. समोर भावनोत्कट प्रसंग सुरू झाले... म्हणजे बिदाई, चितेला अग्नी, विरह असे प्रसंग सुरू झाले की, बायाबापड्या डोळ्यांना पदर लावून मुसमुसत. ''आत्ता काय करायचं बाई'' असे हताश उसासे कानी पडत... सगळं वातावरण गंभीर होत असे.

काहीजणांना त्यातही विनोद सुचत असे. मग करुण पार्श्वसंगीताच्या साथीनं सुरू असलेल्या दुःखद प्रसंगात मधूनच एखाद्या ग्रुपनं फिदीफिदी केलं की, त्या दुःखात 'बुडालेल्या' मंडळींची अस्मिता दुखावली जात असे आणि वयाचा अधिकार वापरून त्या टारगट तरुणाईला गप्प केलं जात असे. काहीजण पुढचा 'सस्पेन्स' आधीच फोडून सगळं नाट्यच फुस्सऽऽ करून टाकत असत; तर काहीजण नायक-नायिकेच्या हळुवार दृश्यात ''ए सोड तिला'' असं फर्मावण्याचा व्रात्यपणाही करत असत. विनोदी पात्रांच्या प्रसंगात (नसलेलं) छप्पर फाड के हशा घुमत असे...

अशा प्रकारे सिनेमा पाहणं हा सार्वजनिक अनुभव असे. महत्त्वाच्या सणांच्या निमित्तानं त्या त्या वर्षातले सुपरहिट सिनेमे चढाओढीनं प्रदर्शित होत. गावातल्या एरवीच्या शांत-निवांत दिनक्रमात रात्री या निमित्तानं गजबज असे. त्यातसुद्धा मराठी सिनेमा म्हटलं की, बायकांची विशेष गर्दी

असायची आणि देवादिकांच्या सिनेमाला तर आणखीनच! आम्ही फक्त 'देवाचे सिनेमे' पाहतो असं अभिमानानं सांगणारे सात्त्विक लोकही असत. अशा सिनेमांना घरातल्या आज्या वगैरे हटकून दिसत.

देवाच्या सिनेमावरून आठवलं. एकदा आमचे एक शेजारी घरी आले होते. त्यांच्या पोटात काहीतरी खास गुपित (!) मावत नाहीये, हे त्यांच्या एकूण आविर्भावावरून कळतच होतं; त्यानुसारच झालं.

''अहो आजी, कळलं का? तात्यांच्या माई आणि नंद्याच्या आजी-दोघीजणी सिनेमाला गेल्या होत्या काल....'' चहा भुरकत त्यांनी बातमी लाँच केली.''

''अगंबाई... मग?''

''मग काय... आल्या की शंख करत...''

''म्हणजे?''आमच्या आजीच्या उत्सुकतेचा कडेलोट व्हायला आला होता.

''अहो, 'सत्यं शिवं सुंदरम्'ला गेल्या होत्या. नावावरून त्यांना वाटलं, देवाचा आहे...'' त्यांच्या मिशीत हसू मावत नव्हतं.

...सांगायचा मुद्दा असा की, असे 'देवाच्या' सिनेमांचे भक्त असत. कौटुंबिक सिनेमांचा 'फीडबॅक' बरेचदा ''घेण्यासारखं आहे नै!'' असा असे. काहींचं त्यावरील तत्त्वचिंतन श्रवणीय असे. बाकी आम जनता सरसकट सगळे सिनेमे मजेत पाहत असे. असं होता होता कितीतरी वर्षं उलटली आहेत. आता घरबसल्या अनेक पर्याय आणि तेसुद्धा चोवीस तास उपलब्ध आहेत; त्यामुळं आता त्या वेळची ती 'क्रेझ' संपलीय. तंबूतला सिनेमा नामशेष होणं अटळच आहे; पण त्याच्याशी कधीकाळी असलेल्या नात्याचे धागे मात्र मनाशी आजही गुंफलेले आहेत.

परवाच मैत्रिणीनं विचारलं, ''इंग्लिश विंग्लिश पाहिलास?''

मी म्हटलं, ''हो.''

पुढं मनात आपोआप शब्द उमटले, ''घेण्यासारखं आहे नै!'' आणि मी एकटीच हसले...

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित**

**'हाऊज दॅट!' या सुप्रिया वकील लिखित पुस्तकातून)**



नवं कोरं



निव्वळ एकजोडी कपडे घेऊन धरतीवरच्या सर्वांत मोठ्या अस्पर्शित वाळवंटात आयुष्याची सात वर्षे घालवणारं एक अद्भुत जोडपं... ज्यानं कालाहारीच्या वाळवंटातलं अनभिज्ञ प्राणीजीवन जगासमोर आणलं, अशा मार्क आणि डेलिया ओवेन्सचे चित्तथरारक अनुभवकथन.

साद घालते कालाहारी

मूळ लेखक - मार्क आणि डेलिया ओवेन्स
अनुवाद - मंदार गोडबोले
पृष्ठसंख्या : ४३२
किंमत : ₹५३०
Book Available



धरणांनी गिळलेली अरण्यं... खाणींनी गिळलेले डोंगर... औद्योगिक प्रकल्पांनी गिळलेले जलस्रोत... माणसानं स्वत:च्या जीवन स्रोतांविरोधातच पुकारलेल्या युद्धांचं अस्वस्थ करणारं चित्रण... पर्यावरण कार्यकर्त्या बहार दत्त यांनी मांडलेली वास्तवदर्शी हकिगत.

हरित युद्धे

मूळ लेखक - बहार दत्त
अनुवाद - रवींद्र भगवते
पृष्ठसंख्या : १७२
किंमत : ₹२५०
Book Available



संपूर्ण सचित्र

चिमुरड्या वयात आभाळाएवढं कर्तृत्व करणारी.. हवामान बदलविरोधी लढ्याचा जागतिक एल्गार बनलेली, ग्रेटा थुनबर्ग.. गोष्ट तिच्या हिमतीची.. गोष्ट तिच्या लढ्याची..

ग्रेटाची गोष्ट

लेखक - जोसेफ तुस्कानो
पृष्ठसंख्या : ६४
किंमत : ₹१२५
Book Available

## नवं कोरं




प्रभावशाली आणि कर्तृत्ववान असूनही अतिप्रगत मानल्या जाणाऱ्या अमेरिकेत केवळ बाई असल्याने अध्यक्षपद नाकारले गेलेल्या हिलरी क्लिंटन यांचा अतुल कहाते यांनी घेतलेला आयुष्यवेध


लेखक - अतुल कहाते

# हिलरी क्लिंटन

पृष्ठसंख्या : १८०
किंमत : ₹२७०

Book Available

---




अनेक अंधकारमय आयुष्यांना प्रकाशकिरण देणारे... राष्ट्रीय नेत्रदान चळवळीचे प्रणेते... तीन पिढ्यांमध्ये नेत्रहीनांच्या सेवेचं व्रत रुजवणारे पद्मश्री डॉ. अरविंद व्ही. यांचा प्रेरणादायी जीवनपट


मूळ लेखक - पवित्रा मेहता ।
सुचित्रा शेणॉय
अनुवाद - ऋजुता खरे

# दृष्टिदाता

पृष्ठसंख्या : ३१२
किंमत : ₹३९५

Book Available

---




कधी कुंचल्यात.. कधी शब्दात.. तर कधी मद्याच्या प्याल्यात स्वतःला हरवून टाकणारा.. अभिमानानं लष्कराचा गणवेष मिरवणारा.. दुसऱ्या महायुद्धाच्या महासंकटात बेरक्या राजकारणानं विजयश्री खेचून आणणारा धुरंधर... विन्स्टन चर्चिल यांच्या वादळी व्यक्तिमत्त्वाचा मार्मिक लेखाजोखा..


मूळ लेखक - रिचर्ड होम्स
अनुवाद - अवधूत डोंगरे

# चर्चिलच्या पाऊलखुणा

पृष्ठसंख्या : ४६४
किंमत : ₹५९५

Book Available

---




नमकीन पदार्थांच्या अस्सल चवीची खवय्यांना ओळख करून देणाऱ्या आणि एका छोट्या शहरातून जगव्यापी भुजिया साम्राज्य उभं करणाऱ्या हल्दिरामांची रंगतदार चरितगाथा

मूळ लेखक - पवित्रा कुमार
अनुवाद - नीला चांदोरकर


# हल्दिराम

पृष्ठसंख्या : २३६
किंमत : ₹३५०

Book Available

# नो नॉट नेव्हर

लेखक : बाबाराव मुसळे



पंधरा ऑगस्ट २०१२, रोज बुधवार. काल वर्गावर्गांत नोटीस फिरली. नोटीसबोर्डवरही लावली गेली. सकाळी सात वाजता प्रत्येक विद्यार्थ्यानं झेंडावंदनासाठी कॉलेजमध्ये हजर असणं आवश्यक. हजर न राहणाऱ्यास पन्नास रुपये दंड- पन्नास रुपये दंड ही फार मोठी बाब नाही; पण त्यामुळे इंटर्नल्सचे जे मार्क्स असतात त्यावर परिणाम होतो. एरव्ही आर्ट्स कॉलेजमध्ये अशा छप्पन्न नोटिसा काढल्या तरी मुलं येत नाहीत. इथं मात्र तसं जमत नाही. कालपासून राणीला थोडी कसर आली होती. तिचं अंग गरम झाल्यासारखं वाटत होतं. संजनानं तिला रात्री तिच्या ओळखीच्या पण स्वस्त डॉक्टरकडे नेऊन दाखविलं. तरी फी-औषधी यांचे तीनशे रुपये लागले. तेवढे पैसे गेले या रुखरुखीनंच राणीची कणकण पळाली... ''राणी, स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमाला कॉलेजात गैरहजर राहणं इतकं सोपं नाही. तुम्ही आजारी होता, असं कारण सांगितलं तर कॉलेज डॉक्टरांचं– तेही अशातशा नाही, सिव्हिल सर्जनचं सर्टिफिकेट मागते. ते देणं इतकं का सोपं आहे? त्यामुळे जो कोणी खरेच दवाखान्यात ॲडमिट असेल तोच गैरहजर राहण्याची रिस्क घेतो. तुझ्यासारखे खोकला-पडशावाले झिंग पळतात...'' संजनानं राणीला समजावून सांगितलं होतं. त्यातही राणी आता आयडॉल झाली. त्यामुळं तिनं प्रत्येक बाबतीत अलर्ट असणं अपरिहार्यच होतं. कुचराई, दिरंगाई, गैरहजर राहणं या गोष्टींचा स्वप्नातही तिनं विचार करू नये.

ते एक बरं की कॉलेज स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन अशा राष्ट्रीय सणांसाठी विशिष्ट ड्रेसकोडचा आग्रह करीत नाही. काही कॉलेजात एरव्ही ड्रेसकोड नसला तरी या दोन दिवशी व्हाइट ड्रेसकोड अवश्य केला जातो. त्यात स्टाफ आणि विद्यार्थी दोन्हीही आले. या कॉलेजात तेवढी एक बऱ्यापैकी सुविधा आहे. मात्र नेहमी गळ्यात आयकार्ड अडकवणं हे सक्तीचं आहे. एखाद्यानं जर तसं आयकार्ड अडकविलं नाही तर एच.ओ.डी.च त्याला शंभर रुपये दंड करतात. पुन्हा दंड झाला तर इंटर्नल्सवर परिणाम. म्हणजे कॉलेजात वावरताना सारं लक्ष ठेवावं लागतं ते इंटर्नल्सवर. कारण त्यात कमी मार्क्स पडले तर रिझल्ट मायनसमध्ये जातो. राणीला कमाल वाटली त्या दिवशीच्या भट्टीची. एकतर तिनं एक प्रेमावरचा एस.एम.एस. पेश केला. दुसरी गोष्ट– दिलजले, दिलवाले यावर भाष्यं केलं. अन् तिसरी सर्वांत खटकलेली गोष्ट म्हणजे तिनं हे करताना आपली जर्सी बाजूला सारून आपली ब्रेस्ट दाखवली... हे सारं करायला वाघिणीचीच छाती पाहिजे. भट्टीला अशा प्रसंगाच्या दुष्परिणामांची कल्पना नसेल? इंटर्नल्सबाबत तिला माहिती नसेल? कसं शक्य आहे हे? इथं शिकायला आलेल्या प्रत्येकाला अभ्यासक्रमासंबंधीचे, कॉलेजसंबंधीचे रूल्स ॲन्ड रेग्युलेशन्स समजून घेणं अत्यंत आवश्यक असतात.

ज्या बाबासाहेबांची, प्राचार्यांची प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात भीती निर्माण केली जाते, ते बाबासाहेब, प्राचार्य भट्टीला काहीच कशी सजा देत नाहीत? खरंतर तिला सजा झाली– दंडरूपात असो वा इतर– तीही जाहीरपणे झाली तर त्याचा परिणाम इतर विद्यार्थ्यांवरही होईल. एक भट्टी एवढे करूनही जेव्हा सुटते तेव्हा आपोआपच इतर विद्यार्थ्यांचीही हिंमत वाढते. आणि कॉलेजचे कडक असणारे नियम पायदळी तुडविले जातात. जर आपल्यावर तसा काही प्रसंग आलाच तर? आपली नाही हिंमत होणार नियम मोडण्याची. याचं कारण आपल्यापाठीमागे खंबीर असं कोणी नाही. आपलं सारंच भिकेवर श्राद्ध केल्यासारखं. आपण आगाऊ भानगडी करायच्या अन् त्या गावाकडे मंकीच्या पप्पांना कळल्या तर ते आपल्याला पैसा कसा पुरवतील? मंकी असो, भट्टी असो किंवा तो त्या दिवशी भट्टीसोबत वर्गात येऊन आगाऊपणा करणारा– ही काहीना काही बॅकग्राउंड असणाऱ्यांचीच मुलं असतात. मंकीचं आपल्याला माहीत आहे. तिच्या पप्पांनी आपल्याला आणि भांगे सरांना स्पष्टच म्हटलं होतं, मंकी पास झाली काय, अन् नापास झाली काय?... अन् याची पुरेपूर जाणीव मंकीलाही आहे. त्यामुळे कॉलेज रेग्युलर सुरू होऊन एवढे दिवस होताहेत तरी ती अजूनतरी सिरिअस नाही. प्रॅक्टिकल्सच्या वेळी ती कोणाचं ना कोणाचं तरी बोलणं खातेच. त्यात आणखी ती टी.जी. स्कीम. मंकीच्या टी.जी. कोण तर दाणी मॅडम. त्या मंकीला टंगळमंगळ करू देतील याची शक्यता फारच कमी आहे. 'तुमची मुलं कोणासोबत राहतात ते मला सांगा, म्हणजे मी त्यांचं भविष्य सांगतो,' असं कुणाचं तरी वचन आहे. मंकीचं भविष्यही त्या वचनाप्रमाणे स्पष्ट आहे, तिचं राहणं भट्टीसोबत म्हटल्यावर. भट्टी किती धीट! वर्गात घडलेल्या प्रकारात ती किंचितही भ्याली नाही अन् प्रिन्सिपॉल्स ॲड्रेसच्या वेळी तिळभरही लाजली नाही... लाज... असं म्हणतात, लाजणे हा स्त्रीचा दागिना आहे. आजी सांगायची, तिची एक नणंद, म्हणजे आजोबांची मोठी बहीण. तिचं लग्न झालं, तिला चार पोरं अन् सहा पोरी झाल्या. पोराबाळांचं लेंढार, लहान-मोठ्या तीस माणसांचा खटला, घरकाम, शेतातलं काम हे करता करता जख्ख म्हातारी होऊन एक दिवस मेली; पण ती कधी नवऱ्याला बोलताना घरातल्या वा बाहेरच्या कोणालाच दिसली नाही. याउलट आपली सख्खी चुलती, लग्नातच चुलत्यासंगं गुलुगुलु बोलायला लागली म्हणे, बोलताना हिडग्यासारखं हसायचीही. आजी म्हणायची, 'इनाकारण हसणारी बाई, समद्या कुळाचा नास करते.' आणि झालंही तसंच, एकदा-दोनदा नांदून गेली... दिवाळीच्या वेळेस निरोप आला, ती गावात बांगड्या भरायला येणाऱ्या कासारासोबत पळून गेली. ही गोष्ट चुलत्याला सहन झाली नाही; त्यानं बातमी कळली त्याच दिवशी वावरात जाऊन आंब्याला फाशी घेतली. लाज हा स्त्रीचा दागिना, हे खरे; पण हे दोन्ही उदाहरणं विरोधाभासाचेच. इतकीही लाज नको की नवऱ्याशी शब्दही बोलायचा नाही आणि एवढाही निलाजरेपणा नको की संसाराची माती होईल.

भट्टी, मंकीसारख्यांच्या बाबतीत दोष त्यांच्या मायबापाचाही आहेच की. संस्कार नावाची काही गोष्ट आहे की नाही? जे माय-बापाकडून आपोआप येतात, पण माय-बापच दोषी असतील तर? कोण्या संतांचं म्हणणं असं– स्वाध्याय पाठाचे वेळी भगवानदादा नेहमी ते वचन उच्चारतात - बीज पेरूनिया तेचि घ्यावे फळ । डोरलीस केळ कैची लागे। प्रश्न आहे मंकीचा. त्यांचे स्वभाव असे का झाले? दोष त्यांचा नाही; तर तो त्यांच्या मायबापांचा; पण आपण एकदा मंकीची आई तिच्या बहिणीच्या लग्नात पाहिली होती– किती सोज्वळ वाटली. ती मंकीसारखी असेल असं वाटत नाही. मग मंकी अशी कशी निपजली? त्या भट्टीच्या मायबापाचं आपल्याला काहीच माहीत नाही. गेल्या वर्षी मराठीच्या वर्गात आपणच मॅडमना विचारलं होतं, मुलगा-मुलगी वाईट प्रवृत्तीची निघाली तर त्याचा जास्तीत जास्त दोष आईलाच का दिला जातो? बापाला कमी

का? त्यावर मॅडम बरंच काही बोलल्या होत्या. त्यांनी एक संस्कृत वचनही म्हटलं होतं. काय ते? कुपुत्र...कु ..हं... बरोबर, कुपुत्रो जायते क्वचिदपि। कुमातः न भवति॥... मुलं वाईट वृत्तीची असली तरी आई तशी नसते... त्यांच्या मते, मुलं कळायला लागली की समाजाकडूनही संस्कार स्वीकारतात. ते चांगले-वाईट दोन्ही प्रकारचे असतात... त्यातले कोणते जवळ ठेवायचे, कोणते दूर करायचे हे ज्याचं त्याला कळलं पाहिजे. मॅडम अशा म्हणाल्या होत्या तरीही... तरीही आई-बापांनी 'आपलं लेकरू मोठं झालं तरी वाऱ्यावर सोडू नये. आपली मुलं सुलक्षणी निघावी हे जर त्यांचं ध्येय असेल तर....'

"अगं राणी, चलतेस ना?" बाहेरून संजनाचा आवाज आला. राणीनं झोपेतून उठल्यावर मुद्दाम दरवाजा उघडून लोटून घेतला होता. झेंडावंदनाला जायचं म्हणून ती साडेचार वाजताच उठली. सात वाजता कॉलेजात हजर व्हायचं होतं. एरव्ही कॉलेज साडेआठ वाजता असते. आज एवढ्या सकाळी सिटीबस नसेल. कॉलेजपर्यंत-म्हणजे दीडेक किलोमीटर अंतर पायी जावं लागेल. नाही म्हटलं तरी पंचवीस-तीस मिनिटं लागतील. त्यातही सव्वासहा वाजताच फ्लॅटवरून निघायचं असं संजनानं रात्रीच फर्मावलं होतं. राणीला तिनं "चिंता करू नको; तुला काही होणार नाहीय. डॉक्टरांच्या गोळ्यांनी रात्रीतून फरक पडेल. सकाळपर्यंत ठीक होशील. बिंधास्त चल," असं म्हटलं होतं. त्यानुसार राणी लवकरच उठली. आज अंघोळ तेवढी केली नाही. तोंड धुऊन वेळ होता म्हणून अंगावर पांघरूण घेऊन पडून राहिली; तर मंकी-भट्टीबद्दल विचार करत बसली... मनात नुसतेच प्रश्न – असं का? तसं का? इंग्रजीचं एक आपलं आवडीचं सुभाषित आहे - A man is known by the company he keeps. मंकीचं, भट्टीचं भवितव्य त्यांचे त्यांना लखलाभ... आपलं आपल्याला.

"हो... चला." राणीनं अंथरुणातून उठत आवाज दिला. अन् ती पांघरुणाची घडी करून ठेवत निघालीही... मंकी अजूनही झोपेतच होती. नेहमीप्रमाणे राणीनं जरा मोठ्यानंच दार ओढून घेतलं. तेव्हा संजना म्हणालीही, "अगं एवढ्या मोठ्यानं जोरानं दार का ओढतेयस?" त्यावर राणीनं "मंकीला कळावं आपण चाललो म्हणून" असं स्पष्टीकरण केल्यावर "चल तिला तिची चाड नाही, अन् तू कशाला तिची चिंता करतेयस?" या वेळी आम्रपाली बोलली.

सगळ्या जणी लिफ्टनं खाली आल्या. थंडगार हवेचा झोत अंगावर आला... "अगं, भुरुभुरु पाऊस सुरू आहे वाटतं? आता कसं जावं आपण? रेनकोट आणावा का फ्लॅटमधून? रेवतीनं विचार मांडला. हं, तसं केलं तर बरं होईल. एकतर थंडी वाजणार नाही. दुसरं अंगही ओलं होणार नाही. चला परत..." संजनाच्या सूचनेबरहुकूम सर्व जणी लिफ्टनं परत वर गेल्या. पाच मिनिटांत परत आल्या. तर राणी जागीच कुडकुडत उभी...

"अगं राणी, तू का उभी? रेनकोट आणला नाहीस?" योगितानं विचारलं.

राणी गप्पच राहिली. "काय झालं राणी, तुझा रेनकोट?" आम्रपालीनंही तोच प्रश्न पुन्हा केला... संजनाच्या लक्षात आलं. ती पट्‌कन पुढे होत आपल्या हातचा तिचा स्वतःचा रेनकोट उकलून आपल्या हातानं राणीच्या अंगावर चढवत म्हणाली, "हा मी आणला तिचा रेनकोट. घे राणी..." राणीनं "ताई" म्हणत नकारार्थी मान हलवली. "वेडी आहेस का तू? ताई म्हणतेस अन्... गप्प रहा..." संजनानं तिच्या अंगावर रेनकोट चढवला. अन् एकाएकी राणीचे डोळे भरून आले. "डोन्ट बी मिसच्यूव्हस!" संजनानं दटावलं. अन् तिनं भावनांना आवर घातला.

गावाकडे तिला कधीच रेनकोट नसे. तशा अनेक मुलामुलींना नसत. त्यात सगळेच काही गरिबाघरचे नव्हते, पैसेवाल्यांचेही होते; पण रेनकोट असलाच पाहिजे किंवा छत्री असलीच पाहिजे असं काही नव्हतं. हं, एक मात्र खरं, प्रत्येक मुलामुलीजवळ मोठी कॅरीबॅग असायचीच. पावसाळा असला की पुस्तकं कॅरीबॅगमध्ये हमखास ठेवलेली असायची. पुस्तकं सुरक्षित असायची. मग अंग, कपडे भिजले तरी चालतील. बऱ्याचदा ओल्या कपड्यांनी वर्गात जाऊन बसावं लागे. निळी बस या दोन वर्षांत सुरू झाली. आधी लाल बसची सोय होती. मात्र गावाशेजारी मोठ्या नाल्यावरचा पूल तुटल्याने कधीमधी म्हणजे ऐन पावसात गाडी गावात येत नसे. त्यासाठी फाट्यावर दीड किलोमीटर यावं लागे. या काळात पाऊस असला की हमखास भिजावं लागे. तसंच शाळेतून परत येतानाही.

शिवाय गावाकडे असल्यावर पावसात कुठे जायचं असलं की पोत्याचा घोंगता अंगावर घेतला की निघाले. मग गोदरीत परसाकडेला जायचे असो, पाण्याची खेप आणायला जायचं असो की धुणं धुवायला जायचं असो. अंगावर रेनकोट घालून गोदरीत गेल्यावर कसं बसावं? शिवाय रेनकोटने काखेत भरलेली घागर नीट धरता येईल का? ती खाली खाली सरकेल अन् धुणं तरी कसं धुवावं? रेनकोट हे चोचले शहरी... पोत्याचा घोंगता हा खेड्यातला व्यवहार्य तोडगा. भलेही त्यातून पुढचं पुढचं अंग भिजेल... पण आता आपण शहरात आलो. त्यातल्या त्यात आता पुण्यात आलो. इथे पोत्याचा घोंगता चालणार नाही. इथे हवा रेनकोटच. आपण घेऊ... तसा अर्धा अधिक पावसाळा संपलाही, आणि आपण गावाकडून आलो तेव्हापासून पुण्यात पाऊस पडला; त्या वेळी नेमके आपण कॉलेजात किंवा फ्लॅटवर... एकदा थोडं भिजलो होतो, तेवढंच. कालच बाबांना फोन लावला होता. गावाकडे तीन दिवसांपासून पावसाची झड सुरू आहे म्हणे... एरव्ही गावाकडे पाऊस जास्तच असतो... आजी सांगायची, आपलं गाव माहूरगडाच्या पट्ट्यात... या पट्ट्यात कधी कोरडा दुष्काळ पडत नाही... नेहमीच पाऊस पडत असतो.


"अन् ताई तुम्ही?..." राणीनं विचारलं. त्यावर आम्रपालीनं उत्तर दिलं, "अगं, हा माझा आहे ना, आमच्या दोघींसाठी... चल तू, हो पुढे..." त्या दोघींनी आम्रपालीचा रेनकोट हातानं दोघींच्या डोक्यावर धरला... अन् त्यांची ही वरात निघाली...

कॉलेज जवळ आल्यावर मागून बाइकवर येणाऱ्या एकानं मोठ्यानं हॉर्न वाजवला; अन् तेवढ्यानं राणी दचकली. मुलं मुद्दाम असं करतात. कधी समोरून वेगानं बाइक आणतात, अन् गचकन ब्रेक दाबून उभी करतात. आपण मात्र जाम घाबरतो. ते दात काढतात. मागून आले तर असे जवळून बाइक नेतील अन् एकदम हॉर्न वाजवतील... एकदा तर एकाने आम्रपालीच्या अंगावर रोडवरच्या डबक्यातलं पाणी उडवलं होतं... केवढी जाम रागावली होती आम्रपाली? तो तेव्हा तिच्या हाती लागता तर, नक्कीच तिने हाणला असता. या मुलींचं पाहून आपणही बरेच धीट झालो. पुन्हा तोच मुद्दा – आपण तेवढे दिसायला... खरंच

आपल्या फ्लॅटवरच्या ग्रूपमध्ये सगळ्यात सुंदर, सुंदर म्हणता येणार नाही पण त्यातल्या त्यात देखणी, निमगोऱ्या रंगाची रेवती आहे... बाकीच्या तिची मजाक घेतात. गावाकडचा कोणी तिचा बी.एफ. आहे म्हणे. तो सध्या औरंगाबादला बी.ई. फायनलला आहे. तो हिचा नात्याने चुलतबहिणीचा दीर. त्याची अन् हिची भेट चुलतबहिणीच्या लग्नातली. तेव्हा ही बारावीला होती... तर त्याने तिच्याशी ओळख काढून तिला चक्क 'लग्न करीन तर तुझ्याशीच' असं म्हटलं होतं. त्यानं तिच्या चुलतबहिणीजवळही हिचा विषय काढला होता. मग चुलतबहिणीनं हिच्या आईला म्हटलं, तर हिची आई म्हणाली, ''काउन गं, तुह्याघरचा नवरदेव लपवतीस की काय? चुलत देर दाखवतीस?'' तेही खरं होतं. तिचा सख्खा दीरही बी.एस्सी. बी.एड. होऊन नुकताच गावातल्या हायस्कूलात लागला होता. त्याच्यावर रेवतीच्या मायबापाची नजर होती. असं तिनं त्याला– त्याचं नाव म्हणे निळकंठ – निळकंठला मजाकमध्ये म्हटलं. तर तो काय म्हणाला माहीत आहे? तो म्हणाला, ''तेही चालेल. मला फक्त तू हवीस... कसंही करून.'' तिनं त्यावर विचारलं, ''तसं कसं? मी त्याची बायको असेन, तुमची थोडीच असणार?'' त्याचं यावर बोलणं फार विक्षिप्तपणाचं होतं. ''तू त्याची असली तरी मी तुला मिळवीनच...'' तिला त्याचा धाक वाटला होता... ''असे कसे बोलता तुम्ही? तुमचं करिअर... कुठल्या तरी पुण्या-मुंबईच्या कदाचित परदेशातल्या कंपनीत तुम्ही नोकरी कराल...'' त्यावर तो ताड्कन म्हणाला, ''मी ते सगळं सोडून तुझ्यापाशी गावातच ठाण मांडून राहीन; पण तुला सोडणार नाही...'' मजाक मजाकमध्ये तिनं फ्लॅटवरच्या मुलींना सांगितलं. तेव्हापासून त्या तिची खेचतात. तसा वर्गातलाही कोणी एक मुलगा तिच्याशी लगट करतो म्हणे... म्हणजे सुंदर असणंही... म्हणजे देखणं असणंही शापच आहे. त्यामुळे योगिता म्हणत असते रेवतीला, ''रेवती, बघ आम्ही. आम्हाला धनी टाकेना चोर नेईना...'' यावर सगळ्या जणी हसायच्या. योगिता म्हणते ते खरं आहे. आपल्यासारख्या मुलींकडे मुलं फारसं लक्ष देत नाहीत...


**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित**

**'नो नॉट नेव्हर' या बाबाराव मुसळे लिखित पुस्तकातून)**



# रांगोळी

**लेखक : प्रतिमा कुलकर्णी**



सकाळी कितीही लवकर घराचे दार उघडून बाहेर पाहिलं की समोरच्या अंगणातली सुंदर रांगोळी लक्ष वेधून घेते. मन प्रसन्न होतं, नव्या दिवसाच्या स्वागतासाठी! आणि पुढच्याच क्षणी वाटतं, समोरच्या काकूंची सडारांगोळीसुद्धा झाली? कमाल आहे! या वयातही इतका उत्साह कुठून आणत असतील त्या? नित्यनेमानं तुळशीपुढे साधं स्वस्तिक रेखतानाही माझी त्रेधातिरपीट उडते आणि काकूंच्या दारात मात्र रोज नवी नक्षी असते. लक्ष वेधून घेण्याइतकी मोठी आणि सुबक! कधी त्यात रंग भरलेले, तर कधी पाना-फुलांची सजावट केलेली. दररोज त्या त्या वाराच्या देवतेचं नाव रांगोळीच्या वरच्या बाजूला न चुकता लिहिलेलं! बरं, इतकं मन लावून सजवलेली ही रांगोळी दुसऱ्या दिवशी काही पाहायला मिळायची नाही. दुसऱ्या दिवशी वेगळ्याच प्रकारची रांगोळी. कधी ठिपक्यांची तर कधी पाना-फुलांची... सणावारी तर मोठ्या चौकोनात ससा, हरिण, हत्ती किंवा पोपट, मोर यांची अलंकारिक नक्षी काढली जायची. दिवाळीच्या चारही दिवशी मोठ्या कल्पकतेनं त्या वेगवेगळ्या रांगोळ्या काढत असत.

मला आठवलं, एखाद्या सणाच्या दिवशी मी काढलेल्या रंगीत रांगोळीचं कौतुक करून जर कुणी म्हणालं, ''आता पुसू नकोस हं इतकी छान रांगोळी,'' तर लगेच पडत्या फळाची आज्ञा घेऊन मी पुढचे दोन दिवस ती रांगोळी तशीच राहू द्यायचे. असला आळशीपणा काकूंच्या वागण्यातच नव्हता. रोजचं कामही नियमितपणे, एका लयीत आणि सुबकतेनं व्हायचं. पहाटेच उठून भलंमोठं अंगण झाडून त्यावर सडा घालणं, आठवड्यातून एकदा शेणाचा सडा देणं, यात गेली कित्येक वर्षं कधीच खंड पडलेला नाही.

सकाळी माझी जेव्हा मुलांना शाळेत पाठवण्याची धांदल सुरू असते, त्यांच्याबरोबर आत-बाहेर करणं सुरू असतं, त्या वेळेपर्यंत काकूंचं सडा-रांगोळी करून झालेलं असतं. झाडांना पाणी देण्याचं काम सुरू असतं. तेवढं झाल्यावर देवांसाठी फुलं काढण्याचं काम सुरू होतं. काकूंच्या घराभोवती नाना रंगांची फुलझाडं होती. त्यांची फुलं सुबकपणे हारात गुंफायचं कामही काकू नित्यनियमानं करायच्या. देवांच्या फोटोंवर ते हार रुळताना पाहून खूप प्रसन्नता वाटे. कधीही गेलं तरी काकूंचं घर नेहमी व्यवस्थित आणि चित्रासारखं सुंदर दिसे. दिवाणखान्यातल्या जुन्या खानदानी फर्निचरला काकूंच्या हातच्या कशिदाकारीनं सजलेल्या आभ्रांनी वेगळाच रुबाब प्राप्त झालेला असतो. ताज्या फुलांच्या मोहक रचनेनं घरातच एक तजेला भरून राहिलेला असतो. स्वतः काकूही दिवसाच्या कोणत्याही प्रहरी हसतमुख असतात.

काकूंच्या या साऱ्याच गोष्टी मला मनापासून भावतात आणि मी त्याविषयी घरात बोलायला लागले की सर्व जण माझी थट्टा करतात. मुलं तर मला त्यांची 'फॅन' म्हणून चिडवतात. पण खरंच काकूंचं व्यक्तिमत्त्वच आहे तसं! कितीतरी गोष्टी त्यातून शिकण्यासारख्या आहेत. एकदा मी माझ्या शेजारणीला म्हटलं, तसं त्यावर ती नाक मुरडून म्हणाली, ''अगं कामच काय असतं त्यांना? एकटा जीव सदाशिव! ना कुणी पसारा घालणारं, ना कुणी 'जेवायला वाढ' म्हणणारं! सारा वेळ स्वतःला आणि घराला सजवण्यातच घालवायचा!'' आणि ती निघून गेली.

क्षणभर मला कळलंच नाही, हिला काय झालं एवढं चिडायला? मग वाटलं, तिचं बोलणं अगदीच काही चूक नाही. कारण काकूंच्या घरात दुसरं कुणीच नव्हतं. दोन वर्षांपूर्वी काका गेले आणि त्या एकाकी झाल्या. पण म्हणूनच त्यांचं हे नियमित वागणं अधिक कौतुकास्पद नाही का? कुणासाठी इतकं टापटिपीनं राहायचं? घर नीटनेटकं सजवायचं? आता या वयात कोण त्यांना जाब विचारणार आहे? एखादीनं कंटाळाच केला असता; पण काकू आजही पूर्वीप्रमाणेच सर्व व्यवस्थित करतात. त्यांच्या वयाच्या बायका गुडघे दुखतात, कंबर धरली आहे अशा नाना तक्रारी करतात; पण काकू आजही नळावरून बादली भरून आणून सडा घालतात. अंगण झाडून काढतात, खाली बसून रांगोळी काढतात. अगदी नेमानं...न कंटाळता! शेजारणीच्या कुजकट बोलण्यानं उलट माझ्या मनातला काकूंबद्दलचा आदर दुणावला.

एके दिवशी काहीतरी निरोप सांगायला काकूंकडे गेले. काकूंनी दार उघडलं आणि मला बसायला सांगितलं. स्वयंपाकघरातून खमंग वास दरवळत येऊन माझ्यापाशी पोचले. मी काकूंना म्हटलं, ''गडबडीत आहात का? पाहुणे येणार आहेत वाटतं कुणी?''

''नाही गं, तू निवांतपणे बस... सवड आहे ना तुला? आणि हे बघ, आता जेवूनच जायचं बरं का?''

''अहो, नको काकू!''

''अगं थांब गं! हे बघ घरी जाऊन तू एकटीच जेवणार ना? मीही इथे एकटीच आहे... दोघी एकत्र जेवू या! आज मी मस्त शिरा-पुरीचा बेत केलाय मुद्दाम... तेव्हा आज माझं ऐकायचं, इथंच जेवायचं!''

काकूंचा तो प्रेमळ आग्रह मला मोडता आला नाही. ज्या कामासाठी मी आले होते ते बोलून झाल्यावर त्यांनी खरंच आमची ताटं वाढली. भाताची सुबक मूद, त्यावर पिवळंधमक वरण, साजूक तूप आणि लिंबाची फोड, शेजारी बटाट्याची भाजी...एवढं वाढून झाल्यावर माझ्याकडे लोणच्याची बरणी देत त्या म्हणाल्या, ''आंब्याचं लोणचं आवडतं ना? घे ना वाढून!'' आणि तेलाची कढई तापत ठेवून डब्यातून सांडगे - पापड काढू लागल्या.

''काकू, अहो काय करताय? कशाला हे आणखी?''

''अगं, चार सांडगे-पापड्या तळते फक्त. तुझ्या निमित्तानं मीही खाईन!''

काकू ऐकायला तयारच नव्हत्या. कितीतरी दिवसांनी असं साग्रसंगीत आयतं वाढलेलं ताट समोर पाहून मला भरून आलं. ते जाणून काकू म्हणाल्या, ''अगं, अनायसे माहेरवाशीण जेवायला यावी तसं वाटलं बघ!''

''पण काकू आज काय आहे नक्की? कुठला सणही नाही.''

''अगं, आज किनई वाढदिवस आहे माझा.''

मला हे सारंच विलक्षण वाटलं. आश्चर्य आवरून त्यांना शुभेच्छा देण्यासाठी तोंड उघडलं तेवढ्यात काकूच म्हणाल्या, ''आश्चर्य वाटलं ना? ही म्हातारी अजून वाढदिवस साजरा करते आहे म्हणून!''

''नाही हो काकू! तुम्हाला कोण म्हणेल म्हातारी. आमच्यापेक्षाही अधिक उत्साही आहात तुम्ही आणि तशाच राहा नेहमी! हीच तुम्हाला शुभेच्छा! आधी माहिती असतं तर काही गिफ्ट नसतं का आणलं?''

''हो ना, आता केक कापायचा तेवढा बाकी राहिला आहे बघ.'' हसता हसता त्यांच्या डोळ्यात नकळत पाणी तरळलं. ''खरं सांगू, यांना

शब्द दिला होता ना? म्हणून घातला हा एवढा घाट!'' काकू म्हणाल्या.

प्रश्नार्थक मुद्रेनं मी त्यांच्याकडे पाहतच राहिले, तसं काकू सांगू लागल्या...

''अगं, उमेदीची सारी वर्षं इतरांची उसाभर करण्यातच सरली. साऱ्या गोष्टींमधून थोडीशी उसंत मिळाली. वाटलं, मुलांसोबत वेळ घालवावा. पण तोपर्यंत त्यांना पंख फुटले होते, दूरदेशी उडून गेली. अचानकच एकाकीपण धावून आलं... भरल्या गोकुळाचं उजाड माळरान झालं... आम्ही दोघंच उरलो. कित्येक दिवस मी रडून काढले. पण एके दिवशी यांनीच समजावलं मला...म्हणाले, ''अगं, आजवर इतकं केलं आपण इतरांसाठी...आता आपण एकमेकांसाठी जगायचं. स्वतःसाठी जगायचं, आपला आपण आनंद शोधायचा...मला सामाजिक कार्याची आवड आहे, वाचनाचा छंद आहे, तो मी पुरा करेन...तुझ्यादेखील कितीतरी गोष्टी करायच्या राहून गेल्या असतील. त्यातला आनंद तू शोध. पूर्वी तुला भरतकाम, कशिदाकारी यांच्यासाठी वेळ मिळायचा नाही ना? आता बघ, सुरुवात केलीस की तुला कितीतरी नव्या कल्पना सुचतील...' यांच्या बोलण्याने मला नवी दिशा दाखवली. जीवन संपलं नाहीये; नव्यानं सुरू झालं आहे, अशी उमेद दिली. खरंतर माझ्यापेक्षा बारा-तेरा वर्षांनी हे मोठे होते; पण या वयातही त्यांनी माझ्यासाठी उसना उत्साह आणला होता. मला निराशेतून बाहेर काढण्याचा त्यांचा प्रयत्न होता. घर टापटीप ठेवणं, नवेनवे पदार्थ करणं, सगळीच कामं मला खूप मनापासून आवडायची. आता तर हाताशी निवांत वेळ होता, छंदही पुरे करता येत होते. मला असं रमलेलं पाहून यांनाही समाधान वाटलं. आजवर एकमेकांचा सहवास फारसा वाटणीला आलेला नव्हता. आता मात्र आम्ही खऱ्या अर्थानं सहजीवन जगू लागलो... समंजसपणानं!

गेली काही वर्षं आम्ही खरंच मनाप्रमाणे जगलो. चित्रपट, नाटकं, पुस्तकं साऱ्यांचा आनंद रसिकतेनं परस्परांशी वाटून घेतला. भरभरून जगलो. त्यांच्या शेवटच्या आजारपणात मात्र माझा धीर सुटला. त्यांच्याशिवाय मी कशी जगू शकेन या विचारानं व्याकूळ झाले. माझी ती अवस्था पाहून त्यांनी माझ्याकडून वचन घेतलं. म्हणाले, ''मी गेलो म्हणून दुःख करू नकोस. आपण एकत्रपणे जो आनंद मिळवला तो आठव. यापुढेही अशीच आनंदात राहा. राहशील ना? तुझ्या हातात कला आहे. काही ना काही करत जा. मी नाही म्हणून एकाकी वाटून घेऊ नकोस. मी काही कामासाठी बाहेर गेलो आहे, परत येणार आहे, असं समज. एकटीसाठी कुठे काय करू, असं म्हणून सणावारी उदास राहू नको. उलट माझी आठवण काढून आवडीचे पदार्थ बनवून आनंदानं खा. तुझ्या वाढदिवशीसुद्धा गोडाधोडाचं झालं पाहिजे घरात! समजलं का?'' मला लटकं रागावून ते म्हणाले. ''त्यांना दिलेला शब्द पाळण्यासाठीच आनंदात जीवन जगण्याचा प्रयत्न करते आहे.'' काकूंनी आवंढा गिळला. ''गेल्या वाढदिवसाला दूधसाखरेचाच नैवेद्य दाखवला देवाला; पण या वेळी मात्र त्यांच्या आवडीच्या शिरा-पुरीचा बेत केला. वाटलं होतं, एकटीला घास घशाखाली उतरेल का? पण देवानं धाडल्यासारखी तू आलीस आणि वाढदिवस साजरा झाला.''

काकूंचं ते बोलणं मी थक्क होऊन ऐकत होते. त्यांच्या उतारवयातल्या त्या समंजस सहजीवनाचं मनोमन कौतुक वाटत होतं. म्हातारपणी त्रागा करून एकमेकांवर राग काढणारी कितीतरी जोडपी मी पाहिली होती; पण भूतकाळातल्या चुका दुरुस्त करत उरलेलं आयुष्य सुखात जगण्याचा विचार करणारं, काका-काकूंसारखं दांपत्य विरळंच असेल. मी माझ्याच विचारांच्या धाग्यात गुंतत गेले होते. डोळ्यांत तरळणारं पाणी पुसत मी म्हटलं, ''काकू, तुम्ही खरंच ग्रेट आहात. तुमच्यासारखं होता येईल का हो मला?''

''अगं, काहीतरीच काय?'' काकू विनयानं म्हणाल्या.

''काकू, तुमचं आणखी एका गोष्टीसाठी खूप कौतुक वाटतं मला. तुमच्या रांगोळीचं...किती तन्मयतेने रोजच्या रोज सुबक रांगोळी काढता तुम्ही...कसं हो जमतं तुम्हाला?''

''अगं, त्यात काय एवढं? लहानपणापासूनच आवड होती मला. पुढे कळत्या वयात समजलं, तुळशीसमोर रांगोळी काढतो तेवढा वेळ नकळत आरोग्यदायी हवा आपल्याला मिळते. दारातली शुभसूचक रांगोळी घरात सुखाच्या लहरी आणते. घरात येणारा माणूस रांगोळीच्या सुखद प्रभावानं सदिच्छा घेऊनच घरी येतो.''

''पण सवड कशी मिळते? आणि कंबर-गुडघे दुखत नाहीत तुमचे?''

''अगं आवड असली की सवड मिळतेच. खरं सांगू...लहानपणी इतका छान हात वळतो रांगोळीसाठी. तो सराव तसाच चालू राहिला तर आपोआप सुंदर नक्षी येते हातातून...आणि या निमित्तानं हालचालसुद्धा होते. उठण्या-बसण्यानं, वळण्या-वाकण्यानं शरीरालाही व्यायाम होतो; नाहीतर मग मात्र कंबर, गुडघे कुरकुरू लागतात. इतक्या सगळ्या गोष्टी साध्य करण्यासाठी दिवसाकाठी फक्त दहाच मिनिटं द्यावी लागतात. अगं पूर्वी दहा माणसांच्या घरात चोवीस तास कामात असायची मी. तेव्हाही हा नेम चुकला नाही.''

''पण काकू, इतक्या सुंदर सुंदर रांगोळ्या तुम्ही रोज काढता, इतकं मन लावून काढलेली ही रांगोळी दुसऱ्या दिवशी पुसून टाकायला काहीच नाही का हो वाटत?''

हसत काकू म्हणाल्या, ''अगं, त्यात काय वाटायचंय? एक रांगोळी पुसल्याशिवाय दुसरी काढता येईल का? नव्यानं काढली जाणारी रांगोळी कदाचित पहिल्या रांगोळीपेक्षा अधिक सुंदर येईल, हो ना? पण पहिलीच रांगोळी आपण पुसून टाकली नाही, तर दुसरी वेगळी आणि त्याहूनही सुंदर रांगोळी आपण काढू शकतो, हे कधीच कळणार नाही आपल्याला!''

''तरी पण रंग, पानं, फुलं यांनी सजवलेली सुंदर रांगोळी कशी पुसून टाकायची हो?''

''अगं वेडे, इतकं मन गुंतवायचं नसतं त्यात. तुला सांगू, जीवनदेखील रांगोळीसारखंच असावं...मनापासून जगायचं...कालच्या रांगोळीत मन रेंगाळलं तर आजचा दिवस कसा रंगवता येणार? चांगलं कर्म, चांगल्या भावना यांचे रंग जीवनातल्या रोजच्या रांगोळीत भरता यायला हवेत. त्याच वेळी काल केलेल्या चांगल्या कर्मांची आठवण पुसून टाकता यायला हवी. म्हणजेच त्या कर्माच्या फळाची आशा हद्पार होईल आणि उत्साहानं नव्या सत्कर्मासाठी आज नव्यानं तयार होता येईल. भूतकाळ पुसून वर्तमानकाळात जगता येईल. जीवनाची ही रांगोळी रोज नव्या पद्धतीनं रेखण्यातच मजा असते. टवटवीत रंगांनी ती उठावदार करायला हवी. कधी तडजोडींचे ठिपके तर कधी आनंदाची फुलं वापरून

ती सुंदर करता यायला हवी. रोजचा दिवस नवी भावना, नवे अनुभव घेऊन येतो. त्याच्या स्वागतासाठी दारात रोज नवी रांगोळी हवीच ना?''

काकूंच्या रांगोळीइतकेच त्यामागचे त्यांचे विचारही सुंदर होते. उद्यापासून आपणही त्यांचं अनुकरण करायचं असं ठरवून मी मनातल्या मनात रांगोळी रेखू लागले.

**(मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित**

**'रुजवाई' या प्रतिमा कुलकर्णी लिखित पुस्तकातून)**


Find us on: facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

नवं कोरं

एक रहस्यमयी हस्तलिखित... एक रहस्यमयी तळं...
आणि दोन गटांची रस्सीखेच... वास्तवाकडून अद्भुततेकडे
नेणारी राजेन्द्र खेर यांची २००५ सालच्या
हॅक्ने लिटररी पुरस्काराने सन्मानित कादंबरी...

बिंदूसरोवर





लेखक -
राजेन्द्र खेर

पृष्ठसंख्या : १८८
किंमत : ₹२५०

Book Available

रामायणात सीतेला पळवलं गेलं...
महाभारतात राज्य हिरावलं गेलं...
तर या कथेत राजाच पळवला गेला...
वत्सदेशाचा संगीतकार राजा उदयन याच्या
सुंदर ऐतिहासिक पर्वाचं पुनरुज्जीवन करणारी कादंबरी

उदयन




लेखक -
राजेन्द्र खेर

पृष्ठसंख्या : ३१६
किंमत : ₹३९५

Book Available

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

# दिनविशेष

## १६ नोव्हेंबर २०२० ते १५ जानेवारी २०२१ दरम्यानचा दिनविशेष

### दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

**खालील संचांवर १६ ते ३० नोव्हेंबर दरम्यान खास सवलत**

**१७ नोव्हेंबर - रत्नाकर मतकरी यांचा जन्मदिन**
'ॲडम', 'एक दिवा विझताना', 'कबंध', 'मध्यरात्रीचे पडघम', 'मृत्युंजयी', 'निर्मनुष्य', 'निजधाम', 'परदेशी', 'फाशी बखळ', 'रंगांधळा', 'संभ्रमाच्या लाटा', 'संदेह', 'स्वप्नातील चांदणे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २२९५/- । सवलत किंमत १५९९/-**

**१७ नोव्हेंबर - मोहना जोगळेकर यांचा जन्मदिन**
'रिक्त' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १६९/-**

**१९ नोव्हेंबर - जॅक शॅफिर यांचा जन्मदिन**
'भल्या दिलाचा माणूस' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३९/-**

**२१ नोव्हेंबर - मंजुश्री गोखले यांचा जन्मदिन**
'आकाश झेलताना', 'ज्ञानसूर्याची सावली', 'हेचि दान देगा देवा!', 'जोहार मायबाप जोहार', 'ओंकाराची रेख जना', 'समर्पण', 'तुकयाची आवली' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २०८०/- । सवलत किंमत १५१९/-**

**२४ नोव्हेंबर - डेल कार्नेगी यांचा जन्मदिन**
'चिंता सोडा सुखाने जगा', 'मजेत जगा आणि आनंदाने काम करा', 'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा', 'आवश्यक अशी पाच लोककौशल्ये', 'स्वत:ला अविस्मरणीय बनवा', 'प्रभावशाली संभाषणाचा झटपट व सोपा मार्ग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२००/- । सवलत किंमत ७९९/-**

**२४ नोव्हेंबर - अरुंधती रॉय यांचा जन्मदिन**
'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२४ नोव्हेंबर - सुधीर गाडगीळ यांचा जन्मदिन**
'लाइफ स्टाइल' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**२६ नोव्हेंबर - वीणा देव यांचा जन्मदिन**
'स्वान्सीतील दिवस' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**२६ नोव्हेंबर - २६-११-२००८ मुंबईवरील हल्ला**
'२६/११ मुंबईवरील हल्ला' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १९९/-**

**२६ नोव्हेंबर - अनंत भोयर यांचा जन्मदिन**
'आभाळझुंज', 'हराळी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५४०/- । सवलत किंमत ३२९/-**

**२८ नोव्हेंबर - विश्वास पाटील यांचा जन्मदिन**
'बंदा रुपाया', 'क्रांतिसूर्य', 'नागकेशर', 'नॉट गॉन विथ द विंड', 'संभाजी', 'गाभुळलेल्या चंद्रबनात' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २३६५/- । सवलत किंमत १७९९/-**

**३० नोव्हेंबर - आनंद यादव यांचा जन्मदिन**
'१९६० नंतरची सामाजिक स्थिती', 'आदिताल', 'आत्मचरित्र मीमांसा', 'भूमिकन्या', 'डवरणी', 'घरभिंती', 'घरजावई', 'गोतावळा', 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या', 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', 'ग्रामसंस्कृती', 'काचवेल', 'खळाळ', 'मायलेकरं', 'माळावरची मैना', 'मळ्याची माती', 'मराठी लघुनिबंधाचा इतिहास', 'मराठी साहित्य - समाज आणि संस्कृती', 'मातीखालची माती', 'माऊली', 'नांगरणी', 'नटरंग', 'पाणभवरे', 'साहित्यिकाचा गाव', 'साहित्याची निर्मितिप्रक्रिया', 'साहित्यिक जडण-घडण', 'सैनिक हो, तुमच्यासाठी', 'शेवटची लढाई', 'स्पर्शकमळे', 'उगवती मने', 'उखडलेली झाडे', 'झाडवाटा', 'झोंबी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ६१२५/- । सवलत किंमत ४४२९/-**

**३० नोव्हेंबर - मार्क ट्वेन यांचा जन्मदिन**
'हकलबेरी फिनची साहसं', 'टॉम सॉयरची साहसं' या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत ७१५/- । सवलत किंमत ४७९/-**

**३० नोव्हेंबर - योजना यादव यांचा जन्मदिन**
'मरी मरी जाय सरीर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ९९/-**

**३० नोव्हेंबर - संजीव परळीकर यांचा जन्मदिन**
'चार जबरदस्त फंडे', 'चार शब्द द्यावे-घ्यावे', 'केल्याने होत आहे

रे...', 'पाल्य व्यक्तिमत्त्वाचा कानमंत्र', 'पुढाकार घ्या', 'विक्री कौशल्य शिका', 'याला जीवन ऐसे नाव', 'झटपट व्यक्तिमत्त्व विकास' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८६०/- । सवलत किंमत ५६९/-**

**३० नोव्हेंबर - हॅरिएट लर्नर यांचा जन्मदिन**
'द डान्स ऑफ अँगर', 'द डान्स ऑफ डिसेप्शन', 'द डान्स ऑफ इन्टिमसी', 'द मदर डान्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०२०/- । सवलत किंमत ६९९/-**

**खालील संचांवर १ ते १५ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**१ डिसेंबर - अर्न्स्ट टोलर यांचा जन्मदिन**
'तुरुंगातील पत्रे' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत १०९/-**

**१ डिसेंबर - हिमसागर जयवंत ठाकूर यांचा जन्मदिन**
'महागाई एक चक्रव्यूह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

**४ डिसेंबर - निक व्होयचिच यांचा जन्मदिन**
'लाइफ विदाउट लिमिट्स' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-**

**६ डिसेंबर - मिनेक शिप्पर यांचा जन्मदिन**
'नेव्हर मॅरी अ वुमन विथ बिग फीट' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४२९/-**

**७ डिसेंबर - विला कॅथर यांचा जन्मदिन**
'देवाची माणसे' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १९९/-**

**९ डिसेंबर - सोनिया गांधी यांचा जन्मदिन**
'निमित्ता निमित्ताने...' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

**११ डिसेंबर - ओशो यांचा जन्मदिन**
'ऐका संतांनो', 'बंडखोर', 'भक्तीत भिजला कबीर', 'ध्यानसूत्र', 'एक एक पाऊल', 'हा शोध वेगळा', 'हसत-खेळत ध्यानधारणा', 'माझे माझ्यापाशी काही नाही', 'मीरा एक वसंत आहे', 'मीरा श्यामरंगी रंगली', 'मीरेची मधुशाला', 'मीरेच्या प्रेमतीर्थावर', 'म्हणे कबीर दिवाणा', 'मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही', 'मृत्यूचं अमरत्व', 'मृत्यायुषी', 'मृत्यू अमृताचे द्वार', 'मुग्ध कहाणी प्रेमाची', 'नानक निरंकारी कवी', 'नानक संसारी संन्यस्त', 'नानक परमात्म्याचा नाद ओम्कार', 'नानक सूर संगीत एक धून', 'नवी पहाट', 'प्रेमरस... कबीरांचा', 'साद घालतो कबीर', 'साक्षात्काराची देणगी', 'शिवसूत्र - भाग १', 'शिवसूत्र - भाग २', 'स्वत:चा शोध', 'विद्रोही' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ४९२५/- । सवलत किंमत ३२४९/-**

**१३ डिसेंबर - मेरी ॲन शाफर यांचा जन्मदिन**
'गर्नसी वाचक मंडळ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

**१५ डिसेंबर - गीता फोगाट यांचा जन्मदिन**
'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १४९/-**

**१५ डिसेंबर - सुरेश पाटील यांचा जन्मदिन**
'दाह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४९/-**

**१५ डिसेंबर - ग्रेचेन रुबिन यांचा जन्मदिन**
'आनंदतरंग' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २४९/-**

**खालील संचांवर १६ ते ३१ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**१६ डिसेंबर - जॅन येगर यांचा जन्मदिन**
'मैत्री अशी आणि तशी', 'वर्क लेस, डू मोअर' या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत ५४५/- । सवलत किंमत ३९९/-**

**१६ डिसेंबर - विजय दिवस**
'परमवीर चक्र' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १२९/-**

**२० डिसेंबर - मॅथ्यू ग्लास यांचा जन्मदिन**
'एन्ड गेम', 'अल्टिमेटम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ५४९/-**

**२१ डिसेंबर - यू. आर. अनंतमूर्ती यांचा जन्मदिन**
'संस्कार', 'अवस्था' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत २९०/- । सवलत किंमत १९९/-**

**२३ डिसेंबर - किसान दिवस**
'आधुनिक द्राक्ष लागवड', 'विपुलाच सृष्टी', 'केल्याने होत आहे रे', 'प्लेन्टी फॉर ऑल', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग', 'शेती करू फायद्याची', 'बोन्साय', 'घरातील बाग', 'छंद बागेचा', 'कॉर्पोरेटला रामराम शेतीला सलाम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत २१०५/- । सवलत किंमत १४३९/-**

**२४ डिसेंबर - मधुवंती सप्रे यांचा जन्मदिन**
'लोकल माझी सखी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ८९/-**

**२४ डिसेंबर - सुरेशचंद्र नाडकर्णी यांचा जन्मदिन**
'गज़ल', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'पृथ्वीवर माणूस उपराच', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ४९९/-**

**२४ डिसेंबर - भारतीय ग्राहक दिन**
'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या सर्व पुस्तकांवर (प्रत्येकी १ प्रत) ४०% सवलत.
**ही सवलत नेट १५००/- व अधिकच्या खरेदीवर लागू.**
'स्वामी', 'श्रीमानयोगी', 'संभाजी' या कादंबऱ्या समाविष्ट नाहीत.

**२५ डिसेंबर - प्रज्ञा ओक यांचा जन्मदिन**
'बुक मार्क' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**२५ डिसेंबर - ख्रिसमस**
बालसाहित्याच्या **१५००च्या** खरेदीवर ४०% सूट

**२८ डिसेंबर - बाबा आमटे यांचा जन्मदिन**
'अमरगीत' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

**२८ डिसेंबर - जॉन ग्रे यांचा जन्मदिन**
' 'स'सुखाचा', 'तो आणि ती', 'तुला आठवताना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८८५/- । सवलत किंमत ५९९/-**

**२८ डिसेंबर - डेव्हिड ॲलन यांचा जन्मदिन**
'गेटिंग थिंग्ज डन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

**३० डिसेंबर - जयसिंगराव पवार यांचा जन्मदिन**
'आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध', 'छत्रपती संभाजी : एक चिकित्सा', 'मराठेशाहीचे अंतरंग', 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे', 'शिवछत्रपती एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८३०/- । सवलत किंमत १२९९/-**

**३१ डिसेंबर - मेगन चान्स यांचा जन्मदिन**
'द स्पिरिच्युॲलिस्ट' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-**

**खालील संचांवर १ ते १५ जानेवारी, २०२१ दरम्यान खास सवलत**

**१ जानेवारी - मायकेल गेट्स गिल यांचा जन्मदिन**
'हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाइफ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २१९/-**

**१ जानेवारी - तान त्वांग एंग यांचा जन्मदिन**
'द गिफ्ट ऑफ रेन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २२९/-**

**१ जानेवारी - पॉल कार्सन यांचा जन्मदिन**
'बिट्रेयल' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**१ जानेवारी - ॲनी बरोज यांचा जन्मदिन**
'गर्नसी वाचक मंडळ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

**१ जानेवारी - नादिया मुराद यांचा जन्मदिन**
'द लास्ट गर्ल' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

**३ जानेवारी - ग्रेटा थुनबर्ग यांचा जन्मदिन**
'ग्रेटाची गोष्ट' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १२५/- । सवलत किंमत ८९/-**

**३ जानेवारी - जसवंत सिंग यांचा जन्मदिन**
'ए कॉल टू ऑनर', 'जिना' या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत ९००/- । सवलत किंमत ४४९/-**

**३ जानेवारी - राजेंद्र खेर यांचा जन्मदिन**
'बिंदू सरोवर', 'उदयन' या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत ६४५/- । सवलत किंमत ४४९/-**

**३ जानेवारी - सावित्रीबाई फुले जयंती**
'महात्मा (जोतीराव फुले)', 'मी मलाला', 'स्टोन्स इन्टू स्कूल', 'थ्री कप्स ऑफ टी', 'माय नेम इज परवाना' या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत १६८५/- । सवलत किंमत ९९९/-**

**४ जानेवारी - कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचा जन्मदिन**
'मराठी भाषा उद्गम व विकास' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत १९९/-**

**७ जानेवारी - शोभा डे यांचा जन्मदिन**
'सिलेक्टिव्ह मेमरी', 'स्पीड पोस्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ७६०/- । सवलत किंमत ५०९/-**

**८ जानेवारी - स्टीफन हॉकिंग यांचा जन्मदिन**
'जॉर्ज अॅन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४८५/- । सवलत किंमत १०२९/-**

**८ जानेवारी - मार्क व्हिक्टर हॅन्सन यांचा जन्मदिन**
'चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल', 'चिकन सूप फॉर द ग्रँड पेरेंट्स सोल भाग १', 'चिकन सूप फॉर द सोल', 'चिकन सूप फॉर द सोल अस्थमा', 'चिकन सूप फॉर द सोल बॅक पेन', 'चिकन सूप फॉर द सोल फॅमिली मॅटर भाग १', 'चिकन सूप फॉर द सोल फॅमिली मॅटर भाग २', 'चिकन सूप फॉर द सोल भाग २', 'चिकन सूप फॉर द सोल भाग ३', 'चिकन सूप फॉर द सोल भाग ५', 'चिकन सूप फॉर द सोल भाग ६', 'चिकन सूप फॉर द सोल टफ टाइम्स, टफ पीपल', 'चिकन सूप फॉर द सोल टू लव्ह भाग १', 'चिकन सूप फॉर द सोल टू लव्ह भाग २', 'चिकन सूप फॉर द टीनएज सोल भाग ३' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३१९५/- । सवलत किंमत २१७९/-**

**९ जानेवारी - विल्बर स्मिथ यांचा जन्मदिन**
'द सेव्हन्थ स्क्रोल' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २७९/-**

**९ जानेवारी - शोभा चित्रे यांचा जन्मदिन**
'एक दिवस', 'पानगळीच्या आठवणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २४९/-**

**१० जानेवारी - निरंजन घाटे यांचा जन्मदिन**
'आल्फ्रेड रसेल वॅलेस', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'असे घडले सहस्रक', 'असे शास्त्रज्ञ असे संशोधन', 'ज्ञानदीप', 'फार फार वर्षांपूर्वी', 'जिज्ञासापूर्ती', 'ज्याचं करावं भलं', 'पर्यावरण प्रदूषण', 'रोबॉट फिक्सिंग', 'शास्त्रज्ञांचे जग', 'स्वप्नचौर्य', 'तरुणांनो होशियार', 'वसुंधरा', 'वेध पर्यावरणाचा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३३७०/- । सवलत किंमत २०४९/-**

**११ जानेवारी - अनू अगरवाल यांचा जन्मदिन**
'अनू'प या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

**११ जानेवारी - वि. स. खांडेकर यांचा जन्मदिन**
एकूण ११९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६,६८५/- । सवलत किंमत १०,५२०/-**

**१२ जानेवारी - स्वामी विवेकानंद जयंती व जागतिक युवा दिन**
'आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद', 'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता', 'चिकन सूप टीनएज सोल', 'चिकन सूप टीनएज सोल भाग २', 'चिकन सूप टीन एज सोल भाग ३', 'मैत्री अशी आणि तशी', 'स्वामी विवेकानंद', ''टीनएजर्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५०/- । सवलत किंमत ११४९/-**


**१२ जानेवारी - मृणालिनी गडकरी यांचा जन्मदिन**
'क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३०९/-**

**१४ जानेवारी - डेव्हिड कर्कपॅट्रिक यांचा जन्मदिन**
'द फेसबुक इफेक्ट' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २९९/-**


आमच्या लेखकांच्या जन्मदिनानिमित्त
तसेच दिनविशेषावर
आधारित विषयावरील पुस्तकसंचावर विशेष सवलत.
❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२
Whats App No. ९४२०५९४६६५
website : www.mehtapublishinghouse.com

**खट्याळ, अल्लड पण महाअवलिया टॉम सॉयर आणि हक फिनची शेकडो वर्षं वाचकांना खिळवून ठेवणारी बेस्ट सेलर्स साहसं आता मराठीत... मार्क ट्वेनच्या तिरपागड्या लेखणीचा अफलातून अभिजात अमेरिकन आविष्कार**





टॉम सॉयरची साहसं

# मार्क ट्वेन

अनुवाद - अवधूत डोंगरे

हकलबेरी फिनची साहसं





पृष्ठसंख्या : २४० । किंमत : ₹३२०

Book Available

पृष्ठसंख्या : ३२० । किंमत : ₹३९५

Book Available

---




**सतराव्या शतकातही तथाकथित नैतिकतेला आव्हान देणाऱ्या नायिकेची अस्वस्थ करणारी गोष्ट... नेथानिएल हॉथॉर्न यांची अभिजात अमेरिकन साहित्यकृती**

प्रायश्चित्त

# नेथानिएल हॉथॉर्न

अनुवाद - श्री. ना. पेंडसे

पृष्ठसंख्या : १६८ । किंमत : ₹२५०

Book Available

पुस्तकांचा
सहवास करतो
मेंदूची मशागत
ज्ञानाची सोबत
मिळत जाते अलगद...

वाचन
माणसाला
परिपूर्ण बनवतं
तर
लेखन
माणसाला
समृद्ध करतं...

पुस्तकं
म्हणजे
खऱ्या ज्ञानाचा स्त्रोत
चला पुस्तकातून घेऊ
साऱ्या विश्वाचा शोध...

वाचन
हीच
ज्ञानाची
गुरुकिल्ली

दोन संस्कृतींची
जोडतो नाळ
सीमेपार घडवतो संवाद
...अनुवाद


मेहता
पब्लिशिंग
हाऊस

१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर,
माडीवाले कॉलनी, पुणे ३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२,
२४४६०३१३, २९५२४०४८
Email: mmgj@mehtapublishinghouse.com
customercare@mehtapublishinghouse.com
Website: www.mehtapublishinghouse.com